अवावर्ती

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ....शिल्पकला.....
सं. क्र. 3045

साक्ष इतिहासाची

REFBK-0024581

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 JUN 1985
19 JUN 1985
19 JUN 1985
18 AUG 1985
25 AUG 1985
4 SEP 1985
25 SEP 1985
7 MAY 1987
2 MAR 1990

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

३०९५
२४५८१
ला.पा.पु.

साक्ष इतिहासाची

अ. वा. वर्टी

REFBK-0024581

प्र.ति.ग्रं. संग्रहालय ठाणे
३०९५
दा. क्र. २४५८१
विनोद ला.पा.पु.
ठाणे स्थल पुस्तक

श्रीविद्या प्रकाशन

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०.

प्रकाशक :

दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© डॉ. अ. वा. वर्टी

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
२८ फेब्रुवारी १९८५

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : २७=५० रुपये

मुद्रक :

यशवंत गोपाळ जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव
पुणे ४११ ०३०

तात्यासाहेब तथा वि. वि. शिरवाडकर

'कुसुमाग्रज'–

ज्यांच्या सहवासात मी आनंदाचे अनेक क्षण टिपले

त्यांस—

अनुक्रमणिका

१	शंभर वर्षांपूर्वीचे एक गाजलेले प्रहसन : मोर एल्एल्. बी.	१
२	सोमनाथ आणि महमूद	१०
३	नाशकातील ख्रिस्तीकरण	५५
४	अहमदशहा दुराणी	६६
५	दोनशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रात	८२
६	मिशनऱ्यांची चिकाटी, ब्राह्मणांचा विरोध !	९४
७	धर्मांतरित : विषप्रयोग फसले !	१००
८	देशी धर्मप्रसारकांना खास शिक्षण	१०७
९	डेव्हिड लिव्हिंग्स्टन नाशिकमध्ये	११४

साक्ष इतिहासाची

१

शंभर वर्षांपूर्वीचे एक गाजलेले प्रहसन : मोर एल्एल्. बी.

मराठी रंगभूमीवर आजही 'करायला गेलो एक', किंवा 'झोपी गेलेला जागा झाला' ह्यासारखी प्रहसने किंवा फार्स येत असतात. परंतु मराठी रंगभूमीवरील फार्सची ही परंपरा मात्र फार जुनी आहे. सत्तर वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर गाजलेल्या अशाच एका फार्सचा किंवा प्रहसनाचा आज परिचय करून द्यावयाचा आहे. 'मोर एलएल्. बी. प्रहसन' हे त्याचे नाव. मात्र हे त्याचे साहित्यिक परीक्षण नव्हे. ज्या काळी हे प्रहसन लिहिले गेले, त्या काळातली म्हणजे सत्तर वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातली सामाजिक परिस्थिती, चालीरीती, त्या वेळची भाषा आणि वाक्प्रचार ह्याविषयीची बरीच गमतीची माहिती त्यावरून मिळते, ती आजच्या वाचकांपुढे ठेवावी, एवढाच उद्देश.

'फार्स' म्हटला की तो खूप विनोदी असावा, अशी आपली कल्पना होते. परंतु पूर्वीचे सारेच फार्स असे विनोदी होते, असे मात्र नव्हे. त्या काळी 'सवाई माधवरावांच्या मृत्यूचा फार्स' देखील असे. परंतु असे असले तरी बहुतेक फार्स मनोरंजनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवूनच लिहिलेले असत. त्या काळात बहुशः पौराणिक नाटके होत. त्यांत विनोद फारसा नसे. विनोद करण्याकरता विदूषक असे, परंतु त्याचा विनोद चित्रविचित्र अंगविक्षेप आणि आचरट कोट्या, ह्यांवरच बहुतेक आधारलेला असे. सुबुद्ध प्रेक्षकांचे ह्या विनोदाने मनोरंजन होण्यासारखे नव्हते. म्हणून मग प्रेक्षकांच्या मनावरील ताण कमी करण्याकरता, मुख्य नाटक संपल्यावर एक छोटासा विनोदी फार्स करण्याची पद्धत प्रचारात आली.

इंग्रजीवरून स्फूर्ती

त्या काळी इंग्लंडातून आलेल्या इंग्रजी नाटक कंपन्या मुंबईत नाट्यप्रयोग करीत. त्यांतल्या काही विनोदी फार्सही करून दाखवीत. ह्या इंग्रजी फार्सांवरून स्फूर्ती घेऊनच

मराठीतही 'फार्स' लिहिले जाऊ लागले. ही प्रथा १८५६ साली अमरचंदवाडीकर नाटक मंडळींनी प्रथम सुरू केली. त्या वेळी फार्सची जाहिरात 'ह्या समयी आम्ही एक नवीन लोकोपयोगी व हसण्याजोगा सर्वोत्कृष्ट फार्स करणार आहो' अशी केली होती. त्यावरून फार्सच्या स्वरूपाची काहीशी कल्पना येऊ शकेल.

मराठीतील फार्स बहुधा लेखकाला, समाजातील अनिष्ट वाटणाऱ्या प्रथांच उपहास करण्याकरता लिहिले जात. त्या काळात 'टोपीवाल्यांची इंग्रजी विद्या' शिकलेला एक वर्ग होता. हा वर्ग स्वतःला 'सुधारक' समजे. त्याचबरोबर इंग्रजी विद्या न शिकलेला सनातनी मतांचाही एक बराच मोठा वर्ग होता. हे दोन्ही वर्ग एकमेकांवर टीका करीत. फार्सांचा उपयोग बहुधा दुसऱ्या पक्षाचा उपहास करण्याकरता, टर उडविण्याकरता केला जाई. 'मोर एल्एल्. बी. प्रहसन'ही असेच सुधारकांची टिंगल करण्याकरता लिहिलेले आहे. ह्या प्रहसनास १९०० च्या सुमारास अमाप लोकप्रियता लाभली होती. आजही भारतीय संस्कृतीची, कौटुंबिक जीवनातील मांगल्याची आणि आजच्या 'सुधारका'ची टर उडविणारी नाटके चांगलीच गल्लाभरू ठरतात, हे आपण पाहतोच. त्या काळातही परिस्थिती काही फारशी वेगळी नव्हती. सनातनी विचारांचे तेव्हाही प्राबल्य होते. नवे ते वाईट आणि आपले जने तेच सोने, असे दाखविणारे फार्स त्यातील सुधारकांच्या उपहासामुळे त्या काळी लोकप्रिय ठरले असल्यास त्यात काहीच नवल नाही.

मोर एल्एल्. बी.

'मोर एल्एल्. बी. प्रहसना'चे लेखक आहेत नारायण हरी भागवत. ना. ह. भागवतांनी बरीच नाटके आणि प्रहसने लिहिलेली दिसतात. सध्या त्यांनी लिहिलेली सात पुस्तके उपलब्ध आहेत. 'भार्याप्रमाद अथवा पति-विटंबना नाटक' हे त्यांनी लिहिलेले पूर्ण नाटक. त्याप्रमाणे त्यांनी लिहिलेले 'फरडा मुत्सद्दी' (१८८५), 'फ्याशनेबल वाईफ अथवा विचारसन्निपात' (१८९०), 'राष्ट्रीय विचार प्रहसन' (१८८६), 'स्त्रीविद्या वैचित्र्यदर्शन प्रहसन' (१८८३), 'हुंडा प्रहसन' (१८८७) आणि 'मोर एल्एल्. बी.' (१८८३) हे फार्स उपलब्ध आहेत. ह्यांतील काही फार्सांच्या एकापेक्षा अधिक आवृत्त्या निघाल्या आहेत. 'मोर एल्एल्. बी.' च्या तर चार आवृत्त्या निघाल्या. त्यावरून त्याच्या लोकप्रियतेची कल्पना येऊ शकते. साधारण हिशेबाने १८८० ते १९०५ पर्यंत म्हणजे सुमारे पंचवीस वर्षे त्याचे रंगभूमीवर सतत प्रयोग होत होते असे दिसते. हे प्रहसन सांगलीकर नाटक मंडळी करीत असे. सांगलीकर नाटक मंडळीने ह्या प्रहसनाचे शेकडयांनी प्रयोग केले आणि हजारो रुपये कमावले, असे रंगभूमीचा इतिहास सांगतो.

'मोर एल्एल्. बी. प्रहसन' ह्या पुस्तकाची तिसरी आवृत्ती १८८९ मधली.

'हे नारायण हरी भागवत यांनी केले' व 'फ्यामिली प्रिंटिंग छापखान्यात छापले' चौथी आवृत्ती १९०३ साली प्रसिद्ध झाली. पुस्तक १/८ क्राऊन साईझचे असून त्याची ६८ पाने आहेत. टाईप मोठा म्हणजे १४ पॉईंटचा वापरला आहे. ह्या प्रहसनात अंदाजे दहा हजार शब्द आहेत. म्हणजे सध्याच्या नेहमीच्या नाटकापेक्षा निम्मा वेळ, फार तर दोन तास ते चालत असावे. दोन्ही आवृत्त्यांची किंमत तीन आणे होती.

कथानक

ह्या प्रहसनाचे कथानक थोडक्यात असे – मोरेश्वर नावाचा तरुण एल्एल्. बी. च्या परीक्षेला बसणार असतो. हा मोरेश्वर म्हणजेच प्रहसनाच्या नावातला 'मोर'. तो 'टोपीवाल्या' ची विद्या शिकलेला असतो व त्याला तिचा 'गुण' लागलेला असतो. बालविवाह त्याला मान्य नसल्यामुळे तो अविवाहित असतो. त्याला 'स्वप्नावस्था' होत असते व प्रकृती ढासळलेली असते. तो म्हणतो, "अगदी नाही नाही म्हटले, तरी या स्वप्नावस्थेने माझे जे हाल मांडलेले आहेत, ते एक आमच्या शरीराला किंवा डॉक्टरसाहेबांना माहीत." आपणाला बायको नाही म्हणून असे होते, अशी त्याची समजूत, म्हणून तो 'मरतुकडा' असला तरी आता लग्न करण्याला आतुर झालेला असतो.

त्याचे वडील खवलेशास्त्री कोकणातून मुंबईला त्याच्याकडे येतात. त्यांचे वय ऐंशी वर्षांचे असते. परंतु तो त्यांचा अपमान करून, 'थेरडा', 'खवल्या' म्हणून हाकलून लावतो. बापाने पैसे मागितले तर तो म्हणतो, "खवलेशास्त्री, तुम्हीच सांगा की, तुमच्या प्रपितामहांनी येथे फुकट पैसे लोंबते आडकावून ठेवले आहेत – ते तोडावेत आणि तुमच्याकडे पाठवावे?" मुलाने आपला पणजा काढल्यावर बाप बिचारा कोकणात निघून जातो.

मोराचा मित्र चिंतामणी त्याची थोडी कानउघाडणी करतो. तो म्हणतो, "तुमच्या देशाची हवा उष्ण, तुमचे आयुर्मान कमी", म्हणून बालपणीच लग्न करणे योग्य. तेव्हा मोरेश्वर "आपल्या मनात तर लग्न करावयाचे फारच भरले आहे", असे सांगतो. चिंतामणी सांगतो, "त्या म्हाताऱ्यावरची (मोरेश्वरचे वडील) ही घोरपड काढून 'दर्शनविवाह' कराल तर मी म्हणतो सोन्याहून पिवळेच होईल!" 'दर्शनविवाह' म्हणजे प्रेमविवाहासारखाच प्रकार. स्वतः मुलगी पाहून लग्न करावयाचे. चिंतामणीच्या गावी बचंभट लग्ने जुळविणारा भिक्षुक असतो. त्याला मोरेश्वर पत्र लिहितो आणि ते आपल्या वडलांजवळ देऊन 'निकलच्या आगबोटीने' कोकणात, जाऊन बचंभटाला द्यावयास सांगतो. मुलगा 'परक्या देशात' म्हणजे मुंबईत आजारी आहे असे कळल्याने खवलेशास्त्री आलेले असतात. ते असे भ्रमनिरास होऊन आणि अपमानित होऊन परत कोकणात जातात.

कोकणात आल्यावर ते बचंभटाकडे जातात, आणि सांगतात, "हा घ्या बुवा तुमचा फंड आमच्याकडे आला आहे." असे सांगून ते बचंभटाला पत्र देतात. बचंभट साळूबाई नावाची एक विधवा असते तिचे साहाय्य घेतात. हिरवेकर काका गाडगिळांची तेरा वर्षांची मुलगी गोदावरी अविवाहित असते. ती 'उफाड्याची पोर' असते व 'दोन वुके' शिकलेली असते. तिचे लग्न मोरेश्वराशी जमवून द्यायचे व 'दोन सल्ले' नि एक 'तीन तोळ्यांचं जोडवं' त्यातून काढायचे असे ठरवून साळू गाडगिळांकडे जाते.

साळू गाडगिळांकडे येऊन चिमाताईला म्हणजे गाडगिळांच्या कुटुंबाला, गोदी फार वाढल्यामुळे गावातील लोक काहीबाही बोलतात, असे सांगते. लोक म्हणतात, "ती आता आपल्या नवऱ्याला भाक्री भाजायला लावील!" बायका म्हणतात, "काय ग बाई, ही येवढी थोरली मुलगी न्हाण आल्याबाचून कशी राहील!" त्याच वेळी बचंभटही येतो. तोही अशाच गोष्टी सांगून खबल्याच्या मुलाचे नाव सुचवितो– आणि अखेरीस गाडगीळ तिचे लग्न मोराबरोबर लावून देण्यास तयार होतात. कारण गाडगीळ म्हणतात, "तोच तर तिचा माझ्या गळ्याला मोठा फास लागून राहला आहे!"

आचरट मोर

मोरेश्वर मुलगी पाहायला कोकणात जाबयास निघाले, तेव्हा बरोबर एक डॉक्टर घेण्याची त्याची इच्छा असते. डॉक्टरकडून त्याला मुलीची शारीरिक तपासणी करून घ्यायची असते. तो कारण सांगतो, "असेच एक लग्न झाले. आणि मग पुढे लग्न झाल्यावर मुलीला, झाकलेल्या शरीराच्या भागात काही खोड होती, आणि ती मग उघडकीस आली. तेव्हा त्याजबद्दल एडिटरने रिमार्क केली होती, की हा असा परिणाम घडून येण्याचे कारण, नवरी पहिल्याने डॉक्टरकडे तपासण्याकरिता पाठवलेली नव्हती!" त्याचा मित्र चिंतामणी ह्या खुळेपणाबद्दल त्याची कानउघाडणी करतो. शिवाय तो डॉक्टर होता प्रभू जातीचा. चिंतामणी म्हणतो, "तो प्रभू, आपण ब्राह्मण, आपल्या खेडेगावात त्याचे कसे जमणार?" अखेरीस मोर आपले मित्र नरशा, केशा व डॉक्टर ह्यांना घेऊन कोकणात जातो.

गाडगिळांच्या घरी गेल्यावर ते गोदीला शाळेतून बोलावून आणण्याकरता जातात. तेवढ्यात मोर, बरोबर आणलेली व्हिस्की, त्याचे मित्र नको नको म्हणत असता पितो. 'दारू पिण्याचा व डाळकुरमुरे फाकण्याचा थाट उडतो.'

बचंभट व गोदीला घेऊन गाडगीळ येतात. 'गोदी लाजत लाजत पुढे सरते.' मोर तिला प्रश्न विचारतो, "एक गोष्ट विचारतो ती सांगा म्हणजे झाले.– ती अशी की हातावर हात मारतात त्याला काय बरे म्हणतात?" गोदी आढेवेढे घेऊन उत्तर देते, "त्याला टाळी म्हणतात." मोर विचारतो, "शाबास– पण टाळी देण्याचा

अर्थ काय ? हाही प्रश्नच आहे समजा. " तेव्हा दोन बुके शिकलेली, तेरा वर्षांची उफाड्याची गोदी उत्तर देते, " काही एक विषयाच्या संबंधाने बोलणं चाललं असता त्या विषयाचं सत्यत्व बाहेर पडल्याच्या योगाने जो आनंद होतो, त्या आनंदाची दर्शक टाळी आहे ! " मोर खुश होतो. तो म्हणतो, " वाहवा, वाहवा, मोठे पसंत उत्तर दिले ! "

मोरला मुलगी पसंत पडली. गाडगीळ गरीब होते. ते म्हणाले, " आता इतकेच, पोरीचे म्हणून पैसे मला द्यायचे नाहीत, मी आपला दूधभात घालून पोरीला देणार, त्यांनी मणिमंगळसूत्र घातलं तरी मला पत्करले. " गाडगीळ विचारतात, " बचंभट, पाळीबिळीचा घरात आधी शोध करा हो. " ती काही अडचण नसल्यामुळे मोरेश्वर – गोदीचे शुभमंगल होते.

पहिली रात्र

मोरेश्वर एकटाच मुंबईला येतो. श्वशुरांकडून, त्याच्या सौ. ला ऋतू प्राप्त झाल्याकारणाने माहेरचा सोहळा आम्ही सुरू केला आहे, गर्भाधान करण्याकरिता तिला मुंबईला नेण्याची लवकर तजवीज करावी, म्हणजे १६ दिवसांच्या आत झाल्यास, नवीन मुहूर्त वगैरे पाहण्याची पंचाईत पडणार नाही, असे पत्र येते. हे पत्र पाहून मोरला चिंता वाटू लागते. त्याला वाटते, " अरेरे ! लग्न केले ही गोष्ट फार वाईट झाली ! कारण, आधीच माझी प्रकृती बिघडलेली. पण तिला येव्हाशीच येथे न आणावी म्हणावे, तरी चांगले दिसत नाही. कारण, ती आता एन उमेदीत आलेली. तशातून शिकलेली ! म्हणजे जुन्या बायकांप्रमाणे तिला पापाची भीती नसणार. पुरुषसंग, ज्याला आमचे जुने लोक व्यभिचार करणे, म्हणजे स्त्रीजातीस महान पातक समजतात, ते तिच्या खिजगणतीतले !....सुधारलेल्या जगात व्यभिचाराला पातक मुळीच म्हणत नाहीत ! आणि आम्ही रिफॉर्मंड नोशनचे असल्याने (मोर नाटकात इंग्रजी खूप बोलतो. पण ते पुष्कळसे गावठी इंग्रजी असते. एकदा तर तो हवाफेराला ' चेंज ऑफ एअर ' असेही म्हणतो ! त्याच्या तोंडी नाटककाराने असले इंग्रजी मुद्दाम घातले आहे की नाटककाराचेच इंग्रजीचे ज्ञान तितकेच होते, कळण्यास मार्ग नाही.) तो विचार आम्हाला सर्वथैव मान्य आहे. " तो गोदीला आणि तिच्या घरच्या मंडळींना बोलवून घेतो.

गोदी रात्री त्याच्या खोलीत येते. परंतु प्रथम तो प्रुफे तपासत बसतो. मग पुस्तक वाचीत बसतो. गोदी चिडते आणि रात्री तीनला ' रागाने हांत्रुणावर ' एका बाजूस अस्ताव्यस्त पडते व तिला थोडा वेळ झोप लागते. पहाटे चारला तो ' आय थिंक आय शॅल बी हॅपी नाऊ, बिकॉज शी गॉट साऊंड स्लीप ' असे म्हणून ' तिच्या शेजारी जाऊ लागतो. ती खडबडून जागी होते आणि उठून बसते. ४ चा ठोका घड्याळात पडतो. तो दचक्याने मागे सरतो. गोदावरी बसलेली दिसते.

उरलेला वेळ कसा काढावा ह्या विचाराने तो काही तरी अचकटविचकट बोलतो. तिच्या अंगाचा संताप होऊन ती आपल्याशीच पुटपुटते....डोळे लाल करून दणादण जिना उतरत अतिक्रोधाने आंधेरात खांबापाशी जाऊन उभी राहते.'

शिव ! शिव !

चिमाबाई– तिची आई– तिला काय झाले म्हणून विचारते– "गोदे, होतं तरी काय तुला ?" गोदी म्हणते, "मसणं होतं– " आई म्हणते, "सांग तरी तुला काय होतं ते ?" गोदी म्हणते, "आई आता काय डोंबल सांगू मी तुला !" आईने बरेच छेडल्यावर गोदी म्हणते, "मी भलतंसलतं काही बडबडत नाही– पण आई, एल्एल्. बी. ग एल्एल्. बी. !" आई विचारते, "हे लबी लबी काय म्हणतेस ? अग, रात्री झालं तरी काय ?" गोदी सांगते, "व्हायचं ते काय ! गेल्ये तशीच परत आल्ये ! म्हणून म्हणते बरं का, एखादा पाणक्या नवरा मिळता तरी पत्करला." आईला राग येतो. ती म्हणते, "तू पडलीस उमेदवार मुलगी, नि त्यात ही मुंबईची वस्ती. मेलं नित्य उठून डोकंभर केस राखलेले सोळभोंक येतच असतात. नि पाहते तो त्यांची सगळी नजर तुझ्याकडेच !....शिव शिव ! ! ! देवा असेच का सगळे शिकलेले लोक असतील ! ! नि त्यांच्या का हाती ही आमची सुजनता देणार ? म्हणजे आधीच आम्ही अबला म्हणजे विचारहीन.– त्यात अशांची संगत ! म्हणजे पातिव्रत्यधर्माचा लयच ! दुसरे काय ! ! !"

येथे प्रहसन संपते.

सुधारकांचा उपहास

ह्या कथानकावरून लक्षात येईल, की त्याची रचना 'सुधारका'ची टिंगल, उपहास, विडंबन करण्याच्या हेतूनेच केली आहे. 'सुधारक' मोरेश्वर आपल्या बापाचा अपमान करून त्याला हाकलून देतो, त्याला स्त्रीचा व्यभिचार हे पाप वाटत नाही, कारण तो 'रिफॉर्मड नोशन'चा माणूस आहे. तो दारू पितो. हे सर्व दुर्गुण त्याच्यात 'टोपीवाल्या'च्या विद्येमुळेच आलेत, असे नाटककाराला सुचवायचे आहे. त्याचबरोबर पाहावयास जाणाऱ्या मुलीची डॉक्टरकडून आधी 'शारीरिक तपासणी' करून घेण्यासारख्या आचरट कल्पनाही त्याच्या डोक्यात आहेत. गर्भाधानाकरता म्हणून त्याची नवपरिणीत वधू त्याच्याकडे येते. त्या वेळची त्याची बागणूक म्हणजे तर मूर्खपणाचा कळसच आहे. इंग्रजी शिकल्याने शरीराची नासाडी होते, असेही लेखकाने सुचविले आहे. मोरेश्वराचे असे बावळट, मूर्ख, व्यसनी आणि दुर्गुणी पात्र निर्माण करून लेखकाला सुधारकांविषयी तिरस्कार निर्माण करावयाचा आहे, त्यांना हास्यास्पद करून सोडावयाचे आहे, हे स्पष्ट दिसते. इंग्रजी शिकलेले लोक मर्ख, नेभळे, आणि पौरुषहीन होतात, लहानपणी लग्न न केल्याने त्यांची

प्रकृती 'मरतुकडी' होते, आणि अशांना आपल्या मुली देणे म्हणजे–'शिव शिव!!! तो पातिव्रत्यधर्माचा लयच ! दुसरे काय !' असा भयंकर निष्कर्ष लेखकाने काढला आहे. ज्या अर्थी साधारण पंचवीस वर्षांत ह्या फार्सचे शेकडयांनी प्रयोग झाले, त्याअर्थी त्या काळच्या प्रेक्षकांना 'सुधारकां'ची टिंगल आजच्याप्रमाणेच खूप आवडत असली पाहिजे, हे स्पष्ट दिसते.

मोरेश्वरच्या आचरट कल्पनांमुळे विनोद उत्पन्न होतो. त्याच्या जोडीला वचंभट–साळू ही लग्न जुळविणारी जोडीही विनोदनिर्मिती करते. ही लोभी जोडी गाडगीळ कुटुंबाला लग्नाकरता कशी युक्तियुक्तीने मनुष्यस्वभावातील वैगुण्यांचा फायदा घेऊन, तयार करते, हे पाहताना प्रेक्षकांना निश्चितच हसू येत असले पाहिजे. ह्या फार्सात शाब्दिक कोटयांवर आधारलेला विनोद फारसा नाही. सारा विनोद स्वभावचित्रणावर आणि घटनांवरच आधारलेला आहे.

भाषा

ह्या फार्सची भाषा पाहिली म्हणजे गेल्या सत्तर वर्षांत मराठी भाषेत किती फरक पडला आहे, ह्याची कल्पना येते. त्या वेळचे अनेक शब्द आज प्रचारात नाहीत. कित्येक शब्दांची त्या वेळची रूपे वेगळीच होती. तसेच वाक्यरचना बरीच सैल होती. आज एखाद्या नटाने ह्या फार्सातील वाक्ये म्हटली तर त्याला त्यातून कितपत रस निर्माण करता येईल, ह्याची शंकाच आहे. आजच्या नाटकातील संवाद आणि ह्या फार्सातील संवाद ह्यांच्या स्वरूपात आणि रचनेत जमीन–अस्मानाचे अंतर आहे. त्याचप्रमाणे लेखनपद्धतीही जरा निराळी होती. 'वा !' या बदली 'वः !', 'एकूण' च्या ऐवजी 'एकन', 'भाकरी' ऐवजी 'भाक्री', 'बोलली' ऐवजी 'बोल्ली', 'होकार' ऐवजी 'हुकार', अशी शब्दांची निराळी रूपे पुष्कळ दिसतात. त्याचप्रमाणे काही शब्दांचे अर्थ आपणास आज सहजासहजी कळणार नाहीत. 'रिणायत स्वरूप्या', 'पेंढ' (पुल्लिंगी), 'तुक्का' (भिक्षुकीचा तुक्का), असे भाषेतून बाहेर पडलेले काही शब्द आढळतात. त्याप्रमाणे आज आपण जे शब्द ग्राम्य, किंवा सदभिरुचीला सोडून मानतो असेही शब्द अगदी मोकळ्या मनाने वापरलेले दिसतात. 'रंडकी', 'रांडबोडकी', 'न्हाण', 'पाळीबिळी', असे शब्द जागोजाग भेटतात. आजच्या नाटकांतून न आढळणारे 'शिव शिव !', 'हर हर !' हे उद्गारही ह्या फार्सात आहेत.

पूर्वीची भाषा आजच्या भाषेपेक्षा अधिक ग्राम्य होती. बोलण्यात पूर्वी सहज शिव्यांचा उपयोग करीत. तिचे काहीसे प्रतिबिंब ह्या फार्सात दिसते. आज आपण 'बाईविना बुवा', 'अजगर' सारख्या, झोपडपट्टीवरील कादंबऱ्यांविरुद्ध त्या ओंगळ, अश्लील आहेत म्हणून ओरड करतो. परंतु हा फार्सही अशा नवकादंबऱ्यांना हार

जाण्यासारखा नाही. त्यात स्वप्नावस्था आहे. न्हाण, पाळी, गर्भाधान, रांडबोडकी, व्यभिचार हे तर आहेतच. परंतु शेवटी तर लेखकाने कमालच केली आहे. पहिल्या रात्री, पहाटे चार वाजता, गोदीजवळ जाऊन मोरेश्वर म्हणतो, " आपण गर्भाशयातून निघाल्यावर ज्याच्या जोरावर आपण अन्न खाऊ लागतो, त्या दुधाची जागा किती मृदू आणि सुरेख असते ! हा पाहिलात ना काय विलक्षण प्रकार आहे ! हे काय असते ते आपल्याला ठाऊक आहे काय ?.... स्तन म्हणजे स्त्रियांच्या शरीराच्या उरपृष्ठ-भागावर दोन गोळे अति सूक्ष्म अशा पातळ पाकळ्यांचे एकावर एक अनेक थर बनून झालेले असतात ! ईश्वराने हा काय विलक्षण देखावा आणि अकल्पित योजना केलेली आहे ही ! " ह्यापेक्षा आपले आजचे अतिनवलेखक तरी अधिक ओंगळ, अश्लील काय लिहू शकणार ?

वेगळेच तंत्र

बहुतेक जुन्या नाटकात अंक असतात, व त्यात प्रवेश असतात. परंतु ह्या फार्सात नुसते सात प्रवेशच आहेत. एका प्रवेशात एकच स्थळ अपेक्षित असते. ह्या फार्सातील काही प्रवेश दोन दोन, तीन तीन स्थळी घडतात. त्या वेळी फिरता, सरकता किंवा जॅक नाईफ रंगमंच नव्हता. मग हे स्थानांतर कसे करीत असावेत ? बहुधा संभाषण चालू असता निरनिराळ्या देखाव्यांचे पडदे टाकत असतील, किंवा लोकनाट्याप्रमाणे कोऱ्या पडद्यांवरच नाटक करीत असतील. स्थळ कोणते आहे हे स्पष्ट करण्याची काळजी, संवादांतून घेतलेली आहे. पाचवा प्रवेश बंदर, रस्ता व गाडगिळांचे घर अशा तीन ठिकाणी घडतो. ' तो त्या होडीतून आलेला दिसतो ', असे बचंभट म्हणतो व आपण बंदरावर आहे असे सुचवितो. नंतर तो ' पुढे चालू लागतो ' व मागून इतर मंडळी जातात. अर्थात तो रस्ता जाता जाता ते गाडगिळांच्या घरी जाऊन पोहोचतात. हे सारे पात्रांच्या हालचालीवरून ओळखायचे. गाडगिळांच्या घराजवळ आल्यावर मोरेश्वर इंग्रजीत म्हणतो, " हे गाडगिळांचे घर आले, " की समजायचे आता गाडगिळांचे घर आले आहे.

ह्यापेक्षाही शेवटचा सातवा प्रवेश रंगभूमीवर कसा करीत असतील, कोण जाणे. हा प्रवेश रंगभूमीवर साधारण वीसएक मिनिटे चालतो, परंतु तेवढ्या अवधीत संध्याकाळपासून उजाडेपर्यंतचा काळ जातो. काही काळ गेला आहे दाखविण्याकरता सध्या रंगमंचावर अंधार करतात. परंतु तेव्हा विजेचे तर सोडाच पण पेट्रोमॅक्सचेही दिवे नव्हते. मशाली किंवा कंदील लावून प्रयोग व्हायचे. मग ' तीन वाजले ', ' चार वाजले, ' ' पाच वाजले, ' हा कालप्रवाह कसा दाखवीत असतील, सांगलीकर मंडळीच जाणे ! त्या वेळी रंगमंचावर किती वाजले हे दाखविण्याकरता घड्याळ ठेवलेले असले तर त्यात हे दर पाचदहा वाक्यांनंतर बदलणारे तास कसे दाखवीत असतील, हाही एक कुतूहलाचाच विषय आहे.

सामाजिक स्थिती

ह्या फार्सावरून त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीवरही प्रकाश पडतो. त्या वेळी भिक्षुक लग्ने जुळवीत. तेरा वर्षांची मुलगी पित्याच्या 'गळ्याशी' येई. लग्नाआधी नहाण आले तर प्रायश्चित्त घ्यावे लागे. लग्नात बायकोला मांडीवर घेऊन 'विड्या तोडण्या'सारखे खेळ होत. शिक्षितांत मद्यपानाचा प्रसार होत होता. तीन बुके शिकलेल्या मुलींना सुशिक्षित समजत. शिकलेल्या स्त्रिया व्यभिचारी असतात व त्यात त्यांना पाप वाटत नाही, अशी समजूत होती. त्या वेळी बहुधा, जलद वाहनांचा अभाव असल्यामुळे मुंबईला कोकणातील लोक 'परका देश' मानीत. मुंबई आधीपासून इंग्रजांच्या ताब्यात असल्यामुळेही तसे म्हणत असतील. त्या काळात पन्नास रुपयांच्या नोटा होत्या. प्रवासात 'कार्पेट ब्याग' (?) वापरीत आणि कोकणात 'निकलच्या (?) आगबोटी'ने जात. लग्नात मुलीचा बाप वराकडून पैसे घेत असावा. प्रभू, ब्राह्मण, ब्राह्मणातील पोटजाती, इतर जाती ह्यांच्यातील भेदाभेद आणि शिवाशिवीच्या कल्पना जोसात होत्या. तोंडात सूत ठेवून शपथ घेतली तर ती लागू पडत नाही, अशी समजूत होती. त्या वेळी शिद्दी लोक गुलाम म्हणून आणत. स्वस्ताई अर्थातच खूप होती.

आज आपल्याला ह्या फार्सातील भाषा ग्राम्य वाटते, संवाद ओबडधोबड वाटतात, स्वभावचित्रण आणि घटना ढोबळ वाटतात, पण तरीही सत्तर वर्षांपूर्वीच्या मराठी समाजाचे एक गंमतीदार चित्र तो आपल्या डोळ्यांसमोर उभे करतो. आज तेच त्याचे महत्त्व.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३०९५
शाखा: ठाणे

२

सोमनाथ आणि महमूद

प्रत्येक राष्ट्राचे काही मानबिंदू असतात. ते वास्तूच्या रूपाने असतील, गीताच्या रूपात असतील किंवा ध्वजासारख्या चिन्हांच्या स्वरूपात असतील. एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर विजय मिळविला तर जित राष्ट्राच्या ह्या मानबिंदूंचा अपमान करणे, त्यांचा विध्वंस करणे, ही जेत्या राष्ट्रांची नेहमीचीच परंपरा आहे. प्राचीन काळापासून तो आजतागायत ह्या गोष्टीची इतिहासात प्रचिती मिळते. जेते राष्ट्र असंस्कृत, धर्मवेडाने पछाडलेले असेल तर जित राष्ट्राच्या मानबिंदूचा ते निर्दयपणे संहार करते. भारताच्या राष्ट्रीय मानबिंदूवर असा पहिला प्रहार गझनीच्या महमुदाने केला. सौराष्ट्रातील श्रीसोमनाथ तीर्थ हे भारताचा त्या काळी एक मानबिंदू होते. साऱ्या भारतातून राजेरजवाडे आणि सामान्य लोक सोमनाथाची पूजा करण्याकरता येत. साऱ्या भारतात काशी इतकेच हिंदूंचे हे महत्त्वाचे पवित्र तीर्थक्षेत्र होते. इ. स. ८ जानेवारी १०२६ ह्या दिवशी शुक्रवार होता. त्या दिवशी सकाळी नऊ वाजून शेहेचाळीस मिनिटांनी महमुदाने हिंदूंना अति-पवित्र वाटणाऱ्या सोमनाथाच्या मूर्तीवर प्रहार केला आणि ती छिन्नविच्छिन्न केली. सोमनाथाच्या मूर्तीवर महमुदाच्या घणाचे घाव बसत होते, नव्हे ते भारतातील प्रत्येक हिंदुमात्राच्या हृदयावर बसत होते. त्या वेदना नऊ शतकांपेक्षा अधिक काळ हिंदू हृदयात सलत राहिल्या.

ह्या पहिल्या प्रहारानंतर मुसलमान राजांनी अनेकदा सोमनाथाचे मंदिर उद्ध्वस्त केले. प्रत्येक वेळी हिंदूंनी त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. सोमनाथ हा भारतीयांचा मानबिंदू होता. परकीय जेत्यांनी केलेली त्याची अवहेलना धुऊन काढल्याशिवाय भारतीयांना स्वस्थता वाटणे शक्य नव्हते. मुसलमानांनी सोमनाथ मंदिराचा विध्वंस करावा आणि हिंदूंनी ते पुन्हा बांधून काढावे, हे चक्र नऊ शतके चालू राहिले. आणि अखेरीस १९५१ सालची मे महिन्यातील ११ तारखेला स्वतंत्र भारताच्या राष्ट्रपतींनी सोमनाथाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा केली. तो दिवसही

शुक्रवारच होता आणि वेळही बरोबर नऊ वाजून शहेचाळीस मिनिटे हीच होती.

त्या दिवशी, भारताच्या इतिहासातील सतत नऊ शतके वाहणारी एक जखम भरून निघाली. भारताचा एक राष्ट्रीय अपमान धुऊन निघाला.

श्रीसोमनाथ तीर्थाचा संहार आणि त्याची नऊ शतकांनंतर झालेली पुनः प्रतिष्ठापना ह्यांचा हा संक्षिप्त इतिहास, मुस्लिम आणि मुस्लिमेतर इतिहासकारांच्या लेखनातून संकलित केलेला.

गझनीचा महमूद

बालपण

महमूद हा गझनीचा राजा सबक्तगीन ह्याचा सर्वांत थोरला मुलगा. सबक्तगीनाला 'अमीर-इ-आदील' म्हणजे 'न्यायी' ही पदवी देण्यात आली होती. बुखाऱ्याचा अमीर नूह ह्याचा तो मांडलिक होता. त्याचप्रमाणे त्याच्या साम्राज्याचा तो एक आधारस्तंभ होता. महमुदाचा जन्म इ. स. १ नोव्हेंबर ९७१ ह्या दिवशी झाला. त्याचे संपूर्ण नाव अब्दुल कासीम महमूद असे होते.

त्याची आई झाबुलीस्तानच्या एका सरदाराची कन्या होती. म्हणून त्याला 'महमूद-इ-झाबुली' असेही म्हणत. फिर्दौसी हा प्रख्यात फारसी कवी मात्र महमूद हा दासीपुत्र होता, असे म्हणतो.

महमुदाच्या जन्माच्या वेळी काही अद्‌भुत घटना घडून आल्याचे काही मुस्लिम इतिहासकारांनी नमूद करून ठेवले आहे. त्याच्या जन्माआधी थोडाच वेळ सबक्तगिनाला एक स्वप्न पडले. त्याच्या खोलीतील एका भांड्यातून एक झाड उगवले आणि पाहता पाहता त्याच्या फांद्या एवढ्या झपाट्याने पसरल्या की त्यांनी सारे जग व्यापून टाकले. त्याच्या पत्नीच्या पोटी जन्माला येणारा मुलगा जगज्जेता आणि मूर्तिभंजक निपजणार ह्याची ती परमेश्वरी सूचना होती. तसेच महमुदाचा जन्म झाला त्याच क्षणी भारतातील वाहिंड शहरातील मूर्तिपूजकांचे एक मंदिर कोसळून पडले. अशा आख्यायिका पुढे मोठ्या झालेल्या प्रत्येक माणसाच्या जन्माशी जोडण्यात येतात. अलेक्झँडरच्या जन्माच्या वेळीही अशाच गोष्टी घडल्या होत्या. पराक्रमी माणसाच्या जन्मालाही अद्‌भुततेचे वलय असावे, अशी त्याच्या भक्तांची इच्छा असते, एवढाच त्याचा अर्थ!

बालपणी एका विद्वान शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली त्याला शिक्षण देण्यात आले. त्या काळच्या निरनिराळ्या ज्ञानशाखांचे आणि धार्मिक शिक्षण राजपुत्रांना देत, त्याप्रमाणे त्याचे शिक्षण झाले. त्याने कुराण मुखोद्‌गत केले आणि मुस्लिम कायदा व परंपरा ह्यांच्या ज्ञानातही तो पारंगत झाला. राजनीती आणि युद्धनीती ह्यांचेही त्याला शिक्षण देण्यात आले. तलवार, भाला आणि धनुष्यबाण ही शस्त्रे चालविण्यात

तो तरबेज झाला. आपल्या पित्याबरोबर तो स्वारीवर जाई. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्याने घुर लोकांच्यावरील स्वारीत भाग घेतला. वयाच्या पंधराव्या वर्षी त्याच्या वडिलांची राजा जयपालाशी लमघान येथे लढाई झाली (इ. स. ९८६). तिच्यात त्याने मोठीच बहादुरी गाजवली.

बापलेकांत वितुष्ट

काही लोकांनी त्याच्या वडिलांच्या मनात त्याच्याविषयी विष कालवले. म्हणून सबक्तगिनाने त्याला इ. स. ९९० मध्ये गझनीच्या किल्ल्यात कैद करून ठेवले. परंतु थोड्याच दिवसांत पितापुत्रांची मने साफ झाली. इ. स. ९९४ मध्ये अबू अली सिमजुरी व फियाक ह्यांच्याशी सबक्तगिनाची लढाई झाली. ह्या लढाईत महमुदाने चांगला पराक्रम गाजविला. ते पाहून अमीराने त्याला 'सैफुद्-दौला' हा किताब दिला आणि त्याला अबू अलीच्या जागी खुरासानच्या सैन्याचा सेनापती नेमले.

परंतु थोड्याच दिवसांत, महमुदाजवळ थोडे सैन्य आहे असे पाहून, अबू अली व फियाक ह्यांनी निशापूर ह्या खुरासानच्या राजधानीवर हल्ला केला. ह्या लढाईत महमुदाचा पराभव झाला. शत्रूने त्याचे हत्ती पकडून नेले आणि निशापूर कबीज केले. नंतर थोड्याच दिवसांत सबक्तगीन आपल्या मुलाच्या मदतीला मोठे सैन्य घेऊन आला. त्याने शत्रूचा पराभव केला. अबू अलीचे बरेच अधिकारी त्याने कैद केले. अखेरीस अबू अलीने पकडलेल्या हत्तींच्या मोबदल्यात त्याने हे अधिकारी मुक्त केले.

सबक्तगिनाची शक्ती वाढत असलेली पाहून बुखाऱ्याच्या अमिराचा वझीर त्याचा द्वेष करू लागला. त्याने सबक्तगिनाच्या विरुद्ध कारवाया सुरू केल्या. तेव्हा सबक्तगिनाने महमुदाला बीस हजार निवडक सैन्य देऊन वझिराचर पाठविले. युद्धात वझिराचा पराभव झाला. त्याला महमुदाने पदच्युत करून त्याच्या जागी आपल्या पसंतीचा वझीर नेमला (इ. स. ९९६). तो ह्या कामात गुंतलेला पाहून अबू अलीचा भाऊ अब्दुल कासीम ह्याने निशापूर जिंकून घेतले. परंतु महमूद परत येताच त्याने लढाई न देताच पळ काढला.

महमुदाने खुरासानमधील सर्व विरोध मोडून काढला होता. खुरासानवरील आपली हुकमत त्याने पक्की केली होती. परंतु ह्यानंतर थोड्याच दिवसांत सबक्तगीन मरण पावला आणि महमुदाला आपल्या बापाच्या राज्यावर हक्क शाबीत करण्याकरता गझनीला जावे लागले.

गादीकरिता झगडा

सबक्तगीन बल्खहून गझनीला परतत असताना वाटेतच (इ. स. ९९७) मरण पावला. पण मरणापूर्वी त्याने इस्माईल नावाच्या आपल्या दुसऱ्या मुलाल

बल्ख (बाल्हीक) आणि गझनीच्या राज्याचे वारस नेमले. इस्माईल हा महमुदापेक्षा वयाने लहान होता. तो त्याचा सावत्रभाऊ होता. त्याची आई अलप्तगीन ह्या सरदाराची मुलगी होती. अलप्तगिनाकडे सबक्तगिनाने उमेदवारीच्या काळात चाकरी केलेली होती. अलप्तगीन प्रथम गुलाम होता, पण नंतर तो काबूलचा राजा झाला. सबक्तगीनही अलप्तगिनाचा गुलाम होता. अल्पतगिनानंतर तो काबूलच्या गादीवर आला होता. ह्या अलप्तगिनाच्या मुलीपासून इस्माईल जन्मला होता. मरणापूर्वी सबक्तगिनाने आपल्या सरदारांकडून इस्माईलशी एकनिष्ठ राहू अशा शपथा घेतल्या होत्या. इस्माईलने लगेच आपण राजा आहोत असे घोषित केले आणि तो बुखाऱ्याच्या अमिराकडे त्याचा पाठिंबा मिळावा म्हणून गेला. त्याच्या बापाने–सबक्तगिनाने–काटकसर करून खूप द्रव्य जमा करून ठेवले होते. ते त्याने महमुदाबरोबर होणाऱ्या आगामी संघर्षात सैनिकांची मदत मिळावी म्हणून त्यांच्यात मुक्त हस्ताने वाटून टाकले.

बापाचा वारसा इस्माईलला मिळावा, हे अर्थातच महमुदाला मान्य होण्यासारखे नव्हते. तो सर्वांत थोरला पुत्र होता. तसाच कर्तबगार आणि पराक्रमी होता. त्याने इस्माईलकडे आपला वकील पाठविला व आपणाला गझनीचे राज्य दिले तर आपण तुला बल्ख व खुरासनची जहागीर देऊ असे कळविले. इस्माईलने ह्याला मान्यता दिली नाही. महमुदाचा सासरा जुझानानचा राजा होता. त्याने दोघा भावांत मध्यस्थी करून समेट करण्याचा प्रयत्न केला. परंतु इस्माईलने त्याच्या मध्यस्थीस नकार दिला. तेव्हा महमूद गझनीवर चाल करून गेला. त्याने इस्माईलला समजाविण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न केला. परंतु इस्माईलला तो महमुदाचा कमकुवतपणा वाटला आणि त्याने पुन्हा नकार दिला तेव्हा युद्धाला तोंड लागले. दोघांची सैन्ये संख्येने सारखीच होती. परंतु त्यांच्या नेत्यांमध्ये फरक होता. इस्माईल युद्धनीतीत अननुभवी होता. त्याचे सर्व आयुष्य विद्वानांच्या आणि कवींच्या सहवासात गेले होते. महमूद मात्र अनेक लढाया खेळलेला आणि युद्धशास्त्रात निपुण असा रांगडा सेनानी होता. इ. स. ९९८ च्या मार्चमध्ये दोघा भावांचे युद्ध झाले. त्यात महमुदाचा विजय झाला. इस्माईलने किल्ल्याचा आश्रय घेतला, परंतु फार काळ तग धरणे अशक्य आहे असे दिसून आल्यावर आणि महमुदाकडून अभय मिळाल्यावर तो महमुदाला शरण आला. त्याची अवघी सात महिन्यांची कारकीर्द संपुष्टात आली आणि महमूद गझनीचा सुलतान बनला. त्याने इस्माईलला कैदेत ठेवले. तो नंतर कैदेतच मरण पावला.

येथे मोगल इतिहासातील अशाच एका प्रसंगाची आठवण होणे स्वाभाविक आहे. शहाजहानच्या मृत्यूनंतर त्याचे पुत्र दारा शिकोह आणि औरंगजेब ह्यांच्यात गादीकरता झगडा झाला. दारा विद्येचा व्यासंगी, तत्त्वज्ञानी, काव्यात्मवृत्तीचा आणि उदार मनाचा होता. औरंगजेब लढवय्या, कपटनीतिनिपुण आणि धर्मवेडा, असहिष्णू

होता. ह्या झगड्यातही औरंगजेबाचाच जय झाला. राज्य वळकावयाचे असेल तर तेथे विद्वत्ता, साहित्य-कलांची आवड, सुसंस्कृतता, ह्या सद्‌गुणांपेक्षा निराळ्याच गुणांची आवश्यकता असते, हेच ह्यावरून दिसून येते.

भारतावरील स्वाऱ्या

गझनीच्या गादीवर महमूद इ. स. ९९८ मध्ये बसला. त्याचा मृत्यू ३० एप्रिल १०३० रोजी झाला. त्याच्या आयुष्याची ही बत्तीस वर्षे सतत लढाया करण्यात गेली. त्याने मध्य आशियात, इराणात आणि सिस्तानमध्ये अनेक स्वाऱ्या केल्या. आणि ह्या सर्व लढायांत विजय संपादन केले. युद्धाशिवाय त्याचे एकही वर्ष गेले नाही. एक पराक्रमी विजेता म्हणून त्याची सर्वत्र कीर्ती झाली. ह्या युद्धात त्याने अनेक शहरे उद्‌ध्वस्त केली, अनेक कत्तली केल्या. महमुदाचे नाव काढताच शत्रुपक्षाचा थरकाप होई, एवढा दरारा त्याने निर्माण केला.

पश्चिमेप्रमाणेच पूर्व दिशेला भारतातही त्याने अनेक स्वाऱ्या केल्या.

भारतावरील स्वाऱ्यांना अलप्तगिनापासूनच सुरुवात झाली होती. त्या वेळी वाहिंड म्हणजे आजचे हुन्द येथे हिन्दुशाही वंशाचे राजे राज्य करीत होते. वाहिंडला राजतरंगिणीकार कल्हण उद्‌भाण्ड म्हणतो. सबक्तगिनाने इ. स. ९८६-८७ मध्ये राजा जयपालावर स्वारी केली होती, तेव्हा महमूदही त्याच्या बरोबर होता. ह्या स्वारीत सबक्तगिनाने पेशावरपर्यंत आपल्या राज्याची सरहद्द वाढवली आणि जिंकलेल्या मुलखातील लोकांना मुस्लिम धर्माची दीक्षा दिली. महमुदाने अलप्तगीन आणि सबक्तगिनाचेच धोरण पुढ चालू ठेवले. इ. स. ९९९ मध्ये बगदादच्या खलिफाने महमुदाला स्वतंत्र राजा म्हणून मान्यता दिली आणि तेव्हा त्याने दर वर्षी भारतावर स्वारी करून धर्मप्रसार करण्याची प्रतिज्ञा केली.

त्याने पहिली स्वारी इ. स. १००० मध्ये केली. तेव्हा तो भारतात फारसा आत आला नाही. लमघानच्या आसपासचे काही किल्ले त्याने काबीज केले आणि तो गझनीला परत आला.

त्यानंतर बरोबर एक वर्षाने म्हणजे सप्टेंबर १००१ मध्ये त्याने भारतावर दुसरी स्वारी केली. सबक्तगिनाने वायव्य भारतातला जो भाग जिंकून घेतला होता, तो जयपालाने परत घेतला होता. जयपालाचे पारिपत्य करण्याकरता ही स्वारी होती. महमुदाकडे पंधरा हजार स्वार आणि पुष्कळ पायदळ होते. जयपालाकडे बारा हजार स्वार, तीस हजार पायदळ आणि तीनशे लढाऊ हत्ती होते. (हे आकडे मुस्लिम इतिहासकारांनी दिले आहेत. नेहमी आपले सैन्य कमी, शत्रूचे जास्त आणि तरीही आम्ही विजय मिळविला, असे दाखविण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते, ही गोष्ट ध्यानात ठेवावी). दोन्ही सैन्यांचे तळ पेशावरजवळ समोरासमोर पडले. २७ नोव्हेंबर १००१ ह्या दिवशी सकाळी युद्धाला तोंड लागले. दुपारपर्यंत युद्धाची धुमश्चक्री

चालली. महमुदाचे घोडेस्वार एकामागून एक हल्ले चढवीत होते. त्या हल्ल्यांचा जोर हिन्दू सेनेला सहन न होऊन पळापळ सुरू झाली. जयपालाचे पाच हजार सैनिक रणांगणावर पडले आणि त्याचा पराभव झाला.

ह्या युद्धात महमुदाला फार मोठी लूट मिळाली. पंधरा मोत्यांचे हार आणि दुसरी अगणित संपत्ती मिळाली. त्यातील एका हाराचीच किंमत ऐशी हजार दिनार होती. जयपाल आणि त्याचे पंधरा पुत्र आणि नातू महमुदाच्या हातात सापडले. त्यांना त्याने मिरान्ड ह्या गावी कैदेत ठेवले. नंतर तह होऊन जयपालाने अडीच लक्ष दिनार व पन्नास हत्ती द्यावेत असे ठरले आणि त्यांना मुक्त करण्यात आले. पण त्याचा एक मुलगा आणि एक नातू ह्यांना महमुदाने ओलीस म्हणून ठेवून घेतले.

ह्या विजयानंतर महमूद वाहिंडला गेला. उरलेल्या हिवाळ्यात त्याने आजूबाजूचा मुलूख काबीज केला. नंतर एप्रिलमध्ये तो गझनीला परतला. ह्या विजयानंतर महमुदाला 'गाझी' म्हणण्यात येऊ लागले.

ह्या युद्धातील पराभव जयपालाच्या जिव्हारी लागला. पंजाबात परतल्यावर इ. स. १००२ च्या शेवटी त्याने अग्निप्रवेश करून आपल्या जीवनाचा अंत केला. त्यानंतर त्याचा पुत्र आनंदपाल गादीवर आला.

आनंदपालचा पराभव

इ. स. १००६ च्या मार्च–एप्रिलमध्ये महमुदाने भारतावर तिसरी स्वारी केली. मुलतानचा राजा दाऊद ह्याच्यावर महमुदाला हल्ला करावयाचा होता. ह्याकरता त्याला सिंधू नदी पार करावयाची होती. परंतु ती सिंधमधून पार करणे धोक्याचे होते. म्हणून ती त्याने पेशावरजवळून पार करण्याचा विचार केला. ह्याकरता त्याला आनंदपालच्या मुलुखातून जावे लागत होते. म्हणून त्याने आनंदपालची परवानगी मागितली. परंतु त्याने महमुदाला नकार दिला आणि दाऊदच्या संरक्षणाकरता तो सैन्य घेऊन पेशावरच्या दिशेने निघाला. महमुदाशी त्याचे युद्ध झाले. पण तो पराभूत झाला. महमुदाने त्याचा चिनाब नदीपर्यंत पाठलाग केला. नंतर आनंदपालने काश्मीरमधील डोंगराचा आश्रय घेतला. तेव्हा त्याचा पाठलाग करण्याचे सोडून देऊन महमूद गझनीला परतला.

महमुदाची शक्ती दिवसेंदिवस वाढत आहे हे पाहून आनंदपाल चिंताग्रस्त झाला. ह्या मुसलमानांच्या स्वाऱ्यांना पायबंद घालावा म्हणून त्याने आजूबाजूच्या राजांकडून सैन्याची कुमक मागितली. सर्व राजांनी आनंदाने आपले सैन्य त्याच्या मदतीला पाठवले. फार मोठी सेना जमली. तिचे आधिपत्य आनंदपालचा पुत्र ब्रह्मपाल ह्याच्याकडे देण्यात आले. त्याने हा सेनासंभार घेऊन पेशावरच्या दिशेन कूच केले.

महमुदाला ह्याची बातमी लागताच तोही आपले सैन्य घेऊन निघाला. सिंधू

नदी पार करून तो वाहिंडच्या मैदानात आला. तेथे ब्रह्मपालाच्या सैन्याशी त्याची गाठ पडली. युद्धाला तोंड लागले. भारतीयांची सरशी होऊ लागली. त्यांच्या पराक्रमापुढे मुसलमानांना तग धरणे अशक्य होऊ लागले. एवढ्यात सुलतान महमुदाने आपल्या खास हुजरातीला ब्रह्मपालाच्या सैन्याच्या पिछाडीवर हल्ला करण्याकरिता पाठविले. ह्या हल्ल्याला तोंड देण्याकरता ब्रह्मपाल आपल्या सैन्याची रचना बदलत असताना सैन्यात गोंधळ माजला आणि त्यातच त्याचा पराभव झाला. महमुदाला ह्या लढाईत बरीच लूट आणि तीस हत्ती मिळाले.

नगरकोटची लूट

सुलतानाने हिंदू सैन्याचा पाठलाग सुरू केला. ब्रह्मपालाने नगरकोटच्या किल्ल्यात आश्रय घेतला. हा किल्ला कांग्न्याजवळ एका टेकडीच्या टोकावर असून तो चारही बाजूंनी बाणगंगा नदीने वेढलेला आहे. ह्या किल्ल्यातील मंदिर अतिशय पवित्र मानले जात होते. आणि त्याच्या श्रीमंतीची कीर्ती दूरवर पसरलेली होती. सुलतानाने किल्ल्याला वेढा दिला. तीन दिवसांनंतर किल्ला पडला. किल्ल्यात त्याला अगणित संपत्ती मिळाली. सात कोटी दिनार, सत्तर हजार मण सोने आणि चांदी आणि भारी किंमतीची वस्त्रे त्याला मिळाली. शिवाय तीस वार लांब आणि पंधरा वार रुंद असा चांदीचा देव्हारा आणि चाळीस वार लांब व वीस वार रुंद मखमलीचे व सोन्याचांदीचे दांडे असलेले भव्य छत्र मिळाले. पांडववंशातील राजा भीमाचे मानले जाणारे सुशोभित सिंहासनही त्याला लुटीत मिळाले. नगरकोटचा किल्ला ह्या भीमराजाने बांधला होता, असे मानले जात होते. ही अमाप लूट घऊन आणि किल्ल्यात आपला एक किल्लेदार नेमून महमूद इ. स. १००९ च्या जूनमध्ये गझनीला परत गेला.

सुलतान गझनीला गेल्यावर आनंदपालने त्याने जिंकलेला सर्व मुलूख परत जिंकून घेतला. त्याने नंदन नावाची नवी राजधानी वसवली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी तो मरण पावला आणि त्याचा मुलगा त्रिलोचनपाल गादीवर बसला.

त्रिलोचनपालावर स्वारी

इ. स. १०१३ च्या नोव्हेंबरात महमूद त्रिलोचनपालावर स्वारी करण्याकरता निघाला. परंतु जोराचा हिमवर्षाव सुरू झाल्यामुळे तो गझनीला परत गेला तो पुन्हा १०१४ च्या मार्चमध्ये नंदनवर स्वारी करण्याकरता निघाला. सुलतान निघाला आहे ही वार्ता कळताच त्रिलोचनपालाने आपला पुत्र 'निडर' भीमपाल ह्याच्याकडे किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली आणि तो स्वतः काश्मीरचा राजा संग्रामराज ह्याच्याकडे कुमक आणण्याकरता गेला. नंदनचा किल्ला दोन टेकड्या जेथे मिळत होत्या, अशा ठिकाणी होता. त्या दोन टेकड्यांमध्ये छोटीशी खिंड होती.

त्या खिंडीत हत्तींची रांग उभी करून भीमपाल महमुदाला तोंड देण्यास सिद्ध होऊन उभा ठाकला. बरेच दिवस महमुदाने ह्या खिंडीवर हल्ले केले, परंतु त्याची काही मात्रा चालेना. पण अखेरीस त्याने भीमपालाला खिंडीतून बाहेर काढले आणि त्याचा पराभव केला.

परंतु नंतर भीमपालाला कुमक येऊन मिळाली. टेकडी सैन्याच्या पिछाडीला घेऊन आणि दोन्ही बगलांवर हत्तींच्या रांगा उभ्या करून, त्याने सुलतानावर हल्ला चढविला. परंतु त्याला मागे हटावे लागले. तेव्हा त्याने हत्ती महमुदाच्या सैन्यावर सोडले, परंतु मुसलमानांनी हत्तींच्या डोळ्यांवर आणि सोंडींवर नेम धरून बाणांचा तुफान मारा केला, तेव्हा हत्ती मागे पळू लागले. हिंदू सैन्यात गोंधळ माजला आणि त्याने नंदनच्या किल्ल्यात आश्रय घेतला. महमुदाने किल्ल्याला वेढा दिला. तटांना सुरुंग लावले. तुर्कोमान तिरंदाजांनी किल्ल्यातील सैन्यावर बाणांचा तुफान वर्षाव केला. तेव्हा काही उपाय न राहून आतील सैन्य बिनशर्त शरण आले. सुलतान किल्ल्यात शिरला आणि त्याने अनेक हत्ती, शस्त्रास्त्रे, जडजवाहीर अशी खूप लूट मिळवली. ह्या किल्ल्यातील देवळात एक मूर्ती होती. ती चाळीस हजार वर्षांपूर्वी बनविण्यात आली होती, असा तिच्यावर एक लेख होता, असे गर्दिझी हा इतिहासकार लिहितो.

त्यानंतर महमूद त्रिलोचनपालाचा समाचार घेण्याकरता काश्मीरकडे निघाला. काश्मीरचा सेनापती तुंग हा होता. महमुदाच्या टेहळणीच्या एका तुकडीचा त्याने सहजगत्या पराभव केल्यामुळे आपण महमुदाचा सहज पराभव करू असे त्याला वाटू लागले. परंतु 'युद्धशास्त्रात निपुण' असलेल्या 'तुरुष्कांच्या सेनापतीने' स्वत: काश्मिरी सैन्यावर हल्ला चढवला आणि विजय संपादन केला, असे राजतरंगिणीकार कल्हण म्हणतो. त्यानंतर त्रिलोचनपालाचाही पराभव झाला.

त्रिलोचनपालावरील महमुदाच्या ह्या विजयाची वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळे आसपासच्या अनेक राजांनी महमुदाचे मांडलिकत्व पतकरले आणि काहींनी तर इस्लामी धर्माचा स्वीकारही केला. नवीन धर्मांतरितांना धर्मशिक्षण देण्याकरता महमुदाने मौलवींची नेमणूक केली आणि सर्वत्र मशिदी बांधण्याचा हुकूम सोडला. इ. स. १०१४ मध्ये तो गझनीला परत गेला.

मथुरेचा विध्वंस

२७ सप्टेंबर १०१८ ला सुलतान महमूद कनौजवर स्वारी करण्याकरता गझनीहून निघाला. वाटेत लागणाऱ्या नद्या वरच्या बाजून पार करण्याकरता तो हिमालयाच्या पायथ्याजवळून सैन्य घेऊन आला. कालिंजरचा राजा बद्दी ह्याचा मुलगा शाही नावाचा होता. त्याचा मुलगा जानकी. जानकीने महमुदाला मार्गदर्शन

केले आणि कनौजला जाण्याकरता महमुदाने २ डिसेंबरला १०१८ ह्या दिवशी यमुना पार केली.

गंगा-यमुनेच्या दुआबात प्रवेश केल्यानंतर महमुदाने अनेक शहरांना वेढे, घातले आणि एकामागोमाग एक विजय संपादन करीत आणि लूट गोळा करीत तो कनौजच्या दिशेने चालू लागला. वाटेत त्याने शिर्शवचा किल्ला घेतला. नंतर बरन आणि बुलंदशायरवर तो चालून गेला. बरनचा राजा हरदत्त त्याला शरण गेला आणि दहा हजार लोकांसमवेत त्याने इस्लामची दीक्षा घेतली.

तेथून महमूद महावनला गेला. तेथील राजा कुलचंदचा त्याने पराभव केला. कुलचंदाचे सैन्य पळू लागले. कित्येकांनी यमुनेत उडया घेतल्या, त्यांतील पुष्कळ प्रवाहाबरोबर वाहून गेले. बाकीच्यांना पकडण्यात आले किंवा ठार करण्यात आले. कोठेच जाण्यास मार्ग नाही असे पाहून कुलचंदाने प्रथम आपल्या राणीस मारून टाकले व नंतर आपल्या छातीत कटयार खुपसून घेऊन त्याने स्वत:चाही अंत करून घेतला. महमुदाला १८५ हत्ती आणि पुष्कळ लूट मिळाली.

त्यानंतर महमुदाने आपला मोर्चा मथुरेकडे वळविला. मथुरेभोवती तट होता, आणि त्याला दोन वेशी होत्या. मथुरा चांगले सुरक्षित शहर होते. परंतु महमूद येताच तेथील सैन्याने काहीही प्रतिकार न करता शरणागती पतकरली. मथुरेत शेकडो सुंदर देवालये होती. शहरातील घरांच्या छपरावर त्यांचे कळस चमकत असत. ह्या मंदिरांच्या शिल्पसौंदर्याने महमूद एवढा प्रभावित झाला की, त्याने गझनीतील आपल्या अमिरांना पाठविलेल्या पत्रात हिंदूंच्या शिल्पकलेची मुक्तकंठाने स्तुती केली, परंतु त्याला त्या मंदिराचे शिल्पसौंदर्य आवडले असले तरी त्याला त्याच्या मूर्तिभंजनाच्या प्रवृत्तीवर विजय मिळविता आला नाही. मंदिरातील सर्व संपत्ती लुटून झाल्यावर त्याने ती मंदिरे जाळून भस्मसात केली.

येथील लुटीत त्याला सुवर्णाच्या पाच मूर्ती मिळाल्या. त्यांतील एका मूर्तीचे डोळे माणकांचे होते. ह्या दोन माणकांची किंमत पन्नास हजार दिनार होती. ह्याशिवाय त्याला चांदीच्या दोनशे मूर्ती आणि एक फार मोठया आकाराचा इंद्रनील मणी मिळाला.

कनौजाचा पाडाव

काही सैन्य मथुरेत ठेवून महमूद कनौजकडे वळला. कनौज ही प्रतिहार सम्राटांची राजधानी होती आणि त्यांचे साम्राज्य उत्तर भारतात पसरलेले होते. महमूद कनौजला २० डिसेंबर १०१८ ह्या दिवशी पोहोचला. तो आल्याचे कळताच कनौजचा सम्राट राज्यपाल गंगा उतरून बारीच्या किल्ल्यात पळून गेला. महमुदाने तो किल्ला एका दिवसात जिंकून घेतला. कनौज शहरात महमुदाच्या सैन्याने भयंकर लूट केली. हिंदूंना कैद करण्यात आले किंवा त्यांची कत्तल करण्यात आली.

कनौजहून परत जाताना त्याने मुंजच्या किल्ल्याला वेढा घातला. मुंज हा ब्राह्मणांचा किल्ला होता. त्यातील सैन्याने तटावरून उडया मारून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ह्या प्रयत्नात बहुतेक सैनिक मरण पावले.

त्यानंतर महमुदाने असईचा किल्ला जिंकून घेतला. तेथून जाऊन त्याने शर्वच्या किल्ल्याला वेढा घातला. तेथील राजा चंदरायने त्याच्याशी लढाई दिली पण तो पराभूत झाला.

ह्या स्वारीत सुलतानाला मिळालेली एकूण लूट तीस लाख दर्हेम एवढया किंमतीची होती. त्याने आपल्यावरोबर पंचावन्न हजार गुलाम आणि ३५० हत्तीही गझनीला नेले.

हिंदुशाही वंशाचा शेवट

इ. स. १०१९ च्या प्रारंभी महमूद पुन्हा भारतावरील स्वारीला निघाला. कालिंजरच्या चंदेववंशीय राजा गंड ह्याने आनंदपालाचा पुत्र त्रिलोचनपालाशी युती केली होती. त्याला शिक्षा करण्याचा महमुदाचा उद्देश होता. महमूद येतो आहे असे कळताच त्रिलोचनपालने कनौजच्या सैन्याशी हातमिळवणी केली. तो रामगंगा नदी पार करून गेला आणि तेथे सुलतानाला अडविण्याकरता उभा ठाकला. अशा स्थितीत नदी पार करणे महमुदाला धोक्याचे होते. परंतु त्याच्या आठ धाडशी सैनिकांनी हवा भरलेल्या पखाली नदीत घातल्या. आणि त्यांच्या आधाराने ते नदी पार करू लागले. त्यांना पाहून त्रिलोचनपालाने काही तिरंदाज आणि पाच हत्ती त्यांच्यावर पाठविले. त्या आठ सैनिकांवर बाणांचा वर्षाव झाला. परंतु त्यांनी पोहता पोहता तिरंदाजी केली आणि पैलतीर गाठले. त्या आठांचे हे धाडसी कृत्य पाहून इतर सैनिकांनाही स्फुरण चढले. त्यातून सुलतानाने त्यांना सांगितले, 'आजचा दिवस त्रास घ्या, मग उद्या मजा करा.' त्यावरोबर त्याच्या सैनिकांनी, कोणी घोडयांवरून तर कोणी पखालींवरून अशा नदीत उडया घेतल्या आणि एकही सैनिक न गमावता सर्वांनी नदी पार केली. नंतर झालेल्या लढाईत त्यांनी त्रिलोचनपालचा पराभव केला. नंतर मिळालेल्या लुटीतला महमुदाचा वाटा २७० हत्ती आणि रत्नांच्या दोन थैल्या एवढा होता.

त्रिलोचनपाल युद्धात जखमी झाला होता, तरी तो महमुदाच्या हातून निसटला. दोन वर्षांनी त्याच्याच माणसांनी त्याचा वध केला. त्याच्यानंतर 'निडर' भीमपाल हा त्याचा पुत्र गादीवर आला. आता त्याचे राज्य नाममात्र राहिले होते. तो इ. स. १०२६ मध्ये मरण पावला व त्याच्या बरोबरच हिंदुशाही वंशाचा शेवट झाला. अल्-बरुनी आणि कल्हण ह्यांच्या मते ह्या वंशातील राजे विद्येचे प्रेम, औदार्य आणि सुजनता ह्या गुणांविषयी प्रख्यात होते.

गंडाचा पराभव

त्यानंतर महमुदाने आपला मोर्चा कालिंजरचा राजा गंड ह्याच्याकडे वळविला. ह्या वेळी गंडाजवळ अफाट सैन्य जमा झालेले होते. मुस्लिम इतिहासकारांच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या सैन्यात १,४५,००० घोडेस्वार आणि ६४० लढाऊ हत्ती होते. हा प्रचंड सेनासागर महमुदाला गाठण्यासाठी सामोरा गेला. महमुदानेही आपल्या सैन्याची युद्धाकरता रचना करून गंडाकडे आपला वकील पाठविला. गंडाने मसलमान व्हावे आणि खंडणी द्यावी, अशा अटी त्याने कळविल्या. त्या अर्थातच गंडाने नाकारल्या. दोन्ही सैन्ये युद्धाच्या तयारीने उभी राहिली.

त्या वेळी सुलतान एका टेकडीवर चढला आणि तेथून त्याने गंडाच्या सैन्याची पाहणी केली. समोरचा तो अफाट सेनासागर पाहून क्षणभर तो गलितधैर्य झाला. त्याच्या डोळ्यांसमोर क्षितिजापर्यंत शिबिरे, तंबू आणि तट पसरलेले दिसत होते. आपण एवढ्या दूर युद्धाला यावयास नको होते, असाही विचार त्याच्या मनाला चाटून गेला. त्या निराशेच्या अवस्थेत त्याने तेथेच गुडघे टेकून ईश्वराची प्रार्थना केली. त्यामुळे त्याच्या मनाला धीर आला. संध्याकाळी एक छोटीशी चकमक झाली. तिच्यात त्याचा विजय झाला. तेव्हा त्याला खूपच हुरूप आला.

दुसऱ्या दिवशी महमुदाने गंडाकडे पुन्हा आपला वकील पाठवला. परंतु तो जाऊन पाहतो तो त्याला गंडाच्या सैन्याचा मागमूसही दिसेना. कोणत्या तरी अनाकलनीय कारणामुळे गंड घाबरून गेला होता आणि रात्रीच्या अंधारात त्याने सैन्यासह पळ काढला होता !

ह्या अनपेक्षित सुदैवी घटनेबद्दल महमुदाने ईश्वराचे आभार मानले. त्याने शत्रुसैनिक कोठ लपलेले नाहीत ना, ह्याची खात्री करून घेतली आणि मग गंडाच्या शिबिराची लुटालूट सुरू केली. त्याला तेथे बराच ऐवज सापडला. गंडाचे ५८० हत्ती घेऊन महमूद गझनीला परत गेला.

मुलतानवरील स्वाऱ्या

महमद बिन कासीमने केलेल्या स्वारीपासूनच मुलतान हे मुसलमानी धर्माचे भारतातील एका ठाणे बनलेले होते. परंतु थोड्याच वर्षांत मुलतानमध्ये करमाती (कार्माथियन) लोकांनी वर्चस्व प्रस्थापित केले. करमाती हे मुसलमानच होते, परंतु ते बगदादच्या खलिफाचा अधिकार मानीत नसत. सबक्तगिनाबरोबर मुलतानचा करमाती राजा अबुल-फथ दाऊद बिन नासीर ह्याचे सलोख्याचे संबंध होते. पण महमूद भाटिंडाच्या स्वारीहून परतत असताना मुलतान प्रांतातून गेला. ते दाऊदला आवडले नाही. त्यामुळे त्यांच्यात वैमनस्य आले. दाऊदच्या ह्या उद्धटपणाबद्दल त्याला प्रायश्चित्त देण्याच्या उद्देशाने महमूद त्याच्यावर स्वारी करण्याकरता निघाला पेशावरजवळ त्याची आनंदपालाची गाठ पडली. त्याचा पराभव करून महमूद

मुलतान प्रांतात शिरला. (आनंदपालावरोबरच्या लढाईची हकिगत आधी येऊन गेलीच आहे.)

महमूद येताच दाऊद सिंधू नदीतील एका वेटावर आश्रयाला गेला. मुलतान-मध्ये ठेवलेल्या सैन्याने शहराभोवतीच्या तटांचे दरवाजे बंद करून घेतले. महमुदाने तटाला वेढा घातला. सात दिवसांच्या युद्धानंतर शहर पडले. शहरवासीयांनी महमुदाकडे संरक्षणाची याचना केली व त्या मोबदल्यात दोन कोटी दिर्हेमचा दंड देण्याचे कबूल केले (इ. स. १००६). महमुदाने ती रक्कम घेऊन नागरिकांना संरक्षण दिले. परंतु करमातींना मात्र त्याने काहीही दयामाया दाखविली नाही. आपल्या धर्माकरता शेकडो करमातींनी प्राणांचे बलिदान केले. महमुदाने त्यांची मशीद-देखील उद्ध्वस्त केली. मशिदीला 'हिन्याच्या पेंढ्या ठेवलेल्या' गोठ्याची दशा झाली. 'आबादुल मलुक' ह्या इतिहासग्रंथात वर्णन केले आहे, 'महमुदाने इतक्या करमातींना कंठस्नान घातले की शहराच्या पश्चिमेस असलेल्या लोहारी दरवाज्यातून रक्ताची नदी वाहू लागली....गोठलेल्या रक्ताने सुलतानाचा हात तलवारीच्या मुठीला घट्ट चिकटून बसला. गरम पाण्यात बुडवून तो सोडवावा लागला.'

त्यानंतर सुलतान महमूद मुलतान व भाटिंडा ह्यांच्या आसपासचा प्रदेश जिंकण्याच्या कामाला लागला. परंतु खुरासानमध्ये इलकखानाने उचल केल्याची वार्ता आल्यामुळे, त्याने सुखपाल ऊर्फ नवासशहा ह्याला मुलतानचा सुभेदार नेमले आणि तो गझनीला निघून गेला.

सुखपाल

सुखपाल हा हिंदुशाही वंशातील राजा जयपाल ह्याचा नातू. इ. स. १००१ मध्ये पेशावरजवळ झालेल्या युद्धात महमुदाने जयपालाचा पराभव केला होता. त्या वेळी त्याने ओलीस म्हणून जयपालाचा एक मुलगा व एक नातू आपल्याजवळ ठेवून घेतले होते. निशापूरच्या युद्धात अबू अलीने हे युद्धकैदी महमुदाकडून जिंकून घेतले. जयपालाचा तो नातू म्हणजे सुखपाल. त्याला अबू अलीने मुसलमान बनविले. तेव्हापासून त्याला 'नवासशहा' म्हणू लागले. नवासशहा म्हणजे राजाचा नातू.

इलकखानाबरोबर लढण्यात महमूद गुंतला आहे असे पाहून सुखपालने मुसलमानी धर्माचा त्याग केला व त्याने बंडाचा झेंडा उभारला. ते पाहून महमूद मुलतानवर चालून आला (इ. स. १००८). सुखपालने लढाई दिली परंतु पराभूत होऊन तो पंजाबात आनंदपालाच्या आश्रयाला गेला. पण अखेरीला महमुदाने सुख-पालास पकडून आणले. महमुदाने त्याच्याकडून चार लक्ष दिर्हेमचा दंड वसूल केला आणि त्याला कैदेत टाकले.

इ. स. १००६ मध्ये मुलतान प्रांत जिंकण्याचे काम अर्धवट टाकून महमुदाला परत जावे लागले होते. म्हणून तो इ. स. १०१० च्या ऑक्टोबरमध्ये मुलतानमध्ये

परत आला आणि त्याने ते काम पूर्ण केले. त्याने दाऊदला कैद केले आणि हजारो करमातींची कत्तल केली, किंवा निरनिराळ्या किल्ल्यांमध्ये त्यांना कैद करून ठेवले. महमुदाने इतके हालहाल केले तरी करमातींचा पुरा बीमोड झाला नाही. महमुदाचा मृत्यू होताच दाऊदच्या मुलाच्या आधिपत्याखाली त्यांनी पुन्हा बंड केले.

भटिंडावर स्वारी

वायव्येकडून गंगेच्या संपन्न खोऱ्यात शिरण्याच्या प्रवेशद्वारावरच भटिंडाचा किल्ला होता. तो घेण्याकरता इ. स. १००४ च्या ऑक्टोबरात महमूद गझनीहून निघाला. सिंधू नदी पार करून तो मुलतानमार्गे भटिंडावर चाल करून आला. तेथे बिजेराय (विजयराज) नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला स्वसामर्थ्याचा इतका विश्वास होता की, किल्ल्याचा आश्रय न घेता तो महमुदाशी लढण्याकरता मोकळ्या मैदानात उतरला. महमुदाने त्याच्यावर पुन्हा पुन्हा हल्ले चढविले, परंतु तीन दिवसपर्यंत त्याने ते परतवून लावले. हिंदूंची ही चिकाटी आणि पराक्रम पाहून मुसलमान निरुत्साह झाले. चौथ्या दिवशी तर बिजेरायच्या सैन्याने महमुदाच्या सैन्यास चांगलाच मार दिला. परंतु त्या वेळी महमुदाने स्फूर्तिदायक भाषण करून आपल्या सैन्याची वीरवृत्ती जागृत केली, आणि मारू किंवा मरू अशा आवेशाने तो बिजेरायाच्या सैन्यावर तुटून पडला. तो स्वतः तलवारीचे सर्वत्र वार करीत पुढे घुसला. त्याच्या सैन्याच्या माऱ्यापुढे बिजरायाचे सैन्य टिकाव धरू शकले नाही. सायंकाळी त्याचे सैन्य वाट फुटेल तिकडे पळू लागले.

तेव्हा राजाने किल्ल्याचा आश्रय घेतला. किल्ल्याभोवती खोल खंदक होता. हा किल्ला अभेद्य समजला जात होता. महमुदाने किल्ल्याला वेढा घातला आणि त्याच्या भोवतालचे खंदक दगडांनी आणि झाडांनी भरून काढण्याचा हुकूम दिला. खंदक बुजविण्यात महमुदाला यश येत आहे असे पाहून बिजेराय किल्ला सोडून जवळच्या अरण्याच्या आश्रयाला गेला. तेथे महमुदाच्या सैनिकांनी त्याला वेढा घातला. शत्रूचा कैदी होऊन मानहानी पतकरण्यापेक्षा त्या मानी राजाने छातीत खंजीर खुपसून आपला अंत करून घेतला.

राजाच्या मृत्यूची बातमी कळताच किल्ल्यातील शिबंदीचे धैर्य गळाले. त्यांनी फारसा विरोध केला नाही आणि किल्ला महमुदाच्या हातात पडला. महमुदाने जे मुसलमान झाले, त्यांच्याखेरीज इतर सर्वांची कत्तल केली. त्याला खूप लूट मिळाली. सोने, चांदी, शस्त्रास्त्रे आणि १२० हत्ती हा लुटीतला महमुदाचा वाटा होता.

परंतु महमुदाला ही लूट पचली नाही. थोडे दिवस तेथेच राहून त्याने आजूबाजूचा प्रदेश जिंकला. जे मुसलमान झाले होते त्यांना मुसलमानी धर्माची तत्त्वे शिकविण्याकरता मुल्ला-मौलवी नेमले. नंतर तो गझनीला निघाला. परंतु नेहमीपेक्षा आधीच पावसाळा सुरू झाल्यामुळे पंजाबातील नद्यांना मोठे पूर आलेले होते. सिंधू

नदी पार करताना त्याच्या जवळची बरीचशी लूट वाहून गेली. ज्यांनी अनेक लढायांत अंगावर बाण झेलले होते, असे त्याचे शेकडो योद्धेही सिंधू नदीने पोटात घेतले. त्यातून मुलतानच्या सुखपालच्या सैन्यानेही त्याच्या सैन्याला वाटेत सळो की पळो करून सोडले. अनेक हालअपेष्टा सोसून महमूद व त्याचे उरलेले सैन्य कसे-बसे गझनीला जाऊन पोहोचले.

नारायणपूरवर स्वारी

नागरकोटहून परत आल्यानंतर थोडयाच दिवसांनी (इ. स. १००९) महमुदाने नारायणपूरवर स्वारी केली. तेथल्या राजाने प्रतिकार केला, परंतु त्याचा पराभव झाला. महमुदाने शहर काबीज केले आणि तेथ लुटालूट केली. नंतर तो गझनीला परतला.

त्यानंतर काही काळाने नारायणपूरच्या राजाने महमुदाकडे सलोखा करण्याकरता आपला वकील पाठवला. त्याने महमुदाला ५० हत्ती व वार्षिक खंडणी देऊ केली व इतर मांडलिकांप्रमाणे दोन हजार सैनिक महमुदाच्या सैन्याला देऊ केले. सुलतानाने हे मान्य केले. त्यानंतर खुरासान आणि भारत ह्यांच्यातील व्यापार बराच वाढला.

ठाणेसरचा पाडाव

इ. स. १०१४ त महमूद ठाणेसर काबीज करण्याकरता गझनीहून निघाला. तेव्हा आनंदपालाचा पुत्र त्रिलोचनपाल ह्याने त्याला ठाणेसर सुरक्षित राखण्याच्या बदली ५० हत्ती देऊ केले. ठाणेसरात चक्रस्वामीचे हिंदूंना अत्यंत पवित्र वाटणारे मंदिर होते. सुलतानाने त्रिलोचनपालाचे म्हणणे मान्य केले नाही. ठाणेसरच्या राजाकडे युद्धात चांगले लढणारे एका विशिष्ट जातीचे हत्ती होते व म्हणून महमुदाला त्याचा मत्सर वाटत होता, असे एक मुस्लिम इतिहासकार सांगतो. तेव्हा डेन्याचा राजा राम ह्याने मोठे सैन्य घेऊन महमुदाला सतलज नदीवर अटकाव केला. पिछाडीला एक टेकडी व पुढ्यात हत्तींची रांग अशी त्याने आपल्या सैन्याची रचना केली. तेव्हा महमुदाने आपल्या सैन्यातील दोन तुकडयांना नदीवरील उतार निरनिराळ्या ठिकाणी पार करून राजा रामाच्या सैन्याच्या बगलांवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. हिंदूंनी पराक्रमाची शर्थ करून संध्याकाळपर्यंत महमुदाच्या हल्ल्यांना तोंड दिले. पण नंतर महमुदाने एक फारच जोराचा हल्ला केला आणि राजा रामाच्या सैन्याची फळी फुटली. हिंदू सैन्य पळू लागले. महमुदाला राजा रामाचे सर्व हत्ती व बरेच जडजवाहीर मिळाले. त्याला विजय मिळाला खरा, परंतु राजा रामाच्या सैन्यापेक्षा त्याच्या सैन्याची हानी खूपच अधिक झाली होती.

त्यानंतर सुलतानाने ठाणेसरवर हल्ला केला. महमूद येताच तेथील राजा

पळून गेला. काहीही विरोध न होता सुलतान शहरात शिरला आणि त्याने लुटीस प्रारंभ केला. हजारो भक्तांनी अनेक वर्षे ज्या मूर्तीच्या पायावर डोके ठेवून पूजा केली होती, ती चक्रस्वामीची मूर्ती महमुदाने उखडून काढली. ती त्याने गझनीला नेऊन तेथील सार्वजनिक चौकात फेकून दिली.

काश्मीरवरील स्वाऱ्या

महमुदाने काश्मीरवरही दोन स्वाऱ्या केल्या. परंतु तेथे त्याची फारशी डाळ शिजू शकली नाही. पहिली स्वारी त्याने इ. स. १०१५ मध्ये केली. काश्मीरचा राजा संग्रामराज ह्याने त्रिलोचनपालाला मदत केली होती, म्हणून त्याला शिक्षा करण्याचा त्याचा उद्देश होता. झेलम पार करून तो तोहीच्या खोऱ्यातून तोश मैदान खिंडीपर्यंत आला. तेथून त्याला काश्मिरात घुसायचे होते. परंतु ह्या खिंडीत असलेल्या लोहकोट ह्या डोंगरी किल्ल्याने त्याचा मार्ग अडवला. महमुदाने किल्ल्याला वेढा घातला. परंतु महिनाभर खटपट करूनही त्याला यश आले नाही. एवढ्यात हिमवर्षावास प्रारंभ झाला. त्याची रसद तुटली आणि वेढा उठवून त्याला माघारी जाणे भाग पडले. परतताना तो डोंगराळ प्रदेशात रस्ता चुकला आणि एका दलदलीच्या प्रदेशात येऊन पोहोचला. हा प्रदेश पार करताना त्याचे शेकडो सैनिक मृत्युमुखी पडले. स्वतः महमूदही शिकस्तीने बचावला.

इ. स. १०२१ मध्ये महमुदाने काश्मीरवर हल्ला करण्याचा दुसरा प्रयत्न केला. परंतु अभेद्य लोहकोट किल्ल्याने त्याचा मार्ग ह्या वेळीही रोखून धरला. पहिलीप्रमाणेच त्याची हीही स्वारी निष्फळ ठरली, थंडीला सुरुवात झाली आणि त्याच्या सैन्याची दुर्दशा उडाली. काश्मीर जिंकण्याची कल्पना कायमची सोडून देऊन महमूद गझनीला परतला.

ग्वाल्हेरवरील स्वारी

इ. स. १०१९ मध्ये महमुदाने कालिंजरचा राजा गंड ह्याच्यावर स्वारी केली होती. परंतु गंडाचा बीमोड झाला नव्हता. तो उघडपणे महमुदाचा अधिकार धुडकावून लावीत होता. म्हणून त्याला शरण आणण्याकरता महमुदाने इ. स. १०२२ मध्ये त्याच्यावर स्वारी केली. कालिंजरला जाताना वाटेत त्याला ग्वाल्हेरचा किल्ला लागला. तेथील राजाचे नाव अर्जुन होते व तो गंडाचा मांडलिक होता.

ग्वाल्हेरचा किल्ला एका प्रचंड खडकावर बांधलेला असून तो दुर्जेय समजला जाई. अशी एक आख्यायिका होती की ज्या राजाने हा किल्ला बांधला, त्यानेच हत्ती पकडून त्यांना माणसाळवून त्यांच्यावर स्वारी करण्यास प्रारंभ केला. नंतर मग इतर राजांनी त्याचे अनुकरण केले. महमुदाने किल्ल्यावर हल्ला केला, परंतु त्याला तो जिंकता आला नाही. पण राजा घाबरला होता. त्यान तहाची बोलणी

सुरू केली. महमुदाला त्याने ३५ हत्ती देऊन त्याची बोळवण केली.

एका मुस्लिम इतिहासकाराने महमुदाच्या वकिलाने ग्वाल्हेरच्या राजाची भेट घतली, त्या प्रसंगाची हकीकत पुढीलप्रमाणे दिली आहे—

" ग्वारीझमशहा महमुदने पुन्हा हिंदुस्थानवर स्वारी केली आणि पुष्कळ शहरे जिंकली. हिंदुस्थानात चार महिने चाल केल्यावर तो कवाकीर (ग्वाल्हेर) नावाच्या किल्ल्यापाशी येऊन पोहोचला. तेथे एक हिंदुस्थानी राजा राज्य करीत होता. महमुदाने त्या किल्ल्यावर जोराचा हल्ला केला तेव्हा राजाचा एक वकील चार भोयांनी वाहून आणलेल्या मेण्यातून आला आणि म्हणाला,' तुम्ही कोणत्या प्रकारचे माणूस आहात, असे माझ्या राजाने विचारले आहे.' महमुदाने उत्तर दिले, ' मी मुस्लिम आहे. जे पाखंडी आहेत, त्यांना मी ईश्वराची भक्ती करण्यास सांगतो. आणि मूर्तिपूजकांचा छळ करतो. तुम्ही हिंदू लोकांनी एक तर आमच्या ईश्वरावर श्रद्धा ठेवावी, आमचा कायदा पाळावा, गोमांस खावे, किंवा एक हजार हत्ती आणि एक हजार मण सोने द्यावे.' वकील म्हणाला, ' आम्ही गोमांस खाणार नाही. तुमचा धर्म आम्हास माहीत नाही. तो शिकविण्यासाठी एखादा विद्वान माणूस आमच्याकडे पाठवा आणि तुमचा धर्म जर आमच्या धर्मापेक्षा चांगला असला तर आम्ही त्याचा स्वीकार करू.' महमुदाने वकिलाबरोबर एक विद्वान मौलवी किल्ल्यावर पाठविला. तो त्यांच्याशी दुभाष्यामार्फत बोलला. त्याचे बोलणे ऐकल्यानंतर राजाचे लोक म्हणाले, ' आम्ही आमचा धर्म सोडणार नाही. तुम्ही मागता तेवढे सोने आमच्याजवळ नाही. पण पुष्कळ चांदी आहे.' ३०० हत्ती, पुष्कळशी चांदी आणि उत्तम पोषाख देण्याचे त्यांनी मान्य केले. महमूद म्हणाला, ' मला मान्य आहे. परंतु तुमच्या राजाने आमचा पोशाख पेहरला पाहिजे. कंबरेभोवती पट्टा आणि तलवार बांधली पाहिजे. आणि राजा घेत असलेली शपथ खरी आहे हे दाखविण्याकरता हिंदू रिवाजाप्रमाणे त्याने आपल्या बोटाचे टोक कापले पाहिजे.'

महमुदाचा आरब वकील पुढे म्हणतो, " जेव्हा मी त्या हिंदू राजासमोर जाऊन उभा राहिलो तेव्हा मला तो राजा अतिशय सुंदर आणि तरुण दिसला. त्याच्या सावळ्या रंगातही तो आकर्षक आणि राजबिंडा दिसत होता. तो एका चांदीच्या सिंहासनावर बसलेला होता. त्याने खाली कापडाची विजार घातलेली होती आणि त्याच्या अंगात एक झगा होता. त्याच्या डोक्यावर पगडी होती. त्याला पाहताच मी त्यांच्या रिवाजाप्रमाणे जोराने टाळी वाजवली आणि जोडलेल्या हातांवर मान लववून त्याने अभिवादन केले. त्याने जो पोषाख परिधान करावयाचा होता तो मी दाखवला आणि तो त्याने अंगात घालावा म्हणून मी त्याची खूप विनवणी केली. तो म्हणाला, ' हा पोषाख घालण्याच्या बाबतीत मला क्षमा असावी. पण तुम्ही तुमच्या राजाला सांगा की मी हा पोषाख घातला आहे.' (तो पोषाख विषारी असावा अशी कदाचित राजाला शंका आली असावी-लेखक) मी म्हणालो, ' माझ्या राजाला

खोटे सांगून मी फसविणार नाही.' तेव्हा त्याने फक्त पट्टा आणि तलवार कंबरेला बांधली. त्याने ह्याप्रमाणे पोषाख घातल्यावर त्याच्या बोटाचा तुकडा कापून दे म्हणून सांगायला मला लाज वाटली. मी फक्त म्हणालो, 'आता शपथ घ्या.' तेव्हा तो म्हणाला, 'आम्ही अग्नीला आणि मूर्तीला साक्षी ठेवून शपथ घेतो. ती तुम्हाला मान्य होणार नाही. मग मी कशी शपथ घेऊ?' मी म्हणालो, 'शपथ कशी घेतात ते तुम्हाला ठाऊक आहे.' तेव्हा लगेच त्याने एका सेवकाला कटयार आणण्यास सांगितले. त्याने ती आपल्या उजव्या हातात घेतली आणि जरासुद्धा हू का चू न करता डाव्या हाताच्या करंगळीचे टोक कापले. त्याने जखमेवर काही औषध शिंपडले आणि तिच्यावर पट्टी बांधली. बोटाचा कापलेला तुकडा त्याने धुऊन काढला आणि तो एका थैलीत कापराबरोबर ठेवून मला दिला. त्याबरोबर त्याने काही वस्त्रे, चांदी आणि दोन घोडेही दिले.

कालिंजरवर स्वारी

तेथून महमूद कालिंजरला गेला. तेथील किल्ला एका डोंगराळ कडयावर बांधलेला होता आणि अभेद्य समजला जात होता. तो किल्ला इतका विस्तृत होता की, त्यात पाच लाख माणसे, वीस हजार जनावरे आणि पाचशे हत्ती राहू शकत. किल्ल्यात भरपूर दाणागोटा आणि शस्त्रास्त्रे होती. महमुदाने किल्ल्याला वेढा दिला आणि रसद पोहोचविण्याचे सर्व मार्ग बंद केले. उपासमारीने आतील सैन्य शरण यावे, असा त्याचा डाव होता. राजा गंडाने तहाची बोलणी सुरू केली. त्याने वार्षिक खंडणी आणि ३०० हत्ती देऊ केले. सुलतानाला ह्या अटी मान्य झाल्या. शरण आल्याबद्दल त्या वेळच्या हिंदू राजांच्या पद्धतीप्रमाणे गंडाने आपल्या बोटाचा तुकडा कापून महमुदाकडे पाठविला. महमुदाकडे असे बोटांचे खूप तुकडे जमले होते.

तह झाल्यावर गंडाने महमुदावर एक प्रशस्तिपर हिंदी कवन करून पाठविले. ते महमुदाला इतके आवडले की त्याने गंडाला पंधरा किल्ले, मानाचा पोषाख आणि इतर मौल्यवान वस्तू भेट दिल्या.

गंडाने महमुदाकडे तहाच्या कलमाप्रमाणे जे हत्ती पाठविले ते माहुतांशिवाय पाठविले. त्याला महमुदाच्या सैनिकांच्या शौर्याची परीक्षा पाहावयाची होती. महमुदाच्या सैनिकांनी ते हत्ती पकडून शिबिरात आणले.

दोन अद्‌भुत वस्तू

ह्याच सुमारास घडलेली एक गोष्ट इब्न आफीर हा इतिहासकार सांगतो. गंडाचा आणि महमुदाचा तह झाल्यावर महमुदाने गंडाला किती चांगल्या रीतीने वागविले, हे पाहून गंडाच्या शेजारच्या राज्याचा राजा कावकन हा प्रभावित झाला. त्याच्याजवळ एक हजार हत्ती होते. त्याने महमुदाकडे आपला वकील पाठविला आणि

मैत्रीची इच्छा व्यक्त केली. वकिलाबरोबर त्याने अनेक भेटीही पाठविल्या होत्या. त्यामध्ये दोन अद्‌भुत वस्तू होत्या. कबूतरासारखा दिसणारा एक पक्षी होता. त्याचे वैशिष्ट्य हे होते की, ज्या ताटात विष कालवलेले अन्न असेल, त्यावरून तो फिरला की त्याचे डोळे अश्रूंनी भरून येत. दुसरी वस्तू म्हणजे एक पाषाण होता. खोल जखमांवरून देखील तो फिरविला की त्या जखमा लगेच भरून येत. झिन्नुल अथीर व सिब्त इब्नुल जवझी ह्या इतिहासकारांनीही ही हकीकत सांगितली आहे.

सुलतान महमुदाने हिंदुस्थानातील शेवटची स्वारी सोमनाथावर केली. ह्या स्वारीमुळेच खरे तर महमुदाचे नाव भारताच्या इतिहासात प्रसिद्ध झाले आहे. सोमनाथाचा विध्वंस केल्यामुळेच मुसलमानांना महमूद हा गाझी (धर्मयोद्धा) वाटतो आणि त्याचा ह्या कृत्यामुळेच खलिफाने त्याला 'कैफुद्दौलत् वल् इस्लाम' म्हणजे 'इस्लामी धर्माचा आणि दौलतीचा रक्षक' अशी पदवी दिली. पण ह्या स्वारीची हकीकत देण्यापूर्वी श्रीसोमनाथ तीर्थाचा इतिहास पाहू.

श्रीसोमनाथ तीर्थ

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी सोमनाथ हे एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. ते सौराष्ट्रातील प्रभासपट्टण क्षेत्रात आहे. काठेवाडातील म्हणज सौराष्ट्रातील पाच रत्नांचा उल्लेख एका सुभाषितात आहे :

सौराष्ट्रे पंचरत्नानि नदी नारी तुरंगमः ।
चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ॥

नदी, नारी, घोडा, सोमनाथ आणि हरिदर्शन ही सौराष्ट्रातील पाच रत्ने आहेत.

काठेवाडची सुरथ, सुराष्ट्र, सौराष्ट्र आणि सोरठ अशी नावे बदलत गेली. सोमनाथ हा सोरठी सोमनाथ म्हणूनच प्रसिद्ध आहे.

प्रभास तीर्थाचा इतिहास वेदकाळापासूनच मिळतो. वेदाच्या खिलसूक्तात ते सरस्वती नदीवर जेथे सोमनाथ आहे, तेथे आहे असा उल्लेख आहे. पुराणकाली ते 'त्रैलोक्य वंदितम्' असे 'विख्यातम्' क्षेत्र होते. प्रभासक्षेत्रात अमावास्येचे महत्त्व फार होते तेथे स्नान, दर्शन आणि व्रत केल्याने कोटी यज्ञांचे फल मिळते, असा पुराणात उल्लेख आहे.

भगवान श्रीकृष्णांनी आपला देह ठेवला तो प्रभासक्षेत्रीच. प्रभासक्षेत्राशी श्रीकृष्णाच्या बालपणीचीही एक कथा निगडित आहे.

उज्जयिनी क्षेत्रात सांदीपनी ऋषींकडे विद्याध्ययन पूर्ण झाल्यावर कृष्णाने ऋषींना विचारले. "गुरुजी, गुरुदक्षिणा काय देऊ?" तेव्हा सांदीपनी म्हणाले, "मला काही नको. तुझ्यासारखा शिष्य मिळाला ह्यातच सारे काही आले."

सांदीपनींचे हे निःस्पृह वचन ऐकून कृष्णाने गुरुपत्नीस विचारले, "माते, तुला काहीतरी द्यावेसे वाटते. काय, देऊ?" त्याबरोबर गुरुपत्नीच्या डोळ्यांत अश्रू आले. कृष्णाने मातेला दुःखाचे कारण विचारले. प्रथम ती सांगेना. परंतु कृष्णाचा फारच आग्रह झाल्यावर ती म्हणाली, "एकदा सांदीपनी चातुर्मास्याकरता प्रभासक्षेत्री गेले होते तेथे आमचा एकुलता एक मुलगा पंचजन नावाच्या असुराने माशाचे रूप घऊन गिळला. तो परत आणून दे."

पंचजन असुराने मुलाला होडीतून पळविले व त्यास दीव बेटात विकले, असा ह्याचा अर्थ. तेव्हा कृष्ण प्रभासला गेला. त्याने पंचजनाला शरण आणले. त्याच्या मदतीने सांदीपनींचा मुलगा त्याच्या मातेला परत आणून दिला. कृष्णाने असुरांवर दया दाखविल्यामुळे त्यांनी सुप्रसिद्ध 'पांचजन्य' हा शंख श्रीकृष्णाला अर्पण केला. बलराम हा शेषाचा अवतार. प्रभासक्षेत्रातील एका विवरात मूळ देह धारण करून त्याने प्रवेश केला आणि तो पाताळात गेला. त्याच्या आणि कृष्णाच्या पार्थिव देहांना अर्जुनाने हिरण्या नदीच्या तीरावर अग्निसंस्कार केला. अर्जुनाने सुभद्राहरण केले तो प्रसंग प्रभासक्षेत्रीच घडला. त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य ऋषींची तपोभूमीही प्रभासक्षेत्र हीच होती. अशा रीतीने प्रभासक्षेत्र वेद व पुराणकालापासून प्रसिद्ध आहे.

सोमराजाची कथा

सोमनाथ हे नाव रूढ कसे झाले ह्याविषयीची कथा पुराणात सांगितली आहे.

ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्ष प्रजापती ह्याला सत्तावीस मुली होत्या. ह्या मुलींचे परस्परांवर अत्यंत प्रेम असल्यामुळे त्यांची ताटातूट होऊ नये म्हणून दक्षाने त्यांचे विवाह सोमराजाशी लावून दिले. परंतु सोमाचे रोहिणीवरच अतिशय प्रेम बसले, त्यामुळे इतर बहिणी रुष्ट झाल्या. त्यांनी बापाकडे तक्रार केली. दक्षाने सोमाला परोपरीने समजावून सांगितले की सर्व पत्नींवर सारखेच प्रेम कर. पण प्रेम असे सांगून थोडेच करता येते? तेव्हा दक्षाने सोमराजाला शाप दिला, 'तुला क्षय लागेल.' क्षयामुळे सोम निस्तेज होऊ लागला. साऱ्या जगातील वनस्पतीही निस्तेज होऊ लागल्या. म्हणून देव दक्षाकडे गेले. तेव्हा दक्ष म्हणाला, 'सोमाने प्रभासतीर्थात स्नान करून शंकराचे आराधन करावे, म्हणजे तो शापातून अंशतः मुक्त होईल. त्याला कांती प्राप्त होईल, परंतु पंधरा दिवस क्षय आणि पंधरा दिवस वृद्धी अशी अवस्था राहील.'

सोमाने प्रभासक्षेत्री येऊन शंकराची आराधना केल्यावर शंकर प्रसन्न झाले. तेव्हा सोमाने विनंती केली की, 'मी पूजन केलेल्या शिवलिंगात पूर्णांशाने राहावे.' शंकरांनी ही विनंती मान्य केली आणि तेव्हापासून सोमनाथ हे नाव रूढ झाले.

त्यानंतर सोमाने सोमनाथाचे सुवर्णमंदिर बांधले. त्याकरता त्याने चंद्रलोकावरून ब्राह्मण आणले. त्यात पाठपूजा करणारे कर्मकांडी होते तसेच शिल्पशास्त्रज्ञही होते.

त्यांनी शिल्पशास्त्रानुसार देवालय बांधले. ह्या ब्राह्मणांना सोमपुरा ब्राह्मण म्हणतात.

वरील कथेत सुचविल्याप्रमाणे प्रभासक्षेत्राची हवा आजही क्षयरोग्यांना अत्यंत अनुकूल आहे. १९५१ साली नवीन मंदिर बांधले त्याचे शिल्पकामही ह्याच सोमपुरा शिल्पींनी केले. मंदिरावर कळस चढविणारा सोमपुरा ब्राह्मणच होता.

वेदकाळी सोमराजाने सोमनाथाचा जीर्णोद्धार करून सुवर्णमंदिर बांधले, काही वर्षांनी त्याचा नाश झाला. त्रेतायुगात रावणाने रौप्यमंदिर बांधले. त्यानंतर श्रीकृष्णान मंदिराचा जीर्णोद्धार करून चंदनाचे मंदिर बांधले. तेही मोडकळीस आल्यानंतर राजा भीमाने दगडी देऊळ बांधले.

मंदिराचा इतिहास

ऐतिहासिक दृष्ट्या, सोमनाथ मंदिर इसवी सनाच्या सुरुवातीला बांधले असावे. दुसरे देऊळ इ. स. ६४० त बांधले. पहिल्या देवळाच्या जागीच दुसऱ्या देवळाचा गाभारा होता. त्याला उघडा सभामंडप होता. ह्या सभामंडपापासून समुद्रापर्यंत जाणाऱ्या पायऱ्या सापडल्या आहेत. दक्षिण बाजूला समुद्रकाठी तट होता.

इ. स. ७११ च्या सुमारास सिंधच्या आरब सुभेदाराने सौराष्ट्रावर स्वारी करून सोमनाथाच्या ह्या दुसऱ्या देवळाचा नाश केला. तेव्हा तिसरे देऊळ इ. स. ७२० च्या सुमारास पहलन वंशातील राजा कृष्ण ह्याने बांधले असावे. इ. स. ८१५ मध्ये दुसरा नागभट्ट उत्तर हिंदुस्थानचा सम्राट झाला. त्याची राजधानी कनौज. हा नित्य प्रभासला सोमनाथाच्या पूजसाठी येई.

ह्या काळात श्रीसोमनाथ तीर्थ काशीक्षेत्राइतके प्रसिद्ध होते. कनौजच्या सम्राटांप्रमाणेच अनहिलवाडचे शिलाहार राजेही सोमनाथाच्या पूजेला येत. इ. स. ८१५ पासून १०१५ पर्यंतचा काळ अत्यंत भरभराटीचा गेला.

त्या वेळी जवळच असलेल्या वेरावळ बंदरातून जगभर व्यापार चाले. तेथून जाणारी गलबते सोमनाथाला येत आणि प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून नवस करीत. हे व्यापारी, सर्व देशातून येणारे गरीब-श्रीमंत भक्त, राजे-महाराजे, ह्यांनी दिलेल्या देणग्यांमुळे सोमनाथ मंदिरात अफाट संपत्ती जमली होती. आसपासच्या दहा हजार गावांचे उत्पन्न देवस्थानाकडे लावून दिलेले होते. मंदिराचे उत्पन्न अंदाजी चाळीस कोटी रुपये होते.

सोमनाथाचे वैभव

सोमनाथाचे वैभव अपूर्व होते. पंचमहाभूते सोमनाथाची नित्य पूजा करीत. महासागर स्वतः भरतीच्या वेळी दिवसातून दोनदा सोमनाथाचे पादप्रक्षालन करी. सूर्याचे किरण नेमके सोमनाथाचे पदवंदन करून जात. देवालयाच्या भोवती भव्य तट होते. दक्षिण तटावर सागराच्या लाटा सतत आदळत असत. मुख्य दरवाजा

पूर्वाभिमुख होता. गाभाऱ्याबाहेर असलेल्या सभामंडपाला छप्पन्न सागवानी खांब होते व ते शिशाने मढविलेले होते. सभामंडपात दोन हजार माणसे बसतील एवढा तो प्रशस्त होता. सुंदर नक्षीने आणि विविध कलाकृतींनी देऊळ शोभिवंत दिसत असे. मंदिराकरिता वापरलेला दगड हा सौराष्ट्रातीलच असून इतका गुळगुळीत होता की, त्यात पाहणाऱ्याचे प्रतिबिंब दिसते. खांब नक्षीदार असून रत्नजडित होते. त्यावर निरनिराळ्या राजांची सुंदर चित्रे काढलेली होती. त्याचे गोपुर तेरा मजली होते आणि त्यावर चौदा सोनेरी कळस होते.

लिंगाचा परीघ साडेचार फूट असून त्याचा रुद्रभाग (वर दिसणारे लिंग) सात फूट उंच होता. लिंगाशेजारी एक कोशागार होते. त्यात मूर्तीचे सुवर्णाचे आणि रत्नांचे अलंकार ठेवलेले होते. शिवाय सोन्याची, चांदीची आणि निरनिराळ्या रत्नांची लिंगे व मूर्ती होत्या. लिंगाभोवती गुंडाळावयाचे वस्त्र किनखापी असून त्यावर रत्ने जडविलेली होती. सभामंडपात सोडलेले पडदेही किनखापी असून त्यांवरही रत्ने जडविलेली होती. गाभाऱ्यातील समया आणि नंदादीप रत्नजडित असल्याने त्यांचा मंद प्रकाश देखील रत्नांच्या साहाय्याने अधिक तेजस्वी होत असे. समयांतून अत्तर वापरले जाई. छताला रत्नजडित झुंबरे होती. आत जणू सर्वत्र दृष्टी खिळवून ठेवणारा रत्नांचा लखलखाट होता.

मंदिरासमोर एक २०० मण वजनाची सुवर्णशृंखला होती व तिला सुवर्णाची घंटा बांधलेली होती. ब्राह्मणांची बदली करण्याची सूचना देण्याकरिता ह्या घंटेचा उपयोग करीत. मंदिरात पूजेसाठी एक हजार ब्राह्मण होते. देवापुढे अष्टौप्रहर गायन, वादन, नर्तन करण्याकरता ३५० गायिकांचा आणि नर्तकींचा संच होता. मंदिराचे बाहेरील दरवाजे प्रशस्त असून चंदनाचे होते. मंदिराच्या शिखरावर सोन्याचा कळस होता. त्यावर काही रत्ने बसविलेली होती. दिवसा सूर्यप्रकाशात आणि रात्री चंद्राच्या किंवा चांदण्यांच्या प्रकाशात ती चमकत असत. समुद्रातून हा कळस कित्येक मैलांवरून दिसत असे व त्याचा उपयोग दीपस्तंभाप्रमाणे होई.

महमुदाची स्वारी

महमुदाने सोमनाथावर स्वारी करण्याचे कारण काय झाले, ह्याविषयी इब्नुल अथीर, हा मुस्लिम इतिहासकार लिहितो, " जेव्हा यामिनुद्दौला (महमूद) हिंदुस्थानात विजयामागून विजय संपादन करीत होता आणि देवळे फोडीत होता, तेव्हा हिंदू म्हणू लागले की सोमनाथाचा ह्या देवांवर कोप झाला आहे. सोमनाथ जर ह्या देवांवर प्रसन्न असता, तर कोणीही त्यांचा नाश करू शकला नसता किंवा कोणताही उपद्रव देऊ शकला नसता. यामिनुद्दौलाने जेव्हा हे ऐकले तेव्हा त्याने सोमनाथाची मूर्ती फोडण्याचा निश्चय केला. "

महमुदान १८ ऑक्टोबर १०२५ ह्या दिवशी गझनी सोडली. त्याच्याबरोबर

तीस हजार घोडेस्वार आणि शेकडो बाजारबुणगे होते. ९ नोव्हेंबरच्या सुमारास तो मुलतानला पोहोचला. तेथे त्याने वाळवंटातून करावयाच्या पुढील प्रवासासंबंधी माहिती मिळवली आणि प्रवासाची तयारी केली. हया वाळवंटातील प्रवासात त्याच्या सैन्याचे अपेक्षेपेक्षा अधिक हाल झाले, असे फरश्ता म्हणतो. वाळवंटातून प्रवास करताना मुख्य तरतूद पाण्याची करावयाची होती. त्याकरता त्याने प्रत्येक सैनिकाला पाणी वाहणारे दोन दोन उंट दिले. त्याचबरोबर महमुदाने स्वतःच्या वीस हजार उंटांवरही जरूर पडल्यास उपयोगी पडावे म्हणून पाणी भरून घेतले. २६ नोव्हेंबरला त्याने मूलतानहून कूच केले आणि आपली सेना घेऊन तो वाळवंटात घुसला.

हया प्रवासात त्याने भाटी लोकांची राजधानी असलेला लाडोर्वाचा किल्ला सुरुवातीलाच जिंकून घेतला. तेथून तो जैसलमीर राज्यातून अनहिलवाडला डिसेंबरच्या अखेरीस जाऊन पोहोचला. अशा रीतीने त्याने वाळवंटातून एक महिना प्रवास केला. तो आलेला पाहताच अनहिलवाडचा राजा भीमदेव कच्छमधील कंठकोट हया मजबूत किल्ल्यात पळून गेला. सुलतानाने अनहिलवाडला पाणी आणि इतर दाणागोटा घेतला आणि त्याने आपला दक्षिणेकडचा प्रवास पुढे चालू केला.

तो मुंढेरला पोहोचला तेव्हा खूप धुके पडले आणि सूर्य दिसेनासा झाला. मुसलमानांचा नाश करण्याकरता सोमनाथाने हे धुके पाडले आहे, असे हिंदूंना वाटले. असे फरश्ता वगैरे दोनतीन मुसलमान इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. महमुदाची आगेकूच थांबविण्याचा निकराचा प्रयत्न मुंढेरच्या राजाने केला. त्याने वीस हजार सैन्य गोळा केले आणि महमुदाशी लढाई केली. परंतु त्यात त्याचा पराभव झाला. तेथून महमूद सरळ देलवाडयाला गेला. महमुदाचा नायनाट सोमनाथ करील अशी तेथील हिंदूंची कल्पना असल्यामुळे त्यांनी महमुदाला मुळीच प्रतिकार केला नाही. त्यामुळे ते शहर महमुदाच्या हातात अलगदच पडले.

सोमनाथावर हल्ला

आता सोमनाथ जवळ आले होते. महमूद सोमनाथाला बुधवार, ५ जानेवारी १०२६ रोजी पोहोचला. समुद्रकिनाऱ्यावर एक मजबूत किल्ला बांधलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या तटावर ब्राह्मणांची गर्दी झालेली होती. ते महमुदाची टर उडवीत होते. मुसलमानांनी आतापर्यंत देवतांच्या मूर्ती फोडलेल्या होत्या. त्याचा सूड उगवण्याकरता सोमनाथाने त्याला तेथे आणले आहे, अशी दर्पोक्ती ते करीत होते. परंतु ब्राह्मणांच्या ह्या श्रद्धेवर किल्लेदाराचा मात्र विश्वास नसावा. तो किल्ला सोडून एका बेटावर पळून गेला आणि महमूद निघून जाईपर्यंत परत आला नाही.

सुलतानाने किल्ल्याला वेढा घातला. हा किल्ला महमुदाच्या स्वारीपूर्वी शंभर वर्षे बांधलेला होता. ब्राह्मणांच्या आणि सोमनाथांच्या भक्तांच्या मदतीने किल्ल्यातील शिबंदीने मोठ्या शौर्याने आणि प्राणपणाने महमुदाचा प्रतिकार केला. परंतु गुरुवारी

सकाळी किल्ल्याच्या तटावर मुसलमान तिरंदाजांनी बाणांचा एवढा तुफानी मारा केला की, किल्ल्यातील लोकांना तट सोडून जावे लागले. दुपारी मुसलमान तटावर चढून गेले आणि हा विजय साजरा करण्याकरता त्यांनी नमाजाची बांग दिली. तेव्हा हिंदू देवळात गेले आकि त्यांनी मूर्तीपुढे साष्टांग प्रणिपात घालून ह्या युद्धात विजय मिळावा अशी प्रार्थना केली. त्यानंतर उत्साहित होऊन अत्यंत शौर्याने त्यांनी मुसलमानांवर निकराचा हल्ला चढविला. ह्या जोरदार माऱ्यामुळे मुसलमान मागे हटले. संध्याकाळपर्यंत हिंदूंनी मुसलमानांना तटावरून हाकलून लावले.

शुक्रवारी सकाळी मुसलमानांनी पुन्हा हल्ला चढविला. त्यांनी तटावर पुन्हा ताबा मिळविला आणि हिंदूंना मंदिराच्या दरवाजापर्यंत मागे रेटले. त्या ठिकाणी भयंकर भाऊगर्दी झाली. हिंदूंचे जथ्थामागून जथे देवळात जात, देवाचा आशीर्वाद घेत आणि बाहेर येऊन मुसलमानांवर तुटून पडत. परंतु हिंदूंचे हे शौर्य मुसलमानांच्या शौर्यापुढे आणि युद्धकौशल्यापुढे फिके पडले. सुलतानाने किल्ल्यावर ताबा मिळविला. त्यानंतर रक्तपाताच्या आणि कत्तलींच्या भीषण नाट्याला प्रारंभ झाला. सोमनाथाच्या रक्षणासाठी पन्नास हजार भक्तांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले, असे सांगतात. जिवंत राहिलेल्यांनी नावांतून पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु किनाऱ्यावर ठेवलेल्या सुलतानाच्या सैनिकांनी त्यांना कापून काढले.

मूर्ती फोडली

त्यानंतर सुलतानान मंदिरात प्रवेश केला. सोमनाथाची मूर्ती पाहताच त्यान मूर्तीच्या वरच्या भागावर कुऱ्हाडी मारून ती विद्रूप करण्याचा आणि तिचे तुकडे तुकडे व्हावेत म्हणून तिच्याभोवती जाळ पेटविण्याचा हुकूम दिला. त्यानंतर मंदिरातील सर्व संपत्ती लुटण्यात आली. ती दोन कोटी दिनार एवढ्या किंमतीची भरली. त्यानंतर देवळाला आग लावून देण्यात आली.

काही मुसलमान इतिहासकार म्हणतात, मूर्तीचे काही तुकडे मक्केला आणि बगदादला पाठविण्यात आले आणि काही गझनीला सुलतानाच्या वाड्यासमोर आणि जुम्मा मशिदीसमोर फेकून देण्यात आले.

त्यानंतर सुलतान पंधराच दिवस राहून गझनीला परत निघाला. सोमनाथाची मूर्ती फोडल्यामुळे आजूबाजूच्या हिंदूंमध्ये संतापाची लाट उसळली होती. अबूचा राजा परमदेव ह्याच्या आधिपत्याखाली हिंदूंनी सैन्य गोळा केले होते. आरवलीच्या रांगा आणि कच्छचे रण ह्या दोहांमधून जी चिंचोळी वाट जाते. तेथे सुलतानाला गाठण्याकरता हे सैन्य निघाले होते. ह्या सैन्याशी मुकाबला टाळण्याच्या उद्देशाने महमुदाने कच्छ आणि सिंधमधला पश्चिमेकडचा मार्ग धरला आणि तो उत्तरेकडे जाऊ लागला. तेव्हा तो कच्छ आणि काठेवाड ह्यांच्यामधील समुद्रापाशी येऊन पोहोचला. परंतु अशा अडथळ्यांना जुमानणारा महमूद नव्हता. ओहोटीच्या वेळेला

त्याने आपला घोडा समुद्रात घातला. त्याच्या मागोमाग त्याचे सैन्यही निघाले आणि तो सुरक्षितपणे पैल किनाऱ्यावर जाऊन पोहोचला.

समुद्र पार करण्यास महमुदाला दोन दिवस लागले. दोन लाख घोडे, उंट आणि इतर वाहतुकीचे प्राणी आणि सैन्य ह्यांसह त्याने समुद्र पार केला, असे फरश्ता म्हणतो.

राजा भीमदेवाने कंठकोट किल्ल्यात आश्रय घेतलेला होता. ह्या किल्ल्याजवळ महमूद येऊन पोहोचला आहे असे कळताच, तो तेथून पळून गेला. महमुदाने कंठकोटचा किल्ला घेऊन तो लुटला आणि कच्छमधून आगेकूच चालू केली. कंठकोटचा किल्ला सोमनाथापासून १४० मैलांवर होता.

कच्छच्या रणातील हाल

पुढे कच्छचे रण होते. त्यातून मार्ग काढणे माहितगाराच्या मदतीशिवाय शक्य नव्हते. हा मार्ग दाखविण्याचे काम एका स्थानिक माणसाने अंगावर घेतले. तो सोमनाथाचा भक्त होता. त्याने महमुदाला चुकीच्या मार्गाने नेले. सोमनाथावरील स्वारीचा सूड उगविण्याकरता त्याने बुद्धयाच असे केले. जेथे पाण्याचा टिपूसही मिळणार नाही अशा वैराण जागी त्याने महमुदाला नेऊन सोडले. नंतर रस्ता शोधण्याकरता महमूद त्या वाळवंटात खूप भटकला आणि एकदाचा कसाबसा सिंधमध्ये जाऊन पोहोचला.

सिंधमध्ये त्याने मन्सूरा घेतले. तेथला करमाती सुभेदार पळून जाऊन एका खजुरीच्या जंगलात लपून बसला. महमुदाने आपले काही अधिकारी त्याच्यावर पाठविले. त्याचे पुष्कळ अनुयायी मारण्यात आले.

तेथून सिंधूच्या काठाने महमूद मुलतानकडे निघाला. परंतु हा प्रदेश वैराण असल्यामुळे आणि तेथे राहणाऱ्या जाटांनी वरचेवर हल्ले करून त्याला सतावून सोडल्यामुळे, त्याच्या सैन्याचे खूप हाल झाले. त्याचे बरेचसे सैनिक आणि जनावरे मृत्युमुखी पडले. बरेच दिवस कंटाळवाणा आणि धोक्याचा प्रवास करून थकलाभागलेला महमूद अखेरीस २ एप्रिल १०२६ रोजी गझनीला पोहोचला.

इस्लामच्या इतिहासात महमुदाची सोमनाथावरील स्वारी हे एक मोठे लष्करी साहस गणले जाते. त्याच्या विजयाची वार्ता साऱ्या मुस्लिम जगतात पसरली आणि सर्वजण आनंदाने बेहोष झाले. खलिफाने महमुदाला आणि त्याच्या भावाला व मुलांना पदव्या देऊन गौरविले. महमुदाला लोक दैवी पुरुष मानू लागले आणि अनेक उत्साही लेखकांनी त्याच्याभोवती अद्‌भुत गोष्टींची वलये रचावयास सुरुवात केली. एक महान राजा आणि पराक्रमी योद्धा म्हणून त्याचे चरित्र रंगविण्यात सर्वांची अहमहमिका लागली. सोमनाथाच्या मूर्तीचा नाश झाला पण तिने महमुदाला इतिहासात अजरामर करून ठेवले.

जाटांवर स्वारी

महमूद सोमनाथाच्या स्वारीहून परत जात असताना जाटांनी त्याचे हाल केले होते. दिवाण रणछोडजी अमरजी हा जुनागडचा दिवाण होता. त्याने 'तारिख-इ-सोरठ' ह्या नावाचा इतिहास लिहिला आहे. त्यात तो म्हणतो, "महमुदाने सोमनाथाचा विध्वंस केल्यामुळे धर्मरक्षक महाराजा मांडलिकाला इतका राग आला की, त्याने गुजरातचा राजा भीमदेव ह्याला बरोबर घेऊन महमुदाचा पाठलाग केला.... मुसलमान त्यांच्याबरोबर लढायला उभे राहिले नाहीत. ते पळून गेले. त्यातील पुष्कळ हिन्दूंच्या तलवारींना आणि राजपुतांच्या गदांना बळी पडले. आणि जेव्हा राजाचा पराक्रमसूर्य प्रखर तेजाने तळपू लागला तेव्हा महमूद विस्मित होऊन पळून गेला. परंतु त्याच्या लोकांपैकी अनेक स्त्रीपुरुषांना पकडण्यात आले."

सोमनाथहून परत येताना आपणाला त्रास देणाऱ्या जाटांना धडा देण्याकरिता १०२७ च्या मार्चमध्ये महमूद गझनीहून निघाला. त्याने जाटांशी जलयुद्ध करण्याचे ठरवून चौदाशे नावा तयार केल्या. प्रत्येक नावेत वीस तिरंदाज होते. त्यांच्यापाशी धनुष्यबाणावरोबरच हातगोळे आणि अग्निगोलक होते. ह्या नावांना पुढे एक व दोन्ही बाजूंना दोन अशा अणकुचीदार लोखंडी सळया बसविलेल्या होत्या.

ह्या युद्धाकरता जाटांनीही चांगली तयारी केली. आपल्या बायकापोरांना त्यांनी नदीतील एका दूरवरच्या बेटावर सुरक्षिततेकरता पाठवून दिले. त्यांनी चार हजार नावा आणल्या. सुलतानाने नदीच्या वरच्या भागात आपल्या नावा आडव्या घालून जाटांच्या नावांना अडविले. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर त्याने हत्ती आणि सैनिकांच्या तुकड्या ठेवल्या. दोन्ही आरमारे एकमेकांशी भिडली आणि अटीतटीचे युद्ध झाले. जाट शौर्याने लढले. परंतु महमुदाच्या सळया लावलेल्या नावांवर त्यांच्या नावा आपटून त्या कलंडल्या आणि बुडाल्या. जाटांचा पराभव झाला. काहींनी किनारा गाठून पळून जाण्याच्या प्रयत्न केला, परंतु तेथे सुलतानाने आधीच ठेवलेल्या तुर्कोमान सैनिकांनी त्यांना पुन्हा नदीत ढकलले. नंतर महमुदाने त्यांची गावे लुटली. १०२७ च्या जूनमध्ये महमूद गझनीला परत गेला.

काही आख्यायिका

सोमनाथाची मूर्ती

मक्केत पूर्वी मूर्तिपूजक राहात होते. काब्यामध्ये मनात नावाच्या देवाची एक मूर्ती होती. ती मूर्ती तिच्या पूजकांनी लपवून ठेवली, आणि 'प्राचीन काळापासून मूर्तिपूजेचे माहेरघर असलेल्या एका देशात' म्हणजे काठेवाडात नेली. ती एकाएकी दिसू लागल्यामुळे ती समुद्रातून वर आली आहे, असे सांगण्यात येऊ लागले. त्या

मूर्तीकरिता एक मंदिर बांधण्यात आले व त्या मूर्तीच्या पूर्वपीठिकेची आठवण राहावी म्हणून तिला 'सो-मनात' म्हणू लागले. काब्याच्या मनातली मूर्ती मनुष्याकृती होती. त्यामुळे सोमनाथाची मूर्तीही तशीच असावी, असे मुस्लिम बखरकारांना वाटते.

सोमनाथाची मूर्ती फार प्राचीन होती, हे मुसलमान बखरकार मान्य करतात. इब्न खलीकान म्हणतो की सोमनाथाच्या मूर्तीभोवती तीस वलये होती. ह्यातील प्रत्येक वलय एक हजार वर्षांचा काल दाखविते असे महमुदाला सांगण्यात आले. ह्याचा अर्थ ती मूर्ती तीस हजार वर्षांची प्राचीन होती असा होतो. अर्थातच ही अतिशयोक्ती आहे.

दैवी शक्ती

इब्न झाफीर म्हणतो, "ह्या मूर्तीमध्ये दैवी शक्ती आहे, असा हिंदूंचा विश्वास आहे. जन्म किंवा मरण देण्याची शक्ती तिच्यात आहे. माणसे मेल्यानंतर त्यांचे आत्मे ह्या मूर्तीजवळ जमतात आणि निरनिराळ्या नव्या शरीरात तेथे त्यांची वाटणी होते. माणसांना सुख किंवा दुःख देण्याची आणि सर्व प्रकारचें रोग बरे करण्याची शक्ती तिच्यात आहे."

इब्न नवाझी मंदिराच्या वैभवाचे वर्णन करून म्हणतो, "मूर्तीच्या स्नानाकरता रोज गंगेचे पाणी आणीत आणि पूजेकरता काश्मीरहून फुले आणीत....मंदिराच्या सभामंडपाला ५६ खांब होते. त्याकरिता आफ्रिकेतून सागवानी लाकूड आणले होते. आणि त्यांच्या आत शिसे भरलेले होते. मंदिराची जमीनही सागवानी फळ्यांची होती."

दाबिश्लीम

सोमनाथ कावीज केल्यावर तेथली हवा महमुदाला इतकी आवडली की, त्याला तेथेच कायमचे राहावे असे वाटू लागले. परंतु त्याच्या सरदारांनी गझनीला परतण्याकरता त्याचे मन वळविले. तेव्हा त्याने सोमनाथ येथे एक सुभेदार नेमण्याचे ठरविले. ह्या जागेकरता दोन उमेदवार होते आणि दोघांचीही नावे दाबिश्लीम होती. पण त्यातील एक संन्याशी होता आणि एक राजा होता. महमुदाने संन्याशी दाबिश्लीमला सुभेदार नेमले आणि त्याच्या सांगण्यावरून राजा दाबिश्लीमवर स्वारी केली. महमुदाने त्याला पकडून गझनीला नेण्याचे ठरविले, कारण संन्याशी दाबिश्लीमला त्याची भीती वाटत होती. थोड्या दिवसांनी कैदी राजाला आणायला संन्याशाने काही अधिकारी पाठवले. राजा थोड्या अंतरावर आला असताना, हिन्दुस्थानातील रिवाजाप्रमाणे संन्याशी त्याला सामोरा जावयास निघाला. परंतु राजाला यावयास थोडा अवकाश होता म्हणून संन्याशी एका झाडाच्या सावलीत, डोळ्यांवर तांबड्या रंगाचा रुमाल ठेवून झोपी गेला. तेथे एक गिधाड आले. तो तांबडा रुमाल पाहून, तो मांसाचा

तुकडा असावा असे त्याला वाटले. त्याने एकदम झडप घातली आणि रुमालावरोबर संन्याशाचे डोळेही फोडून नेले. राजा येऊन पाहतो तो त्याचा प्रतिस्पर्धी आंधळा होऊन राज्य करण्याला नालायक झालेला होता. म्हणून लोकांनी कैदी राजा दाविश्रीमला आपला राजा घोषित केले आणि त्याच्याकरता संन्याशाने तयार करून ठेवलेल्या अंधारकोठडीत संन्याशाला टाकले. हो कथा फिरिस्त्याने सांगितली आहे.

बुत्शिकन

शेख फरिदुद्दीन 'अत्तार' हा एक कवी होऊन गेला. तो पुढील गोष्ट सांगतो :

"सुलतान मंदिरात घुसून मूर्ती फोडू लागला तेव्हा ब्राह्मणांनी त्याला तेवढयाच वजनाचे सोने देऊ करून मूर्ती वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना नकार देऊन सुलतानाने मूर्ती फोडण्याचा हुकूम दिला. त्याच्या सरदारांनी ब्राह्मणांचे म्हणणे मान्य करण्याचे फायदे त्याला सांगितले. तेव्हा सुलतान म्हणाला, 'मी बुत्फरोष (मूर्ती विकत घेणारा) नाही. मी बुत्शिकन (मूर्ती फोडणारा) आहे.' अखेरच्या न्यायदानाच्या दिवशी जेव्हा ईश्वरासमोर सर्व मूर्तिपूजकांना आणण्यात येईल, तेव्हा ईश्वर म्हणेल, 'आधर आणि महमूद ह्यांना बरोबर घेऊन या. एक मूर्ती तयार करणारा होता व दुसरा मूर्ती फोडणारा होता.'

नंतर सुलतानाने मूर्तीभोवती जाळ पेटवावयास सांगितले. जाळ पेटवताच मूर्ती फुटली आणि तिच्या आतून बीस मण रत्ने बाहेर पडली. तेव्हा सुलतान म्हणाला, 'सोमनाथ ह्यालाच (अग्नीला) लायक होता. आणि हे (रत्ने) मला अल्लाने दिलेले बक्षीस आहे.'"

पूर्वीचे वचन

पुढील गोष्ट 'फतुहूस-सलातीन' मध्ये दिलेली आहे.

"महमुदाचा जन्म झाल्याबरोबर हिंदुस्थानातील ज्योतिष्यांना कळले की, गझनीत एका राजपुत्राचा जन्म झालेला आहे आणि तो मोठा झाला की सोमनाथ मंदिराचा नाश करणार आहे, म्हणून त्यांनी राजा जयपालला महमूद लहान असतानाच त्याच्याकडे एक वकील पाठवावयास लावले. सोमनाथ काबीज केल्यावर मूर्ती परत करण्याचे महमुदाने वचन दिले तर खूप संपत्ती देऊ असे त्यांनी सांगितले. महमुदाने सोमनाथ काबीज केल्यावर ब्राह्मणांनी त्याला त्याच्या ह्या वचनाची आठवण करून दिली आणि त्याप्रमाणे मूर्ती परत मागितली. महमुदापुढे मोठा पेच पडला. त्याला मूर्ती परतही करावयाची नव्हती आणि वचनही मोडावयाचे नव्हते. त्याने ब्राह्मणांना दुसऱ्या दिवशी यावयास सांगितले. मग त्याने ती मूर्ती जाळून तिचा चुना बनविला. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण येऊन वचन पुरे कर म्हणून सांगू लागले, तेव्हा महमुदाने त्यांना हा चुना लावलेले पानांचे विडे खावयास दिले. त्यांनी पान खाताच महमूद म्हणाला, 'आता मूर्ती तुमच्या तोंडात आहे.'"

ब्राह्मणाची युक्ती

ह्याच बखरीत पुढील गोष्ट दिली आहे.

"महमुदाने सोमनाथाच्या मूर्तीचा नाश केल्यानंतर एका ब्राह्मणाने तशीच एक मूर्ती बनविली आणि गावाबाहेर काही अंतरावर ती पुरून ठेवली. नंतर त्याने एका वासराला तेथे जाऊन पायांनी माती उकरायला शिकविले. एके दिवशी सकाळी त्याने सगळ्या लोकांना बोलाविले आणि सांगितले, 'काल रात्री सोमनाथ माझ्या स्वप्नात आला होता. मी जवळच लपवून ठेवलेला आहे, असे त्याने सांगितले. तू जर तुझे वासरू सोडून दिले तर ते मला लपविलेल्या ठिकाणी जाऊन पायांनी माती उकरील.' त्याप्रमाणे त्याने वासरू सोडले आणि त्याने जमीन उकरल्या ठिकाणी मूर्ती सापडली. नंतर मूर्तीला गुलाबपाण्याने स्नान घालून तिची देवळात पुन्हा स्थापना करण्यात आली."

हाजीचे महमुदाला निमंत्रण

शेख दीनन पुढील कथा सांगितली आहे.

"सुलतान महमुदाने सोमनाथावर स्वारी करण्यापूर्वी तेथे काही मुसलमान राहात होते. परंतु तेथला राजा कुंवरराय हा त्यांचा फार छळ करी. सोमनाथासमोर रोज एका मुसलमानाचे डोके उडवीत. मक्केत हाजी महमद नावाचा एक फकीर होता. त्याच्या स्वप्नात एकदा महमद पैगंबर आले आणि त्यांनी हाजीला सोमनाथाला जाऊन तेथील मुसलमानांचे संरक्षण करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे हाजी सोमनाथाला आला.

एके दिवशी एक मुसलमान म्हातारी अतिशय शोकाकुल झालेली हाजीला दिसली. हाजीने तिला कारण विचारता, उद्या बळी जाण्याची माझ्या मुलाची पाळी आहे, असे तिने सांगितले. हाजीला तिची करुणा आली आणि तुझ्या मुलाच्या बदली मी जाईन असे त्याने तिला सांगितले. हे राजाला कळताच त्याला फार राग आला. परंतु उघडपणे त्याला हाजीला इजा करणे शक्य नव्हते, म्हणून तो बेसावध असण्याची संधी राजा पाहू लागला. एके दिवशी राजा हाजीला सोमनाथाचे देऊळ दाखवीत फिरत असताना हाजीची एकदम समाधी लागली. तेव्हा त्याचे डोके उडवा असा हुकूम राजाने आपल्या सेवकांना अगदी हलक्या आवाजात दिला. परंतु सेवक हाजीकडे जाऊ लागताच त्याचे पाय जमिनीला चिकटून बसले.

नंतर हाजीने मुसलमानांचा हा छळ थांबविण्याकरता महमुदाला सैन्यासह येण्याचे निमंत्रण पाठविले. त्याप्रमाणे महमूद आला. त्याने वाटेत कुंवरररायाचा मेहुणा, मंगरोळचा राजा जयपाल ह्याला शरण आणले. नंतर त्याने सोमनाथचा राजा कुंवरराय ह्याच्यावर स्वारी केली, तेव्हा त्याने तहाचे बोलणे सुरू केले. कुंवरराय मुसलमान झाल्याखेरीज तह होणार नाही, असे महमुदाने निक्षून सांगितले.

कुंवररायने ते नाकारले आणि युद्ध करण्याचे ठरविले. ह्याच सुमारास हाजी मरण पावला. परंतु मरण्यापूर्वी महमूद त्याला भेटावयास गेला नाही म्हणून त्याचा महमुदावर रोष झाला होता.

काही दिवस लढाई झाल्यावर राजाने किल्ल्याचा आश्रय घेतला. दोन्ही बाजूंचा एकमेकांवर गोळीबार चालू होता. (महमुदाच्या काळी बंदुकीच्या दारूचा शोध लागलेला नव्हता. शेख दीनने ही बखर इ. स. १०८१ मध्ये लिहिलेली आहे.) किल्ल्याचा वेढा बारा वर्षे चालला. सुलतान थकून गेला. तेव्हा सुलतानाच्या वझिराने, हाजीच्या कबरीचे दर्शन घेऊन त्याचा राग शांत करावा, असा सुलतानाला सल्ला दिला. त्याप्रमाणे सुलतानाने जाऊन किल्ला जिंकण्याकरता हाजीच्या साहाय्याची प्रार्थना केली. हाजीचा राग शांत झाला व त्याने महमुदाला एक युक्ती सुचविली.

आपले सर्व सामानसुमान तसेच सोडून देऊन महमूद पाच मैलांवर जाऊन लपून बसला. राजाला वाटले, महमूद पळून गेला आणि तो गाफील राहिला. सुलतान रात्री गुपचूप परत आला आणि हाजीने खास निवडलेले दोन सैनिक बरोबर घेऊन त्याने किल्ला जिंकून घेतला. ह्या युद्धात सुलतानाने सव्वा लाख माणसे गमावली.

कुंवररायने महमुदाला मूर्ती फोडू नको म्हणून विनविले. त्याकरता खूप द्रव्य देऊ केले. पण महमुदाने मूर्तीचे चूर्ण केले आणि आधीच्या कथेतल्याप्रमाणे ते राजाला आणि त्याच्या सरदारांना पानातून खावयास दिले. नंतर मिठाखान नावाच्या सरदाराची सोमनाथावर नेमणूक करून महमूद गझनीला निघून गेला. थोडया दिवसांनी मिठाखानाने देऊळ जाळून टाकले. "

अधांतरी मूर्ती

सोमनाथाची मूर्ती कोठल्याही आधाराशिवाय अधांतरी राहात होती, अशीही हकीकत मुस्लिम बखरकारांनी लिहून ठेवली आहे. एक बखरकार म्हणतो, "सोमनाथ मंदिरातील लिंग हवेत अधांतरी होते, ते लोहचुंबकामुळे, पण तक्तपोशी फुटून फरशी खाली पडताच लिंग खाली पडले."

दुसरा एक बखरकार लिहितो, "मूर्ती लोखंडाची असून तिच्या डोक्यावरील मुकुटास लोहचुंबक बसविलेला असावा. त्यामुळे ती अधांतरी राहात असावी. काहींना ही कल्पना पटली व काहींना खोटी वाटली. म्हणून छताचे एकदोन तुकडे काढून मूर्तीचा तोल बिघडतो की काय, हे पाहण्याची आज्ञा महमुदाने केली. थोडे दगड काढताच मूर्ती डळमळू लागली. जास्त दगड काढताच ती हळूहळू जमिनीवर बसली."

झकेरिया कझीमी लिहितो, "मूर्ती मनुष्याच्या आकाराची, हाताच्या मुठी वळवून गुडघ्यावर टेकलेल्या, रक्त व कृष्णवर्णी असून, डोळ्यांत लाल काळसर हिरे बसविलेले होते. मूर्ती अधांतरी होती. तिला काहीतरी अदृश्य आधार असला पाहिजे,

म्हणून आश्चर्याने थक्क झालेला महमूद भाल्याने सगळ्या बाजू तपासून पाहू लागला."

लिंग अयस्कांत मण्याचे असून ते अधांतरी होते, असाही एक वृत्तान्त आहे.

इतिहास की कल्पित

हा झाला सोमनाथावरील महमुदाच्या स्वारीचा इतिहास-मुख्यतः मुस्लिम इतिहासकारांच्या दृष्टिकोणातून पाहिलेला. महमुदाला आपण धर्मरक्षक, महान योद्धा ठरविताना त्यांनी आपल्या कल्पनेचा वारू स्वैर सोडला आहे, असे दिसून येते. त्याकरता त्यांनी अनेक अद्भुत, अशक्य वाटणाऱ्या गोष्टी घुसडून दिल्या. कित्येक गोष्टी केवळ ऐकीव स्वरूपाच्या त्यांनी नमूद करून ठेवल्या आहेत. वरील जाटांबरोबर झालेल्या लढाईचीच गोष्ट घ्या. महमुदाच्या नावांनी धक्के दिल्याने जाटांच्या नावा उलटतील कशा? मग तशा त्या महमुदाच्या नावाही उलटायला नकोत का? महमुदाने मूर्तीचे तुकडे बरोबर नेले, ही गोष्टही शक्य वाटत नाही. सोमनाथाची मूर्ती म्हणजे दगडी लिंग होते, हे आपणास ठाऊक आहे. जेथे महमुदाला जाटांच्या ससेमिऱ्यामुळे आणि हिंदू सैनिकांच्या पाटलागामुळे लुटलेले जडजवाहिर आणि आपले प्राणही सांभाळणे मुश्किल झाले, तेथे तो हे अवजड दगडाचे तुकडे कशाला सांभाळून घेऊन जाईल? तसाच वर दिलेल्या आख्यायिकांच्या स्वरूपात असलेला इतिहास-तो तर शक्याशक्यतेचा विचार न करता लिहिलेल्या केवळ अद्भुत कथांचा संग्रह आहे. हा सारा इतिहास अतिशयोक्तिपूर्ण वर्णनांनी भरलेला आहे. फार काय, सोमनाथावरील स्वारी खरोखरीच झाली होती की नाही, ह्याविषयी देखील शंका वाटावी अशी परिस्थिती आहे.

उत्बी हा महमुदाचा समकालीन इतिहासकार. परंतु आपल्या इतिहासात त्याने ह्या स्वारीचा उल्लेखही केलेला नाही. गुजरातच्या सोळंकी राजांचा संपूर्ण इतिहास गुजरातेतील हिन्दू आणि जैन इतिहासकारांनी लिहून ठेवलेला आहे. हेमचंद्राचे 'द्व्याश्रयी' आणि मेरुतुंगाचे 'विचारश्रेणी' आणि 'प्रबंधचिंतामणी' हे चौदाव्या शतकाच्या प्रारंभी लिहिलेले इतिहासग्रंथ होत. त्याचप्रमाणे कल्हणाने इ.स. ११५० त 'राजतरंगिणी' हा काश्मीरचा इतिहास सांगणारा ग्रंथ लिहिला. ह्या सर्व ग्रंथांत महमुदाच्या सोमनाथावरील स्वारीचा अजिबात उल्लेख नाही. एवढी साऱ्या हिन्दू जगताला हादरवून सोडणारी घटना घडलेली असताना तिचा पुसटता उल्लेखही ह्या ग्रंथांत असू नये हे आश्चर्यच नव्हे काय? त्याचप्रमाणे आतापर्यंत जे कोरीव लेख उपलब्ध झाले आहेत, त्यांतही ह्या स्वारीचा मुळीच उल्लेख नाही. हिन्दूंनी आपल्या ह्या अपमानाची हकीकत मुद्दामच दिली नाही, असा एक तर्क केला जातो. परंतु काश्मीरपासून गुजरातपर्यंतच्या सर्व लेखकांनी अगदी ठरवून ही स्वारी अनुल्लेखाने मारावी, हे जरा अद्भुतच वाटते.

महमुदाच्या समकालीन असलेल्या मुस्लिम इतिहासकारांनीही त्याच्या चरित्रात

ह्या स्वारीचा उल्लेख केलेला नाही. स्वारीच्या तारखेनंतर दोनशे वर्षांनी लिहिणारा रझीनुद्दीन व त्यानंतर वीस वर्षांनी लिहिणारा हमीदुल्ला ह्यांनीही आपल्या बखरीत ह्या स्वारीचा उल्लेख केलेला नाही. ह्या स्वारीचा पहिला उल्लेख येतो तो इब्दुल अथीर ह्याच्या पुस्तकात (इ. स. १२७०). नंतरच्या लेखकांनी हेच वर्णन अधिकाधिक खुलवून दिले आहे. ह्या गोष्टींचा विचार करता महमुदाची सोमनाथावरील स्वारी ही कपोलकल्पित तर नाही ना, अशी शंका निर्माण होणे साहजिक आहे. परंतु ह्या स्वारीविषयीचा एखादा लेख त्या काळी उपलब्ध असावा, व त्यावरून इब्दुल अथीरने आपला इतिहास लिहिला असावा, असे समजूनच हा इतिहास खरा मानावा लागतो.

महमूद-व्यक्ती आणि राजा

महमुदाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी इतिहासकारांत मतभेद आहेत. मुस्लिम इतिहासकारांच्या मते तो एक मोठा संतपुरुष आणि योद्धा होता. त्याच्या अंगात काही अद्भुतशक्ती होती, तर अलीकडच्या काही इतिहासकारांच्या मते तो एक क्रूरात्मा, दरोडेखोर होता. लुटालूट, अत्याचार आणि कत्तली करण्यात त्याला राक्षसी आनंद वाटे. त्याचे खरे मूल्यमापन ह्या दोन दृष्टिकोणांमध्ये कोठेतरी आहे. तो एक रणनीतिकुशल योद्धा होता, हे निर्विवाद. शिवाय त्याच्या अंगात काही चांगले गुणही होते.

महमूद मध्यम उंचीचा होता. त्याचे शरीर प्रमाणबद्ध आणि बळकट होते. तो गौरवर्णाचा होता. त्याचा चेहरा आकर्षक होता. त्याचे डोळे बारीक होते. त्याची हनुवटी सुडौल आणि गोलाकार होती. तिच्यावर छोटीशी दाढी होती.

स्वभावाने तो प्रेमळ होता. त्याने आपल्या भावांना औदार्याने वागविले. तो शिस्तीचा भोक्ता होता, तरीही त्याच्या अधिकाऱ्यांमध्ये प्रिय होता. त्याच्या मर्जीतून उतरलेल्या अधिकाऱ्यांना आणि बंडखोरांनादेखील तो फार तर तुरुंगात टाके. त्यांना जीवे मारते नसे.

खासगी जीवन

महमुदाला सात मुलगे होते. तीन मुली होत्या. दोघी मुलींची लग्ने इतर राज्यांच्या राजपुत्रांबरोबर झाली. एकीचे ' कावूसनामा ' लिहिणाऱ्या लेखकाबरोबर झाले.

महमुदाच्या खासगी जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही, परंतु त्या काळच्या जुलमी सुलतानाप्रमाणे त्याने एषारामी चैनबाजीत आयुष्य घालविले नाही, एवढे निश्चित. मुस्लिम नीतिनियम तो बहुशः पाळीत असे. मुसलमानांना चार बायका करण्याची परवानगी आहे. ती मर्यादा त्याने ओलांडली नसावी. तो केव्हा केव्हा गंमत म्हणून मद्यप्राशन करी, परंतु तो व्यसनी मद्यपी नव्हता. काही निवडक लोकांच्या संगतीतच तो मद्य-प्राशन करी. ह्या मंडळींनाही माफक प्रमाणातच मद्यप्राशन करावे लागे. कोणी जर अतिरिक्त मद्यपानामुळे असभ्य वर्तन केले, तर नंतर तो त्याची कानउघाडणी करी.

अबून नज्म नावाच्या एका सुंदर गुलामावर त्याची फार मर्जी होती. परंतु ती त्याच्या सौंदर्यापेक्षा त्याने निष्ठापूर्वक केलेल्या सेवेमुळे होती. परंतु, सुलतानाचे एका सुंदर दिसणाऱ्या गुलामावर प्रेम होते. हा कवींना चांगला काव्यविषय वाटला. आणि म्हणून अनेक कवींनी त्यांच्यामधील प्रेमाची काव्यमय वर्णने केली.

शौर्य

महमुदाचे शौर्य आणि रणकौशल्य वादातीत होते. अनेक युद्धांमध्ये ते दिसून आले. तो नेहमी सैन्याच्या आघाडीवर असे आणि हातघाईच्या लढाईत बेदरकारपणे घुसे. त्याला सर्व युद्धांत विजय मिळाला. फक्त काश्मीरवरील स्वाऱ्यांत त्याला दोनदा अपयश आले. सर्व लढायांतील मिळून त्याच्या शरीरावर वहात्तर जखमांचे व्रण होते असे सांगतात. मुसलमानांवरील हल्ल्यात त्याने इतक्या शत्रुसैनिकांना स्वतःच्या हाताने कंठस्नान घातले की, गोठलेल्या रक्तामुळे त्याचा हात तलवारीच्या मुठीला घट्ट चिकटून बसला आणि गरम पाण्यात बराच वेळ बुडवून ठेवल्यावरच तो सुटला. त्याच्या निर्भयतेमुळे आणि शौर्यामुळे त्याच्या सैन्यात आत्मविश्वास निर्माण होई आणि अत्यंत बिकट प्रसंगीदेखील त्याचे सैनिक प्राणपणाने लढत.

सैन्य

त्याच्या सैन्यात अनेक देशींचे लोक होते. एकाच जमातीचे सैन्य असल्यास एखादे वेळ धोका निर्माण होईल असे त्याला वाट. त्याच्या सैन्यात अरब, अफगाण, दायलमाइट, खुरासानी, घुरी आणि हिंदूही होते. भारतीय सैन्याप्रमाणे त्याने हत्तींचे पथकही ठेवले होते. हत्तींवरील माहूत सर्व हिंदू होते. त्यांच्यावरील प्रमुखाला 'मुकद्दम-इ-मीलबानान' म्हणत. महमुदाचे हत्तींवर जातीने लक्ष असे. दरवर्षी एकदा तो हत्तींची पाहणी करी आणि रोडक्या हत्तींना हिंदुस्थानात प्रकृती सुधारण्याकरता पाठवून देई. हे सर्व हत्ती बहुतेक युद्धात पकडलेले होते किंवा हिंदू राजांकडून खंडणी म्हणून मिळालेले होते. हिंदूंच्या गजदलाला महमुदाविरुद्ध कधी जय मिळाला नाही. परंतु आपले गजदल त्याने अशा कौशल्याने वापरले की, त्याला मिळालेल्या विजयात त्याचा मोठा वाटा असे. त्याचे खडे सैन्य एक लाखाचे होते. त्यात ५६ हजार घोडेस्वार होते. युद्धाच्या वेळी मांडलिकांकडून आणि सरदारांकडून आलेल्या सैन्यामुळे हा आकडा खूपच वाढत असे.

साम्राज्य

अब्बासी खिलाफतीच्या अस्तानंतर महमुदाचे साम्राज्यच सर्वांत मोठे होते. महमूद गादीवर आला तेव्हा तो गझनी, बख्त आणि बल्ख ह्या छोट्या राज्यांचा स्वामी होता. परंतु नंतर त्याने अनेक राज्ये जिंकून घेऊन गझनीच्या साम्राज्याच्या मर्यादा इराकपासून ते कनौजपर्यंत आणि ख्वारीझमपासून तो काठेवाडपर्यंत

वाढविल्या. त्याच्या साम्राज्याची पश्चिमोत्तर लांबी दोन हजार मैलांची आणि दक्षिणोत्तर लांबी चौदाशे मैलांची होती.

न्यायी राजा

महमूद आपल्या प्रजेची चांगली काळजी घेत असे. सामान्य जनतेची संपत्ती आणि त्यांचे प्राण ह्यांना धोका पोहोचणार नाही, ही जबाबदारी तो ओळखून होता. त्याच्या राज्याच्या एका कोपऱ्यात दरोडेखोरांनी एका बाईला लुटले. तिने त्याच्याकडे तक्रार करताच त्याने त्या दरोडेखोरांचा निःपात केला. निशापूरच्या अमीराने (पाटलाने) अशीच एका स्त्रीची संपत्ती बेकायदेशीरपणाने जप्त केली होती. महमुदाने अमीराला फटक्यांची शिक्षा दिली आणि त्याला बडतर्फ केले. इ. स. १०१० मध्ये खुरासानमध्ये मोठा दुष्काळ पडला. तेव्हा त्याने गरीब लोकांना धान्य आणि पैसा वाटला. त्याच्या न्यायीपणाच्या आणि प्रजेवरील प्रेमाच्या अशा अनेक गोष्टी मुस्लिम इतिहासकारांनी लिहून ठेवल्या आहेत.

दरबारातील रत्ने

महमुदाला साहित्याची आवड होती. कवी आणि विद्वान म्हणून त्याने थोडेफार नाव कमाविले होते. 'तफ्रिदल्-फरू' ह्या नावाचे एक पुस्तक त्याने लिहिले आहे. त्याच्या दरबारात साहित्यावर चर्चा आणि वादविवाद होत, आणि त्यात तो स्वतः भाग घेत असे. त्याच्या दरबारात त्या वेळच्या मुस्लिम जगतातील विद्वद्रत्ने गोळा झालेली होती. अनेक कवींनी त्याच्यावर स्तुतिपर कवने केली. कवींना आणि विद्वानांना तो दरवर्षी चार लक्ष दिनार वाटत असे. अबुल कासीम फिर्दौसी, अबुल-कासीम हसन बिन अहमद अन्सारी फरुखी, असजदी आणि घडाइरी, हे त्यांतील विशेष नामांकित कवी व विद्वान होत. त्याचप्रमाणे ज्योतिषशास्त्रविशारद अल्बरुनी, तत्त्ववेत्ता फरीबी आणि अल् उत्बी ह्यासारखे प्रसिद्ध लेखकही त्याच्या दरबारात होते. त्याने गझनीत एक विद्यापीठ स्थापन केले आणि त्यात वाङ्मयातील विविध शाखांतील पुस्तकांचा संग्रह केला. एखादे शहर जिंकले की तेथे मिळणारे उत्तम आणि दुर्मिळ ग्रंथ तो ह्या विद्यापीठातील ग्रंथसंग्रहालयात आणून ठेवी.

धर्मवेडा?

महमूद वृत्तीने धार्मिक होता. सर्व धार्मिक कार्ये तो कटाक्षाने करी. तो रोज नियमितपणे नमाज पढे आणि कुराणाचे पठण करी. राजकीय कारणांमुळे, त्याच्या मनात फार असूनही त्याला मक्केची यात्रा मात्र करता आली नाही. रमजान महिन्यात तो खूप दानधर्म करी. तो कर्मठ सुन्नी होता. त्याने लोकांची मते तपासण्याकरता अधिकारी नेमले होते, व सुन्नी मतापेक्षा वेगळी मते धारण करणाऱ्यांना तो शिक्षा करीत असे. त्याने करमाती (कार्माथियन) आणि बातिबी ह्या मुसल-

मानांतीलच पंथांच्या लोकांचा भयंकर छळ केला. त्यांना तो तुरुंगात टाकीत असे, ठार करीत असे किंवा जिवंतपणी जाळीतही असे. त्यांचे धर्मग्रंथ सापडले की ते तो जाळून टाकीत असे. मुसलमानांमधील निराळ्या पंथाच्या लोकांवर देखील अत्याचार करण्याची मुसलमानांची तेव्हापासून असलेली प्रथा अद्यापिही चालू आहे, हे पाकिस्तानात अहमदीयांचा जो छळ होतो आणि मधूनमधून ज्या कत्तली होतात, त्यावरून दिसून येते. हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांत त्याने हिंदूंची देवळे फोडली, त्यांच्यावर अनेक अत्याचार केले आणि त्यांच्या कत्तलीही केल्या.

तरी पण, मुस्लिम इतिहासकारांच्या मते तो कट्टर धर्मवेडा नव्हता. भारतातील स्वाऱ्यांत त्याने कोणा हिंदूला बळजबरीने बाटविले नाही. गझनीतील हिंदू आपल्या मोहल्ल्यात मानाने राहात होते आणि त्यांच्या धर्मपालनावर कोणतेही निर्बंध नव्हते, असे ते सांगतात. मग त्याने हिंदूंची मंदिरे का पाडली, त्यांतील मूर्ती का फोडल्या आणि हिंदूंची लुटालूट का केली ? ह्या प्रश्नाचे उत्तर ते असे देतात की, त्या काळात जितांवर असे अत्याचार करणे कायदेशीर होते आणि भारतात तर राजाच्या खजिन्याबरोबरच देवळातही खूप संपत्ती गोळा झालेली असे. त्या संपत्तीची लूट करण्याकरता महमुदाने देवळावर हल्ले केले. शांततेच्या काळात त्याने हिंदू मंदिरावर कधी हल्ले केले नाहीत. युद्धात भारतात त्याने जेवढ्या शौर्याने लूट आणि कत्तली केल्या, तितक्याच क्रौर्याने त्याने त्या मुस्लिम देशांशी झालेल्या युद्धातही केल्या असाही मुस्लिम इतिहासकार त्याचा बचाव करतात.

ते काहीही असले तरी महमूद हा धर्मवेडा होता, त्याने भारतावर स्वाऱ्या करून हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले, शिल्पकलेचे सुंदर नमुने असलेली त्यांची देवळे फोडली आणि शक्य तेवढ्या हिंदूंना जबरदस्तीने मुसलमान केले, ही जी भारतातली पूर्वापार समजूत आहे, तिचे निराकरण होणे दुरापास्त आहे.

बांधकामे

महमुदाने आपल्या हयातीत फारशी बांधकामे केली नाहीत. बल्खमध्ये एक मंडई, ऑक्सस नदीवर एक पूल आणि गझनीपासून १८ मैलांवर नवर नदीवर एक धरण, एवढाच त्याने केलेल्या बांधकामांचा इतिहासकार उल्लेख करतात. महमुदाने गझनीत एक प्रचंड मशीद बांधली. ती त्याने लुटून आणलेल्या सोन्याने आणि रत्नांनी शृंगारली. गझनीपासून दोन मैलांवरील एका छोट्या खेड्यात रौदा-इ-सुलतान म्हणज सुलतानाची कबर आहे. ही कबरदेखील आज पडझड झालेल्या अवस्थेत आहे. प्राचीन गझनी होती, त्या ठिकाणी आज त्या नगरीची साक्ष देणारे फक्त दोन मिनार उभे आहेत. ते एकमेकांपासून चारशे यार्डांच्या अंतरावर आहेत आणि त्यांची उंची १४४ फूट आहे. महमुदाने व त्याच्या नंतरच्या राजांनी गझनीत मोठमोठे राजप्रासाद बांधले. सरदारांनीही मोठमोठे वाडे बांधले. भारतातून लुटून

आणलेल्या संपत्तीने गझनी शहर वैभवसंपन्न झाले होते. परंतु क्रूर योद्धयांपेक्षाही काळ अधिक क्रूर आणि शक्तिशाली आहे. फक्त महमुदाची पंडित कबर आणि ते दोन मिनार प्राचीन गझनीच्या वैभवाची साक्ष देत आज केविलवाणेपणाने उभे आहेत.

काळाचा सूड !

महमुदाने निर्दयपणे लुटालूट करून खूप वभव मिळविले खरे, पण ते त्याच्या पश्चात फार काळ टिकले नाही. महमुदाच्या मृत्यूनंतर अवघ्या शंभर वर्षांनी घुरच्या सुलतान अल्लाउद्दीनाने (जग जाळणारा) गझनी शहर संपूर्ण उद्ध्वस्त केले. नंतर महमुदाने बांधलेल्या त्या रत्नखचित मशिदीचा चिनी मूर्तिपूजकांच्या टोळ्यांनी विध्वंस केला. पुन्हा इ. स. १२२६ मध्ये चेंगीजखानाने गझनीवर धाड घातली. त्याने सर्व रहिवाशांना घराबाहेर काढले व त्यांची गणती केली. त्यातील कारागीर निराळे केले आणि बाकीच्या सर्वांची कत्तल केली. त्याने सारे शहरही उद्ध्वस्त केले. 'मोगल आले व खोदून, जाळून, कत्तल करून लुटून परत गेले,' असे चंगीजखानाच्या धाडीचे वर्णन करण्यात येते. तसाच प्रकार गझनीत घडला. दुसऱ्या एका वृत्तान्ताप्रमाणे, चेंगीजखानाने चार महिने वेढा दिल्यानंतर गझनी शहर घेतले, पायासह खोदून ते त्याने जाळून टाकले व सुमारे दोन लक्ष लोकांची त्याने कत्तल केली. इतर राज्यांत जाऊन लुटालूट आणि कत्तली करणाऱ्या महमुदाच्या राज्यावर हा इतिहासाने एक प्रकारे भयंकर सूडच उगविला !

अखेरचे दिवस आणि मृत्यू

सुलतान महमुदाच्या आयुष्यातील तेहेतीस वर्षे सतत युद्धे करण्यात गेली. ह्या ताणामुळे त्याच्या मूळच्या कणखर शरीरावरही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. सोमनाथच्या स्वारीवरून परत येताना जाटांनी त्याच्या सैन्याला भयंकर त्रास दिला होता. त्यांना शिक्षा करण्याकरता त्याने इ. स. १०२७ मध्ये केलेली स्वारी ही त्याच्या आयुष्यातील अखेरची स्वारी ठरली. ह्या स्वारीवर असतानाच त्याला मलेरियाने पछाडले. हे दुखणे नंतर आतड्यांच्या क्षयरोगावर गेले. ह्या रोगापासून त्याला दोन वर्षे बराच त्रास झाला. तरीपण आपला हा आजार लोकांपासून लपवून ठेवण्याकरता तो आपली नित्यकर्मे करीत राहिला. रोजचा दरबार तो भरवी. तो एकदा खुरासानमध्ये सेलजुकांवर स्वारी करूनही आला. काही काळ बल्खमध्ये राहून तो गझनीला परत आला. त्यानंतर एक आठवड्यानेच गुरुवारी दुपारी पाच वाजता त्याचा अंत झाला. ३० एप्रिल १०३० हा तो दिवस होता. त्या वेळी त्याचे वय एकूणपन्नास वर्षांचे होते. त्याच दिवशी संध्याकाळी, त्याचे आवडते विश्रांतिस्थान जी फिरुझी बाग, तिच्यात त्याचे दफन करण्यात आले.

आजारीपणात त्याने विलक्षण सहनशक्ती दाखविली. आजारी माणसाप्रमाणे

बिछान्यात पडून राहण्याचे त्याने नाकारले. बिछान्यावर तो तक्क्यांना टेकून बसून राही आणि कामकाज करी. त्याला मृत्यूही ह्याच अवस्थेत आला.

लोभी वृत्ती

मरण्यापूर्वी काही काळ तो आपले आवडते सैन्य डोळे भरून पाहून आला. मग त्याने लुटून आणलेल्या द्रव्याच्या आणि रत्नांच्या राशी आपल्यासमोर मांडण्याचा हुकूम केला. सत्तर रत्तल रत्ने त्याच्यासमोर रांगेने मांडून ठेवण्यात आली. हे सारे साम्राज्य, सारे वैभव आपण आता सोडून जाणार म्हणून तो रडू लागला. त्याचा संपत्तीचा लोभ जबरदस्त होता.

काही इतिहासकार त्याच्या ह्या रडण्याला सोज्वळ स्वरूप देतात. ते म्हणतात, "मृत्यूच्या क्षणी त्याला आपल्या जीवनातील सर्व गोष्टी आठवल्या. त्या कत्तली, त्या जाळपोळी, त्या आर्त किंकाळ्या आणि त्यातच मिसळलेला त्याच्या विजयी सेनेच्या शस्त्रांचा खणखणाट ह्या साऱ्यांचे एक भयानक दृश्य त्याच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. त्याचे हृदय पश्चात्तापदग्ध झाले आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. पश्चात्तापाने पोळून तो ढसाढसा रडला."

सोमनाथावरील स्वारीच्या उत्तरार्धात त्याला मलेरियाचा विकार जडला. त्याने केलेल्या भयंकर अत्याचारांबद्दल अखेर सोमनाथाने त्याला ही शिक्षा दिली, असे भाविक हिंदूंना वाटल्यास नवल नाही.

महमूद मृत्युशय्येवर असतानाच आपल्या साम्राज्याचे शकले पडणार, हे दृश्य त्याला डोळ्यांसमोर दिसू लागले होते. क्षितिजावर काळे ढग जमा होऊ लागले होते. खुरासानमध्ये वस्ती करण्याची त्याने ज्यांना परवानगी दिली होती, तेच सेलजूक लोक क्षणाक्षणाला प्रबळ होत चालले आहेत, हे त्याला जाणवत होते.

सोमनाथाचे दरवाजे

सोमनाथाची लूट घेऊन जाताना महमुदाने सोमनाथ मंदिराचे चंदनी दरवाजेही बरोबर नेले आणि ते नंतर त्याच्या कबरीला लावण्यात आले अशी समजूत प्रचलित होती. इ. स. १८३६ ते १८४२ ह्या काळात हिन्दुस्थानचा गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड हा होता. त्याच्या कारकीर्दीत इंग्रजांनी अफगाणिस्तानवर स्वारी केली. ऑक्लंडनंतर लॉर्ड एलनबरो हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला. अफगाणांबरोबरच्या युद्धात प्रथम इंग्रजांना बराच मार खावा लागला, पण अखेरीस त्यांनी अफगाणांवर विजय मिळविला. इंग्रजांचे विजयी सैन्य अफगाणिस्तानातून परत यावयास निघाले तेव्हा लॉर्ड एलनबरोने 'गझनीच्या महमूदाच्या कबरीवर टांगलेली त्याची गदा आणि त्या कबरीला लावलेले सोमनाथ मंदिराचे दरवाजे घेऊन या.' असा हुकूम पाठवला. अफगाणांवरील इंग्रजांच्या लष्करी प्रभुत्वाचे चिन्ह म्हणून त्याला ह्या वस्तू हव्या होत्या. ह्या वस्तूंची सैन्याच्या निशाणाइतकी काळजी घ्य

आणि तितक्याच इतमामाने त्या हिन्दुस्थानात आणा, असा त्याचा सेनापती नॉटला हुकूम होता.

इंग्रजांचे हिन्दुस्थानी सैन्य परत आल्यावर विजय साजरा करण्याकरता त्या सैन्याने फिरोजपूरमध्ये संचलन केले. त्या प्रसंगी एलनबरोने 'सर्व राजेरजवाडे, अमीरउमराव आणि हिन्दुस्थानातील प्रजानन' ह्यांना उद्देशून एक जाहीरनामा काढला. त्याची सुरुवात त्याने "माझ्या बंधूंनो आणि माझ्या मित्रांनो", अशी केली होती. आणि पुढे म्हटले होते, "आमच्या विजयी सैन्याने अफगाणिस्तानातून सोमनाथ मंदिराचे दरवाजे आणले आहेत आणि सुलतान महमुदाची उद्ध्वस्त कबर आता गझनीच्या विध्वंसाकडे पाहात आहे. आठशे वर्षांच्या अपमानाचा सूड अखेरीस उगवण्यात आला आहे. इतकी शतके तुमच्या अवहेलनेचे प्रतीक असलेले सोमनाथ मंदिराचे दरवाजे आता तुमच्या राष्ट्रीय गौरवाचे अभिमानचिन्ह आणि तुमच्या सैन्याच्या सिंधू नदीपलीकडील देशावरील प्रभुत्वाचा पुरावा झाले आहेत."

त्यानंतर पुढे त्या जाहिरनाम्यात म्हटले होते, "सरहिंद, राजवाडा आणि माळव्यामधील राजांनो आणि उमरावांनो, ह्या यशस्वी युद्धाचे गौरवास्पद विजयचिन्ह मी तुमच्या स्वाधीन करीत आहे. हे चंदनी दरवाजे तुम्ही आपल्या मुलखातून जीर्णोद्धार केलेल्या सोमनाथ मंदिराकडे सन्मानपूर्वक घेऊन जा."

ह्या दरवाजांचे भव्य स्वागत करण्यात येऊन ते मिरवणुकीने आग्र्याच्या किल्ल्यात नेण्यात आले. तेथे ते दिवाण-इ-आममध्ये ठेवण्यात आले. हा मोगल बादशहांचा दरबार हॉल होता. तेथे ते १८७० पर्यंत होते. तेथून ते नंतर आग्र्याच्या पुराणवस्तू संग्रहालयात हलविण्यात आले.

लॉर्ड एलनबरोने हे दरवाजे सोमनाथ मंदिराचे दरवाजे म्हणून आणले असले तरी ह्याविषयी तज्ज्ञांना शंका होती. पुरातत्त्ववेत्ता जेम्स फर्ग्युसन ह्याने ह्या दरवाज्याची सूक्ष्मदर्शकातून कसून तपासणी केली. तेव्हा ते दरवाजे चंदनाचे नसून देवदाराचे आहेत, असे त्याला दिसून आले. त्यावर फुलपत्तीचे पुष्कळ नक्षीकाम केलेले होते. ते आरबी धाटणीचे होते, त्यावर सबक्तगिनाचा पुत्र महमूद ह्याच्यावर कृपावर्षाव करावा, अशी अल्लाची प्रार्थना कुफी लिपीत कोरलेली होती. त्यांच्यावर धातूच्या अनेक पट्ट्या ठोकण्यात आलेल्या होत्या व ह्या सर्व कोरीव कामात हिंदू संस्कृतीचे कोठलेही चिन्ह दृष्टोत्पत्तीस येत नव्हते. हे दरवाजे सोमनाथ मंदिराचे नाहीत, असा तज्ज्ञांचा अभिप्राय पडला. सध्या ते आग्र्यातच कोठे तरी अडगळीत पडलेले असावेत.

सोमनाथ मंदिराचे म्हणून एलनबरोने हे दरवाजे मोठे वाजतगाजत चुकीने आणलेले असले, तरी राष्ट्राने आपला स्वाभिमान कसा जपावा, आपला अपमान कसा धुऊन काढावा, हे त्याच्या ह्या कृतीपासून शिकता येण्यासारखे आहे, हे मात्र निश्चित !

सोमनाथाचा जीर्णोद्धार

गझनीच्या सुलतान महमुदाने सोमनाथाचा विध्वंस केला खरा, परंतु तो परतल्यानंतर त्याचा जीर्णोद्धार करण्यात आला. खरे म्हणजे, हिंदूंनी देऊळ पुन्हा पुन्हा बांधावे आणि धर्मवेड्या मुसलमान राजांनी ते पुन्हा पुन्हा पाडावे, असे एक चक्रच पुढील काळात सुरू झाले. ह्या मंदिराचा मुसलमानांनी नंतरच्या काळात सात वेळा नाश केला आणि प्रत्येक वेळी ते हिंदूंनी पुन्हा बांधून काढले. भारत १९४७ साली स्वतंत्र झाल्यानंतर, सोमनाथाचें सुंदर आणि भव्य देवालय पुन्हा बांधण्यात आले आहे आणि आता येथे हे दुष्ट-चक्र अखेरीस थांबले आहे.

कुमारपाल

सोमनाथाचे मंदिर महमुदाने पाडल्यानंतर अनहिलवाडचा राजा सिद्धराज जयसिंहाने ते पुन्हा बांधावयास घेतले. ते मालवाधिप कुमारपाल ह्याने इ. स. ११६९ साली बांधून पूर्ण केले. त्यात माळव्यातील भोज परमाराने बरेच साहाय्य केले. कुमारपालच्या वेळीच देहोत्सर्गांच्या जागी घाट व पायऱ्या बांधल्या. कुमारपालाने बांधलेल्या देवळाला भावबृहस्पतीने 'मेरु प्रासाद' नावाचा आणखी भाग जोडला. ह्या मंदिराचे वर्णन असे केलेले आढळते :

"मंदिर कैलास पर्वतासारखे उंच, रमणीय व मजबूत होते. देवळाच्या उद्घाटन समारंभास राजा उपस्थित होता. त्याने स्वतः पूजा केली. तो गाव देवस्थानाला दान केला. त्याने प्रभास शहराचाही पुनरुद्धार केला. देऊळ सोन्याच्या पत्र्याने मढवून काढले. नंतर गौरी, भीमेश्वर वगैरे देवालये बांधून पत्र्याने मढविली. राजसभेकरता मोठा मंडप बांधला. हे पाचवे देऊळ शेवटपर्यंत होते. ह्याचेच अवशेष अलीकडे सापडले आहेत."

११७८ मध्ये मुझुद्दीन घोरी ह्याने गुजरातवर स्वारी केली. पण राजा भीमाने त्याचा पराभव केला. त्यामुळे सोमनाथावर स्वारी करण्याचा त्याचा बेत फसला.

त्रिपुरांतक

त्यानंतर, त्रिपुरांतक नावाचा एक शिल्पकार होता, त्याने सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून शिवाय मंदिराभोवती आपल्या कुटुंबियांच्या नावाने पाच शिवालये बांधली. त्याने इ. स. १२८७ मध्ये सोमनाथ प्रतिष्ठा महोत्सव केल्याचा उल्लेख आहे. सोमनाथाची व्यवस्था त्याने लावून दिली. कोणी काय काम करावे, ह्या यादीत 'माळ्याने रोज दोनशे कमळे व दोन हजार सुगंधित पुष्पे द्यावीत.' असे म्हटले आहे.

अल्लाउद्दीनाची स्वारी

इ. स. १२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीच्या गादीवर आला. त्या वेळी

अनहिलवाडपट्टणच्या गादीवर राजा कर्णदेव होता. त्याचा प्रधान माधवी ह्याचे राजाशी वैर होते. म्हणून सूड घेण्यासाठी त्याने अल्लाउद्दीनला स्वारीकरता बोलावले. अल्लाउद्दीन जाळपोळ करीत सौराष्ट्रात आला. तेथे त्याला कोणी विरोध केला नाही. तो आलेला कळताच कर्णदेव पळून गेला. आजूबाजूच्या रजपुतांनी सोमनाथाचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा पराभव झाला. ते सारे सोमनाथासमोर आडवे पडले. त्यांची कत्तल झाली. त्यात माधवीही मारला गेला. अल्लाउद्दीनाने देवळाचा नाश केला (इ. स. १२९८). त्याला लुटीची खूप आशा होती. परंतु महमुदाच्या स्वारीनंतर शहाण्या झालेल्या हिंदूंनी देऊळ अगदी साधे ठेवले होते. त्या रागाने त्याने मंदिराचा विध्वंस केला.

मंदिराची मशीद

त्यानंतर जुनागडचा चुडासामा राजा महिपाल देव ह्याने इ. स. १३०८ ते १३२५ ह्या दरम्यान देवालयाचा जीर्णोद्धार केला. मंदिरावर सोन्याचा कळस लावला. त्यानंतर त्याचा पुत्र खंगार हा गादीवर आला. त्याने पुन्हा लिंगप्रतिष्ठा केली.

इ. स. १३७५ मध्ये गुजरातचा पहिला सुलतान मुझफरशहा ह्याने मंदिराचा नाश केला. नंतर पुन्हा गुजरातचा सुभेदार झाफरखान ह्याने मंदिरावर हल्ला करून मंदिराची मशीद केली (इ. स. १३९५). नंतर बांधलेल्या देवळाचा नाश मुझफरशहाच्या नातवाने केला. पुढे अहमदाबाद वसविणारा अहमदशहा ह्याने सोमनाथवर हल्ला केला. इ. स. १४७१ मध्ये महमद बेगडा ह्याने मंदिराचा नाश केला. सोमनाथाच्या देवळावर हल्ला करून त्याचा विध्वंस करणे मुसलमान राज्यकर्त्यांचे जणू एक कर्तव्यच होऊन बसले होते !

औरंगजेब

इ. स. १५०० पासून दोनशे वर्षे मंदिरात साधारण पूजाअर्चा चालू होती. मध्यंतरी इ. स. १५९० मध्ये तिसरा मुझफरशहा ह्याने मंदिराची पुन्हा मशीद करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात त्याला यश आले नाही. त्यानंतर दिल्लीत औरंगजेबाचे राज्य सुरू झाल्यानंतर सोमनाथवर पुन्हा गंडांतर आले. भारतातील निरनिराळी क्षेत्रे भ्रष्ट करण्याचा त्याने सपाटा लावलाच होता. सोमनाथ तरी त्याच्या धर्मवेडातून कसा निसटणार ?

त्याने गुजरातचा सुभेदार अहमद आझम ह्याला आज्ञापत्र पाठविले, 'सोमनाथ मंदिर पुन्हा बांधता येणार नाही, अशा रीतीने त्याचा संपूर्ण नाश करून टाकावा.' त्याप्रमाणे इ. स. १७०२ मध्ये अहमद आझमने मंदिरात गोवध केला आणि त्याचा संपूर्ण नाश केला. मंदिरावरून अक्षरशः गाढवांचे नांगर फिरवून त्याने दगडविटांचा कसलाच अवशेष ठेवला नाही. नंतर त्याने त्या जागेवर मशीद बांधली. ह्यापुढे सोमनाथाची पूजा गावाबाहेरील एका छोट्या देवळात होऊ लागली.

नंतर गुजरातेवर गायकवाडांचा अंमल सुरू झाल्यावर पुन्हा देऊळ बांधले. पण सोमनाथ जुनागडच्या नबाबाच्या ताब्यात गेल्यावर त्याने इ. स. १७८२ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जवळच मशीद बांधली.

अहिल्यादेवीचे मंदिर

मूळच्या मंदिराच्या जागेवर समुद्राच्या लाटांनी वाळू सारखी वर येऊ लागली. शिवाय मंदिराचे स्थान अशुभ आहे म्हणून त्यावर ही वरचेवर संकटे येतात असाही समज रूढ झाला. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी पूर्वीच्या मंदिराजवळच पण नवीन जागेवर एक भव्य मंदिर बांधले. त्यात लिंग सुरक्षित राहावे म्हणून ते तळघरात ठेवले. प्रसंग आलाच तर तळघराकडे जाणारे भुयार बंद करता यावे, अशी व्यवस्था केली. हानी झाली तर ती वरच्या बाजूला होईल, पण प्राणप्रतिष्ठा झालेल्या लिंगाला धक्का लागू नये म्हणून ही व्यवस्था केली होती.

मूळच्या मंदिराचे अवशेष मात्र वाळूच्या ढिगाऱ्याखाली लपून राहिले.

हिंदूंना अतिपवित्र वाटणाऱ्या श्रीसोमनाथ तीर्थासारख्या मंदिरावर धर्मवेडया मुसलमानांनी असे वरचेवर हल्ले करून त्याचा विध्वंस केला. त्यांनी घाव घातले ते मंदिराच्या दगडामातीवर नाही तर त्यांचा प्रत्येक घाव सहस्रपटींनी वाढून प्रत्येक हिन्दुमात्राच्या हृदयावर बसला. हिन्दूंच्या हृदयावर ह्या ज्या खोल जखमा झाल्या आहेत, त्या दीर्घकाल बुजणाऱ्या नाहीत.

पुन्हा प्राणप्रतिष्ठा

सोमनाथावरील अलीकडचे संकट

इ. स. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. पण त्याच वेळी भारताचे विभाजनही झाले. पश्चिमेला पाकिस्तान ह्या मुसलमानी राष्ट्राची निर्मिती झाली आणि काही काळ सोमनाथावर पुन्हा एका संकटाची सावली पडली. जुनागड संस्थान पाकिस्तानच्या जवळ असल्यायुळे जुनागडच्या नबाबाने पाकिस्तानात सामील होण्याचे मनसुबे सुरू केले होते. परंतु हिन्दूंचे हे अतिपवित्र तीर्थस्थान पाकिस्तानात जाऊ देण्यास जुनागड संस्थानात बहुसंख्य असलेल्या हिन्दूंचा साहजिकच विरोध होता. हे तीर्थक्षेत्र पाकिस्तानात गेल्यावर त्याची काय स्थिती होईल, ह्याची कल्पना करणे अवघड नव्हते. गेल्या हजार वर्षांत मुसलमानांना जे साधले नव्हते, ते त्यांना सोमनाथ पाकिस्तानात गेल्यावर साधता आले असते. पाकिस्तानात गेलेल्या हिन्दूंच्या अनेक मंदिरांप्रमाणे त्याचीही विटंबना झाली असती, आणि अखेरीस त्याची नावनिशाणी राहिली नसती. ही कल्पना हिन्दूंना केवळ असह्य होती. म्हणून जामसाहेबाने दिल्लीत जाऊन ह्या संकटाची राज्यकर्त्यांना कल्पना दिली. सरदार पटेल

आणि काकासाहेब गाडगीळ ह्यांनी निश्चय केला की काही झाले तरी सोमनाथ पाकिस्तानात जाऊ द्यावयाचे नाही. पाकिस्तानी पोलिस जुनागडला येऊही लागले होते. तेव्हा सरदार पटेलांनी खंबीरपणाने भारतीय सैन्य जुनागडला पाठविले. जुनागडचा नबाब पाकिस्तानात पळून गेला. जुनागड संस्थान भारतात सामील करण्यात आले आणि सोमनाथ ह्या भयंकर गंडांतरातून वाचला.

आपली सेना २४ ऑक्टोबर १९४७ ह्या विजयादशमीच्या दिवशी जुनागडात शिरली. दिवाळीत सरदार पटेल, काकासाहेब गाडगीळ व जामसाहेब जुनागडला गेले. तेथे कार्तिक शुद्ध प्रतिपदा संवत् २००४ ह्या पाडव्याच्या दिवशी त्यांनी सोमनाथाला जाऊन त्याचे दर्शन घेतले. तेथेच सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची घोषणा सरदार पटेलांनी केली.

अवशेष

इ. स. १९४८ च्या जानेवारीत कन्हैयालाल मुनशी मंदिराच्या जागेची पाहणी करण्याकरता सोमनाथाला गेले. पूर्वीच्या देवळाच्या सभामंडपाचा, प्रदक्षिणेच्या मार्गावरील अंतराळाचा भाग शिल्लक होता. देवळाच्या खांबांवरील कमानीही अस्तित्वात होत्या. आणि काही मोडलेल्या कमानी इतस्ततः पडलेल्या होत्या. ३५ फूट अंतरावर एक, असे सभामंडपाचे आठ खांब होते. शिखराचे अवशेष पश्चिमेस पडले होते. काही मूर्तीही सापडल्या. उत्तरेकडे दगडाचे महापीठ बनविलेले असून त्याला हत्ती-घोडे ह्यांचा आधार असल्यासारखे कोरलेले होते. खांबांचे अवशेष शिल्लक होते. मेघनाद मंडपाची फरशी बाहेर दिसत होती. ह्या फरशीखाली पूर्वीच्या देवळाचे पाये व अवशेष सापडले. त्यावरून असे दिसून आले की, त्या काळी शिल्पकला पराकोटीला गेलेली होती. दोन दगडांत चुना, सिमेंट काहीच जाऊ शकत नव्हते. काही ठिकाणी सिमेंटही सापडले. जुना पाया अत्यंत मजबूत होता. तो जमिनीखाली तेरा फूट होता. त्यावर वाळू जमा झालेली होती. जुन्या सामग्रीचा उपयोग न करता नवीन देऊळ बांधावयाचे ठरले. मंदिरावरोबर संस्कृत विद्यापीठही स्थापन करावयाचे ठरले.

३ जुलै १९५० रोजी कन्हैयालाल मुनशींनी वनमहोत्सवानिमित्त, श्रीकृष्णाने देहोत्सर्ग केला त्या ठिकाणी वृक्षारोपण केले. कारण कृष्ण ही वनमहोत्सवाची देवता आहे. कृष्णाच्या वेळी गिरिपूजा करीत. गोवर्धन, रैवतक पर्वत ही कृष्णाच्या वास्तव्याची, पूजेची आणि विहाराची स्थाने होती. कृष्णाने स्वर्गातून पारिजात, वैजयंती, तुळस ह्या वनस्पती पृथ्वीवर आणल्या.

८ मे १९५० रोजी जामसाहेबांनी सोमनाथाच्या देवळाची कोनशिला बसविली. त्या वेळी सरदार पटेल म्हणाले, "सोमनाथाचा जीर्णोद्धार केल्याखेरीज आपण स्वतंत्र झालो असे जनतेला वाटणार नाही. यास्तव हे घडणे इष्ट आहे."

मूळची जागा

शेकडो वर्षांनंतर मूळच्या जागेवर मशीद व वाळूचे अनेक थर जमलेले असल्यामुळे सोमनाथाचे मूळचे मंदिर कोठे होते, हे शोधून काढण्यास बराच त्रास झाला. नामांकित भूगर्भशास्त्रज्ञांकडून आणि स्थापत्यविशारदांकडून मूळ जागा निश्चित करण्यात आली. त्याकरता तेथील मशीद काढावी लागली. वाळूत ३६ ते ४० फूट खोल खणावे लागले. तेथेपर्यंत खणल्यावर एक प्रशस्त चौथरा असलेला मूळ पाया लागला. त्याच्या खाली खणल्यावर एकाखाली एक असे चार पाये लागले. प्रत्येक पायाच्या चौथऱ्याला एक अशी एकूण चार गोमुखे सापडली. त्यावरून चार पायांचा शोध लागला. ह्यावरून मूळच्या मंदिराची जागा हीच होती, हे निश्चित झाले.

ह्या पूर्वीच्या मूळ जागेवरच नवे मंदिर बांधण्याचे निश्चित होऊन सरदार पटेल ह्यांच्या हस्ते पायाभरणी समारंभ थाटाने पार पडला. गझनीच्या महमुदाने पाडलेल्या मंदिराच्या शिखरावर ज्या कलाकाराने कळस चढविला होता, त्याच कलाकाराच्या वंशजाकडे आताही कळस चढविण्याची व इतर कामगिरी सोपवली. ह्या घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या हा धंदा जिवंत राहिला होता. हे कारागीर सोमपुरा ब्राह्मण जातीचे आहेत.

मंदिराचे बांधकाम

मंदिराच्या कामाला झपाट्याने सुरुवात झाली. शेकडो कारागीर बांधकामासाठी आणि कलाकुसरीसाठी खपू लागले. मंदिराकरता सौराष्ट्रातच मिळणारा उत्कृष्ट टिकावू असा पांढरा दगड आणला. मूर्तीसाठी त्याच राज्यात मिळणारी काळ्या-निळ्या बहु रंगाची उत्कृष्ट रघुवीरशीला वापरली. त्या शिळेची शाळुंकेसह पिंडी बनविली. पिंडीभोवतालच्या शाळुंकेचा घेर एक खणाइतका प्रशस्त असून पिंडी अत्यंत गुळगुळीत बनविली आहे. शाळुंकेच्या आतील शिवलिंग जवळजवळ पुरुषभर उंचीचे म्हणजे पाच फुटांचे आहे. त्याचा परीघ आठ ते दहा फूट आहे. मंदिराबाहेरील पायऱ्यांपासून गाभाऱ्यात शिवलिंग व शाळुंका नेण्यास पंचाहत्तर कारागिरांना सतत काम करून दोन दिवस लागले. शिवलिंगापुढे असणारा नंदी सुंदर, भव्य आणि नक्षीकामाने शृंगारलेला आहे. ८ मे १९५० ह्या दिवशी नव्या मंदिराचा पाया घातला. मूळ जागेच्या जवळ एका जुनाट मशिदीचा घुमट होता. तो पाडून टाकण्यात आला. ही मशीद सूर्यमंदिराच्या जागेवर बांधण्यात आली होती. कारण तेथे सूर्याची मूर्ती सापडली. तेथे बलभीम मारुतीची स्थापना करण्याचे ठरले.

प्राणप्रतिष्ठा

मंदिर बांधून पूर्ण होताच त्याची प्राणप्रतिष्ठा मोठ्या राजशाही थाटामाटाने

करण्याचे ठरले. त्याकरता प. पू. केवलानंद सरस्वती स्वामीजी (पंडित नारायण-शास्त्री मराठे) व त्यांचे शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांची नियुक्ती करण्यात आली. नवे सोमनाथ मंदिर पूर्वास्पृश्यांना पूजेकरता व अहिंदूंना दर्शनार्थ मोकळे राहील, असे विश्वस्तांनी ठरविले होते. ते अनेक सनातनी मताच्या शास्त्रीपंडितांना मान्य नसल्यामुळे हा आचार्यत्वाचा मान पुरोगामी मतांच्या महाराष्ट्रीय विद्वानांकडे आला. प्राणप्रतिष्ठेसाठी भारतातील निरनिराळ्या क्षेत्रांमधून एकंदर १६० ऋत्विज आणि ४ अग्निहोत्री ह्यांना पाचारण करण्यात आले.

समारंभ

समारंभाकरता प्रतिष्ठा मंडप, अघोर मंडप (मधुपर्क मंडप), अतिरुद्र मंडप, नवग्रह मंडप (जपजाप्याकरता) आणि सभामंडप असे पाच प्रशस्त मंडप उभारण्यात आले.

श्रीसोमनाथाच्या प्राणप्रतिष्ठा समारंभास शके १८७३ वैशाख शु. द्वितीया, मंगळवार, दि. ८ मे १९५१ ह्या दिवशी सकाळी आठ वाजता मंगल वाद्यांच्या गजरात प्रारंभ झाला.

पुण्याहवाचन, देवतापूजन इत्यादी विधी यथासांग पार पडले. ह्या वेळी यजमानपद सौराष्ट्राचे त्या वेळचे कमिशनर श्री. द. वा. रेगे ह्यांनी सपत्नीक स्वीकारले होते. ९ मे १९५१ रोजी नवग्रहहवन इत्यादी अनेक पूजा करून मंडप, ध्वज, पताका ह्यांची सिद्धी केली. ह्या वेळी अग्निमंथनाने ज्वाला प्रज्वलित केल्या. तिसऱ्या दिवशी देवतास्थापन, संस्कार स्नपन, अथर्वशीर्ष जप, अष्टदिक्पाल हवन, शांतिसूक्त, पूर्णाहुती, मंत्रजागर हे कार्यक्रम झाले. देवतेचा स्नपनविधी झाला. त्याकरता सर्व भारतीय नद्या, तीर्थे, जगातील सर्व नद्या, सागर, सरोवरे ह्यातील जल भारतीय राजदूतांमार्फत मागविले होते. पवित्र ठिकाणच्या मृत्तिका, वनस्पती, सेतू आणि रत्ने ह्यांनी युक्त अशा जलाने स्नपन केले. श्री. रेगे, काकासाहेब गाडगीळ, टंडनबाबू आणि बारा ऋत्विज ह्यांनी स्नान घातले. ह्याकरता निरनिराळ्या उदकांचे शंभर कलश होते. जलात मुक्त हस्ताने अत्तरे मिसळली होती, त्यामुळे सर्व वातावरण सुगंधाने भरून गेले होते. त्यानंतर देवतेचे अधिवासन केले.

मूर्तीत देवत्व

शुक्रवारी सकाळी ९ वाजून ४६ मिनिटांनी भारताचे त्या वेळचे राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांच्या शुभहस्ते सोमनाथ प्राणप्रतिष्ठा व्हावयाची होती. ते साडे-आठ वाजता येऊन उपस्थित झाले. त्यांचा पोषाख अगदी साधा होता. त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी यज्ञनारायणाला तीन प्रदक्षिणा घातल्या. तर्कतीर्थांनी बाबूजींच्या भाळी केशरी तिलक लावला. त्यांना नंतर गाभाऱ्यात नेण्यात आले.

त्यांच्या गळ्यात पुष्पमाला घालण्यात आल्या, आणि प्राणप्रतिष्ठेस प्रारंभ झाला.

श्रीसोमनाथाच्या पिंडीखाली शास्त्रात सांगितल्याप्रमाणे हिरेमाणके, रत्न घातली. शांतिसूक्ताला प्रारंभ झाला. राजेंद्रबाबूंबरोबर त्यांच्या पत्नीही होत्या. राष्ट्राध्यक्षाची पत्नी असूनही पूजासाहित्य त्या स्वतः घेऊन पायी चालत आल्या. अथांग जनसागर जमला होता. वेदघोष सुरू झाला. गाभाऱ्यात लावलेल्या ध्वनिक्षेपकांतून तो आसमंतात दुमदुमला.

ज्योतिष्यांनी काढलेल्या सुमुहूर्तावर राष्ट्राध्यक्षांनी बरोबर ९ वाजून ४६ मिनिटांनी सुवर्णशलाकेचे उद्धरण केले. ही सुवर्णशलाका म्हणजे सोन्याची तीनचार इंच लांबीची बारीक कांडी होती. ती लिंगाचा खालचा तळ व शाळुंका ह्यांच्यामध्ये लिंगालगत बारीक छिद्रात रोवून ठेवलेली होती. स्थापनेचे मंत्र सुरू झाले आणि राष्ट्राध्यक्षांनी सुवर्णशलाका ओढून काढली. त्याबरोबर मूर्तीत देवत्व स्थिर झाले. 'सुस्थिरो भव' असे ऋत्विजांनी म्हटल्यावर निरनिराळ्या वैदिक मंत्रांचा घोष सुरू झाला. हा सारा समारंभ पाहून बाबूजींच्या नेत्रात आनंदाश्रू उभे राहिले. जनसागराने 'जय सोमनाथ' असा एकच जयजयकाराचा घोष केला. प्राणप्रतिष्ठेच्या वेळी भारतातील सर्व देवालयांतून घंटानाद करण्यात आला. त्याच वेळी सागरात पुष्पांनी सुशोभित होऊन नटलेल्या आणि अर्धचंद्राकृती रेषेत उभ्या असलेल्या एकशे-एकवीस नौकांवर ठेवलेल्या तोफा धडाडल्या.

आणि अशा रीतीने प्राचीन सोमनाथ मंदिराचा पुन्हा एकदा जीर्णोद्धार झाला.

राष्ट्राची अस्मिता

सरदार पटेलांनी म्हटल्याप्रमाणे सोमनाथाच्या जीर्णोद्धारामुळे भारतीयांना आपण स्वराज्यात आहोत, असे अभिमानपूर्वक वाटू लागले. राष्ट्राची अस्मिता शाबूत राखण्याकरता राष्ट्राचे अपमान धुऊन काढावे लागतात; आणि ज्या जागी ते अपमान झाले असतील तेथेच त्यांचे निराकरण करावयाचे असते. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने फ्रान्सचा पराभव केल्यानंतर, आपला राष्ट्रीय अपमान असाच धुऊन काढला होता. पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव केल्यानंतर, आर्डिनिसच्या अरण्यात एका रेल्वेच्या डब्यात फ्रेंच सेनापतींनी जर्मन सेनापतींकडून शरणागती लिहून घेतली होती. त्या अपमानाचा वचपा दुसऱ्या महायुद्धात फ्रेंचांची शरणागती त्याच अरण्यात आणि त्याच डब्यात लिहून घेऊन जर्मनांनी काढला होता. सोमनाथ मंदिराच्या मूळच्या जागेवरील मशीद काढून तेथे सोमनाथाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा करण्यात हाच उद्देश होता. तो अंशतः तरी नक्कीच सफल झाला.

अंशतः अशाकरता म्हणावयाचे की, भारतीय राष्ट्राच्या उद्दाम धर्मवेडयांनी केलेल्या अपमानाच्या विद्रूप खुणा अद्यापि भारतात अनेक ठिकाणी आहेत. काशी, अयोध्या, मथुरा, प्रयाग, गोवा अशा अनेक क्षेत्रांत ह्या अपमानास्पद खुणा टळक-

पणाने दृष्टोत्पत्तीस येतात. सरदार पटेलांनी सोमनाथाची जखम बुजवली. ह्या राहिलेल्या जखमा कोण बुजवील ? त्याकरता दिल्लीश्वराचे तक्त फोडणारा एखादा भाऊ हवा, वसईच्या चर्चवरची घंटा आणून ती देवळात टांगणारा एखादा चिमाजी-अप्पा हवा, पुन्हा एखादा सरदार पटेल हवा !

ज्या दिवशी असा एखादा स्वाभिमानी आणि पराक्रमी पुरुष भारतात जन्माला येईल, आणि भारतीयांच्या हृदयांना इंगळ्यांप्रमाणे डंख मारणारे हे सारे अपमान धुऊन काढील, तो भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा सुदिन ठरेल !– आणि तेव्हाच भारतात खरेखुरे राष्ट्रीय ऐकात्म्य साधेल !

आधार :

(१) मध्ययुगीन भारत– भाग ३ रा–हिंदू भारताचा अंत.–ले. चिं. वि. वैद्य
(२) श्रीसोमनाथ तीर्थ– ले. श्री. गौतमबुवा पाठक आणि मुख्यतः
(३) दि लाइफ अँड टाइम्स ऑफ सुलतान महमूद ऑफ गझनी– ले. डॉ. महम्मद नाझीम

३

नाशकातील खिस्तीकरण

तुम्ही नाशिकला आगगाडीने आलात तर तुम्हाला नाशिक रोड स्टेशनवर उतरावे लागेल. नाशिक रोड स्टेशन नाशिक शहरापासून सुमारे सहा मैल दूर आहे. मग तुम्हाला बस, टॅक्सी किंवा टांगा करून शहरात जावे लागेल. पूर्वी नाशिक-नाशिक रोड दरम्यान ट्राम होती. प्रथम घोडयाची. नंतर काही वर्षे पेट्रोलची. रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंना रस्त्यावर आपल्या फांद्यांची कमान करणारे विशाल वटवृक्ष होते. ह्या कमानीच्या शीतल छायेतून ट्राममधून आरामशीर प्रवास करणे, ही एक मोठी मौज होती. पण ते असो. मुख्य प्रश्न असा की नाशिक शहरापासून आगगाडीचे स्टेशन हे असे दूर का ठेवण्यात आले ?

तुम्हाला वाटेल, त्या वेळच्या इंजिनियरांना येथूनच लोहमार्ग नेणे, चढउतार, नद्याओढे, टेकडया वगैरेंच्या दृष्टीने सोयीचे वाटले असेल आणि म्हणून नाशिक रोड स्टेशन शहरापासून असे दूर आहे. किंवा तुम्हास वाटेल, इंग्रज लोक सैन्याच्या दृष्टीने लोहमार्ग बांधीत. देवळालीला गोरे सैन्य होते. तेव्हा देवळालीवरून आगगाडी नेणे आवश्यक असल्यामुळे आणि नाशिक शहर बाजूला पडत असल्यामुळे त्यांनी नाशिक शहरात लोहमार्ग आणला नसेल. परंतु तुमचे हे तर्क सपशेल चूक आहेत.

ब्रह्मवृंदाची मागणी

ह्या प्रश्नाचे उत्तर असे आहे. जेव्हा लोहमार्ग नाशिकजवळ आला, तेव्हा नाशकातील ब्रह्मवृंद रेल्वे अधिकाऱ्यांकडे गेला आणि त्याने सांगितले, "नाशिक हे पवित्र क्षेत्र आहे. भौतिक संस्कृतीचे अपत्य असलेल्या भयंकर आगगाडीला ह्या शहराच्या परिसरात सहा मैलांच्या आत आणून ह्या क्षेत्राचे पावित्र्य भ्रष्ट करू नका." अर्थात, ब्रह्मवृंदाने ही मागणी केल्यानंतर अधिकाऱ्यांना ती मान्य केल्याखेरीज गत्यंतरच नव्हते.

खरं वाटत नाही तुम्हाला ? कदाचित नाही वाटणार. शहराजवळ आगगाडी

आल्याने आपला उपाध्येगिरीचा धंदा जोरात चालेल, असे उलट ब्रह्मवृंदाला वाटले असते, असे तुम्हाला वाटेल. शिवाय तुम्ही विचाराल, नाशिकच्या ब्राह्मणांनी आगगाडीला विरोध केला, तर तिचीच लहान बहीण जी ट्राम, ती अगदी गावात आली तर तिला का नाही विरोध केला ?

असे प्रश्न तुम्हाला सुचले तरी कर्मठ ब्राह्मणांनी आगगाडी नाशकाजवळ येताना विरोध केला, ह्या गोष्टीवर तुम्हाला विश्वास ठेवलाच पाहिजे. कारण, नाशकात ख्रिस्ती धर्माचा प्रसार करावयास आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ही माहिती लिहून ठेवलेली आहे. अंधारात चाचपडणाऱ्या पाखंडी लोकांना येशूचा पवित्र संदेश शिकावावयास आलेल्या मिशनऱ्यांच्या सांगण्यावर विश्वास न ठेवून कसे चालेल ?

मजेदार माहिती

ही माहिती 'नाशिक आणि ख्रिस्तसंदेश' (नाशिक अँड दि गॉस्पेल) ह्या इंग्रजी पुस्तकाच्या प्रास्ताविकात नाशिकची माहिती देताना दिली आहे. ह्या पुस्तकात १८३२ ते १९३२ ह्या शंभर वर्षांच्या काळात नाशकात मिशनऱ्यांनी ख्रिस्तीकरणाचे जे प्रयत्न केले त्याची माहिती दिली आहे. मिशनचे दप्तर, मिशनऱ्यांची पत्रे, दैनंदिन्या, इत्यादी सामग्रीचा उपयोग करून दोन मिशनऱ्यांनी हे पुस्तक लिहिलेले आहे. लेखक मिशनऱ्यांनी आपली संपूर्ण नावे दिलेली नाहीत. फक्त 'जी. सी.' व 'एच्. सी. आर.' अशी नावांची आद्याक्षरे दिली आहेत. ते १९३२ साली प्रसिद्ध झाले. म्हणजे तसे ते दुर्मिळ नाही. परन्तु महाराष्ट्रातील ख्रिस्तीतर वाचकांच्या हाती ते पडण्याचा संभव फारच कमी, म्हणून एक प्रकारे ते दुर्मिळच आहे. ह्या ७४ पानांच्या छोट्याशा पुस्तकातील माहिती आज आपणाला बरीचशी गंमतीची व मजेदार वाटण्यासारखी आहे. म्हणून त्याचा संक्षिप्त स्वरूपात परिचय करून देत आहे.

ह्या पुस्तकावरून त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचीही बरीचशी कल्पना येऊ शकते. आणि त्याचबरोबर हजारो मैलांवरून आलेल्या ह्या गोऱ्या मिशनऱ्यांची चिकाटी, कोती का होईना परंतु आपलाच धर्म खरा, ही असलेली त्यांची दृढ समजूत, येशूच्या पवित्र संदेशाचा प्रसार करणे हेच आमचे जीवितकार्य मानून त्याकरता अनेक हालअपेष्टा सहन करण्याची त्यांची जिद्द, त्यांची निष्ठा, त्यांचे धैर्य, त्यांची सोशिकता, त्याग, वगैरे मिशनऱ्यांच्या अंगच्या अनेक गुणांचाही परिचय होतो. ह्या शंभर वर्षांच्या काळात वीस मिशनऱ्यांनी नाशकात दीर्घकाळ वास्तव्य केले. येथील हवा आणि इतर परिस्थिती त्यांच्या देशातील परिस्थितीपेक्षा अत्यंत विपरीत. साहजिकच त्यांना किती हालअपेष्टा भोगाव्या लागल्या असतील ह्याची कल्पनाच करावी. नाशकात थोडाफार काळ स्थायिक झालेल्या ह्या वीस गोऱ्या मिशनऱ्यांपैकी सहाजणांची प्रकृती अतिशय बिघडली आणि त्यांना मायदेशी पाठवून द्यावे लागले, तर पाचजण कॉलरा, मलेरियासारख्या रोगांना बळी पडले.

ह्यावरून ह्या गोऱ्या मिशनऱ्यांना ह्या परक्या आणि त्यांच्या विरोधी वातावरण असलेल्या देशात किती खडतर जीवन जगावे लागले असेल, ह्याची थोडीफार कल्पना येईल.

ह्या पुस्तकाला नाशिकच्या त्या वेळच्या बिशपने 'चार शब्द' लिहिले आहेत. त्यात त्याने ह्या मिशनऱ्यांच्या आत्मत्यागापासून 'अंधारात चाचपडणाऱ्या पापी जनतेला प्रकाश दाखवावयास येणाऱ्या भावी मिशनऱ्यांना स्फूर्ती मिळो,' अशी इच्छा व्यक्त केली आहे. खरोखरच, मिशनऱ्यांच्या दृष्टिकोणातून पाहिले तर हे पुस्तक भावी मिशनऱ्यांना स्फूर्तिदायक ठरावे, अशी माहिती त्यात आहे. किंबहुना, आपणही त्यापासून स्फूर्ती घ्यावी असे हे पुस्तक आहे.

मिशनऱ्यांनी नाशकात शंभर वर्षे खिस्तीकरणाचे भगीरथ प्रयत्न केले. त्यात त्यांना कितपत यश आले ? ह्या कुतूहलजनक प्रश्नाचे उत्तरही ह्या पुस्तकात सापडते.

भारतात खिस्ती धर्म युरोपातल्याही पूर्वी आलेला आहे. मलबारात सेंट टॉमस खिस्ताब्दाच्या पहिल्या शतकातच आला होता. त्याने त्या काळात खिस्ती धर्माचा प्रसार केला आणि त्या वेळी ज्या लोकांनी धर्मांतर केले, त्यांचे वंशज आजही मलबारात आहेत. त्यानंतर चौदाव्या शतकापासून भारतात अनेक मिशनरी धर्मप्रसाराकरता येत राहिले. कोकण-गोवा वगैरे भागात त्यांनी धर्मप्रसाराकरता अनेक अत्याचारही केले. परंतु मुंबई आणि महाराष्ट्राच्या देशावरच्या भागात मात्र मिशनऱ्यांचे आगमन बरेच उशिरा झाले. भारतातील मूर्तिपूजक आणि अज्ञानी लोकांत खिस्ती धर्माचा प्रसार करून त्यांना शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविण्याकरता इंग्लंड व अमेरिकेत १८०८ ते १८१० च्या दरम्यान मिशनरी संस्थांची स्थापना झाली, आणि लगोलग १८१३ त रेव्ह. गॉर्डन हॉल व रेव्ह. नॉट हे दोन अमेरिकन मिशनरी मुंबईत आले. परंतु त्या वेळी इंग्लंड व अमेरिका ह्या दोन देशांत लढाई चालू होती, त्यामुळे हे दोघे मिशनऱ्यांच्या वेशात आलेले अमेरिकन हेर असावेत असा इंग्रजांना संशय आला. त्यांना पकडून इंग्लंडला पाठविण्याचा हुकूम कलकत्त्याहून मुंबईच्या राज्यपालास आला. परंतु तेवढ्यात ह्या मिशनऱ्यांनी कोचीनला जाणाऱ्या एका जहाजातून पलायन केले. त्यांना कोचीनला अटक करण्यात आली आणि पुन्हा मुंबईला आणण्यात आले.

ह्यापूर्वी भारतात मिशनऱ्यांना धर्मप्रसार करण्याची इंग्लंडच्या सरकारची बंदी होती. परंतु मिशनऱ्यांनी सतत दबाव आणल्यामुळे १८१३ साली इंग्लंडच्या सरकारने मिशनऱ्यांना भारतात धर्मप्रसार करण्याची परवानगी दिली. भारतातील जनता धर्मप्रसारामुळे चिडेल अशी सरकारला भीती वाटत होती व म्हणून त्याने मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारावर बंदी घातली होती. परंतु भारतात इंग्रजांचे राज्य जर मजबूत करावयाचे असेल, तर त्याकरता खिस्ती धर्मप्रसार हे एक प्रमुख साधन आहे, असे मिशनऱ्यांनी सरकारला पटवून दिले. हिंदी लोकांना आपल्या धर्मात ओढले म्हणजे

ते आपल्याशी एकजीव होतील व आपल्याविषयी त्यांना आपुलकी निर्माण होईल, हा मिशनऱ्यांचा मुद्दा सरकारला पटला होता. आता रेव्ह. हॉल व नॉट ह्यांचा मार्ग मोकळा झाला आणि त्यानंतर मग भारतात येथील अज्ञानी लोकांचा उद्धार करू इच्छिणाऱ्या मिशनऱ्यांची रीघच लागली.

नाशकातील पहिले मिशनरी

नाशकातही पहिला जो मिशनरी आला तो रेव्ह. गॉर्डन हॉलच होता. ते १८२६ साल होते आणि त्या वेळी नाशकात कॉलऱ्याने धुमाकूळ घातला होता. कॉलऱ्याच्या रोग्यांची शुश्रूषा करण्याकरता आणि त्यांना मुक्तीचा मार्ग दाखविण्याकरता, स्वतःच्या प्राणांची तमा न बाळगता तो आला होता. त्याने आणलेली औषधे आणि धार्मिक पुस्तके संपल्यावरच तो नाशकातून परत जाण्याकरता निघाला. परंतु त्याने नाशिक सोडले मात्र, त्यालाच कॉलऱ्याने पछाडले आणि नाशकापासून तीस मैलावर असलेल्या दापूर ह्या छोट्या खेडयात तो २० मार्च १८२६ रोजी मरण पावला.

रम्य नाशिक

त्यानंतर चार वर्षांनी म्हणजे १८३१ मध्ये रेव्ह. फरार आणि डॉ. विल्सन– मुंबई येथे भरगच्च शिक्षणकार्य केलेले–हे दोघे नाशकास आले. रेव्ह. फरार आपल्या वृत्तान्तात दि. १४ मार्च ह्या रोजी नोंद करतो, "आज सकाळी नाशिक शहरात आम्ही फेरफटका मारला. नाशिक अतिशय रम्य ठिकाण आहे. आजूबाजूच्या टेकडयांवरून नाशकावर नजर टाकली तर तेथून फारच सुंदर देखावा दिसतो. यथून शहरातील मंदिरे, त्यांची उंच शिखरे, त्यांवरील चकाकणारे कळस आणि भव्य प्रासाद ह्यांचे दर्शन होते. आणि सेंट ऑगस्टाईनला प्राचीन काळातील मूर्तिपूजकाची भव्य नगरी पाहून जसे दुःख झाले, तसेच आम्हालाही मनातून अतिशय दुःख झाले."

प्रथम मुंबईबाहेर मिशनरी केंद्र नव्हते. अहमदनगर येथे नवीन केंद्र उघडण्याचे घाटत होते. परंतु १८३२ मध्ये नाशिक येथेच मिशनरी केंद्र उघडण्याचा निणय घेण्यात आला आणि त्याप्रमाणे रेव्ह. मिचेल आणि रेव्ह. डिक्सन ह्यांची नाशिकला रवानगी करण्यात आली. हे दोघे नाशिकला जुलैच्या अखेरीस येऊन पोहोचले. मिचेल व त्यांची पत्नी ह्यांनी नाशकातील पेशवेवाडयातील एका भागात मुक्काम ठोकला. (ह्याच वाडयात नंतर कित्येक वर्षे सेंट जॉर्जेस हायस्कूल होते. आज तेथे पेठे हायस्कूलची नवी भव्य इमारत उभी आहे.) ह्या वाडयात त्यांना बिनभाडयाने राहण्याची परवानगी सरकारने दिली होती. मिशनऱ्यांच्या दृष्टीने हा वाडा गैरसोयीचा असला तरी त्यांना नाशकात दुसरी जागा मिळणे शक्य नसल्यामुळे तेथेच वास्तव्य करणे भाग पडले.

त्यानंतर सप्टेंबरच्या मध्यास रेव्ह. फरार आपल्या पत्नीला घेऊन आला. तो आपल्या दैनंदिनीत लिहितो, "ज्याला जुना राजवाडा म्हणतात त्या इमारतीत भाई मिचेल राहतो आहे. एका उभट, अरुंद आणि गोल जिन्यावरून वर गेल्यावर मी एका ग्यालरीत पोहोचलो. तेथे अंधुक प्रकाश होता, पण त्याही प्रकाशात मिचेल आणि त्याचे कुटुंब नाष्टा करीत असलेले मला दिसले. दक्षिण भारतात रात्रीची थंड हवा घरात कोंडून ठेवण्याची पद्धत आहे. दिवसाची उष्ण हवा शक्य तेवढी घरात येऊ देत नाहीत. घराला काचेच्या खिडक्या नसल्यामुळे, बाहेरची उष्ण हवा बाहेर ठेवण्याच्या प्रयत्नात मिचेलला उजेडही बाहेरच ठेवावा लागत होता. आतमधील अंधार दिसू शकेल, एवढाच उजेड तो आत घेऊ शकत होता. नाष्टा झाल्यानंतर तो मला वाड्याच्या दुसऱ्या भागात घेऊन गेला. तेथे तो स्वतःकरता राहण्याच्या खोल्या तयार करीत होता. मी तर अंधाऱ्या आणि घाणेरड्या बिळाकडे पाहात आपण त्यात कसे राहू शकू ह्यावर विचार करीत राहिलो."

चौदा वर्षे वास्तव्य

डिक्सन प्रथम प्रवासी बंगल्यात उतरला होता. नंतर त्याने गावात एक घर भाड्याने घेतले. परंतु तो लिहितो, "मी जेव्हा त्या घरात राहावयास म्हणून गेलो, तेव्हा घरमालक मला घराचा तावा देईना. त्याने आधी केलेला करार पाळण्याचे नाकारले, म्हणून मग मी एका धर्मशाळेत जाऊन राहिलो. ह्या धर्मशाळेत साधू, बैरागी आणि काही भिकारी राहतात."

अशा रीतीने तीन मिशनरी नाशकात धर्मप्रसाराकरता आले. ह्यांतील फरार (व त्याची पत्नी) आणि डिक्सन १८४६ पर्यंत म्हणजे चौदा वर्षे नाशकात राहिले. त्यांच्या दृष्टीने हा चौदा वर्षांचा वनवासच होता. परंतु ह्या अवधीत त्यांनी नाशकात ख्रिस्ती धर्मप्रसाराचा पाया घातला. ह्या कामात मिसेस फरारचा वाटाही मोठा होता. मिचेलच्या मागे मात्र आपत्ती हात धुऊन लागल्या होत्या. प्रथम त्याची बायको आजारी पडली. नंतर त्याचा लहानगा मुलगा मरण पावला. आणि शेवटी तो स्वतःच भयंकर आजारी पडला. त्यामुळे त्याला १८३४ मध्ये इंग्लंडला हलविण्यात आले. तरी पण ह्या दोन वर्षांच्या अल्पावधीतच त्याने एवढे भरीव कार्य केले की, नाशिकच्या मिशनऱ्यांच्या इतिहासात त्याचा उल्लेख गौरवानेच होईल.

प्रारंभीचे प्रयत्न

नाशकात येताच मिचेलने धर्मप्रसारास सुरुवात केली. प्रथम प्रथम तो सामुदायिक धर्मोपदेश न करता एकेका माणसाला गाठून व्यक्तिशः उपदेश करी. "रस्त्यावर प्रचार केला तर फारसा उपयोग होणार नाही, असे मला वाटते." असे तो म्हणतो. पण त्याला वैयक्तिक उपदेशही फारसा उपयुक्त वाटला नसावा कारण थोड्याच दिवसांत तो डिक्सनबरोबर नदीघाटावर जाऊन लोकांना ख्रिस्ती धर्माचा

उपदेश करू लागला. "आम्ही जाताना लोक आमच्याकडे शत्रुत्वाच्या दृष्टीने पाहतात, असें मला दिसून आले." असे तो लिहितो.

फरार आपल्या दैनंदिनीत ४ ऑक्टोबर १८३२ रोजी नोंद करतो, "प्रथम प्रथम आम्ही खूप संयम आणि सहनशीलता दाखविणे शहाणपणाचे ठरेल असे ठरविले. आम्ही एका हमरस्त्यावर एक व्हरांडा भाड्याने घेतला आणि त्यावर रोज दुपारी बसू लागलो. रोज वीस ते तीस माणसे येत आणि ती चौकशी करून किंवा चर्चा करून जात. आमचे कार्य गाजावाजा न होता शांतपणाने चाललेले पाहून आम्हाला आनंद वाटला. परंतु हा आनंद अल्पकालच टिकला. एके दिवशी एक मोठे ब्राह्मणभोजन झाले आणि त्यात सर्व जातींच्याच लोकांनी ठरविले की आमच्या जवळ कोणीही गेल्यास त्याच्यावर जातिबहिष्कार घालण्यात येईल. तरीही आम्ही काही दिवस आमचा क्रम चालू ठेवला, परंतु लोकांना भीती वाटत असल्यामुळे ते आमच्याकडे येईनात. तेव्हा आम्हीच लोकांकडे जाण्याचे ठरविले. आता आम्ही कोणीही जेथे कोठे भेटेल तेथे त्याच्याशी संभाषणाला सुरुवात करतो. ब्राह्मण लोक आमचा अपमान करण्याचा आणि त्रास देण्याचा प्रयत्न करीत असले तरी इतर जातींतील लोक मात्र आमचे म्हणणे शांतपणाने आणि आदरपूर्वक ऐकून घेतात, असे दिसून येते."

ब्राह्मणद्वेष

ह्या सर्व वृत्तान्तात मिशनऱ्यांचा ब्राह्मणांविषयीचा द्वेष स्पष्ट दिसून येतो, आणि तेही साहजिकच होते. ब्राह्मणवर्ग हा हिंदू समाजाचा कणा होता. भारतीय धर्म, परंपरा, विद्या आणि इतिहास ह्यांचा तो अभिमानी होता. ब्राह्मणवर्गातूनच ह्या गोष्टी इतर वर्गांत झिरपत. समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व ब्राह्मणांकडे होते. मिशनऱ्यांना आपल्या धर्माचा महाराष्ट्रात प्रसार करण्याच्या मार्गात ब्राह्मणांची मोठीच धोंड होती. हा वर्ग जर नेस्तनाबूद झाला किंवा इतर वर्ग त्याच्या विरुद्ध उभे राहून तो निष्प्रभ झाला तर येशूचा संदेश देण्याचे आपले काम सुकर होईल अशी त्यांची खात्री होती. म्हणून येथील ब्राह्मणांवर मिशनऱ्यांचा दात होता, व त्याचे दर्शन मधून मधून ह्या वृत्तान्तात घडते. असे असले तरी शक्य तेवढे ब्राह्मण बाटून ख्रिस्ती व्हावेत अशीही त्यांची इच्छा होती. कारण एकदा ब्राह्मणच ख्रिस्ती झाले की त्यांच्या मागोमाग इतर जातीही विनासायास ख्रिस्ती होतील, अशी त्याची अटकळ होती. परंतु ब्राह्मणांना बाटविण्यात मिशनऱ्यांना फारसे यश येत नव्हते. त्यामुळे ते ब्राह्मणांवर दात धरून होते.

अशा रीतीने मिशनऱ्यांचे धर्मप्रचाराचे कार्य कोणाच्या फारसे डोळ्यांवर न यता नाशकात चालू झाले. काही ब्राह्मण तर मिशनऱ्यांना भेटावयास त्यांच्या घरी देखील जाऊ लागले. अशा एका ब्राह्मणाविषयी मिचेल लिहितो, "आज रात्री

नऊच्या सुमारास माझ्याकडे एक ब्राह्मण आला. मी पाहिलेल्या अतिशय बुद्धिमान ब्राह्मणांपैकी तो एक होता. हा माणूस वरचेवर माझ्याकडे येतो, परंतु तो येतो त्या वेळी माझ्याकडे दुसरे कोणी आलेले नसेल, ह्याची काळजी घेऊन तो येतो. तो इतक्या वेळा माझ्याकडे येऊन गेला, परंतु तो कोणत्या उद्देशाने ह्या फेऱ्या घालतो हे काही मला कळत नाही. त्याच्यासारखे बरेच लोक येतात, परंतु त्यांच्या येण्याचा उद्देश आम्हाला कळत नसल्यामुळे आम्ही घोटाळ्यात पडतो. ते आले की आम्ही हातातील कामदेखील बाजूला सारून त्यांच्याशी बोलत असतो. आम्ही त्यांच्याविषयी बरीच कळकळ दाखवतो. परंतु थोड्याच दिवसांत त्यांना कंटाळा येतो आणि भग ते दिसेनासे होतात."

मिचेल दुसऱ्या एका ब्राह्मणाविषयी लिहितो, "आमच्या शेजारीच राहून अध्ययन करणारा एक ब्राह्मण तरुण आज संध्याकाळी माझ्याकडे आला होता. गेले पंधरा दिवस तो जवळजवळ रोज येतो. तो वादविवाद उकरून काढून आमचे दोष दाखविण्याचा प्रयत्न करतो. तरी पण त्याच्या बाबतीत अगदीच निराश होण्याचे कारण नाही."

खोटारडे साधू

त्या काळात नाशकात साधू, वैराग्यांची गर्दी असे. अर्थातच मिचेलला हे लोक मुळीच आवडत नसत. तो लिहितो, "आज एक साधू आला. माझी त्याची गंगेवर ओळख झाली होती व तेव्हा त्याला मी पैसे देण्याचे कबूल केले होते, असे तो सांगू लागला. खरे म्हणजे, त्या माणसाबरोबर बोलण्याकरता मी तोंडही उघडलेले नव्हते. पापपुण्याचा काहीही विचार न करता हे हिंदू साधू बेधडकपणे खोटे बोलतात, ह्याचाच हा पुरावा आहे. मी ह्या साधूबरोबर क्वचितच बोलतो. हे साधू अत्यंत अज्ञानी असतात. त्यांना कोणतीही गोष्ट समजत नाही किंवा समजून घेण्याची इच्छा नसते. ह्या प्रसंगाचा फायदा घेऊन एका दुभाषी ब्राह्मणाचे साहाय्य घेऊन मी त्या साधूला सुनावले, 'त्याला दान देणे हे मी पाप मानतो. हे पाप मी कधीही करणार नाही.'"

इतरांकडे मोर्चा

उच्चवर्णीयांत आपल्या प्रचाराचा फारसा परिणाम होत नाही, हे पाहिल्यावर मिशनऱ्यांनी आपला मोर्चा इतरत्र वळविला. ८ सप्टेंबर रोजी मिचेल नोंद करतो :

"डिक्सनबरोबर मी मुसलमान मोहल्ल्यात जावयास निघालो. वाटेत पूर्वी आम्ही कधीही पाहिला नव्हता असा शहराचा एक भाग आम्हाला दिसला. चौकशी करता ह्या भागात सर्व शूद्र राहतात असे कळले. आम्ही दोघांनीही त्यांच्यासमोर भाषणे केली; आणि निदान माझ्या मते तरी, ब्राह्मण किंवा मुसलमानांपेक्षा ह्या लोकांनी येशूच्या संदेशाचे ग्रहण अधिक समाधानकारकरीत्या केले. आमची भाषणे ऐकताना ते खूप हसत होते, हे खरे, (बहुधा मिशनरी मराठी ऐकून). त्यांना

प्रत्येक गोष्ट दोन-दोनदा, तीन-तीनदा सांगावी लागे. परंतु आम्ही निघालो तेव्हा ते गंभीर दिसत होते. त्यांच्यातील पुष्कळांनी येशूच्या संदेशाप्रमाणे वागण्याचे आश्वासनही दिले."

आणि निराशा

मिशनऱ्यांचा धीर आता चेपत चालला होता. हळूहळू त्यांनी आपला प्रचार अधिक मोठ्या प्रमाणावर चालू केला. साहजिकच त्याची प्रतिक्रिया म्हणून त्यांना विरोधही अधिक होऊ लागला. मिचेल एके दिवशी नोंद करतो, "महामारीपासून दूर पळावे तसे लोक मला टाळत होते." दोन दिवसांनंतर तो लिहितो :

"आज ब्राह्मणांकडे गेलो. नाटकी अगत्याने त्यांनी मला बसावयास एक आसन दिले. थोडा वेळपर्यंत आमच्यातील ठळक फरकांबद्दल आम्ही शांतपणाने बोलत राहिलो. नंतर वातावरण तापले. ब्राह्मण खूप संतापले. ते त्वेषाने माझी निर्भर्त्सना करू लागले. त्यांची ही निर्भर्त्सना इतकी बदनामीकारक आणि असभ्य होती की, तेथून परत येणेच शहाणपणाचे होते. मिशनऱ्यांना अशा तऱ्हेचे काम करावे लागते म्हणून त्यांना लवकर मरण येते, असे आमचा पंडित म्हणतो. अशा प्रसंगी होणारा भावनोद्रेक आणि नंतर मनावर येणारे निराशेचे सावट, हे सहन करणे एक दिव्यच असते."

मिचेलप्रमाणेच डिक्सनचा अनुभवही निराशाजनकच होता. आतापावेतो त्याने प्रचार खूपच केला होता, परंतु त्याचे दृश्य फळ मात्र अत्यल्प होते. त्याच्या धर्मप्रसाराच्या प्रयत्नांनी केव्हा केव्हा लोक रागावत, परंतु बहुधा लोक तिकडे दुर्लक्ष करीत किंवा त्याची टिंगल करून चालू लागत. एखादे वेळी लोक त्याचा प्रचार ऐकावयास उभे राहात, परंतु त्यांना त्यातले काही समजत असेल तर शपथ. ज्यांना पवित्र संदेशाचे त्याने डोस पाजलेले असत त्यांची केव्हा केव्हा तो चाचणी घेई, आणि जणू जन्मात कधी त्यांनी तो संदेश ऐकला नव्हता इतके ते कोरे असलेले आढळून येई. तो निराश मनाने लिहितो : "जमिनीत बी पेरणाऱ्या शेतकऱ्यांची उपमा आम्हाला साजणार नाही. एखाद्या घनदाट अरण्यात शिरून तेथील झाडेझुडपे छाटून शेतीसाठी जमीन तयार करणाऱ्यांचीच उपमा आम्हाला शोभून दिसेल."

चिकाटी

परंतु मिशनऱ्यांची चिकाटी जबरदस्त असते. आपले श्रम वाया जात आहेत हे दिसत असूनसुद्धा त्यांनी आपल्या प्रयत्नात ढिलेपणा येऊ दिला नाही. आत त्यांनी नदीघाटावर जाऊन नियमितपणे धर्मप्रचाराला सुरुवात केली. मिचेल लिहितो, मुंबई इलाख्यात दुसरीकडे कोठेही आढळणार नाही इतकी धर्मप्रचाराला अनुकूल परिस्थिती ह्या घाटावर आहे. आम्ही घाटावर प्रचाराकरता रोजच गेलो असतो. परंतु ब्राह्मण चिडतील म्हणून आम्ही रोज जात नाही. सध्या आम्ही आठवड्यातून

दोनदा जातो. तिथ फिरावयास आलेले किंवा यात्रेकरता आलेले बरेच लोक आमचा प्रचार ऐकतात." नंतर एके दिवशी तो लिहितो, "आम्ही जोराने ओरडून बोलल्यावर जितक्या लोकांना ऐकू जाईल, तेवढा मोठा आमचा श्रोतृवर्ग असतो. आज श्रोत्यांत बहुतेक ब्राह्मणांचा भरणा होता. डिक्सनचे भाषण त्यांनी बरेच शांतपणे ऐकून घेतले. तो साधारण पाऊण तास बोलला. डिक्सनच्या वक्तृत्वाच्या कौशल्यामुळेच त्यांनी त्याचे भाषण शांतपणाने ऐकून घेतले असे मला वाटते. युरोपप्रमाणेच नाशकातही चांगले आणि थोडक्यात भाषण केले तर श्रोते जिंकले जातात. परंतु येथील श्रोते भाषण किती दक्षैक दृष्टीने ऐकतात हे पुढील गोष्टींवरून समजून येईल. सर्व भाषणात डिक्सनने व्याकरणाची एकच चूक केली तर सर्वजण फिदीफिदी हसू लागले."

मराठी भाषणाचे दिव्य

मिशनऱ्यांना मराठीत भाषणे करावी लागत. मराठी कितीही शिकले तरी गोरे लोक ती कशी बोलतात हे आजही आपण पाहतो. मग येथे येऊन अल्प काळ मराठीचा अभ्यास करून, मराठीत बोलण्याचे धाडस करणाऱ्या ह्या मिशनऱ्यांना कोणत्या प्रसंगातून जावे लागले असेल, ह्याची आपणाला कल्पना करता येईल. डिक्सन लिहितो, "परक्या देशात एखाद्या संमिश्र श्रोतृवर्गासमोर परकी भाषेत उत्स्फूर्तपणे बोलण्याकरता फार मोठ्या प्रमाणावर शारीरिक आणि मानसिक श्रम करावे लागतात. येथल्यासारख्या हवेत तर हे श्रम फारच बेजार करणारे असतात. येथल्या आमच्या प्रयत्नांना थोडेफार जरी यश आले असते तरी आम्हाला ह्या परिश्रमांचे काही वाटले नसते. आमची सर्व शक्ती खर्च करूनही त्याचा काहीही सुपरिणाम होत नाही, ही जाणीव फारच नाउमेद करणारी आहे."

शिवीगाळ

मिचेल आणि डिक्सन ह्यांना जो अनुभव आला त्यापेक्षा फरारला आलेला अनुभवही काही फारसा वेगळा नव्हता. १८३५ मध्ये तो लिहितो :

"कोणी गावी गेल्यामुळे आणि कोणी आजारी पडल्यामुळे आमच्या प्रचारात खंड पडला होता. नंतर आम्ही तो पुन्हा सुरू केला तेव्हाही लोकांनी त्याचे विशेषसे स्वागत केले नाही. उलट, आता लोक आमचा प्रचार ऐकतच नाहीत. दिवसेंदिवस लोक आम्हाला शिवीगाळ करण्याइतके धीट बनत आहेत आणि पुष्कळदा तर आम्ही तोंड उघडण्यापूर्वीच ते आम्हास अत्यंत अर्वाच्य आणि घाणेरड्या शब्दांत शिवीगाळ करतात. ही शिवीगाळ विशेषत: ब्राह्मण करतात. उदाहरणार्थ दोन दिवसांपूर्वी मी घाटावरून फिरत होतो. पहिली अनुकूल संधी मिळताच लोकांना उपदेश करण्याचा माझा उद्देश होता. एवढ्यात एक ब्राह्मण मला उद्देशून काहीतरी बोलला. त्याला मी उत्तर देण्यापूर्वीच त्याच्याबरोबर आलेल्या टोळीपैकी एकजण मला एकाएकी शिव्या

देऊ लागला. तो म्हणाला, " तू कावळा आहेस. कुत्रा. सुव्वर. चल. निघ इथनं. " त्यानंतर एके दिवशी तो लिहितो, " आज सर्वांनी काही तरी ठरविले होते. आम्हास पैसे द्या म्हणजे आम्ही तुमचे भाषण पाहिजे तितका वेळ ऐकू म्हणून ते सांगू लागले. "

हिंदूंची सहिष्णुता

तीन वर्षांनी फरार आणि डिक्सन यांनी कलकत्त्याच्या बिशपला आपल्या कार्याचा अहवाल पाठविला. त्यात ते लिहितात,

" लोकांनी जमण्याच्या सार्वजनिक ठिकाणी पवित्र संदेशाचा रोज प्रचार करण्यात येतो. हा प्रचार कधी प्रत्यक्ष असतो तर कधी अप्रत्यक्ष असतो. आम्ही जेलला आठवड्यातून एकदा भेट देतो. नाशिक हॉस्पिटलमध्ये आम्ही वरचेवर जातो. हॉस्पिटलमधील रोग्यांची संख्या आणि त्यांची परिस्थिती ह्यावर आमच्या भेटी अवलंबून असतात. येथील लोक ख्रिस्ती धर्माबाबत पूर्णपणे उदासीन आहेत किंवा कट्टर विरोधी तरी आहेत. येथील लोक विषयासक्त आहेत म्हणून ते ख्रिस्ती धर्माकडे दुर्लक्ष करतात, त्याचप्रमाणे, 'आमचा धर्म आम्हाला उत्तम आहे, तुमचा तुम्हाला उत्तम आहे', ह्या तत्त्वावर त्यांचा अढळ विश्वास आहे, म्हणूनही ते ख्रिस्ती धर्माकडे लक्ष देत नाहीत...."

खरे म्हणजे ह्या मिशनऱ्यांनी भारतीयांच्या ह्या धर्मसहिष्णुतेचा गौरव करावयास हवा होता. पण, त्याकरता त्यांच्या अंगातही सहिष्णुता असावयास हवी होती. परंतु आपलाच धर्म खरा व इतर सर्व धर्म खोटे, अशी ठाम समजूत असणाऱ्यांत ह्या उदार सहिष्णुतेची अपेक्षा ती कशी करणार ?

चुकीचे निदान

आपल्या वृत्तान्तात हे मिशनरीद्वय पुढे लिहिते, " जातीचा अभिमान, आपल्या धर्मावरील कर्मठ निष्ठा, आणि ब्राह्मणांच्या बाबतीत त्यांचे पुरोहित म्हणून असलेले वर्चस्व आणि संपत्ती नाहीशी होईल ही भीती, ह्यामुळेच ख्रिस्ती धर्माविषयीचा हा विरोध येथील लोकांत निर्माण झालेला आहे. गंभीर सत्याविरुद्ध शिवीगाळ, उपहास आणि अश्लील टिंगल ह्या शस्त्रांचा उपयोग करून ते लढतात. गावात आम्ही जी धार्मिक पुस्तके वाटतो ती बहुतेक सर्व फाडून टाकली जातात. "

मिशनऱ्यांचा ब्राह्मणद्वेष येथेही दिसून येतो. म्हणजे आपली संपत्ती जाण्याचे ब्राह्मणांना भय वाटत होते. खरे म्हणजे ते जर ख्रिस्ती झाले असते तर इतर बाटग्या ख्रिस्त्यांप्रमाणे त्यांना मिशनऱ्यांनी परदेशातून आणलेला पैसा देऊन सुखात ठेवले असते. आणि येथील लोकांना म्हणे आपल्या जातीचा आणि धर्माचा अभिमान आहे. का असू नये बाबांनो ? तुम्हास तुमच्या धर्माचा अभिमान असला आणि त्याची दीक्षा इतरांना देण्याकरता तुम्ही जिवाचा आटापिटा केला तर ते चालते, आणि

इतरांनी आपल्या धर्माप्रमाणे नुसते राहिले आणि तुमच्या धर्मात येण्यास नकार दिला तर मात्र तुम्ही त्यांचा तुच्छतेने उल्लेख करता !

पण ज्यांची दृष्टी आपला धर्म पाहण्यापुरतीच कोती आहे, ज्यांच्यात विशाल सहिष्णुतेचा अभाव आहे आणि ज्यांना आपल्या धर्माचा प्रसार होत नाही हे पाहून नैराश्याने ग्रासले आहे, त्यांनी चिडून जाऊन असे शब्द वापरले तर त्यांना त्याबद्दल क्षमा करावयास हरकत नाही.

४

अहमदशहा दुराणी

संक्षिप्त जीवनवृत्तान्त

अहमदशहा अब्दाल्लीचा जन्म मुद्दोसाई जमातीत इ. स. १७२४ त झाला. वयात आल्यावर तो नादीरशहाच्या सैन्यात दाखल झाला. नादीरशहाच्या मृत्यूनंतर त्याला अफगाण जमातींचा राजा म्हणून निवडण्यात आले. इ. स. १७४७ त त्याला कंदाहार येथे राज्याभिषेक करण्यात आला. नंतर त्याने काबूल व पेशावर जिंकून सर्व अफगाण जमाती आपल्या अंमलाखाली आणल्या. त्याने हिंदुस्थानवर एकूण आठ स्वाऱ्या केल्या. पहिली स्वारी इ. स. १७४८ त केली. परंतु मनूपूरच्या लढाईत पराभव खाऊन त्याला परतावे लागले. यानंतर १७४८ च्या हिवाळ्यात, इ. स. १७५२ व १७५५-५६ मध्ये त्याने हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. मुख्यतः पंजाब प्रांतावर अधिकार प्रस्थापित करण्याकरता ह्या स्वाऱ्या होत्या. चौथ्या स्वारीत त्याने दिल्ली व मथुरा ही शहरे लुटली व अनन्वित अत्याचार केले. इ. स. १७५८ त मराठ्यांनी लाहोर व मुलतान प्रांत काबीज केले व तेथे अदिना बेग हा आपला सुभेदार नेमला. तेव्हा हे प्रांत परत घेण्याकरता त्याने पाचव्यांदा हिंदुस्थानवर स्वारी केली. ह्या स्वारीत त्याला हिंदुस्थानातील बहुतेक मुसलमान राजांनी मदत केली. शीख, जाट व रजपूत ह्यांनी मात्र राष्ट्रीय दृष्टीच्या अभावाने मराठ्यांना मदत केली नाही. पानिपतला मराठ्यांचा दारुण पराभव झाला. तो इतिहास सर्वांना ज्ञातच आहे. त्यानंतर अहमदशहाने १७६२ मध्ये सहावी, १७६४ त सातवी व १७६८ त आठवी अशा हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. इ. स. १७६८ ते ७० पर्यंत त्याने बाल्ख व बुखारा ह्या प्रांतांवर स्वाऱ्या केल्या. इ. स. १७७२ त तो मरण पावला. जवळजवळ बत्तीस वर्षे त्याने राज्य केले. त्याने अनेक देशांवर स्वाऱ्या केल्या. त्याच्या आयुष्यातील फार मोठा काल लढाया करण्यात गेला. त्याच्या जीवनात विविध प्रकारचे प्रसंग त्याच्यावर आले. त्याच्या जीवनातील काही प्रमुख घटना पुढे विस्ताराने दिल्या आहेत.

जन्म आणि बालपण

१४ जानेवारी १७६१ ह्या दिवशी अफगाण आणि मराठे ह्यांच्यात पानिपतचे तिसरे घनघोर युद्ध झाले. ह्या युद्धात मराठ्यांचा पराभव करून त्यांची कत्तल करणारा एक क्रूरकर्मा अफगाण राजा एवढीच आपणाला अहमदशहा दुराणी किंवा अब्दाल्लीची सर्वसाधारण ओळख आहे. परंतु ती तितकीशी खरी नाही. अहमदशहाने मराठी इतिहासाला आणि हिंदुस्थानच्या इतिहासालाही वळण लावले हे खरे, परंतु त्याचे खरे कर्तृत्व अफगाणिस्तानच्या इतिहासातच दिसून येते. सर्व पश्तू भाषिकांचे त्याने अफगाणिस्तान हे राष्ट्र बनविले. त्या अर्थाने तो अफगाणिस्तानचा राष्ट्रपिता आहे. त्याचे हे कार्य अफगाणिस्तानच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याच्या योग्यतेचे आहे.

अहमदशहाचा जन्म होण्यापूर्वी अफगाणिस्तान हे एक राष्ट्र नव्हते त्यात अनेक जमाती होत्या आणि प्रत्येक जमात स्वतंत्र होती. त्यांच्या आपसांत नेहमी लढाया चालत. त्यांचे खान हे त्यांचे छोटे छोटे राजे. ह्या अनेक जमातींपैकी अब्दाल्ली ह्या जमातीत अहमदशहाचा इ. स. १७२२ मध्ये जन्म झाला. त्याचा जन्म हिंदुस्थानातील मुलतान ह्या शहरी झाला असे मानण्यात येते. त्या काळात आज अफगाणिस्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशावर प्रसिद्ध इराणी बादशहा नादीरशहा ह्याचा अंमल होता. झमानखान अब्दाल्ली हा नादीरशहाचा हिरात येथील सुभेदार होता. झरघुना अलिकोझी ह्या नावाच्या त्याच्या पत्नीच्या पोटी 'अहमदखान'चा जन्म झाला.

अहमदखानच्या जन्मानंतर लवकरच त्याचा पिता मरण पावला. तेव्हा त्याच्या आईला त्याच्या सुरक्षिततेची काळजी वाटू लागली. त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर हाजी इस्माईलखान हा हिरातचा सुभेदार झाला होता. त्यालाच झरघुनाने आपली मुलगी देऊन आपला जावई करून घेतले आणि अशा रीतीने तिने आपल्या मुलांना संरक्षण मिळवले.

इस्माईलखानाने अहमदशहाला व त्याचा मोठा भाऊ झुल्फिकारखान ह्याला फर्रा येथे ठेवले होते. इ. स. १७३२ त मीर हुसेन नावाच्या घालझी जमातीच्या सरदाराने फर्रावर हल्ला केला. झुल्फिकारखानाचा पराभव झाला. त्याला व अहमदखानाला मीर हुसेनने कैदेत टाकले. त्या वेळी अहमदखान दहा वर्षांचा होता. नंतर नादीरशहाने १७३८ त मीर हुसेनचा पराभव केला. त्या वेळी अहमदखान कंदाहारला कैदेत होता. नादीरशहाच्या सैन्यातील अब्दाल्ली सैनिकांनी अनेक पराक्रम केल्यामुळे शहाची त्या जमातीवर मर्जी होती. कंदाहार जिंकल्यावर त्याने अहमदखानाची सुटका केली. अहमदखानाचा मेहुणा इस्माईलखान हा शहाच्या मर्जीतला असल्यामुळे त्याने अहमदखानावरही कृपेचा वर्षाव केला. त्यान खजिन्यातून ह्या दोघा भावांना खूप मोठी रक्कम दिली व मंझन्द्रान प्रांताचा कारभार त्याच्याकडे सोपविला.

अहमदखान ह्या वेळी अवघा सोळा वर्षांचाच होता. परंतु त्याचे व्यक्तिमत्त्व इतके रुबाबदार आणि आकर्षक होते की, नादीरशहाने त्याला आपल्या खासगी तैनातीत यसवल (हुजऱ्या) म्हणून ठेवले. ह्या हुद्द्यावर असल्यामुळे अहमदखानाला नादीरशहाबरोबर हिंदुस्थान, तुर्कस्तान वगैरे वरील स्वाऱ्यांवर जावयास मिळाले व युद्धशास्त्रात तो प्रवीण झाला. लवकरच त्याची खजिन्यावरील बक्षीच्या जागी बढती झाली. नादीरशहा त्याच्यावर एवढा खुश होता की, हिंदुस्थान, इराण, तुराण इत्यादी देशांत देखील आपणाला अहमदखानासारखा हुशार माणूस आढळला नाही, असे तो भर दरबारात सांगे. नादीरशहाने अहमदखानाच्या हाताखाली चार हजार अब्दाल्ली घोडेस्वारांची तुकडी दिली होती, व शाही तंबूच्या दुसऱ्या प्रवेशद्वारावर रखवाली करण्याचे जबाबदारीचे काम त्याच्यावर सोपविले होते.

'तू राजा होणार !'

नादीरशहाने इ. स. १७३९ त दिल्ली काबीज केल्यानंतर एके दिवशी दिवाण-इ-आमच्या जाळीच्या दरवाज्याबाहेर अहमदखान बसलेला निजाम उल्मुल्काने पाहिला. निजाम उल्मुल्क हस्तसामुद्रिकात प्रवीण असल्याची ख्याती होती. अहमदखानाचा चेहरा पाहून पुढे हा फार मोठा पुरुष होणार आहे, असे त्याने भविष्य वर्तविले. नादीरशहाचा निजामाच्या भविष्यकथनावर पूर्ण विश्वास होता. निजामाच्या ह्या भविष्याची बातमी त्याच्या कानावर जाताच त्याने अहमदखानाला आपल्या जवळ बोलावून घेतले. तो जवळ येताच शहाने एक कटयार काढली आणि तिने अहमदखानाच्या कानाचा एक छोटासा तुकडा छाटला आणि तो म्हणाला, "तू राजा झालास म्हणजे ह्या व्रणामुळे तुला माझी आठवण राहील."

ह्याच सुमारास एके दिवशी नादीरशहा सोन्याच्या आसनावर बसून थंड हवा खात होता. जवळच अहमदखान अदबीने उभा होता. तेवढ्यात नादीरशहा एकाएकी म्हणाला, "अहमद अब्दाल्ली, असा पुढे ये." तो समोर येताच नादीरशहा म्हणाला, "आणखी पुढे ये." अहमदखान अगदी जवळ येऊन अदबीने आणि नम्रतेने त्याच्या समोर उभा राहिल्यावर नादीरशहा म्हणाला, "अहमदखान माझ्यानंतर तुला राजपद मिळणार आहे, हे लक्षात ठेव. पण नादीरच्या वंशजांना तू नेहमी ममतेने वागीव." अहमदखान म्हणाला, "शहेनशहाचा मी बंदा आहे. शहाला माझे मुंडके उडविण्याची इच्छा असेल तर त्यालाही माझी तयारी आहे. मला असे सांगण्याची जरूरच काय ?"

आणि आपल्या भावी जीवनात अहमदखानने हे वचन तंतोतंत पाळले. नादीरशहाचा नातू शहा रूख ह्याला अहमदशहाने आणि शहा रूखच्या मुलाला अहमदशहाचा मुलगा तैमूरशहा ह्याने शत्रूंविरुद्ध मदत केली. नादीरच्या वंशजांना मदत करण्याची प्रथा अहमदशहाच्या पुढील वंशजांनीही कायम ठेवली.

नादीरशहाचा वध

ह्यानंतर आठ वर्षे अहमदखान नादीरशहाच्या तैनातीत होता. नादीरशहा निरनिराळ्या देशांवर स्वाऱ्या करीत होता, आणि मुंडक्यांच्या राशी रचून त्याकडे पाहण्यात क्रूर आनंद मानीत होता. परंतु त्याच्या क्रौर्याला आणि जुलुमाला आता त्याचे इराणी सरदारही कंटाळले होते. त्याच्याविरुद्ध निरनिराळे कट रचले जाऊ लागले. महमद कुलीखान हा सरदार ह्या कटवाल्यांत प्रमुख होता. त्याला सैन्याचा पाठिंबाही होता. नादीरशहाला ह्या कटाचा सुगावा लागला. अहमदखानावर त्याचा विश्वास होता. अहमदखानाच्या हाताखाली चार हजार शूर अफगाण सैनिक होते. त्याने अहमदशहाला बोलावून घेतले आणि सांगितले, "तुझ्या स्वामिनिष्ठेवर आणि शौर्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मला माझ्या रक्षकांविषयी संशय येतो आहे. उद्या ह्या रक्षकांवरील सर्व अधिकाऱ्यांना अटक करण्याची मी तुला आज्ञा देतो. त्या सर्वांना साखळदंडांनी बांधून टाक. जर कोणी प्रतिकार केला तर काही दया-माया दाखवू नकोस. माझा जीव धोक्यात आहे, आणि माझा प्राण तूच वाचवशील असा मला विश्वास आहे."

अहमदखान ही आज्ञा प्रत्यक्षात आणायची तयारी करावयास गेला. छावणीत रात्री निजानिज झाली की तो ह्या इराणी सरदारांची कत्तल करणार होता. परंतु नादीरशहाने अहमदखानाला दिलेली ही आज्ञा कुलीखानाच्या एका हेराने ऐकली होती. त्याने त्यांना वेळीच सावध केले. त्याबरोबर कुलीखान सत्तर सरदार बरोबर घेऊन नादीरशहाचा वध करण्याकरता त्याच्या तंबूकडे निघाला. परंतु नादीरशहाचा दरारा एवढा होता की, त्यातील सत्तावन्न सरदारांनी मधेच भीतीने माघार घेतली. फक्त कुलीखान आणि सालेखान हया दोन सरदारांनाच नादीरशहाच्या तंबूत शिरण्याचे धैर्य झाले. सालेखानाने नादीरवर तलवारीचा वार केला आणि त्याचा एक हात तोडला. नादीरने काही प्रतिकार करण्यापूर्वीच कुलीखानाने त्याचे डोके उडविले. आणि अशा रीतीने त्या क्रूर, उन्मत्त, जुलमी शहाचा अंत झाला.

ह्या प्रकाराची बातमी अहमदखानाला ताबडतोब लागली. नादीरशहाची एक राणी बिबीसाहेबा हिने अहमदखानाकडे एक दासी पाठवून त्याच्याकडे साहाय्याची याचना केली. अहमदखान आपल्या सैन्यासह लगेच गेला आणि त्याने नादीरच्या जनानखान्याला संरक्षण दिले. इराणी सैन्याने छावणीची लुटालूट चालवली होती. त्यांनी अफगाणांवरही हल्ला चढविला. अफगाणांपेक्षा इराणी सैन्य संख्येने खूप मोठे होते. अहमदखान नादीरच्या तंबूत गेला. त्याने त्याची राजमुद्रा, कोहिनूर हिरा आणि इतर मौल्यवान वस्तू काढून घेतल्या. मग त्याने आपल्या धन्याच्या शवाला शेवटचा कुर्निसात केला आणि लुटालूट आणि दंगल करणाऱ्या इराणी सैन्यातून मार्ग कापीत तो आपल्या सैन्यानिशी छावणीच्या बाहेर पडला. सकाळ होईतो,

ज्याचे नाव घेतले की अनेक देशांतील लोक थरथरा कापत, त्या शहाच्या वैभवशाली छावणीचा मागमूस देखील राहिला नाही.

महमद कुलीखानाने नादीरचे शिर त्याचा पुतण्या अली कुलीखान ह्याच्याकडे पाठवून दिले. त्याचे शिरावेगळे धड त्याच्याकरता आधीच माशहद येथील कैवान-इ-बाल ह्या बांधून ठेवलेल्या कबरीत पंधरा दिवसांनी पुरण्यात आले, परंतु त्याच्या अवशेषांना शांती लाभली नाही. आगा अहमदशहा कादरच्या हुकमावरून त्याची कबर उकरून त्याचे अवशेष तेहरानला नेण्यात आले. तेथे त्याने ते अवशेष आपल्या राजवाड्याच्या उंबरठ्याखाली पुरून ठेवले. आपल्या कुटुंबियांचा छळ करणाऱ्या या जुलमी राजाचे अवशेष येता-जाताना आपल्या पायाखाली तुडविले जावेत, हा त्याचा ह्या कृत्यामागील हेतू होता.

अहमदशहाचा राज्याभिषेक

अफगाणांनी नादीरशहाच्या छावणीतून पळ काढला, परंतु इराणी सैन्याने त्यांचा पिच्छा पुरविला. अहमदखानाच्या नेतृत्वाखाली अफगाण सैन्य ह्या संकटातून सुखरूप निभावले. त्यांनी आपल्या देशाचा मार्ग सुधारला. इतके दिवस ह्या जमाती नादीरशहाच्या आधिपत्याखाली होत्या, परंतु आता त्याच्या मृत्यूनंतर दुसरा अधिपती निवडण आवश्यक होते. अफगाण सैन्य इराणकडून अफगाणिस्तानकडे जात असताना अफगाणांचा अधिपती निवडण्याकरता जिरगे भरत. अफगाणांचा अधिपती होण्याकरता प्रत्येक जमातीच्या पुढाऱ्याची धडपड चालू होती. अशी नववी सभा चालू असताना महंमद सबीरशहा नावाचा एक दरवेश (साधू) म्हणाला,

"हा सारा काथ्याकूट कशाला ? परमेश्वराने अहमदखानाला जन्माला घातले आहे. तो तुमच्या कोणाहीपेक्षा उच्च कुळातला आहे आणि त्याच्याशी पराक्रमाच्या बाबतीत बरोबरी करील, असा तुमच्यात एकही माणूस नाही. म्हणून परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे वागा, नाहीतर त्याचा क्रोध तुमचा विनाश करील."

दरवेश सबीरशहानेही निजामुल्मुल्काप्रमाणे अहमदखान राजा होणार असे भविष्य, नादीरच्या वधापूर्वी तीनच दिवस आधी वर्तविले होते. नादीरशहाची शेवटची छावणी खाबूशानला पडली होती. तेव्हा दरवेश सबीरशहा आला आणि अहमदखानाला पाहून नादीरशहादेखत त्याला म्हणाला, "तुझ्या मुद्रेवर मला राजचिन्हे दिसत आहेत. मला थोडेसे कापड दे. त्याचे मी काही तंबू आणि शाही शामियाना बनवितो. मग तू सिंहासनावर बसावे अशी मी परमेश्वराची प्रार्थना करीन."

दरवेशाच्या मागणीप्रमाणे अहमदशहाने त्याला कापड दिले. सबीरशहाने त्याचे तंबू बनवून कुराणाचे पठण करीत त्याने ते जमिनीत रोवले. त्याच्या तिसऱ्याच दिवशी नादीरशहाचा वध झाला. तेव्हापासून एक अंतर्ज्ञानी साधुपुरुष म्हणून अहमदखानाची सबीरशहावर भक्ती जडली होती व छावणीतून पळ काढताना तो न विसरता

सबीरशहाला बरोबर घेऊन निघाला होता.

अफगाणांच्या जिरग्यात अहमदशहाला नेता निवडावे म्हणून सबीरशहाने भाषण केले. नंतर सर्वांनी अहमदखानाची आपला नेता म्हणून निवड केली. तेव्हा सबीरशहाने अहमदखानाला, आता स्वतःला राजा म्हणून जाहीर कर अशी गळ घातली. परंतु ते सध्या प्रवासात होते. तेथे राज्याभिषेकाचे साहित्य कोठून मिळणार ? ही अडचण अहमदखानाने सांगताच, सबीरशहा त्याला एका मातीच्या ढिगाऱ्यावर घेऊन गेला आणि म्हणाला, " हे तुझे सिंहासन. " नंतर अहमदखानाला त्या ढिगाऱ्यावर बसवून तेथे उगवलेल्या गवताचे एकदोन तुरे आणून त्याने ते अहमदखानाच्या पगडीत खोवले आणि तो म्हणाला, " हा तुझा राजमुकुट. " मग त्याने जाहीर केले, " आजपासून तू ' बादशहा दुर-इ-दौरान ' (महाराजा युगमौक्तिक) झालास. "

सबीरशहाने दिलेल्या ह्या पदवीत अहमदखानाने थोडा फरक केला. ' दुर-इ-दौरान ' बद्दल त्याने ' दुर-इ-दुरान ' (मोत्यातील मोती) ही पदवी घेतली. तेव्हापासून त्याची अब्दाली जमात दुराणी जमात म्हणून ओळखली जाऊ लागली.

अहमदशहाची सबीरबाबावर किती भक्ती होती ह्याचे वर्णन ' तारिख-इ-हुसेनशहा ' ह्या ग्रंथाच्या कर्त्याने केले आहे. तो लिहितो, " एके दिवशी मी अहमदशहाच्या दरबारात गेलो होतो. शहा सिंहासनावर बसला होता आणि एक संपूर्ण नग्न दरवेश त्याच्या मांडीवर डोके ठेवून पहुडला होता. मधूनमधून तो दरवेश शहाचे नाक आणि कान पकडून त्याला आपल्या जवळ ओढी आणि म्हण, ' हे पाहा, हे अफगाणा, मी तुला राजा केले आहे. ' शहा आपले डोके खाली नमवून त्याच्याशी अत्यंत नम्रतेने बोलत होता. हा दरवेश सबीरशहा होता. "

ह्या सबीरशहाचा अंत मात्र क्रूर रीतीने झाला. अहमदशहा भारतावर पहिली स्वारी करण्याकरता निघाला तेव्हा सबीरशहा लाहोरला पुढे आला होता. अहमदशहाविरुद्ध मोगलांचा तोफखाना आपल्या मंत्रसामर्थ्याने निरुपयोगी करण्याकरता हा पीर आला आहे अशी लाहोरात अफवा उठली. दिल्लीच्या बादशहाचा लाहोरचा सुभेदार शहानवाझ ह्याने ही बातमी ऐकून आपला अधिकारी अदीना बेग ह्याला सबीरशहाकडे पाठविले. तेव्हा सबीरशहा म्हणाला, " लाहोरात मी जन्मलो. येथल्या लोकांचे भले व्हावे म्हणून माझा प्रयत्न आहे. अहमदशहा अब्दालीच्या समशेरीसमोर तुमची समशेर टिकाव धरणार नाही. " अदीना बेगने विचारले, " का बरे ? त्याची तलवार पोलादाची आहे आणि आमची काय लाकडाची आहे ? " तेव्हा सबीरशहा म्हणाला, " दोन्ही तलवारी पोलादाच्या आहेत हे खरे, परंतु त्याचे ग्रह आता उच्चीचे आहेत आणि तुमचे खाली उतरत आहेत. " सबीरशहाची ही व आणखी अशीच दुरुत्तरे शहानवाझला कळल्यावर त्याने सबीरशहाच्या घशात तापलेले शिसे ओतून त्याचा अंत करविला.

राजा म्हणून निवड होताच अहमदशहाने लगेच आपल्या सरदारांच्या आणि अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. नंतर वाटेत भेटलेल्या एका इराणी सैन्याचा पराभव करून तो कंदाहारला गेला. तेथे त्याला एक शुभशकुन झाला. दोन कोटी रुपये आणि जडजवाहिराचा मोठा खजिना घेऊन नादीरशहाला देण्याकरता सिंधी आणि पंजाबच्या नवाबांनी आपले सरदार पाठविले होते. ते सध्या कंदाहारमध्ये मुक्कामाला होते. ही सारी संपत्ती अहमदशहाला आयतीच मिळाली. नंतर पानिपतच्या तिसऱ्या युद्धाच्या वेळी त्याला मराठ्यांचा खजिनाही असाच अकल्पितपणे मिळाला होता. हा खजिना त्याने आपल्या सरदारांत आणि शिपायांत लगेच वाटून टाकला. त्याच्या ह्या औदार्याने त्याने लोकांची मने एकदम जिंकून घेतली. सैन्यात नवीन भरती करण्याकरिताही त्याने ह्या खजिन्याचा उपयोग केला. आता त्याचे राजपद सुरक्षित झाले होते. इ. स. १७४७ च्या जुलैमध्ये कंदाहारच्या मशिदीत अफगाण रिवाजाप्रमाणे अत्यंत साधेपणाने त्याला राज्याभिषेक करण्यात आला. त्याने आपली राजमुद्रा तयार केली आणि आपल्या नावाची नाणी पाडली. त्यानंतर तो अफगाणिस्तान हे एक राष्ट्र बनविण्याच्या उद्योगाला लागला.

मनूपूरची लढाई

इ. स. १७४८ त लाहोर जिंकून व तेथे खूप लूट मिळवून अहमदशहा दिल्लीच्या रोखाने निघाला. ह्या वेळी दिल्लीच्या तख्तावर महमदशहा होता. तो अफूबाज होता. नादीरशहाच्या स्वारीची आठवण ताजी होती तरी अहमदशहाच्या प्रतिकाराची जय्यत तयारी कोणी करीत नव्हता. मोठ्या सैन्याची तयारी चालली होती, परंतु सारे काम दिरंगाईने चालले होते. प्रथम हे सैन्य ३ डिसेंबरला दिल्लीहून कूच करणार होते. ती तारीख १४ करण्यात आली. परंतु त्या दिवशीही चंद्र वृश्चिक राशीत असल्यामुळे मुहूर्त चांगला नाही म्हणून सैन्य हलले नाही. तीन आठवडे काहीच हालचाल झाली नाही. ह्या सैन्याकरता ६० लक्ष रुपयांची उधळपट्टी करण्यात आली. म्हातारा वझीर कमरुद्दीन ह्या सेनेचा सेनापती होता. ह्या सेनेत उत्साह निर्माण करण्याकरता मग बादशहाने मोठ्या नाखुशीने आपला एकुलता एक पुत्र अहमद ह्याला सेनेबरोबर जाण्याची परवानगी दिली.

अहमदशहा झपाट्याने एकएक शहर काबीज करीत सरहिंदला येऊन पोहोचला होता. तेथला सुभेदार त्याला शरण आला. तेथे वझीराचा जनानखाना होता. तो व इतरही खूप लूट अहमदशहा अब्दाल्लीला मिळाली. अनेकांना कंठस्नान घालण्यात आले व पुष्कळ स्त्रियांना गुलाम करण्यात आले. तेथून अब्दाली दिल्लीवर स्वारी करणार अशी बातमी आली आणि दिल्लीहून लोकांची पळापळ सुरू झाली. जेव्हा ती अनावर झाली तेव्हा ती बादशहाच्या हुकुमाने थांबविण्यात आली.

अखेरीस राजपुत्र अहमदच्या सैन्याची अब्दाल्लीच्या सैन्याशी सरहिंदपासून

१० मैलांवर मनूपूरला गाठ पडली. एक आठवडाभर बारीकसारीक चकमकी चालल्या. ११ मार्च १७४८ ला सकाळी युद्धाला तोंड लागले. अब्दाल्लीने तोफेचा जो पहिलाच गोळा सोडला तो वरोवर वझीराच्या तंबूवर येऊन पडला. वझीर नुकताच नमाज पढून उठला होता. त्याच्या कमरेला गोळ्याने जखम झाली. अब्दाल्लीच्या तोफखान्यावरील सरदार मादी कुलीखान तहाची बोलणी करण्याकरता म्हणून वझिराकडे जाऊन आला होता. परत येताना त्याने पावले मोजून वझिराच्या तंबूची जागा बरोबर लक्षात ठेवली होती व ह्या माहितीचा उपयोग करून त्याने नेमकी गोलंदाजी केली, अशी गोष्ट ह्या वाबतीत सांगण्यात येते.

तोफेचा गोळा लागल्यामुळे आता आपण जगत नाही असे पाहून वझिराने आपला पुत्र मीर मन्नू ह्याला बोलावून घेतले व सांगितले, " वेटा, मी आता थोड्या काळचा सोबती आहे. अजून बादशहाची आज्ञा कृतीत आणावयाची आहे. तू ताबडतोब घोड्यावर स्वार हो आणि शत्रूवर हल्ला कर." येवढे बोलून वझिराने प्राण सोडला.

आपल्या पित्याच्या मृत्यूचे मीर मन्नूला अतिशय दुःख झाले होते, पण ते गिळून त्याने घाईघाईने आपल्या पित्याच्या शवाचे तंबूतच दफन केले. वझिराच्या मृत्यूची बातमी गुप्त ठेवून तो त्याच्या हत्तीवर स्वार झाला आणि त्याने युद्धाची नौबत वाजवली. वझीर आजारी असल्यामुळे त्याचा मुलगा सेनापती झाला आहे, अशी बातमी पसरविण्यात आली. मग आपल्या सरदारांना बोलावून तो म्हणाला," ज्याला माझ्याबरोबर रणांगणावर यावयाचे असेल त्याने यावे. ज्याला यावयाचे नसेल त्याने आपल्या तंबूत जाऊन बसावे. कारण युद्धातून पळ काढल्याने फार नुकसान होते. माझ्या शरीरात प्राण आहेत तोवर परमेश्वराच्या कृपेने अगदी अखेरच्या क्षणापर्यंत लढण्याचा माझा निश्चय आहे." येवढे बोलून तो अफगाणांवर बेधडक चालून गेला.

नंतर भयंकर रणकंदन माजले. राजा इश्रीसिंहाचे केशरी पोषाखातले रजपूत सैन्य दुराण्यांवर चालून गेले. त्यांनी पराक्रमाची शर्थ केली, परंतु दुराण्यांच्या बंदुकांमुळे त्यांचा धुव्वा उडाला. मोगल सैन्यातील पुष्कळ मुसलमान आणि हिंदू सैनिकांनी दिल्लीच्या दिशेने पळ काढला. अहमदशहाने राजपुत्र अहमदच्या सैन्यावर हल्ला चढविला. तेव्हा मीर मन्नू अहमदच्या मदतीला धावून गेला. मोगलांचा पराभव होणार अशी चिन्हे दिसू लागली. मीर मन्नूने पराक्रमाची शर्थ केली. तोफांच्या युद्धाबरोबरच आता हातघाईची लढाई सुरू झाली. येवढ्यात अफगाण सैन्यात एक विलक्षण प्रकार घडला आणि लढाईचे पारडे फिरले.

अफगाणांच्या सैन्यात अग्निबाणांनी भरलेल्या काही गाड्या होत्या. ह्या गाड्या त्यांना लाहेरच्या लुटीत मिळाल्या होत्या. त्यांतील एका गाडीने पेट घेतला आणि मग शेकडो बाण आकाशात उडून दुराण्यांवरच पडू लागले. त्यामुळे बाकीच्या

गाडयाही पेटल्या. आकाश हजारो बाणांनी भरून गेले. त्यांतील एक पेटता बाण दारू-गोळ्याच्या कोठारावर पडला. त्याबरोबर भयंकर स्फोट झाले आणि हजारो इराणी आणि अफगाण शिपाई जळून गेले. बाण उडताना 'हाश्-कूऽ' असे आवाज होत. ते आवाज हिंदुस्थानातून आलेल्या भुतांचे असून, ती भुते शहाला शोधीत आहेत अशी अफगाणांची समजूत झाली. ह्या प्रकाराने त्यांच्यात हाहाकार माजला आणि एकच गोंधळ उडाला. जिकडे वाट मिळेल तिकडे तो पळू लागला. ह्याच वेळेस मोगल सेनेनेही त्यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. अफगाणांचा पूर्ण पराभव झाला. अहमदशहा-सारखा सेनापतीच केवळ त्यांचा नेता असल्यामुळे त्यांची लांडगेतोड झाली नाही. त्याने आपली उरलेली सेना सरहिंदला सुखरूप नेली. पाठलाग करणाऱ्या मोगल सेनेला हुलकावण्या देत अखेरीस तो अफगाणिस्तानात परत पोहोचला. परत जाताना त्याला मोगलांनी आणि शिखांनी खूप त्रास दिला व त्यांच्या जवळची लूट बरीच हलकी केली. अहमदशहाच्या जीवनातला मोठा पराभव असा हाच एक म्हणता येईल.

निशापूरच्या लढाया

मनूपूरच्या पराभवाप्रमाणेच इराणातल्या निशापूरच्या अहमदशहाने १७५० त केलेल्या पहिल्या स्वारीत त्याला पराभव खावा लागला होता. निशापूरला तो वेढा देऊन बसला होता. आतील लोकांनी तहाची बोलणी करीत कुमक येईपर्यंत त्याला झुलवीत ठेवले. कुमक येताच त्यांनी अफगाणांवर हल्ला चढवला. बारा हजार अफ-गाणांची कत्तल झाली. येवढ्यात भयंकर थंडी पडू लागली. ह्या स्वारीतल्या एका सेनापतीने लिहून ठेवले आहे, "थंडीपासून रक्षण करण्याकरता उंटाच्या पोटातील आतडी काढून मी त्याच्या पोटातील उबेत दुलया लपेटून बसत असे. त्यातली ऊब नाहीशी झाली की मी दुसरा उंट मारून त्याच्या पोटात जाऊन बसत असे. एका रात्रीत तर मी ह्याप्रमाणे सतरा उंट मारले." ह्या स्वारीवरून अफगाण सैन्य जेव्हा परत घरी आले तेव्हा त्यातील सैनिक म्हणजे निव्वळ हाडाचे सापळे उरले होते.

मनूपूरच्या लढाईत अग्निबाणांच्या गाडयांनी पेट घेतला आणि लढाईचे पारडे फिरले, तसाच काहीसा प्रकार १७५१ त केलेल्या निशापूरच्या दुसऱ्या लढाईतही घडला होता. फरक इतकाच की तो अहमदशहाला फायदेशीर पडला. ह्या वेळी अहमदशहाने एक प्रचंड नवी तोफ ओतली. तिच्या गोळ्याचे वजन सहा मण होते. ती किल्ल्यावर डागली तेव्हा तिच्या पहिल्याच गोळ्याने निशापुरातील अनेक घरे जमीनदोस्त झाली. त्यामुळे निशापूरचे रक्षण करणारे सैन्य अतिशय घाबरून गेले आणि ते शहाला शरण आले. ते पाहून शहाने सुटकेचा मोठा निःश्वास सोडला–कारण, पहिला गोळा उडतानाच एक स्फोट होऊन त्या तोफेची शकले पडली होती. परंतु ही गोष्ट शत्रूला कळली नव्हती व त्या तोफेच्या भीतीने त्याचे सैनिक शरण आले होते.

दोन शूरांची भेट

अहमदशहाने नंतर हिंदुस्थानवर इ. स. १७५२ च्या मार्चमध्ये तिसरी स्वारी केली. मीर मन्नूने त्याच्याशी पुन्हा युद्ध केले. मीर मन्नूला दिल्लीहून येणारी कुमक आली नाही. त्याचे सरदार एक एक पळून जाऊ लागले. तरी लाहोरच्या रक्षणाचा कडेकोट बंदोबस्त करून तो लढत राहिला. अहमदशहाने लाहोरला वेढा दिला आणि आजूबाजूची गावे उद्ध्वस्त केली. मग शहाने मुन्नूला निरोप पाठविला, "आज चार महिने मुसलमानांची आपसांत लढाई चालली आहे. आता तू पुन्हा तटबंदी उभारली आहेस. म्हणजे मुसलमानांचा आणखी संहार होणार. हे अल्लाला आणि पैगंबराला मान्य होईल काय? तू मला निःसंकोचपणाने भेटायला ये. मी तुला काही दगाफटका करणार नाही. मी मागितलेली खंडणी दे आणि लाहोरला सुखाने राहा."

शहाचा हा निरोप मिळताच मन्नूच्या मनाने एकदम पलटी खाल्ली. त्याच्या सल्लागारांचा सल्ला न जुमानता तो थोडया सैनिकांनिशी शहाला भेटावयास गेला. शहाच्या व त्याच्या भेटीत पुढील बोलणे झाले :

त्याला पाहून शहा आनंदाने म्हणाला, "शाबास! मुईनउन्मुल्क! शाबास! मी जर तुझा राजा असतो तर तुझे शौर्य पाहून, तुझ्या मदतीकरता कंदाहारपासून लाहोरपर्यंत सैनिकांचा पूल उभा केला असता!" नंतर शहाने विचारले, "तू मला हयाआधी का नाही शरण आलास?"

मीर मन्नू : कारण तेव्हा माझा राजा दुसरा होता.

शहा : मग तुझा राजा दिल्लीहून तुझ्या मदतीला का नाही आला?

मीर मन्नू : मीर मन्नू शत्रूचा समाचार घेण्यास समर्थ आहे, अशी त्याला खात्री होती. म्हणून त्याला कुमक पाठविण्याची जरुरी वाटली नाही.

शहा : बरं, समज, मी तुझ्या हातांत सापडलो असतो तर तू काय केलं असतंस?

मीर मन्नू : मी तुमचं डोकं उडवलं असतं आणि ते माझ्या बादशहाला नजर म्हणून पाठवलं असतं.

शहा : आता तू माझ्या हातात सापडला आहेस. मी काय करू?

मीर मन्नू : तुम्ही जर सौदा करणारे बनिया असाल तर खंडणी घेऊन मला सोडून द्या. पण जर तुम्ही राजे असाल तर मला अभय देऊन सन्मानाने परत पाठवा.

मीर मन्नूच्या ह्या स्पष्ट आणि निर्भय बोलण्याने शहा खुश झाला. त्याने त्याला आलिंगन दिले. त्याला आपला पुत्र म्हणून संबोधिले. त्याला बहुमानाचा पोशाख आणि 'फर्जंदखान बहादूर' हा किताब दिला. शिवाय शहाने त्याला एक घोडा, तलवार आणि आपली पगडी दिली. शहाच्या सैनिकांनी चालविलेली लुटालूट व कत्तल बंद करावी अशी मन्नूने विनंती केली. ती मान्य करून शहाने एकदम तसे हुकूम सोडले.

मथुरेचा विध्वंस

इ. स. १७५६ त शहाने हिंदुस्थानवर चौथी स्वारी केली. ह्या स्वारीत त्याने दिल्ली काबीज केली व लाल किल्ल्यात मुक्काम ठेवला. त्याने अंताजी माणकेश्वराचा पराभव करून तेथील मराठा सैन्याचा मोड केला. ह्याच वेळी त्याची सुरजमल जाटाशी बोलणी चालली होती. त्याने जाटाला आपल्या भेटीला बोलावले, परंतु तो आला नाही. दिल्लीहून त्याच्या आश्रयाला पळून आलेले काही लोक शहाच्या हवाली करण्याचेही त्याने अमान्य केले. शहाने जाटावर स्वारी करण्याचे ठरविले. सुरजमलचा मुलगा जवाहरसिंग ह्याने अब्दाल्लीच्या एका तुकडीला कापून काढले. त्यामुळे शहा आणखीनच चिडला. आपला सेनापती जहानखान ह्याला त्याने जाटांचा मुलूख लुटून उद्ध्वस्त करण्याची आज्ञा केली. त्याचप्रमाणे हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र मथुरा जमीनदोस्त करण्याचा हुकूम दिला. 'हिंदूचे शिर कापून आणणाऱ्या प्रत्येकाने ते वझिराच्या तंबूपुढे टाकावे, ह्या शिरांचा हिशोब ठेवण्यात येईल आणि प्रत्येक शिराला पाच रुपये ह्याप्रमाणे पैसे देण्यात येतील,' असा क्रूर आदेशही त्याने आपल्या सैन्याला दिला.

शहाचा सेनापती जहानखान लुटालूट आणि कत्तली करीत अकस्मात मथुरेवर चालून आला. जवाहरसिंग मथुरेच्या रक्षणाकरता सिद्ध होता. 'शत्रू व्रजभूमीत शिरेल तर तो आमच्या प्रेतांवरूनच,' असा त्याचा आणि जाटांचा निर्धार होता. पाच हजार जाटांनिशी तो जहानखानाच्या सैन्यावर तुटून पडला. नऊ तास ते लढले. परंतु मुसलमानांच्या मोठ्या सैन्यासमोर त्यांचा निभाव लागला नाही. तीन हजार जाट धारातीर्थी पडले. आणि जहानखानाने १ मार्चला मथुरेत प्रवेश केला.

मथुरेतील लोक असंरक्षित होते. शहराभोवती तटबंदी नव्हती, खंदक नव्हता की सेनाही नव्हती. ह्या पवित्र तीर्थी होते फक्त पुजारी, यात्रेकरू, बायका आणि मुले. त्यातून दोन दिवसांपूर्वीच होळीचा सण साजरा झाला होता. त्याकरता आजूबाजूच्या गावांतले पुष्कळ यात्रेकरू आले होते. आपल्या धन्याचा 'लुटा आणि कत्तल करा' हा हुकूम कृतीत आणण्यास जहानखानाला ह्यापेक्षा अधिक अनुकूल परिस्थिती दुसरी कोठली मिळाली नसती. त्याने आपल्या शूर सैनिकांना तेथल्या निःशस्त्र भाविक लोकांची कत्तल करण्याचा हुकूम सोडला. मथुरेत पुन्हा होळी साजरी झाली – हिंदूंच्या रक्ताच्या लाल रंगाने. साऱ्या शहराला आग लावून देण्यात आली आणि ह्या होळीच्या ज्वालांच्या जिभा गगनाला चाटू लागल्या. मंदिरे आणि त्यातील मूर्ती फोडण्यात आल्या आणि मूर्तीची शकले घेऊन अफगाण सैनिक रस्त्यावर पोलो खेळले.

रात्री जहानखानाने आपले सैन्य मागे घेतले आणि मग नजीबखानाचे रोहिले कोल्हे मथुरेवर तुटून पडले. त्यांनी तीन दिवस लुटीच्या आशेने सारी मथुरा खणून

काढली. शेकडो सुंदर स्त्रिया रोहिल्यांनी भ्रष्ट केल्या किंवा पळवून नेल्या. झोपड्यांतून राहणारे वैरागी आणि संन्यासीही त्यांच्या तावडीतून सुटले नाहीत. 'प्रत्येक झोपडीत एक तोडलेले मुंडके असे व त्याच्या तोंडाला मारलेल्या गाईचे मुंडके लावलेले असे', अशी वर्णने सापडतात. ह्या कत्तलीनंतर सात दिवसपर्यंत यमुनेचे पाणी लाल राहिले आणि नंतर ते पिवळे पडले.

मथुरेचा विध्वंस करून झाल्यावर हे सैन्य तेथून उत्तरेला सात मैलांवर असलेल्या वृंदावनाकडे वळले. तेथल्या कत्तलीचे एका मुसलमान जवाहिऱ्याने वर्णन केले आहे– 'जिकडे पाहावे तिकडे प्रेतांचा खच पडलेला होता. रस्त्यांवर प्रेतांची इतकी गर्दी झाली होती आणि रक्तामांसाचा इतका चिखल झाला होता की, चालणेदेखील मुश्किल झाले होते. एके ठिकाणी तर आम्ही, दोनशे मुले मारून त्यांच्या प्रेतांचा ढीग केलेला पाहिला. त्यांतील एकालाही मुंडके नव्हते. वातावरणात एवढी दुर्गंधी भरली होती की तोंड उघडणे किंवा श्वास घेणेदेखील संकट वाटे.'

त्यानंतर ही सेना गोकुळाकडे वळली. तेथे तिला नंग्या साधूंनी प्रतिकार केला. अंगाला राख फासलेले चार हजार नग्न साधू तलवारी घेऊन अफगाणांवर तुटून पडले. दोन्ही बाजूंचे दोन दोन हजार लोक मरून पडले. तेव्हा गोकुळात फक्त नग्न साधू राहतात, तेथे लूट काही मिळणार नाही; असे बंगालचा वकील जुगलकिशोर ह्याने शहाला सांगितले. मग शहाने आपले सैन्य परत बोलावले.

ह्या क्रौर्याचा बदला अफगाण सेनेला लगेच द्यावा लागला. नद्या सुकल्या होत्या व त्यात अर्धवट जळालेली प्रेते सर्वत्र पडली होती. त्यामुळे महामारी सुरू झाली. शहाच्या हुकमावरून जेथे कत्तली झाल्या होत्या तेथल्याच नद्यांचे दूषित पाणी त्याच्या सैनिकांना प्यावे लागत होते. रोज दीडदोनशे अफगाण मरू लागले. ह्या रोग्याला चिंचेचे पाणी द्यावयाचे तर त्याची किंमत घडयाला शंभर रुपये झाली. घोडेही पटापट मरू लागले. शहाच्या फौजेचा बराच नाश झाला आणि अशा रीतीने त्याच्या क्रौर्याचा मोबदला तिला लगेच मिळाला.

'वद्दा घालू–गाडा'

ह्याच सुमारास पंजाबात शीख लोक डोके वर काढू लागले होते. मुसलमानांनी त्यांचा अतिशय छळ केला होता आणि म्हणून त्यांनी लढाऊ वृत्ती धारण केली होती. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर उत्तर भारतात प्रबळ अशी कोणतीच सत्ता उरली नव्हती. पंजाबवर अहमदशहाचे सुभेदार असत, परंतु अहमदशहाची पाठ फिरली की शीख त्यांना सळो की पळो करून सोडीत. अफगाणांशी शिखांनी गनिमी युद्ध आरंभिले होते आणि दिवसेंदिवस त्यांची शक्ती वाढत चालली होती.

त्यांचे पारिपत्य करण्याकरता अहमदशहाने हिंदुस्थानवर तीन स्वाऱ्या (सहावी, सातवी व आठवी) केल्या. त्याने १७६२ त केलेल्या सहाव्या स्वारीत

ज्याला शीख 'वह्दा घालू-गाडा' म्हणतात, तो भयंकर प्रसंग घडला.

शहा आपणाविरुद्ध 'जेहाद' पुकारून येत आहे, असे कळताच आपली बायकामुले सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्याचा शिखांनी निर्णय घेतला. मथुरा-वृंदावनात व पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर जे प्रकार घडले ते आपल्याही बाबतीत घडू नयेत, अशी त्यांची इच्छा असणे स्वाभाविक होते. ह्याप्रमाणे तीस हजार शिखांचा काफला रायपूर गुज्जरवालच्या दिशेने चालला असता. ५ फेब्रुवारी १७६२ ह्या दिवशी शहाच्या सैन्याने त्याच्यावर हल्ला केला. त्याबरोबर शिखांनी बायकामुलांभोवती कडे घातले आणि ते शत्रूशी लढू लागले. लढता लढता त्यांनी आपला प्रवासही चालूच ठेवला होता. शहाने खूप प्रयत्न केले परंतु शिखांचे हे पोलादी कडे त्याला काही मोडता येईना.

जाता जाता शीख गहाल ह्या खेड्याजवळ आले, परंतु तेथल्या गावकऱ्यांनी त्यांना आसरा दिला नाही. नंतर ते कुत्बा आणि बाह्मनी ह्या खेड्यांत आश्रयार्थ घुसले, परंतु ही खेडी अफगाणांच्या ताब्यात होती. तेथल्या रंघार जातीच्या लोकांनी शिखांना सर्व बाजूंनी वेढून त्यांनी लुटालूट आणि कत्तल सुरू केली. अफगाण आणि मुसलमान सैन्यही आले आणि मग स्त्रिया व मुलांची एकच कत्तल सुरू झाली. शिखांच्या त्या काफल्यातील जवळजवळ सर्व स्त्रिया आणि मुले मारली गेली. तरी पण शीख शौर्याने लढतच राहिले. ह्या युद्धात दोन्ही बाजूंचे सैनिक इतके थकून गेले की ते लढत लढत एका तळ्याजवळ येताच युद्ध आपोआपच बंद पडले. अफगाण व शीख शेजारी शेजारी बसून त्या तळ्यातील पाणी पिऊन तहान शमवू लागले. पाणी पिऊन झाल्यावर पुन्हा युद्धाला सुरुवात झाली, परंतु त्यात आता पूर्वीचा जोर राहिलेला नव्हता. लवकरच उरलेले शीख शत्रूच्या तावडीतून निसटून गेले.

प्रलयकाल

हिंदुस्थानवरील सातव्या स्वारीनंतर अमाप लूट आणि हजारो गुलाम घेऊन अहमदशहा अफगाणिस्तानकडे निघाला होता. त्याचे सैन्य चिनाब नदी ओलांडू लागले. त्या ठिकाणी नदीच्या आठ धारा होत्या. त्यांतील सहा त्यांनी सुखरूप पार केल्या. परंतु सातव्या धारेला पाणी खूप होते आणि पाण्याला जोरही खूप होता. त्यामुळे ती पार करताना शहाच्या सैन्यातील माणसे, घोडे व उंट वाहून जाऊ लागले. त्यांची पुष्कळशी लूट नदीने लुटली. ह्याविषयी तेथे उपस्थित असलेला नूर-महंमद लिहितो– "जणू प्रलयकालच आल्याप्रमाणे वाटले.... मी नदीतून घोड्यावरून जात होतो. वरच्या बाजूला स्त्रियांना घेऊन जाणारे हजारो उंट होते. पाण्यात उंटांबरोबर स्त्रियाही हजारोंनी पडत होत्या. येवढ्यात एक अत्यंत लावण्यवती स्त्री वाहात येऊन मला बिलगली. त्यामुळे माझाही जीव धोक्यात आला. मी तिला

ढकलून देण्याची शिकस्त केली, पण तिने आपली पकड सोडली नाही. अखेरीस तिचा मालक आला व तिला घेऊन गेला. तेथे इतका हाहाकार उडाला होता की, बाप मुलाला पाहात नव्हता आणि आया मुलांना पाण्यात सोडून देत होत्या. खूप संपत्ती वाहून गेली आणि शिखांबरोबरच्या युद्धात मेली नसतील इतकी माणसे मृत्युमुखी पडली."

शहाचे अखेरचे दिवस

अहमदशहाने जेव्हा जेव्हा मंदिरे उद्ध्वस्त केली, तेव्हा तेव्हा त्याच्यावर काही ना काही संकटे आली. जणू काय परमेश्वर त्याला शिक्षाच करीत होता. सहाव्या स्वारीत त्याने अमृतसरचे शिखांचे सर्वांत पवित्र देवालय, वैशाखी सणाच्या आदल्या दिवशी म्हणजे १० एप्रिल १७६२ रोजी उद्ध्वस्त केले. एक मोठी फौज घेऊन शहा अमृतसरला गेला आणि तेथील हरमंदिर त्याने सुरुंग लावून उडवून दिले. आजूबाजूच्या इमारती त्याने उद्ध्वस्त केल्या. माणसांच्या आणि गाईंच्या मांसाच्या तुकडे तेथल्या पवित्र तीर्थात टाकून त्यानें ते भ्रष्ट केले, आणि पाडलेल्या इमारतींचे ढिगारे त्यात घालून ते बुजवून टाकले.

हरमंदिर सुरुंगामुळे विच्छिन्न झाले तेव्हा विटेचा एक तुकडा शहाच्या नाकावर येऊन आदळला. त्याला झालेली जखम तशी क्षुल्लक होती पण तिनेच त्याचा हालहाल करून अखेरीस अंत केला.

बाल्खमध्ये स्वारी करून अहमदशहा कंदाहारकडे परतत होता. तेव्हा वाटेतच तो आजारी पडला. इतक्या वर्षांच्या युद्धांच्या दगदगीचा त्याच्या शरीरावर परिणाम झाला होता. त्यातून त्याला मधुमेहही असावा. त्याच्या नाकावरची जखम सारखी चिघळतच चालली होती. त्याचा चेहरा इतका विद्रूप दिसू लागला होता की तो चांदीचे नाक लावीत असे. नाकाच्या ह्या पसरत जाणाऱ्या जखमेवर त्याने अनेक उपाय करून पाहिले होते. एकदा हिंदुस्थानातील एक प्रसिद्ध शल्यशास्त्रज्ञ (सर्जन) वृंदावन ह्यालाही त्याने अफगाणिस्तानात बोलावून घेऊन उपचार करविले होते. परंतु कोणत्याही उपायाने त्याला गुण आला नाही.

आपला मृत्यू समीप आला आहे हे पाहून त्याने आपला दुसरा पुत्र तैमूरशहा ह्याला आपला उत्तराधिकारी नेमले. त्याचा मोठा मुलगा सुलेमान ह्याला डावलून त्याने राज्य तैमूरला द्यावे हे त्याच्या सरदारांना पसंत पडले नाही. त्यांनी शहाकडे ह्याबाबत तक्रार केली. तेव्हा शहा म्हणाला, "मी केवळ लहर म्हणून तैमूरला उत्तराधिकारी नेमत नाही. सुलेमानपेक्षा तो जास्त मुत्सद्दी आहे. राज्याच्या हितासाठीच मी हा निर्णय घेतला आहे. सुलेमानने सरदार झालबेगला विचार न करता मारून टाकले."

"पण आपल्याच हुकमावरून त्याने हे कृत्य केले."

" मी दिलवरखानाला मारण्याची आज्ञा तैमूरलाही दिली होती, पण ती त्याने कुठे पाळली ? राजकीय कारणामुळे एखाद्याचा काटा काढण्याचा मी हुकूम देईन, परंतु इतर काही खाजगी गोष्टी सुलेमानला ठाऊक होत्या. त्याने माझी आज्ञा पाळायला नको होती. "

शहाच्या ह्या युक्तिवादाने सरदारांचे समाधान झाले, व तैमूरला भावी राजा म्हणून नियुक्त करण्यास त्यांनी मान्यता दिली.

१७७२ च्या उन्हाळ्यात शहाची प्रकृती खूप खालावली. नाकाची जखम पोखरीत पोखरीत आतील भागापर्यंत पोहोचली होती. त्या जखमेत किडे पडले होते, आणि तो काहीही खाऊ-पिऊ लागला की ते त्याच्या तोंडात पडत. त्याला काही खाणेही मुष्किल झाले. सुलेमान टेकड्यांतील तोफा मारुक येथील राजवाड्यात तो राहावयास गेला. ह्या टेकड्या कंदाहारपासून ९० मैलांवर आहेत.

स्वामी प्राणपुरी उर्ध्वबाहू नावाचा एक संन्यासी भटकता भटकता गझनीजवळ शहाच्या सैन्याच्या ताब्यात सापडला. हिंदू साधूंना जडीबुटी चांगल्या माहीत असतात, अशी त्यांची कीर्ती शहाने ऐकली होती. त्याने स्वामीला आपल्या नाकावर उपचार करण्यास सांगितले. स्वामी तर ह्या बाबतीत अगदीच अनभिज्ञ होता. पण त्याने मोठ्या चातुर्याने वेळ मारून नेली. त्याने सांगितले, " ही नाकावरील जखम व तुमचे राजपद ह्यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. त्या दृष्टीने ही जखम नाहीशी करणे धोक्याचे आहे. " अर्थात, शहाने त्याला मुकाटयाने जाऊ दिले.

शहाचा रोग झपाट्याने वळावत गेला. त्याचे बोलणेही अस्पष्ट झाले. त्याला जे सांगायचे असे ते तो खुणांनी सांगू लागला. याकूतखान नावाचा एक गुलाम सतत त्याच्याजवळ असे. त्यालाच शहाच्या खुणा समजत. परंतु नंतर त्यालाही खुणा कळेनातशा झाल्या. मग शहा लिहून सांगू लागला. अशा रीतीने हालहाल होऊन २३ ऑक्टोबर १७७२ च्या रात्री शहाचे प्राणोत्क्रमण झाले.

शहाला शिकारीचा आणि अश्वारोहणाचा फार शोक होता. त्याचे घोड्यावर अतिशय प्रेम असे. एके दिवशी शहा अतिशय उदास दिसत होता, म्हणून शहा वलीखानाने त्याला कारण विचारले. तेव्हा शहा म्हणाला, " माझा घोडा ताल्बीन आजारी आहे. " शहा वली म्हणाला, " पण आपल्याकडे तर हजारो घोडे आहेत. " शहा म्हणाला, " खूप शोध केल्यानंतर मी ' दो-अस्प ' (ताली व महदम ह्या दोन घोड्यांचा मालक) बनलो होतो. आता त्यातला एक आजारी आहे. आता मी कदाचित पुन्हा ' एक-अस्प ' होईन, ह्या कल्पनेने मला उदास वाटते. "

शहाच्या मृत्यूची बातमी याकूतखानाने तैमूर गादीवर बसेपर्यंत गुप्त ठेवली. त्यान शहाचे शव एका मेण्यात घातले. त्याचा खजिना आणि ते शव घेऊन तो कंदाहारल निघाला. मधूनमधून तो मेण्याजवळ जाई आणि जणू शहाची आज्ञा घेऊन परत येई·

केव्हा तो शहाकरता जेवण घेऊन जाई. अशा रीतीने त्याने शहाची मृत्यूची बातमी योग्य काल येईपर्यंत अगदी गुप्त ठेवली.

कंदाहारमध्ये शहाचे शव पुरण्यात आले व त्यावर एक अष्टकोनी कबर बांधण्यात आली. त्याच्या कबरीवर मृत्युलेख आहे :

'अहमदशहा दुराणी महान राजा होता. त्याच्या न्यायाचा दरारा एवढा होता की सिंह आणि हरीण शांततेने एकत्र नांदत. त्याच्या विजयाच्या जयजयकाराने त्याच्या शत्रूंचे कान सतत बधिर होत.'

५

दोनशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रात

'उत्तरकालीन पेशवाई कौटुंबिक राहणी' ह्या शीर्षकाचे पेशवेकालीन पत्रव्यवहाराचे एक पुस्तक १९३३ साली प्रकाशित झाले आहे. त्याचे संपादन केले आहे, प्रख्यात इतिहासकार कै. गो. स. सरदेसाई ह्यांनी. ह्या पुस्तकात सन १७६२ ते १७८५ पर्यंतची पेशवे दप्तरातील पत्रे व काही कागद आहेत. त्यावरून विशेषतः पेशव्यांच्या घरगुती गोष्टींची, व निरनिराळ्या पेशव्यांच्या आवडीनिवडीतील भिन्नतेची कल्पना येते. थोरले माधवराव पेशवे ह्यांनी रंगीबेरंगी भडक कपडे वापरण्यास नकार दिला होता, तर त्यांचे काका राघोबा ह्यांनी एका पत्रातून सुंदर आणि नृत्यकुशल मुलींची मागणी केली होती. ह्या पत्रांवरून पेशवाईच्या अखेरच्या अर्धशतकातील लोकराहणीची बरी कल्पना येते. त्या वेळच्या समजुती, आता विलक्षण वाटणाऱ्या काही कल्पना व घटना, ह्यांची आपणाला त्यावरून कल्पना येतेच; पण आपल्या काही कल्पनाही चुकीच्या होत्या, हे समजून येते. मुख्य म्हणजे आपले पूर्वज सुधारणांना अनुकूल नव्हते, जर इंग्रजांचे राज्य येथे 'ईश्वरकृपेने' आले नसते तर युरोपातले नवे वैज्ञानिक शोध आपल्यापर्यंत आलेच नसते, अशी जी काहींची समजूत आहे, ती किती चुकीची आहे, हे ह्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. आपल्या पूर्वजांनी अठराव्या शतकाच्या अखेरीसच ह्या नव्या गोष्टींचा स्वीकार करावयास सुरुवात केली होती व ते कितीही 'सनातनी' असले तरी परक्यांच्या चांगल्या गोष्टींचे स्वागत करावयास अनमान करीत नसत, हे दिसून येते. इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानवर स्थापन झाले नसते तर ह्या गोष्टी येण्यास कदाचित थोडा अवधी लागला असता, पण त्या आल्याशिवाय राहिल्या नसत्या, हे ज्या देशावर इंग्रजांनी राज्य केले नाही, अशा देशांतही त्या सुधारणा आल्या, ह्यावरून दिसून येते. त्या काळचे सण-समारंभ, खेळ, प्रवास आणि शिक्षण, पाळीव प्राणी, दागदागिने, स्त्रियांची राहणी, औषधपद्धती, धर्मकल्पना, आणि त्या वेळच्या शनवारवाड्यातील आगीसारख्या काही घटना, इत्यादी गोष्टींची ह्या पत्रव्यवहारावरून बरीच कल्पना येते. साधारण दोनशे

वर्षांपूर्वी पूर्वज कसे राहात होते, ह्याची काही मनोरंजक माहिती ह्या पत्रव्यवहारातून मिळते.

पेशवे कुटुंबांतील स्त्रिया

पेशवे मूळचे कोकणातले. मध्यम स्थितीतले, घाटावरच्या मानाने गरीबच. पेशव्यांच्या घराण्यातल्या पुरुषांना बायका आणत, त्याही साहजिकच कोकणातून. कोकण हे पेशव्यांचे 'विलायत'च होते. पेशवे घराण्यातील मुलांना योग्य मुली पाहण्याकरता कोकणात माणसे पाठविली जात. दुसऱ्या बाजीरावाकरता मुली पाहण्याच्या कामगिरीवर जनार्दन नारायण नावाचा माणूस पाठविण्यात आला होता. त्याने आपल्या कामगिरीचा वृत्तान्त २२-२-१८०३ ह्या दिवशी महाडहून लिहिलेल्या पत्रात दिला आहे. मुलीचा शोध घेत तो महाड येथे आलेला आहे. त्याला गोहागर येथील राजश्री विनायक भट खरे ह्याची कन्या पसंत पडली. 'ती वर्ष ६ सरून ७ वर्ष आषाढ मासी लागेल. ती मूल चांगल्यात दृष्टीस पडली .... मुलीची मातोश्री गरोदर सात महिन्याची आहेत.' जनार्दन नारायणाने कोकणात आणखी दोन मुली पाहिल्या होत्या. 'आणखी दोन मुली एक सोमण व एक सहस्रबुद्धे यांच्या नव वर्षाच्या मध्यम प्रतीत आहेत. त्या तूर्त आणीत नाही. भेटीनंतर त्यांचे स्वरूप वर्णन करीन.' त्या काळच्या प्रथेप्रमाणे मुलींचे विवाह बालवयातच होत.

कोकणातल्या ह्या गरीब स्थितीतल्या मुली पेशवे घराण्यात पडल्या की त्यांची राजघराण्यास योग्य ती बडदास्त व इतमाम ठेवण्यात येई. थोरले माधवराव पेशवे कर्नाटकात स्वारीवर गेले होते. तेव्हा त्यांच्याकडे त्यांची पत्नी रमाबाई ह्यांना पाठविण्याचा विचार चालला होता. त्याविषयी राघोबा नाना फडणिसांना १-१२-१७६४ च्या पत्रात लिहितात, 'चि. सौ. रमाबाईस[कर्नाटकात न्यावयाकरता आणावयास रा. पांडरंग कृष्ण याजबरोबर उंट व तट्टे, घोडी देऊन पाठविले आहे. तरी आणखी सरंजाम लागेल तो तुम्ही तेथून देऊन रवानगी करणे.'

प्रवास

पेशवे कुटुंबातील स्त्रिया प्रवास करीत तेव्हा त्यांच्या बरोबर उंट, तट्टे, घोडे, स्वार वगैरे सर्व सरंजाम असे. त्याचप्रमाणे प्रवासाच्या बाबतीत स्त्रियांच्याही इच्छेला मान देण्यात येई. रमाबाईला कर्नाटकात पाठविण्याची तयारी झाली होती. पण तिने तो बेत पायाच्या काही दुखण्यामुळे रहित केला. राघोबा नाना फडणिसांना ३०-१२-१७६४ च्या पत्रात लिहितात, चि. सौ. रमाबाईस आणावयासी रा. पांडुरंग कृष्ण गोडबोले राजश्री गोविंद सिवराम याजकडील स्वार पाठविले आहेत. त्यास रमाबाईचे शरीरास किंचित पीडा उपद्रव जाहाला आहे, पाय दुखतो, म्हणौन तुम्ही लिहिले त्यास, तूर्त आणण्याचे प्रयोजन नाही.'

पेशवे कुटुंबातील स्त्रिया प्रवासास गेल्या की त्यांना, आजच्या मंत्र्यांच्या बायकांप्रमाणेच व्ही. आय. पी. ट्रीटमेंट देण्यात येई. त्यांना त्या त्या गावच्या प्रेक्षणीय वस्तू, स्थळे दाखविण्यात येत. विसाजी केशव २९-१०-१७६९ च्या पत्रात मोत्याजीराव विचाऱ्यांना लिहितो....' श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री पार्वतीबाई व रमाबाई श्री गणपति पुले येथे येणार तेव्हा रत्नागिरीसही येतील तरी महादेव पाल व दत्त पाल (लढाऊ गलबतांची नावे) आणखी दोनचार गलबते सदरहू पाल गोदीतून बाहेर काढून कार्याकरण चालते सामानाची तरतूद करून रत्नागिरीस आणून बाईसाहेबांसी दाखविणे. दोन वेला सरबत्ती करणे ' पार्वतीबाईला व रमाबाईला तेवढ्याकरता खास लढाऊ गलबते आणून, त्यावरून तोफांची सरबत्ती करून दाखविण्याचा हा हुकूम होता.

खर्च

पेशवे कुटुंबातील स्त्रियांचा खर्चही भरपूर असे. गोपिकाबाई नाशिकजवळ गंगापूरला राहात असे. तिचा कारभारी रामचंद्र नारायण गोरे पेशव्यांकडे खर्चाकरता अधिक पैशाची मागणी करतो. गंगापूरची शिबंदी, धर्मकार्ये, बांधकाम, तेथील जेवण्याखाण्याचा व इतर खर्च भरपूर होत असे, असे दिसते. रामचंद्र नारायण गोरे दि. २३-३-१७६५ ला पुण्यास पाठविलेल्या पत्रात लिहितो,....आपणाजवळ ऐवज नाही हे आम्हास ठाऊक आहे. (पेशवे नेहमीच पैशाच्या अडचणीत असत.) व नवा वाडा बांधावयास प्रारंभ केला आहे, हेही काम भारी आहे. अद्यापि अर्धे जाले नाही. तेही असो, आम्हाजवळ शिबंदी वगैरे खर्च समेत कोठी दर माहे रुपये ३००० तीन हजाराचा आहे. थोरले श्रीमंतांनी ऐवज दर माहे येक हजार प्रमाणे रुपये आठ हजार देविले, ते दोन महिन्यात खर्चोन गेले. काली आपण दोन हजार ऐवज राजश्री बाजाजीपंत मांडवगणे यांजकडून देविला तो तेच दिवशी सेटच्याचा ऐवज देणे होता त्यास दिले. आणखी ऐवज किमान पक्ष रुपये १०००० दाहा हजार काही करून पाठविले पाहिजेत. आता दर माहे सात आठ हजार लागतील यात संदेह नाही, श्रीमंतांजवळ शिबंदी नावाप्रमाणे ठेवलीच पाहिजे, कोठीत काही नाही. '

तीर्थयात्रा

पेशवे कुटुंबातील स्त्रियांच्या तीर्थक्षेत्रांच्या यात्रा नेहमी चालू असत. त्र्यंबकेश्वर, श्रीवर्धन जवळील हरिहरेश्वर, गणपतीपुळे, इत्यादी तीर्थक्षेत्रांच्या यात्रांचा उल्लेख ह्या पत्रव्यवहारात सापडतो. स्त्रियांना तीर्थयात्रा करण्याकरता सर्व व्यवस्था करण्यात येत असे आणि उत्तर भारतातील क्षेत्रांच्या लांबलांबच्या यात्राही ह्या स्त्रिया करीत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत पेशवे कुटुंबांतील स्त्रिया काशीयात्रेस गेल्या होत्या, तेव्हा वाटेतल्या राजे नबाबांनी त्यांची योग्य ती बडदास्त ठेवल्याचे व त्यांची सर्व

सोय पाहिल्याचे उल्लेख इतिहासात आहेत.

वाचन

पेशवे कुटुंबातील स्त्रियांचे धार्मिक ग्रंथांचे वाचन चांगले असे. पहिल्या बाजीरावाचा कनिष्ठ पुत्र जनार्दन याची पत्नी सगुणाबाई हिच्या जवळील पोथ्यांची दि. ११-१-१७८४ ची एक यादी ह्या पत्रव्यवहारात दिलेली आहे. प्रत्येक पोथीचे नाव व तिच्यातील पानांची संख्या ह्या यादीत दिलेली आहे. यातील भागवत, गीता, अध्यात्म रामायण, काही स्तोत्रे ही आपणाला ठऊक आहेत. परंतु चित्रदीप नाटकदीप वगैरे पाच दीप; द्वैत, भूत वगैरे विवेकांची पंचदशी वगैरे आपणाला अपरिचित अशा पोथ्यांची नावेही यादीत दिलेली आहेत. सगुणाबाईच्या संग्रहात अशा एकूण ५७ पोथ्या होत्या. दुसऱ्या बाजीरावाची एक पत्नी दहाव्या वर्षी पुस्त्या काढीत असल्याचाही उल्लेख आहे. ह्यावरून पेशवे घराण्यातील स्त्रियांना लिहिता वाचता येण्याइतके तरी शिक्षण देण्यात येत असे, असे दिसून येते.

नवी बांधकामे

आपले मंत्री मंत्र्याच्या बंगल्यात राहावयास गेले की बंगल्याची नवी सजावट करतात, नवे फर्निचर घेतात, काही नवी बांधकामेही करतात. पण हा प्रकार नवा नाही. पेशवाईतही हेच होत होते. गोपिकाबाई गंगापुरास असताना तेथे तिने नवा वाडा बांधला. नंतर ती पुण्यात राहावयास जाणार होती. तेव्हा तिच्या कुणबिणीकरता नवी घरे हवी होती. रामचंद्र नारायण गोरे दि. १७-२-१७६९ च्या पत्रात पुण्याला लिहितो, ' ....पुण्यातील कोटावरची वगैरे जवळची कुणबिणीची घरे होती ती मोडली गेली. त्यास आता पुण्यास मातुश्री बाईसाहेबांची स्वारी आल्यावरी कुणबिणीला घरे पाहिजेत. त्यांस दुसरी घरे वाड्याचे समीप ऐशी बांधोन ठेवण्यास सांगावे. घरे पंधरा पावेतो पाहिजेत. ' ह्यानंतर रामचंद्र नारायण पुढे जे लिहितो ते गंमतीचे आहे. तो लिहितो ' याप्रमाणे लिहून पाठवायची आज्ञा मजला बहुत दिवस जाली होती. मी विसरलो होतो. आता स्मरण जहाले....' सरकारी अधिकारी तेव्हाही कामे विसरत होते तर !

कन्याविक्रय

पेशवे कुटुंबातील स्त्रिया त्या काळास अनुसरून वृत्तीने धार्मिक, रूढींचे पालन करणाऱ्या अशा होत्या. तरी काही अनिष्ट सामाजिक रूढी नष्ट व्हाव्यात असे त्यांना वाटे व तसे त्या पेशव्यांना सांगत. ह्या प्रकारचे गोपिकाबाईने गंगापूरहून नाना फडणिसाला दि. ५-१-१७७२ ला लिहिलेले पत्र फार बोलके आहे. त्यांना गोपिकाबाईंचा कारभारी रामचंद्र नारायण गोरे लिहितो,

'...समुद्रतीरी व देशामध्ये कितीका स्थली कन्येचा विक्रय करून द्रव्य घेत आहेत, याप्रमाणे अनाचार प्रवृत्त जाला आहे. यास श्रीमंतासारखे ब्राह्मण प्रभू असता व तुम्हासारिखे ज्ञाते सनमार्गवर्ती विवेकी मंत्री असता हा मार्ग अनुचित, योग्य नव्हे. त्या ह्या अर्थी श्रीमंतास विनंती करून याचा बंदोबस्त करावा.' पूर्वी एकदोनदा सगळीकडे पत्रे पाठवून कन्याविक्रय बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु बालविवाह, हुंडा, मद्य, वगैरे विरुद्ध कायदे करूनही सध्या फारसा उपयोग होत नाही, तसाच प्रकार तेव्हा घडला. तेव्हा गोपिकाबाई पत्रात पुढे लिहिते, 'बंदोबस्त कसा होईल म्हणाल तरी, पेशवे श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणी मद्याचा बंदोबस्त केला तो हा कालपर्यंत उत्तम प्रकारे केल्यास होईल.' भाऊसाहेबाने त्या काळात दारूबंदी यशस्वीपणे कशी अंमलात आणली होती, ते कळल्यास आजही त्याचा बराच उपयोग होईल. जे कोणी कन्याविक्रय करतील त्यांना कडक शिक्षा करावी, असे गोपिकाबाईने सुचविले होते. '....ज्याणे कन्येचा विक्रयेकरून द्रव्य घेतले, असे चौकशीत आढळल्यास परिच्छिन्न त्याजपासून राजदंड घेऊन वाली घालावे. (जातीतून वाळीत टाकावे.) यैसे केल्याने प्रभूचे यैसे बहुत होईल. याप्रमाणे आपणास लिहोन पाठवावयास श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांची आज्ञा जाली....'

अंधश्रद्धा

त्या काळात समाज अंधश्रद्धांनी ग्रासलेला होता. दैवी शक्तींवर, भुताखेतांवर, ज्योतिष्यावर, बुवांवर आणि मंत्रतंत्रावर सर्वांचाच विश्वास होता. ह्याची अनेक उदाहरणे ह्या पत्रव्यवहारात पाहावयास मिळतात.

दि. ३ ७-१७६४ च्या पत्रात थोरले माधवराव पेशवे नाना फडणिसांना वेदमूर्ती गंगाधर भट कर्वे ह्यांचे विद्यमाने अनुष्ठाने करायास लिहितात, त्यात दश लक्ष मृत्युंजय जप करावयाचा होता व त्याकरता वेदमूर्तींना रु. १०००/-मंजूर केले होते. त्याबरोबरच मन्युसूक्त सहस्रचंडी आवर्तने व गणपती सहस्रनाम आवर्तने करावयाची होती. आणि एकूण दक्षिणेचा अजमास रु. ३२००/- केला होता.

दि. ७-९-१७७२ ला श्रीमंत परमहंस परिव्राजकानंद घनेंद्र सरस्वती यतिवर ह्यांनी आजारी माधवरावाला पत्र लिहून दिलासा दिला होता,....'आपण पत्र पाठविले तदवलोकने करून आपली शरीरप्रकृती विदित झाली. रोगजन्य दुःखानुभव मात्र अल्पकाळपर्यंत आहे परंतु अपायचिंता सर्वथा नाही. पूर्वीही हा अर्थ आपणास श्रुत केलाच आहे. पुनः प्रतिज्ञापूर्वक शरीरास सर्वता अपायचिंता नाही हाच आमचा निश्चय आहे. आसेतुहिमाचल राज्य स्वाधीन करून सार्वभौमपद भोगाहष्ट बलवत्तर आहे. तस्मात् शरीर चिंता न करणे. क्षिप्र आरोग्य होईल....'

दक्षिणा

पेशवाईतील ब्राह्मणभोजने आणि दक्षिणा प्रसिद्धच आहेत. सन १८०६ मधील

'श्रावणमासचे दक्षिणेचा समारंभ येथास्थित जाला. येकूण साठ हजार ब्राह्मण जाले. दक्षणा एक लक्ष चौऱ्याण्णव हजार पाचशे साठ रुपये जाहली.' ग्रहण असले की ब्राह्मणांना दाने देत. सन १७६३ मध्ये सूर्यग्रहण होते.... 'उपरी सूर्यग्रहण समई शतगोदाने करणे.' शंभर गाई दान करावयाच्या होत्या. प्रत्येक गाईस रु. ४० पर्यंत खर्च करायचा होता,....' समयास गाई शत मिळाल्या नाही तरी ज्या मिळतील त्या देऊन बाकी रुपये नेमणूकप्रमाणे उत्तम ब्राह्मण चांगले पाहोन देणे. तसेच एका ब्राह्मणास ग्रहणस्पर्शापासून ग्रहण सुटेपर्यंत नर्मदास्नानास लावणे. जितकी स्नाने होतील ती करवावी. त्यास दक्षणा पन्नास रुपये देणे.' गोदानाबरोबर काही ब्राह्मणांना जमिनीचे दानही मिळे. ब्राह्मणांना दक्षिणा आणि दाने दिल्याचे अनेक उल्लेख ह्या पत्रव्यवहारात सापडतात.

आंब्रभोजन

निरनिराळ्या धार्मिक प्रसंगांच्या निमित्ताने ब्राह्मणभोजने होत. १९-४-१७६७ च्या पत्रात पुणे, वडगाव, वारजे ह्यांपैकी एक ठिकाणी ५ हजार, माहुलीस व भीमातीरी प्रत्येकी १ हजार, असे ७ हजाराचे ब्राह्मणभोजन देण्यात आले. बेत 'आंब्रभोजना'चा होता. प्रत्येकी खर्च एक रुपया होता. १७६८ मध्ये सिद्धटेकास संततधारेचे अनुष्ठान पंचेचाळीस दिवसपर्यंत केले. 'सिधिविनायकास येकवीस सहस्र प्रदक्षिणा घालवाव्या. दोन्ही प्रकार लिहिल्याप्रमाणे चांगले ब्राह्मण पाठवून करवणे, याखेरीज प्रत्यही शंभर ब्राह्मण भोजनासी श्रावण मासपर्यंत घालावयाचे आहेत... येक पैसा दक्षणा द्यावी. भोजनास दोनचार शाका, कढी, सांबारे, पांढऱ्या पोल्या, सांकर, तूप याप्रमाणे घालीत जावे,' असा मेनूही दिला आहे. १७९५ मध्ये मोरो नारायण दाबक ह्यास 'श्रावण मासचे उत्छाहानिमित्य ब्राह्मणभोजन वाडा शुक्रवार येथील....च्यार रोजा दररोज येक हजारप्रमाणे येकूण चार हजार ब्राह्मण-भोजनाचा मक्ता दिला होता, त्याबद्दल त्यास रु. २५०० मिळाले होते.' केव्हा केव्हा हा धर्मदाय खर्च फार होतो असे पेशव्यांना वाटे. दि. १७-१२-१७६४ च्या पत्रात माधवराव नाना फडणिसास लिहितो, 'विनंती उपरी. तीर्थरूप सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाई व मातोश्री सगुणाबाई यांजकडे धर्मदायाचा खर्च मनस्वी होतो म्हणून कलले व तुम्ही एक-दोन वेला लिहिलेच होते. त्यास या गोष्टीचा बंदोबस्त करणे. परवानगीशिवाय काही न देणे.'

गंगाजलच्या अकरा कावडी रामेश्वराला नेण्यात येत. कार्तिक आणि मार्ग-शीर्षात गंगेच्या २५ व यमुनेच्या २५ कावडी पुण्याला येत. त्याचे १ हजार रुपये खर्च मंजूर होता. १७७० साली वैशाखी अमावास्येस ग्रहण होते. तेव्हा तुंगभद्रातीरी तुलादान केले. ब्राह्मणांना रत्नांचे कंठेही दान देत. रमाबाई सती गेली तेव्हा खाशा कुणबिणी, खिजमतगार, वाड्यातील चाकरीचे ब्राह्मण व आचारी आणि पुण्यातील

अग्निहोत्री ह्यांना रु. १४६०० दान केले. त्याखेरीज रमाबाईने आपले हजारो रुपयांचे दागिने, देवस्थाने, ब्राह्मण, ब्राह्मणांच्या स्त्रिया, ह्यांना वाटून टाकले.

मंत्र-तंत्र, नवस

मंत्र व तंत्राने–नवस केल्याने मनातले ईप्सित साध्य होईल अशी तेव्हा भावना होती. मंत्रतंत्रांनी शत्रूचा पराभव देखील करता येईल अशी तेव्हा श्रद्धा होती. पेशवा नाना फडणिसाला २४–४–१७६७ च्या पत्रात लिहितो, 'शत्रु पराज्ययार्थ सप्तशती व मन्युसूक्त दोन अनुष्ठानास प्रारंभ करून चालती केली म्हणौन लिहिले ते कलले. येक मंडल जाल्यावर समाप्त करावे. अथवा संकल्प केला असेल तसे समाप्त करावे. १७६७ मध्ये माधवराव पेशवा कर्नाटकच्या स्वारीवर गेला होता. तेव्हा ज्यास वर्षासन किंवा जमीन, गाव इनाम दिलेले आहे अशा ब्राह्मणास '....बोलावून आणून सांगावे की खास स्वारी कर्नाटक प्रांती मसलतीवरी जाहाली आहे. त्यास, शत्रु–पराजयार्थ अनुष्ठान आपले वरी स्वकष्टार्जित येजमान कल्याणार्थ करावे म्हणून सांगावे,' अशी २–२–१७६७ च्या पत्रात आज्ञा केली आहे. दि. २९–३–१७८१ च्या पत्रात नानांनी अमृतरावाला पत्रात लिहिले आहे, 'महादेवशास्त्री....मंत्रशास्त्री आहेत म्हणौन लिहिलेत. त्यास, शत्रूचे पारिपत्य होईल असे सामर्थ्य व्हावयाजोगे असिल्यास युक्तीने पुसावे, किती रोजात इंग्रजांचे पारिपत्य होईल ? असे पुसून लिहून पाठवावे;' असा मजकूर आहे. इंग्रजाविरुद्ध मंत्र, अनुष्ठान, नवस ह्यांच्या उपयोग पेशवा करी. एका कागदात उल्लेख आहे. 'सालगुदस्ता इंग्रज मुंबईकर हा दुर्बुध्दी धरून सरंजामसुद्धा कसबे तळेगावपर्यंत चालोन आला होता. त्याचा पराभव व्हावयानिमित्य वेदमूर्ती राजश्री अनंतभट पित्रे याचे विद्यमाने श्रीस नवस सरकारातून केला होता. त्यास इंग्रजाचे पारिपत्य श्रीकृपेकरून जाहले.' देवाला नवस केल्याने तळेगावला इंग्रजांचा पराभव झाला, अशी समजूत होती. पुरंदरानजिक भैरवबाडीच्या भैरवाला सोन्याचा मुखवटा वाहण्याचा नवस गंगाबाईने केला होता. तो तिच्या पश्चात पूर्ण केल्याचा उल्लेख ह्याच कागदपत्रात आहे.

नारायणराव पेशवा दि. १७–१२–१७६४ च्या पत्रात नाना फडणिसाला लिहितो.... 'आम्हास काही दुष्ट ग्रह आहेत. त्यांचा जप करावयास येथे संकल्प करून वेदमूर्ती राजश्री नारायण भट भाव्ये यास सुपारी देऊन तुम्हाकडे पुण्यास पाठविले आहेत. भटजींना अनुष्ठानाकरिता १ तांब्या, १ आसनास घोंगडी, १ गोमुखी, १ रुद्राक्ष माळ व १ धोतरजोडा द्यावा' अशी सूचना केली आहे.

चेटूक

संगमेश्वर तालुक्यातील गाव माखजन येथील बाजार व पेठ व गाव....वाणी उदमी वगैरे लोक याजवरी भुते घालोन घराची घरे गुरेसुधा मारिली आहेत म्हणौन विदित जाले. हा प्रकार धामणीकर वाणी याने केला असा संशय होता. त्याने

'भुते घालोन गुरे माणसे मारली होती. त्याची चौकशी करण्याची आणि तो दोषी ठरल्यास त्या 'भुताल्या'स शिक्षा करण्याची आज्ञा पेशव्याने दि. २३ नोव्हेंबर १७६९ च्या पत्राने नाना फडणिसांना दिली आहे. असे चेटकाचे प्रकार झाल्याचे आणि चेटकिणींना गावकऱ्यांनी मारल्याचे आपण आजही वृत्तपत्रातून वाचतो.

प्रायश्चित्त

पूर्वी ब्राह्मणाच्या हातून काही पाप झाले तर त्याला प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेत. सूर्यनारायण तेलंग ह्याने राही नावाच्या ब्राह्मण स्त्रीशी व्यभिचार केल्याचे पाप केले होते. त्याला दिलेल्या शिक्षेची आणि प्रायश्चित्ताची माहिती दि. २१-९-१७७२ च्या पत्रात आहे. 'सूर्यनारायण तेलंग याणे राही ब्राह्मण इजपाशी बदकर्म केले त्याचा मुदा खरा झाला. त्याजवरून याजला तीर्थे करावयाची आज्ञा जाली होती. त्यास सात आठ वर्षे जाली. हाली तीर्थाटणे करून आला आहे. सूर्यनारायण भट यास शास्त्रता प्रायश्चित्त देऊन शुद्ध करावा. सूर्यनारायणाला जातिबहिष्कृत केले होते. प्रायश्चित्त घेतल्यावर त्यास जातीत परत घ्यावे', असे पत्रात लिहिले आहे.

वैद्यकीय उपचार

वैद्यकीय उपचार मुख्यतः आयुर्वेदिक वैद्यांकडून होत. ह्या पत्रव्यवहारातून त्या काळाच्या गंगा विष्णू, बळवंतराव वैद्य, रामचंद्र भट, अशा नामांकित वैद्यांचा उल्लेख येतो. थोरल्या माधवरावावर त्या काळातल्या सर्व प्रख्यात वैद्यांचे उपचार झाले होते. त्याकरता उपयोगात आणलेली निरनिराळी तेले, भस्मे, मुरांबे, च्यवनप्राश ह्यांचे उल्लेख या पत्रव्यवहारात येतात.

बनारसचा कासीराम वैद्य ह्यास माधवरावाची प्रकृती पाहण्याकरता पुण्यास बोलावले होते. महिपतराव कृष्ण चांदवडकर दि. २०-७-१७७२ च्या पत्रात लिहितो, '....पत्र वैद्यबावास देऊन बहुत आग्रह केला., कित्येक गोष्टी नाना प्रकारच्या नाना युक्तीच्या निघेत आल्या सांगितल्या परंतु न ऐकेत. वृद्धापकाळ, सेवट समाप्तीचे दिवस घालवतात असा विचार आहे....' कासीराम वैद्यास काशीहून पुण्यास येण्याकरता अनेक प्रलोभने दाखवली, परंतु वृद्धापकाळामुळे आणि त्याचाच मृत्यू जवळ आलेला असल्यामुळे तो पुण्याला आला नाही. तेव्हा काशीचा राजा चेतसिंग ह्याचा दिवाण भाईरामपंत होता. पत्रात त्याच्याविषयी महिपतराव पुढे लिहितो, 'राजश्री भाईरामपंत बहुत शाहाणे माणूस कारस्थानी, मनसुबेबाज, भले वित्पन्न, ब्राह्मणभक्त, रीत आप्तपूर्व असे आहेत. वैद्यक्रियेत निपुण आसें समस्ताचे मुखे यैकतो.' भाईरामपंतांची उत्तम वैद्य म्हणून कीर्ती होती. त्याने पेशव्याकरता औषध दिले. अनुपान सांगून कसे व्हावे हे लिहून दिले. परंतु ते औषध महिपतरावाने माधवरावाला पाठवले नाही. कारण....' परंतु औशाधाचे काम, देणारा पाचसे कोसावर, ठीक

दिसोन येईना. स्वामीची मर्जी विनावैद्य संनिध असल्या खेरीज, वोखद कसेही असो, विस्वासूक कोण्ही कसाही असो; परंतु औषध घेणे नाही. हे सेवकास पुरते ठाऊक आहे. औषध भारी मोलाचे उगेच पाठवून द्यावे, तेथे स्वामीजवल उपयोग न पडे.... यास्तव राहविले आहे.' औषध देणारा वैद्य स्वतः उपस्थित असल्याखेरीज माधवराव औषध घेत नसे, हे महिपतरावास ठाऊक होते.

वैद्यांबरोबरच हकिमांची व इंग्रज डॉक्टरांचीही औषधे पेशवे घेत. कोणा आरमणी वैद्यास प्रथम रघुनाथरावाने त्रिंबकराव विश्वनाथ ह्यास पत्र लिहून पाठविण्यास सांगितले होते. परंतु त्यास नंतर नको म्हणून कळविले, त्या वेळी रघुनाथराव आनंदवल्लीस राहात होता. त्रिंबकरावाने आज्ञेप्रमाणे एका हकिमास पाठवून दिले. तसेच.... 'रेवदंडेकर पाद्री यास आज्ञेप्रमाणे सांगितले. तो लवकरच मुंबईस जाऊन औषधे घेऊन स्वामीकडे परभारा आनंदवल्लीस येणार,' असे त्रिंबकरावाने कळविले आहे. बरेच इंग्रज पाद्री वैद्यकात तरबेज असत व त्या वेळचे राजेमहाराजे पुष्कळदा त्यांच्याकडून औषधोपचार करून घेत.

त्या वेळी निजामाच्या पदरी दोन इंग्रज डॉक्टर होते. त्यांची माहिती माधवराव सदाशिवने पेशवा माधवरावला कळविली होती. त्यावर माधवराव पेशवा लिहितो,.... 'दागतर इष्टुरी व वाजवेल हे दोघे बहुत प्रामाणिक. त्यांची स्तुती वैद्य जनवार्तेकडून व नबाबाच्या मुखे फार ऐकतो, त्यात इष्टुरी बहुत गुणी चांगला माणूस. तो आपल्याकडे जास्तीत जास्त रु. ३००/- पर्यंत नोकरीस आल्यास त्यास नबाबाची परवानगी घेऊन पाठवावे....' 'चाकर होऊन येत नसल्यास पत्र न देणे', असे माधवरावाने कळविले आहे.

इंग्रज वकील

इंग्रजांचे पोषाख, शरीराचा वर्ण वगैरे निराळे होते. सवाई माधवरावाला भेटण्याकरता इंग्रज वकील पुरंदरास येणार होता. परंतु त्या विचित्र पोषाखातील लालतोंडया इंग्रजाला पाहून बालपेशवा घाबरून जाईल अशी कारभाऱ्यांना भीती वाटत होती. म्हणून इंग्रजांचा पोषाख पाहण्याची सवय व्हावी ह्या हेतूने इंग्रज कपडे मागविले होते. ज्यान हे कपडे पाठवून दिले तो दि. २-१-१७७६ च्या पत्रात लिहितो...., 'इंग्रजाकडील वकील आला आहे तो श्रीमंताचे भेटीस येईल. त्याच्या टोप्या व अंगरखे पाहून श्रीमंत भयभीत होतील. यास्तव अगोदर धीट करावे लागते. ऐशास जामदारखान्यात व जिनसखान्यात वगैरे कारखान्यात टोप्या व अंगरखे इंग्रजाचे साजाचे व सोंगाचे पाठवून द्यावे म्हणौन पत्री लिहिले. त्याजवरून टोप्या व कुडत्या मिलोन साडेसहा सनगे पाठविली.' कोणाला तरी हे कपडे घालून आणि तोंड रगवून इंग्रजांचे सोंग आणून त्याची श्रीमंतांना सवय केली की नाही, हे कळत नाही.

नवीनाचे स्वागत

त्या काळातले लोक इतके सनातनी विचाराचे होते तरी इंग्रजांबरोबर येणाऱ्या नवीन औषधांचे आणि यंत्रांचे ते हळूहळू वापर करावयास लागले होते. साताऱ्यास १७९८ मध्ये देवीची साथ आली होती. तेव्हा काहींनी देवी टोचून घेतल्या. युरोपातही देवी टोचण्यास नुकतीच सुरुवात झाली होती व त्यास तेथे विरोधही होत होता, हे लक्षात घेता इकडच्या लोकांनी आपण होऊन देवी टोचून घेतल्या, हे वाचून आश्चर्य वाटले. कोणी एक सातारकर आपल्या पत्रात लिहितो, '....सातारा शहरात देवी बहुत आल्या आहेत आणि देवी आणावयाचा वैद्य (देवी टोचणारा) सातारा येथे आला होता. आमचे घरी मुलास व चि. सौ. यमुनेस देवी आल्या नवत्या, याजकरता वैद्यास आणून तोटका केला (देवी टोचल्या) मूल दोन व चि. सौ. यमुना व अप्पाजीपंताचा मूल व पुत्र व वाळाजी हरी याचा पुत्र इतक्यास वैद्याने देवी आणविल्या, त्यामुळे पंधरावीस रोज बहुत घाबरे जाहालो. काही सुचेनासे जाले होते. परंतु आपले आशिर्वादेकरून आरोग्य जाहली.' त्या काळात देवी टोचण्याची क्रिया प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे शरीरात त्याची प्रतिक्रिया जोरदार होत असे.

त्या वेळी मेणकापडाच्या टोप्याही पावसाळ्यात वापरायला सुरुवात झाली होती. दि. २-८-१७७१ च्या पत्रात पेशवा लिहितो, ...' पावसाली टोपी सकलादी दुरंगी करून पाहिजे.... त्याप्रमाणे व येक सुलतानी सकलादीची याप्रमाणे दोन टोप्या करून जलद पाठवून द्याव्या.' त्याचप्रमाणे दुर्बिणीचाही पेशवे वापर करू लागले होते. नारायणराव दि. ५-४-१७७३ च्या पत्रात लिहितो, ' परसू वागमारा खिजमतगार याजबरोबर दुर्बिन पाठवली ती पावली. '

कॅमेरा, घड्याळे

'सावली पाहून तसवीर काढावयाची पेटी' म्हणजे त्या वेळचा प्राथमिक अवस्थेतील कॅमेरा ' इंग्रेजाकडील आणली होती ती .... शोध करून आपणाकडे नवलोजी चव्हाण याज समागमे पाठवली आहे, ' असा कॅमेऱ्याचा उल्लेख एका कागदात आहे.

दुर्बिण आणि कॅमेऱ्याप्रमाणे घड्याळांचाही प्रसार होऊ लागला होता, असे दिसते. नारायणरावाने माधवरावाला लिहिलेल्या पत्रात घड्याळांचा उल्लेख आहे. शिंप्याकडे ' दुपटा व तिवट व झगा ' करावयास कापड दिले होते. परंतु तीन महिने झालेतरी कपडे मिळाले नाहीत. (शिंप्यांचा कपडे वेळेवर न देण्याचा गुण तेव्हापासून आहे.) तसेच, ' गोपाल कारागीर घड्याळाचा याजजवळ खासे घड्याळ व मातुश्री बाईकडील वाड्याचे घड्याल नीट करावयास दिल्हे, ते अद्याप घड्याले तयार होत नाहीत. ' (घड्याळजी शिंप्याचाच भाऊ) ' त्यास ताकीद करून लौकर तयार करऊन पाठवून देणे, ' असे माधवरावाने नारायणरावास कळविले होते. त्यास नारायणरावाने

दि. १०-६-१७६७ रोजी उत्तर पाठविले. त्यात तो लिहितो, '....दोन घडयाले गोपाल कारागीर याजकडे आहेत. त्यापैकी मातुश्री बाईचे घडयाल आठ पंधरा दिवसी तयार करून देतो. खासे घडयाल तयार व्हावयास सहा महिने लागतील म्हणोन त्याणे सांगितले.' गोपाल कारागीर वेळेवर काम करत नाही म्हणून त्यास निम्मा रोजमुरा द्यावा, असे माधवरावाने लिहिले होते. नारायणराव म्हणतो, 'निमे रोजमुरा त्यास द्यावा म्हणोन आज्ञा, त्यास, निमे रोजमुरा तो घेत नाही. मातुश्री बाईचे घडयाल तयार करून घरास जावयास आज्ञा मागतो.' गोपाल कारागीरही चांगलाच पक्का दिसतो. पेशव्यांची अडवणूक करायलाही तो डरत नाही.

एकदा पेशव्यांचे घडयाळाची काच फुटली. तेव्हा ते दुरुस्ती करता नाना फडणिसाकडे पाठवताना पेशवे लिहितात, 'गंजीतील घडयालाचे भिंग फुटले आहे..... तर याचे मेजाचे भिंग शिलकेस असल्यास बसविणे. सिलकेस नसले तर नवे मागवण न मिळे तर माफजतीने घडाल जवाहीरखान्यात ठेवणे.' दि. २०-११-१७८९ च्या पत्रात 'हात घडयालास नवे भिंग बसवून रवाना केले ते शाबूत येऊन पोहचले', म्हणून पोच दिली आहे.

रामजी माधवरावाला पेशव्यांनी पन्नास साठ रुपये किंमतीची घडयाळे मुंबईहून मागवावयास सांगितले होते. त्याकरता त्याने कृष्णसेठ सावकार ह्याला मुंबईस घडयाळ खरेदीकरता पाठवले. परंतु ह्या किंमतीत घडयाले मिळत नाहीत असे कळवून रामजी पुढे लिहितो, '....थोर घडयाले दोन हातभर उंच व लहान डबीवजा येक, एकूण तीन. त्या तिहांची किमत सारखीच, दर साडेतीनसे रुपये पडतात.' ती घेऊन पाठवावीत तर आणखी एक अडचण. विकत घेतलेल्या वस्तू पसंत पडल्या नाहीत तर मुंबईकर सावकार त्या परत घेत नाहीत.... आणि तेथील सावकारीची रीत खरिदी होऊन पसंत न पडता माघारी टाकल्यास घेत नाहीत, तर ह्या तीन घडयाळांपैकी कोणते घडयाळ पाठवू ते कळवावे,' असे रामजीने पेशव्यास लिहिले आहे.

चहादाणी

इंग्रजांच्या संपर्काने पेशवे चहा प्यावयासही शिकले होते असे दिसते. नारो आपाजीला पेशव्यांनी जवाहरखान्यातून एक चहादाणी पाठवून देण्यास पत्राने कळविले होते. त्याबाबत नारो आपाजीही दि. १६-६-१७६४ च्या पत्रात लिहितो, '.....च्याहादाणी जवाहरखान्यात नाही. सिहीगडास गेली आहे, तेथून आणविली आहे. आल्यावर पाठवतो.'

पुण्यात १८०८ साली आगीचा बंबही होता. त्या वर्षी शनवारवाडयास आग लागली असता बंबाचा उपयोग केल्याचा उल्लेख ४-४-१८०८ च्या पत्रात आहे. '....अग्न खोलीचे पश्चिमेचे आंगास कडीपाट व येक तुलईस लागली. च्यार पाच कडया निमेसिमे व काही तुलई यास आच पोचली. नंतर बंब आणून पाण्याचा पुरावा

चोहीकडून केला, त्याणे आग दरोबस्त विझली.'

ह्यावरून पेशवाईच्या काळातच इंग्रजी किंवा युरोपीय सुधारणा आपल्याकडे हळूहळू येऊ लागल्या होत्या, हे दिसून येते.

उल्कापात

ह्या पत्रव्यवहारात काही चमत्कारही वाचावयास मिळतात. नारो बाबाजीकडे पेशव्यांनी पत्राने पृच्छा केली, 'चैत्र शुद्ध अष्टमी बुधवारी आवसी च्यार घटका रात्रीस इकडे तारा पडला, गडगडले,' असे कळते ते खरे काय त्यावर नारो बाबाजीने चौकशी करून दि. २-४-१७९३ च्या पत्रात उल्कापाताचे जे वर्णन केले आहे, ते कोणाही साहित्यिकाला हेवा वाटावे असे आहे. तो लिहितो,....' त्यास वेदमूर्ती राजश्री विनायेक जोसी याणी पारनेरीहून लिहिले की, बुधवारी संध्याकाली दोन घटिका रात्री समई मोठा तारा तुठोन अग्नीदिशेकडून आला, परंतु भास मात्र अग्नीदिसेचा. केवळ मध्यभागी अदौ देखिला, तेथून नैरूत्यस सनिध उतरला यैसे देखिले. नेत्रास झापड पडली, दुर्धर तेजोमयो देखिला. त्याचे टुकडे दोन झाले. एक टुकडा वर्तुलगोल, दुसरा टुकडा त्यास बिसारा आकाशापासून भूमिपरियेत, सहस्रावधी मनुष्यानी पाहिला. आपणही पाहिला. तदनंतर तोफेच्या आवाजासमान तीन शब्द मोठे झाले. त्यावर मेघगर्जनेसमान गंभीर गर्जन झाले. यैसा निर्घात उल्कापातासहित जाला म्हणौन विनायक जोसी याणी लिहिले होते व गंगातीर प्रांतीही तारा दोन घटका रात्री समई पडला. हे सर्वत्रानी पाहिला. परंतु शब्द जाला हे कोण्ही यैकिले न यैकिले.'

बैल व्याला

परंतु ह्यापेक्षाही एक मोठा चमत्कार नंदवाडा ह्या गावी झाला. तेथे तर चक्क एक बैलच व्याला ! ही बातमी खरी की खोटी ह्याची शहानिशा करून कळविण्याची आज्ञा पत्रलेखकाला सरकारकडून झाली होती. तेव्हा तो पत्रात लिहितो,....' त्याजवरून जेथे बैल होता तेथे वीसपंचवीस भले लोकसुद्धा जाऊन पाहिला. बैल पाणियात बसला होता. दोन माणसे लाऊन उठविला. तो परम श्रमेकरून उठला. च्यार हात लांब जाताच मागती पडिला. प्रसूतकालचे भाव सारे त्याचे देही व द्वारी जाहाले आहेत. काही जारही तेथे पडिला आहे. प्रसूत होते समई आणिक लोकांनी बहुतांनी पाहिला. त्याचेही दाखले पाहिले. प्रत्यक्ष वासरासरिखे स्वेत (पांढरे) होते. कान, डोळे, पाय, सारे येथास्तित होते. परंतु जीव नव्हता. निराळे होताच जवळ कुतरी होती त्यानी खादले. तेथे रक्त पाचसात जागा पडिले आहे. सर्वांनी पाहिलेही आहे व हाली पाहाता भावनाही दिसते.' प्रसूत झालेल्या बैलाचे आणि कुत्र्याने खाऊन टाकलेल्या वासराचे एवढे वर्णन केले तरी बैल व्याला ह्या गोष्टीवर पत्रलेखकाचा विश्वास बसत नाही. तो पुढे लिहितो, 'परंतु न व्हायची गोष्टी आहे. मिथ्या आसेल बैलास वासरू कोठे होणार ? ....'

६

मिशनऱ्यांची चिकाटी, ब्राह्मणांचा विरोध !

अप्रत्यक्ष प्रचार

मिशनऱ्यांचे धर्मप्रसार करण्याचे दोन मार्ग असतात: प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष. लोकांमध्ये जाऊन व्याख्याने देऊन ख्रिस्ती धर्माचा प्रचार करणे हा प्रत्यक्ष मार्ग. शाळा, अनाथाश्रम, कुष्ठधाम आणि हॉस्पिटले, दवाखाने काढून धर्माचा प्रचार करणे हा अप्रत्यक्ष मार्ग. मिशनरी जेथे जेथे जातात तेथे तेथे ते प्रथम शाळा उघडतात. आज स्वतंत्र भारतातही त्यांच्या कॉन्व्हेंट शाळा चालू आहेत. ख्रिस्ती धर्माची तत्त्वे संस्कारक्षम मुलांच्या मनावर बिंबविणे, हाच गल्या शतकातील शाळांप्रमाणे ह्या शाळांचाही उद्देश आहे. आपल्या स्वाभिमानशून्यतेमुळे आजही ह्या शाळा भरभराटीत आहेत. दरवर्षी नवीन नवीन शाळा निघत आहेत, आणि आपल्या पाठिंब्यावरच त्या जोरात चालू आहेत.

पूर्वी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळांतून ख्रिस्ती धर्माची शिकवण उघड उघड देण्यात येत असे. त्या वेळच्या क्रमिक पुस्तकातील काही धड्यांची नावेच पाहा: 'बायबलचे महत्त्व', 'ख्रिस्त हाच आम्हाला अनुकरणीय', 'ख्रिस्त हाच आमचा तारणहार !', 'बाल ख्रिस्ताचा महिमा !' इत्यादी. साहजिकच हा प्रचार सतत कानी पडत राहिल्यामुळे काही विद्यार्थी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करीत. आज ख्रिस्ती धर्माचा एवढा उघड प्रचार ख्रिस्ती शाळांतून होत नाही. तरीपण, भारतीय संस्कृतीपेक्षा पाश्चिमात्य संस्कृती श्रेष्ठ आहे, हिंदू धर्मापेक्षा ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ आहे, असा परिणाम त्यांतील विद्यार्थ्यांवर होतोच आणि त्यांच्यात व भारतातील सामान्य जनतेत फार मोठा दुरावा निर्माण होतो.

सर्व बाजूंनी विरोध

नाशकात आलेले मिशनरी धर्मप्रसाराकरताच आलेले असल्यामुळे त्यांनी येथे येताच शाळा उघडल्या. पहिली शाळा उघडण्याचे श्रेय मिसेस फरार हिल

जाते. तिने नाशकात आल्यानंतर लगेच, एक मुलींची शाळा स्थापन करण्याचा प्रयत्न केला. ह्या शाळेत प्रारंभी तीन मुलींनी नावे दाखल केली. पण लवकरच एके दिवशी तिघींनीही आपण शाळेत येणार नाही म्हणून सांगितले. त्याचप्रमाणे ज्या बाईच्या घरात शाळा भरवायची होती, तिनेही आपली जागा, आधी ठरलेल्या भाडयाच्या दुप्पट भाडे देऊ करूनही देण्याचे नाकारले. मिसेस फरार १३ ऑक्टोबर १८३२ रोजी आपल्या दैनंदिनीत लिहिते, " मिशनऱ्यांना आणि त्यांच्या कार्याला सर्व बाजूंनी आणि सर्व तऱ्हांनी कडक विरोध होत आहे. आपणाला खिस्ती करण्याकरता लालूच; लबाडी किंवा जुलूम ह्यापैकी कोणताही मार्ग अनुसरायला मिशनरी कमी करणार नाहीत, अशी लोकांची समजूत झालेली आहे. ह्या प्रकारच्या पुष्कळ कल्पित गोष्टी गावात पसरलेल्या आहेत. परिणामतः आमच्याकडे भीतीने आणि द्वेषाने पाहिले जाते. त्याचप्रमाणे लोक आमच्याशी उद्धटपणाने वागतात."

मिसेस फरारचा मुलींची शाळा काढण्याचा प्रयत्न अशा रीतीने फसल्यावर तिला मुलामुलींची मिश्र शाळा काढण्याचा सल्ला देण्यात आला. अशा मिश्र शाळेकडे लोक कमी संशयाने पाहतील अशी अटकळ होती. ह्या मिशनऱ्यांबरोबर मुंबईहून बाळाजी नावाचा माणूस आलेला होता. त्याला मिसेस फरारने काजीपुऱ्यात शाळा उघडण्यास सांगितले. परंतु ही शाळाही फार काळ चालली नाही. पेशवेवाडयापासून ही शाळा खूप दूर होती, आणि तिच्यावर मिसेस फरारला लक्ष ठेवणे अवघड जात होते. वर्षभरातच ही शाळा बंद करावी लागली.

अनाथाश्रम यशस्वी

परंतु मिसेस फरारने आपली चिकाटी सोडली नाही. तिने आता आणखी एक निराळा प्रयोग करून पाहण्याचे ठरविले. तिने 'अनाथ' मुलींकरता आश्रम काढण्याचे ठरविले. ज्या मुलीला बाप नाही किंवा नवरा नाही ती अनाथ अशी तिची व्याख्या होती. ह्या शाळेत लेखन, वाचन, शिवणकाम शिकवावयाचे व प्रत्येक मुलीला उपजीविकेकरता रोज एक पैसा म्हणजे पाव आणा द्यावयाचा असे तिने ठरविले. त्याप्रमाणे, आतापर्यंतच्या अनुभवाने शहाणी होऊन, तिने ही आश्रमशाळा पेशवेवाडयात आपल्या नजरेखालीच काढावयाची असा निर्णय घेतला. अनेक अडचणींवर मात करून तिने ही शाळा काढली. १८३२ च्या अखेरीस ह्या शाळेत अठरा मुली होत्या. आता या शाळेकरता निधी जमविण्याच्या उद्योगाला ती लागली. मुंबई, अहमदनगर, मालेगाव येथील तिच्या परिचितांनी ह्या शाळेकरता मुक्तहस्ताने पैशाची मदत पाठवली. मिसेस फरारजवळ ह्या शाळेकरता 'भरपूर निधी' जमला.

लवकरच ह्या शाळेतील मुलींची रोजच्या हजेरीची सरासरी पन्नास झाली. ती लिहिते, " रोज ह्या मुली खिस्ताचा संदेश ऐकण्याकरता जमतात. ह्यातील वीस पंचवीस मुली पुष्कळच चांगले वाचू शकतात आणि माझ्याबरोबर खिस्ती धर्म-

तत्त्वांवर चर्चा करू शकतात." थोड्या अवधीत शाळेतील मुलींची संख्या पासष्ट-पर्यंत गेली. त्यांच्याकडून ख्रिस्ती धर्माची तत्त्वे पाठ करून घेतली जात आणि ख्रिस्ती धर्माची गाणी म्हणवून घेतली जात.

१८३६ मध्ये मिसेस फरारने ह्या शाळेकरता वसतिगृह स्थापन केले. प्रथम त्यात आठ मुली आल्या. १८३८ मध्ये वसतिगृहात राहणाऱ्या मुलींची संख्या पंधरापर्यंत गेली. ह्या सर्व मुलींना ख्रिस्ती धर्माची शिकवण देऊन त्यांना ख्रिस्ती बनविण्यात आले आहे, असे मिसेस फरार लिहिते. हे कार्य मिशनऱ्यांच्या पहिल्या सात वर्षांच्या नाशकातील वास्तव्यातील सर्वांत उत्तम कार्य होय, असे शिफारसपत्र पुस्तकाच्या लेखकद्वयाने देऊन ठेवले आहे.

सात शाळा

मिशनऱ्यांनी मुलांकरताही नाशकात भराभर सात मराठी शाळा काढल्या. ह्या सर्व शाळांमधून १८३५ मध्ये २६० मुले आणि ६५ मुली शिक्षण घेत होत्या. ह्यातील चार शाळा गंगापूर, चांदोरी, देवळाली व मखमलाबाद ह्या खेड्यातून होत्या, तर तीन नासिक शहरात होत्या. त्याचप्रमाणे त्यांनी एक उर्दू शाळा काढली होती. तिच्यात २० विद्यार्थी होते. इंग्रजी शाळेत १५ विद्यार्थी होते. ह्या शाळांमधून लेखन, वाचन, अंकगणित आणि ख्रिस्ती धर्मतत्त्वे ह्यांचे शिक्षण देण्यात येई. चांगल्या शिक्षकांचा अभाव, जागेची चणचण आणि लोकांचा विरोध ह्या अडचणी असल्या तरी मुख्यतः शूद्र लोकांत शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांना ख्रिस्ती धर्माची पुस्तके वाचता येतात, हाच ह्या शाळांचा मुख्य फायदा होता. मिशनऱ्यांनी ह्या शाळा धडाक्याने सुरू केल्या होत्या, तरी प्रत्यक्ष मिशनऱ्यांच्या देखरेखीखाली असणाऱ्या शाळांखेरीज इतर शाळांतून ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या दृष्टीने फारसे कार्य झाले नाही. १८४३ मध्ये खर्चाची कपात करण्याच्या उद्देशाने ह्या सर्व शाळा बंद करण्यात आल्या.

पहिली इंग्रजी शाळा

ह्या शाळांमध्ये इंग्रजी शाळेचे महत्त्व विशेष होते. ही शाळा १८३४ पासून पेशवेवाड्यातच चालू झाली होती. तेव्हा तिच्यात १२ विद्यार्थी होते. "नाशकातील विद्यार्थी इंग्रजीचे शिक्षण लक्षपूर्वक घेतात," असे मिसेस फरार म्हणते. ह्या शाळेत मराठी लिहिणे, वाचणे, व्याकरण, अंकगणित, भूगोल, ज्योतिषशास्त्र, इतिहास, सृष्टि-ज्ञान, संगीत आणि गायन, रसायनशास्त्र, युक्लिड (भूमिती) हे विषय शिकविण्यात येत. अर्थातच सामुदायिक प्रार्थना होतीच.

१८५० मध्ये वाड्यातील इंग्रजी व मराठी शाळा चालू होत्या. फक्त ख्रिस्ती विद्यार्थ्यांकरताही एक शाळा उघडण्यात आली होती. तिच्यात १५ विद्यार्थी होते.

शिवाय गावात हिंदू विद्यार्थ्यांकरता दोन व मुसलमान विद्यार्थ्यांकरता एक अशा शाळा चालू होत्या. ह्या सर्व शाळांतून ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देण्यात येई. ह्या वेळी सरकारी शाळाही निघाली होती. तिच्यात ख्रिस्ती धर्मशिक्षण देण्यात येत नसे. असे असूनही ह्या शाळेत अवघे ८०-९० विद्यार्थी होते, तर मिशनऱ्यांच्या शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २५० होती, असा अभिमानपूर्वक उल्लेख मिशनऱ्यांनी केला आहे.

मिसेस फरार मध्यंतरी इंग्लंडला जाऊन आली. तिच्या गैरहजेरीत मुलींची शाळा बंद पडली होती. तिने ती पुन्हा चालू करण्याची खटपट करून पाहिली. परंतु आता ह्या शाळेला लोकांचा पूर्वीपेक्षाही अधिक विरोध दिसून आला म्हणून ह्या शाळेचे मुलींच्या अनाथाश्रमात रूपांतर करण्यात आले. ह्या शाळेत ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्याशिवाय कोणाला प्रवेश नसे. हा अनाथाश्रम लहान प्रमाणावरच राहिला. नंतर तो मुंबईला हलविण्यात आला.

शाळांना संघटित विरोध

ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देणाऱ्या आणि धर्मांतर घडवून आणणाऱ्या ह्या शाळांना स्थानिक लोकांनी विरोध केला नसता आणि त्या बंद पाडण्याचा निकराचा प्रयत्न केला नसता, तरच नवल. साहजिकच ह्या बाबतीत नाशिकच्या ब्राह्मणांनी पुढाकार घेतला. १८३५-३६ ह्या वर्षभरात ब्राह्मणांनी हा प्रयत्न कसा केला आणि हळूहळू त्यांचा विरोध कसा मावळला ह्याचे उत्तम वर्णन मि. फरारने आपल्या दैनंदिनीत केलेल्या नोंदीत आढळून येते.

२६ ऑगस्ट १८३५- ब्राह्मण पुन्हा जागृत झाले आहेत आणि आमच्या कार्यात अडथळे आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. एक ब्राह्मण पुढारी काल रात्री आमचे शिक्षक राहात असलेल्या घरमालकाकडे आला आणि त्याने ह्या शिक्षकांना घरातून ताबडतोब हुसकून दिले नाही तर त्याच्यावर बहिष्कार घालू अशी घरमालकाला धमकी दिली. त्याचप्रमाण शिक्षकांनी शाळेत ख्रिस्ती गाणी म्हणण्याचे बंद केले नाही तर त्यांनाही जातिबहिष्कृत करू असा इशारा दिला.

२९ ऑगस्ट – काल रात्री धर्मसभा झाली. ह्या सभेला नाशकातील सर्वांत वजनदार असे सुमारे साठ ब्राह्मण उपस्थित होते. आमच्या मिशनमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक ब्राह्मणाला ह्या सभेपुढे बोलवण्यात आले आणि रोज तो काय काय काम करतो, ह्याविषयी त्यांच्याकडून खोदून खोदून माहिती काढण्यात आली. त्याचप्रमाणे सरळ प्रश्न विचारून आणि युक्तियुक्तीने मिशनऱ्यांचा शाळा काढण्यात उद्देश काय आहे, ह्याचीही बारीक चौकशी करण्यात आली.

४ सप्टेंबर – आमच्या मराठी शाळांतून ब्राह्मणांनी आपली मुले काढून घेतली आहेत. इंग्रजी शाळेतूनही ब्राह्मणांनी आपली मुले काढून घेतली तर ही शाळा चालविणे आम्हाला अवघड जाईल. सध्या धर्माधिकारी गावातील समस्त ब्राह्मणांच्या

सह्या गोळा करीत आहेत. त्यानंतर ते क्रमाक्रमाने इतर जातींच्या सह्या गोळा करणार आहेत.

आज्ञापत्र

८ सप्टेंबर – इंग्रजी शाळेतून एक एक ब्राह्मण मुलगा नाव काढून घेऊ लागला आहे. कारण ह्या मुलांच्या बापांनी आज्ञापत्रावर सह्या केल्या आहेत. जो माणूस पाद्रथाकडे भेटावयास जाईल, किंवा जो आपल्या मुलाला मिशनच्या शाळेत घालेल त्याला जातिबहिष्कृत करण्यात येईल, असे समस्त ब्रह्मवृंद एकमताने जाहीर करीत आहे, असा फतवा निघालेला आहे.

११ सप्टेंबर – आजच्या धर्मसभेला मुसलमानांच्या काझीला निमंत्रण देण्यात आले होते. मिशनऱ्यांच्या प्रयत्नांना विरोध करण्याकरता आपण काय उपाययोजना करीत आहोत, हे ब्राह्मणांनी काझीला समजावून सांगितले आणि मुसलमानांनीही तशीच उपाययोजना करावी असा त्याला आग्रह करण्यात आला. त्याला काझीने संमती दिली आणि आपल्या लोकांपैकी कोणीही आमच्याशी संबंध ठेवणार नाही, अशी त्याने हमी दिली.

शिक्षकांना समज

१४ सप्टेंबर – काल रात्री शिक्षकांना पुन्हा धर्मसभेत बोलावण्यात आले. मी अंदाज केला होता, तशाच गोष्टी घडल्या. आपण निर्दोष आहोत असे शिक्षकांनी सांगितले, परंतु सभा त्यांचे काही ऐकून घेण्यास तयार होईना. त्यांनी जर आमच्या नोकऱ्या सोडल्या नाहीत, तर आज संध्याकाळी त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात येईल आणि त्यांना घरातून बाहेर काढण्यात येईल असा त्यांना निर्वाणीचा इषारा देण्यात आला. आज सकाळी शिक्षक माझा सल्ला घेण्याकरता आले. ह्या कठीण परिस्थितीत मी त्यांच्या पाठीशी उभा राहीन काय, असे त्यांनी विचारले. मी त्यांना आवश्यक ती सर्व आश्वासने दिली व सर्वतोपरी मदत करीन म्हणून सांगितले, आणि आपल्या नोकऱ्या सोडण्यापेक्षा जातीबाहेर राहणे पसंत करू असे धर्मसभेला निक्षून कळविण्यास त्यांना सांगितले. त्यांना राहण्याकरता जागा मी पाहून ठेवली आहे. त्यांना घरातून बाहेर काढले तर ह्या जागेत राहता येईल.

१४ ऑक्टोबर – धर्मसभेच्या रोज बैठकी होतात. आम्हाला विरोध करण्याकरता नवीन उपाय काय योजावेत आणि आधीच्या आपल्या योजना कशा कार्यान्वित कराव्यात, ह्यावर त्यांचा खल चालतो. परंतु अद्याप त्यांचा निश्चित निर्णय लागत नाही.

ब्राह्मणांत फाटाफूट

५ नोव्हेंबर – धर्मसभेच्या बैठका आता अनियमितपणाने भरू लागल्या आहेत.

आणि ब्राह्मणांत फूट पडू लागल्याची लक्षणे दिसू लागली आहेत. कर्मठ आणि तापट ढोक्याचे ब्राह्मण मात्र मिशनचे समूळ उच्चाटन करू म्हणून वल्गना करीत आहेत.

सात महिन्यांनंतर फरार लिहितो.

१४ जून १८३६ – धर्मसभेने पुन्हा हल्ला करण्याची धमकी दिली आहे. परंतु आता त्यांच्या धमक्यांत विशेषसा दम उरलेला नाही. सध्या त्यांच्यात दोन पक्ष पडलेले आहेत. आणि प्रत्येक पक्ष दुसऱ्याला जातीबाहेर काढण्याचा प्रयत्न करतो आहे. धर्मसभेतील एका प्रमुख शास्त्र्याने, आम्हाला त्रास देण्याचे त्यांनी बंद केले तर आम्ही त्यांना काय देऊ, ह्याबद्दल अलीकडेच विचारणा केली आहे.

आणि ब्राह्मणांच्या ह्या विरोधाचा शेवट असा झाला—

२७ सप्टेंबर १८३६ – गेल्या वर्षी ह्या वेळी मिशनचा समूळ नाश करण्याकरता आणि मिशनशी जो कोणी संबंध ठेवील त्याला दोषी ठरविण्याकरता ब्राह्मण उद्युक्त झाले होते. आज संध्याकाळी सुमारे पन्नास प्रतिष्ठित ब्राह्मण माझ्याकडे आले व त्यांनी सर्व संध्याकाळ माझ्या सहवासात घालवली. धर्मसभेतील आमचा सर्वांत कट्टर विरोधकही त्यात होता.

७

धर्मांतरित : विषप्रयोग फसले !

प्रवास

एखाद्या गावी प्रचाराचे केंद्र स्थापन केले तरी मिशनरी तेथून लांबलांबचे प्रवास करतात. शंभर वर्षांपूर्वीच्या काळात प्रवासाच्या सोयी आणि साधने आजच्या-सारखी नव्हती. बैलगाड्या, मेणे किंवा घोडे हीच तेव्हाची प्रवासाची साधने होती. तेव्हा धड रस्तेही नव्हते. चोर दरोडेखोर ह्यांचे भय प्रवासात सतत असे. त्यातून मिशनरी थंड हवेच्या प्रदेशातून आलेले. येथील उन्हाळा आणि धूळ त्यांना तापदायक ठरणारी होती. परंतु आपल्या कार्यावर नितांत श्रद्धा असणारे मिशनरी अशा अड-चणींना दाद थोडीच देणार ! त्याही प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे धर्मप्रचारार्थ प्रवास सतत चालूच होते.

१८३०–३१ साली मुंबईत मिशनरी केंद्र होते. तेथून थंडीच्या दिवसांत पुणे, नासिक, आणि महाराष्ट्रातील इतर छोटी मोठी गावे ह्यांचा प्रवास करण्यास मिशनऱ्यांनी आधीच प्रारंभ केला होता. मुंबईपासून शंभर–दीडशे मैलांच्या परिसरात ते प्रवास करीत. नाशकाला मिशनरी केंद्र स्थापन झाल्यावर हाच प्रघात पुढे चालू ठेवण्यात आला. १८३३ साली मिचेल आणि डिक्सन औरंगाबाद, दौलताबाद आणि वेरूळ येथे जाऊन आले. १८३६ मध्ये फरार तर नागपूरपर्यंत जाऊन आला. १८३७ मध्ये त्याने कोपरगाव, अहमदनगर, सोलापूर आणि पंढरपूर ह्या गावांना भेटी दिल्या. १८४२ त तो मालेगावला जाऊन आला. १८३८–३९ मध्ये वॉर्थ तर पंढरपूर आणि तेथून गोव्यापर्यंत जाऊन आला. ह्या प्रवासांच्या निमित्ताने मिशनरी तीन तीन महिने आपल्या केंद्रावर गैरहजर असत. ह्या दूरदूरच्या प्रवासाबरोबरच नासिकच्या आसपास असलेल्या येवले, निफाड, विंचूर, अंधरसूल, चांदोरी, सायखेड इत्यादी गावांनाही ते वरचेवर भेटी देत.

चोरदरोडेखोरांचा उपद्रव

ह्या गावांमध्ये मिशनऱ्यांचे स्वागत मिश्र स्वरूपात होई. साधारणतः नाशिकच्या

लोकांपेक्षा ह्या गावचे लोक त्यांचे स्वागत बरे करीत. तरी पण त्यांना इतर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागे. ह्या प्रवासात दोन वर्षांच्या अवधीत डिक्सनला तीन वेळा लुटण्यात आले. एका प्रसंगाचे तो वर्णन करतो :

" येवले, १९ डिसेंबर १८३३– आजचा दिवस मी फारच विचित्र मनःस्थितीत घालवला. काल रात्री अकरा-बाराच्या सुमारास काही भिल्लांनी (ही एक लुटारू जमात आहे) माझ्या तंबूत प्रवेश केला. त्यातील एकाने मला दंडुक्याचा प्रसाद दिला आणि ते माझा बिछाना, झगा आणि ट्रंक घेऊन पळून गेले. ह्या ट्रंकेत माझी अत्यंत मौल्यवान पुस्तके होती. त्याचप्रमाणे गेल्या चार महिन्यांत मी केलेली भाषांतरे होती. तंबूत मी एकटाच होतो. माझ्याबरोबर जी थोडी माणसे होती, ती गाढ झोपी गेलेली होती. त्यामुळे माझ्या आरडाओरडीने ती जागी होईपर्यंत चोरट्यांनी पोबारा केला होता. मला फारशी शारीरिक इजा झाली नाही ह्याबद्दल मी परमेश्वराचा आभारी होतो, परंतु माझे हिब्रू बायबल आणि शब्दकोश चोरट्यांनी नेल्यामुळे मला अतिशय दुःख झाले. ह्या पुस्तकांच्या समासात मी बरीच टिपणे करून ठेवली होती. त्यामुळे मला ही पुस्तके वाचणे आणि त्यांचा अर्थ समजावून घेणे सोपे जात असे. मी लगेच स्थानिक मामलेदाराला वर्दी दिली. त्याने चोरट्यांचा पाठलाग करण्याकरता माणसे पाठवली. आज दुपारी माळरानावर माझी ट्रंक सापडली. माझी पुस्तके आणि कागद इतस्ततः पडलेले होते. पुस्तकांचा आणि कागदपत्रांचा आपणास काही उपयोग होणार नाही असे पाहून चोरांनी ती तेथेच टाकून दिली होती. "

येवल्यात धक्काबुक्की

येवल्याच्या लोकांनी डिक्सनला बराच त्रासही दिला. तो लिहितो– " आज बाजाराचा दिवस होता. दुपारी बाजारात जाऊन मी लोकांपुढे प्रचार करू लागलो. परंतु लोकांची उद्धट वर्तणूक पाहून, माझ्या इच्छेपेक्षा लवकरच मला आवरते घ्यावे लागले. जेव्हा हे लोक नुसते तोंडाने शिवीगाळ करतात, तेव्हा ते केवळ निरर्थक आवाज आहेत, असे मी मानतो. परंतु जेव्हा ते जवळ येऊन अंगाशी लगट करू लागतात आणि धक्काबुक्की करायला सुरुवात करतात, तेव्हा माझ्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि शहाणपणाच्या दृष्टीने तेथून माघार घेणेच मला योग्य वाटते. " नंतर तो लिहितो, " आज संध्याकाळी एक वयस्क प्रतिष्ठित गृहस्थ माझ्याकडे आला आणि म्हणाला, ' तुम्ही लोक आमचा देश लुटायला आणि आमच्या लोकांना धर्मभ्रष्ट करायला आलेले आहात. तुम्ही अगदी मरेपर्यंत जरी धर्मप्रचार केला तरी तुमच्याकडे कुणी ढुंकूनही पाहणार नाही. ' "

त्या काळात, मिशनरी हे सरकारचे पित्ते आहेत आणि त्यांना सरकारकडून पगार मिळतो, अशी लोकांची समजूत होती. ती इतकी दृढमूल होती की, तिचे

निराकरण करण्याचा प्रयत्नच मिशनऱ्यांनी सोडून दिला होता. लोक मिशनऱ्यांनी दिलेली चोपडी आणि पत्रके रागारागाने फाडून टाकत.

ब्राह्मण हस्तक

बाहेरगावच्या प्रवासाबरोबरच नाशकातील प्रचारही चालूच होता. आता फरार आपल्याबरोबर एका ब्राह्मणास घेऊन जाई. त्यामुळे लोकांचा विरोध बराच कमी झालेला दिसून आला. लोक ह्या ब्राह्मणाचे म्हणणे शांतपणाने ऐकून घेत आणि त्याच्याकडून चोपडी घेण्याकरता एकच झुंबड उडवीत. त्या काळात साक्षरतेचा प्रसार फारसा नव्हता, तरीपण ह्या वाटलेल्या पुस्तकांचा परिणाम बराच होत असे, असे मिशनऱ्यांना दिसून आले. बारा वर्षांच्या अवधीत मिशनऱ्यांबरोबरच्या लोकांच्या वागणुकीतही बराच फरक पडला होता. पूर्वी लोक त्यांना दगड मारीत, शिव्या देत, त्यांची पुस्तके टराटरा फाडून टाकीत. पण आता लोक मिशनऱ्यांशी आदराने वागू लागले होते.

घरगुती जीवन

मिशनरी पेशवेवाडयात राहात होते. त्यात राहू लागल्याबरोबर प्रथम त्यांनी एक खोली प्रार्थनेची खोली म्हणून मुक्रर केली. हिच्यात रोज सकाळी मराठीतून प्रार्थना होई. ह्या प्रार्थनेला प्रथम फक्त मिशनऱ्यांचे नोकरच हजर राहात. शाळा स्थापन केल्यानंतर शाळेतील सर्व मुले ह्या प्रार्थनांना हजर राहू लागली. इंग्रजी प्रार्थनांना १८३५ मध्ये मिशनऱ्यांखेरीज आणखी आठ ख्रिस्ती येत. ह्यातील चौघे पोर्तुगीज होते. दहा वर्षांत हा आकडा ३८ पर्यंत गेला.

वाडयात राहणारे पहिले मिशनरी म्हणजे मिचेल व त्याची पत्नी. त्यांच्यानंतर फरार पतिपत्नी राहावयास आली. वाडयात मुलींची शाळा, इंग्रजी शाळा, आणि मुलांची मराठी शाळाही असे. त्याचप्रमाणे मुला-मुलींचे एक वसतिगृहही उघडण्यात आले होते. १८३८ मध्ये ह्या वसतिगृहात ३८ मुले होती. त्याशिवाय वाडयात अनाथाश्रमही होता. १६ मार्च १८३६ रोजी मिसेस फरार लिहिते :

आफ्रिकन मुले

'काल सहा अनाथ आफ्रिकन (शिद्दी) मुले नाशकात आणण्यात आली. एक देशी गुलामांच्या जहाजावरून त्यांची सुटका करण्यात आली आहे. सध्या ही मुले मुसलमान आहेत. त्यांना इंग्रजी, मराठी किंवा आम्हाला समजणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही भाषेतील एक शब्दही बोलता येत नाही. ह्या आफ्रिकन मुलांशिवाय आमच्याकडे दोन हिंदू मुली आणि दोन पोर्तुगीज मुले आहेत. ह्यांना आम्ही इंग्रजी आणि ख्रिस्ती धर्म शिकवू अशी आशा आहे.'

नाशकात आणण्यात आली तेव्हा ही शिंदी मुले आजारी होती. दोन महिन्यांतच त्यांच्यापैकी तीन मुले मरण पावली.

फरार व त्यांची मुले

फरारना दोन लहान मुले होती. मोठा हेन्री नाजुक प्रकृतीचा असल्यामुळे त्याला आधीच इंग्लंडला पाठविण्यात आलेले होते. दुसरा मुलगा फ्रेडरिक. हा नंतर कँटरबरीचा डीन झाला. त्याचा जन्म मुंबईला झाला होता. तो तीन वर्षांचा झाला तेव्हा त्यालाही इंग्लंडला पाठवून देण्यात आले. त्याला का पाठवून देण्यात आले ह्याचे कारण मोठे मनोरंजक आहे. मिसेस फरार लिहितेः—

'खिस्ती समाजाशी आमचा संपर्क पूर्णपणे तुटलेला आहे. येथे कोणी धर्मांतरित खिस्ती नाही की खिस्ती सहायकही नाहीत. आम्ही नसताना मुलाची काळजी घेऊ शकेल असा कोणी खिस्ती अगदी अलीकडेपर्यंत नव्हता. आमच्या छोट्या फ्रेडरिकला एकही खिस्ती मोठा माणूस किंवा लहान मुलगा मित्र म्हणून मिळण्यासारखा नव्हता. आजूबाजूला सर्वत्र पाखंडी होते. त्याला सर्वत्र मूर्तिपूजा दृष्टीस पडे. एखाद्या देवळावरून आम्ही गेलो की त्याचे कुतूहल एकदम जागृत होई आणि तो विचारी,"हे कुणाचं देऊळ आहे ? त्यात कोण आहे ?" त्या देवांची नावे सांगण्याची आम्ही आमच्या नोकरांना बंदी केली होती. म्हणून त्याने असे प्रश्न विचारले की त्याला उत्तर देण्यात येई, "फ्रेडरिक, तो एक दगड आहे." पण त्यावर लगेच तो विचारी,"पण त्या दगडाचे नाव काय आहे ? मला पाहू द्या ना तो दगड. भिंतीवरची चित्रं मला पाहायचीत." याशिवाय त्याला येथून पाठवून देण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या कानांवर नेहमी घाणेरडे आणि पापी शब्द पडत. आम्ही ऐन हिंदू वस्तीत राहात असल्यामुळे, आम्ही कुठे बाहेर पडलो नाही तरी आमच्या कानांवर घाणेरडे शब्द येऊन पडतातच. हिंदू जी भाषा वापरतात ती खरोखरच अत्यंत ओंगळ आणि घाणेरडी असते.'

इतर धर्मांचा अभावितपणे का होईना पण आपल्या मुलांवर प्रभाव पडू नये म्हणून मिशनरी किती दक्ष असत, हे यावरून दिसून येते.

एकाकी जीवन

आपली इतर कामे सांभाळून मिसेस फरार गावातील बायकांच्या–विशेषतः ब्राह्मण बायकांच्या भेटी घेई. ह्या भेटींची हकिकत तिने लिहून ठेवली आहे, त्यावरून त्या काळातील सामाजिक परिस्थितीवर चांगला प्रकाश पडू शकेल.

परदेशात आणि परकी लोकांत इतक्यात दूर अंतरावर येऊन राहिल्यावर मिशनऱ्यांना, आणि विशेषतः त्यांच्या बायकांना, एकटे एकटे वाटणे साहजिकच होते. कित्येक महिन्यांत त्यांना दुसरा गोरा माणूस भेटत नसे. त्यामुळे एखादा गोरा पुरुष किंवा स्त्री त्यांना कधी भेटली तर त्यांचा तो दिवस मोठ्या आनंदात जात असे.

मिसेस फरार लिहिते, 'मुंबईला जात असलेल्या काही गोऱ्या स्त्रिया (लेडीज) येथे थांबल्या व संध्याकाळ त्यांनी आमच्या सहवासात काढली. गेल्या बारा महिन्यात मला एकही गोरी स्त्री भेटली नव्हती.'

पहिले धर्मांतरित

महाराष्ट्रात ज्या दोघांनी अगदी प्रथम ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला त्यांतील एक होती स्त्री व एक होता पुरुष. स्त्रीचे नाव होते इसाबेला. ती मिसेस रॉबर्टसनची आया होती. पुरुषाचे नाव होते जोसेफ. तो नंतर रॉबर्ट मनीस्कूलचा दरवान झाला. ही धर्मांतरे १८४० मध्ये मुंबईत झाली.

त्याच वर्षी नाशकातही ख्रिस्ती होण्याकरता दोन उमेदवार पुढे आले. त्यांची नावे होती रामकृष्ण अन्ताजी व दाजी पांडुरंग. हे दोघेही मिशनऱ्यांच्या इंग्रजी शाळेतील विद्यार्थी होते. रामकृष्ण मिशनऱ्यांकडे वरचेवर येई आणि ख्रिस्ती धर्माची माहिती करून घेई. परंतु मिशनरी-रॉबर्टसन त्याला मुळीच उत्तेजन देत नसे (!) तरी पण रामकृष्णाने आपला ख्रिस्ती होण्याचा हेका सोडला नाही. आणि मग गोष्टी घसाला लागल्या. एक दिवस रामकृष्णाने घरी देवाची पूजा करण्यास नकार दिला आणि म्हणून त्याच्या बापाने त्याला घरातून हाकून दिले. विचाऱ्याला आता कोठेच आसरा नसल्यामुळे कृपाळू रॉबर्टसनने त्याला आपल्याकडे ठेवून घेतले. दुसऱ्या दिवशी रामकृष्णाचे आईबाप आले व त्यांनी त्याची घरी चलण्याविषयी विनवणी केली. आईबापांची स्थिती पाहून रामकृष्णाला रडू कोसळले. नंतरही कित्येक दिवस त्याला जेवण जात नसे किंवा धड झोप लागत नसे. तरी पण त्याने परत घरी जाण्यास नकार दिला. नंतर त्याच्या बापाने सबकलेक्टरकडे फिर्याद केली. आपण स्वखुशीने मिशनऱ्याकडे राहतो असे रामकृष्णाने त्याच्यासमोर सांगितले. कोर्टात ब्राह्मणांनी त्याचे मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याने धैर्याने त्यांच्यासमोर मूर्तिपूजेचा धिक्कार केला.

विषप्रयोग

त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्याने बाप्तिस्मा घेण्याकरता अर्ज केला. तो सोळा वर्षांचा असून चार वर्षे मिशनऱ्यांच्या इंग्रजी शाळेत शिकत होता. त्याने ख्रिस्ती होण्याचा आपला निश्चय मिशनऱ्याकडे व्यक्त केला. दाजीने ख्रिस्ती होण्याचे ठरविले असले तरी घरी त्याचा लगेच छळ करण्यात आला नाही. पण मग एक दिवस त्याच्यावर विषप्रयोग करण्यात आला. त्याला सिव्हिल सर्जनकडे नेण्यात आले आणि तो मोठ्या मुष्किलीने वाचला. तीन आठवड्यांनंतर रामकृष्णावरही तसाच विषप्रयोग करण्यात आला. तो तर मरायचाच, पण आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच वाचला.

अर्थात ह्या मुलांवर घरी असे विषप्रयोग होऊ लागल्यामुळे त्यांना वाचविण्याकरता ताबडतोब मुंबईला रवानगी करून देण्याखेरीज दयाळू मिशनऱ्यांना गत्यंतरच नव्हते. मुंबईला गेल्यावर रॉबर्टसनने त्यांना १८४१ मध्ये बाप्तिस्मा दिला. ह्या दोघांनाही पुढील आयुष्यात अनेक अडचणींना, आजारांना आणि छळाला तोंड द्यावे लागले. रामकृष्णाने नंतर नाशकास देशी मिशनरी म्हणून पुष्कळ वर्षे चांगले काम केले. दाजीही नंतर पाद्री बनला.

प्रतिक्रिया

ह्या दोघांच्या धर्मांतराची तीव्र प्रतिक्रिया नाशिकच्या ब्राह्मणांत होणे साहजिकच होते. सर्वांनी आपली मुले मिशनरी शाळांतून काढून घेतली. शाळेतील ब्राह्मण शिक्षकांवर आणि मिशनऱ्यांना शिकविणाऱ्या पंडितांना जाति-बहिष्कृत करण्यात आले. परंतु ब्राह्मणांचा हा राग कसावसा सहा महिनेच टिकला. सहा महिन्यांनंतर ब्राह्मण मुले शाळांत पूर्ववत जाऊ लागली.

नाशकात मिशन स्थापन केल्यानंतर आठ-नऊ वर्षांनंतर धर्मांतर करण्यात मिशनऱ्यांना पहिले यश प्राप्त झाले.

ह्यानंतर नाशिकला मधूनमधून काही जणांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देणे सुरू झाले. वाड्याजवळच एक धर्मशाळा होती. तिच्यात काही भिकारी, म्हातारे, अनाथ, अपंग लोक राहात. ह्यातील चार जणांना, ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यात आली. खुद्द नाशकात बाप्तिस्मा दिलेले हे पहिले ख्रिस्ती. त्याकरता मिशनऱ्यांना १८४४ पर्यंत म्हणजे तब्बल बारा वर्षे खटपट करीत राहावे लागले. ह्या चौघांची नावे अशी — येशीबाई व विठू ही दोघे मराठी होती. कन्हाईराव व गंगाराम हे दोघे परदेशी होते. चौघेही चाळिशी ओलांडलेले होते.

ह्यातील येशीबाईची हकिकत जरा नाट्यपूर्ण आहे. ती एका सैनिकाची विधवा होती. ती मालेगावला राहात होती. एके दिवशी, तिचा नवरा गावी गेला असताना, तिला अनीतीला प्रवृत्त करण्याकरता काही लोक आले. परंतु तिने प्रतिकार केला, म्हणून तिच्या झोपडीला आग लावून देण्यात आली. आगीत तिचे हातपाय संपूर्णपणे जळाले आणि ती जन्माची अपंग झाली. एक वर्षानंतर तिचा नवरा मेला. नंतर लष्करातील अधिकाऱ्यांनी वर्गणी काढून तिला दहा वर्षे पोसले. तिचा नवरा ख्रिस्ती झालेला नसला तरी मनातून ख्रिस्ती होता. येशीचाही ख्रिस्ती धर्माकडे ओढा होता. नाशिकला मिशन केंद्र आहे असे कळल्यावर ती नाशिकला आली आणि लगेच तिने बाप्तिस्मा घेतला.

त्यानंतर पुन्हा इंग्रजी शाळेतील दोन ब्राह्मण मुलांनी ख्रिस्ती होण्याची इच्छा व्यक्त केली. त्याबरोबर गावात प्रचंड खळबळ माजली. मुलांचे आईबाप येऊन त्यांना परोपरीने विनवण्या करून समजावू लागले. त्यांनी जीव देण्याची देखील धमकी

दिली. अखेरीस आपली मुले परत घरी नेण्यात त्यांना यश आले. घरी नेल्या-बरोबर त्यांना दुसऱ्या गावी पाठवून देण्यात आले आणि नंतर त्यांच्याविषयी मिशनऱ्यांना काहीही कळले नाही.

भिकारी, अपंग

त्यानंतर धर्मशाळेतील आणखी तिघांना खिस्ती करण्यात आले. रामा रोडे नावाचा एक कुणबी आंधळा भिकारी, रामदीन सेवक नावाचा एक अपंग माजी सैनिक, आणि लालबू चव्हाण नावाची एक परदेशी विधवा हे ते तिघे धर्मांतरित होत. त्यानंतर जेम्स परमेश्वर नावाच्या एका लष्करातील कंपाऊंडरला त्याच्या बायकोसकट बाप्तिस्मा देण्यात आला.

अप्पाजी यार्दी नावाचा एक अठरा वर्षे वयाचा ब्राह्मण विद्यार्थी मिशनरी इंग्रजी शाळेत होता. त्याने खिस्ती होण्याचे ठरविले. तेव्हा त्याचा घरी छळ होऊ लागला. लोक 'खिस्ती आला, खिस्ती आला' म्हणून त्याची टिंगल करू लागले. घरचा छळ असह्य झाल्यावर त्याने मिशनऱ्याकडे आसरा घेतला. नाशकात खिस्ती धर्माची दीक्षा घेतलेला हा पहिला ब्राह्मण.

त्यानंतर भिका सोनार नावाचा अर्धांगवायू झालेला भिकारी, मालखेडच्या पाटलाचा महारोग झालेला मुलगा लक्ष्मण हे खिस्ती झाले. लक्ष्मणच्या आठ वर्षाच्या मुलीलाही खिस्ती करण्यात आले व रामकृष्णाने तिला आपल्या घरी ठेवून घेतले. रामकृष्णाची छोटी मुलगी मारुजा हिलाही बाप्तिस्मा देण्यात आला.

धर्मांतरितांची संख्या हळूहळू वाढत होती. परंतु नंतर नाशकात वरचेवर कॉलऱ्याच्या साथी येऊ लागल्या व त्यात बरेच खिस्ती मरण पावले. तरीपण मिशनने आता चांगले मूळ धरले होते, आणि १८५० पर्यंत नाशकातील देशी खिस्त्यांचा आकडा ५७ पर्यंत गेला. त्यांच्याकरिता मिशनरी मराठीतून प्रार्थना भरवीत. खिस्ती लोकांची संख्या वाढत असलेली पाहून मिशनऱ्यांना समाधान व कृतकृत्यता वाटणे साहजिकच होते. हिंदू समाजाने मूर्खपणाने दूर लोटलेल्या पतित विधवा, उपेक्षिलेले अपंग आणि अनाथ, ह्यांचीच धर्मांतरितांत बहुसंख्या असली तरी 'सैतानाच्या तावडीत सापडलेल्यांना पकडून आणून चांगल्या मेंढपाळाच्या (खिस्ताच्या) हवाली करणे' हे मिशनऱ्यांचे परम पवित्र कर्तव्य होते, व अनेक अडचणींना तोंड देत, जबर चिकाटीने ते आपले हे कर्तव्य पार पाडीत होते. त्याबद्दल त्यांचे कौतुकच केले पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

८

देशी धर्मप्रसारकांना खास शिक्षण

हे मिशनरी दूरदेशाहून भारतात येत. येथील हवापाणी, अन्न त्यांना मानवण्यासारखे नसे. येथील परिस्थिती आरोग्याला विघातक होती आणि पुष्कळदा प्लेग, कॉलरा ह्यांसारख्या भयंकर रोगांच्या साथी येत. साहजिकच ह्या प्रतिकूल परिस्थितीत बरेच मिशनरी अकाली मृत्युमुखी पडत. परंतु त्यांची कर्तव्यनिष्ठा एवढी जबरदस्त होती, की ह्या सर्व संकटांना तोंड देऊन ते येथील लोकांना 'सत्याचा प्रकाश' दाखविण्याच्या आणि त्यांना 'सैतानाच्या तावडीतून सोडवून' येशूच्या कळपात आणण्याच्या 'पवित्र' कार्याला वाहून घत.

१८३४ मध्ये मिचेल आणि त्याची पत्नी ह्यांना प्रकृतिअस्वास्थ्यामुळे मायदेशी परत जावे लागले. १८४० मध्ये मुलींच्या शाळेवर देखरेख करण्याकरता मिसेस स्टोन नावाची मिशनरी बाई आली. येथे आल्यावर पंधराच दिवसांत ती आजारी पडली आणि पंधरा दिवसांच्या आजारपणानंतर ती मरण पावली.

१८३६ मध्ये रेव्ह. राथ नाशिकला आला. बायबलमधील काही भक्तिगीतांचे मराठीत भाषांतर करण्याचे आणि त्यांना चाली लावण्याचे कार्य त्याने केले. अर्थातच धर्मप्रसार हे मुख्य काम होतेच. १८४२ च्या मे महिन्यात त्याला कॉलरा झाला आणि त्यात त्याला मृत्यू आला. १८४६ त रेव्ह. डिक्सन मरण पावला. नाशकात आलेले बहुतेक मिशनरी मराठी भाषा शिकत आणि ख्रिस्ती धार्मिक वाङ्मयाचे मराठीत भाषांतर करत. डिक्सनने केलेली भाषांतरे विद्वानांच्या पसंतीस उतरली होती.

डिक्सन दौऱ्यावर गेला असताना पैठणला अकस्मात आजारी पडला. त्याच्या नोकरांनी त्याला बेशुद्धावस्थेत एका चारपायीवर घालून औरंगाबादच्या डाक बंगल्यात आणले. त्याला ऊन लागू नये म्हणून एक नोकर सतत त्याच्यावर छत्री धरून असे. औरंगाबादच्या गोऱ्या डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त केली, परंतु डिक्सन जगला नाही. तीन दिवसांनी तो शुद्धीवर न येताच मरण पावला.

आणखी एक आघात

त्यानंतर नाशिक मिशनवर आणखी एक मोठा आघात झाला. पुढल्याच वर्षी म्हणजे १८४७ च्या मार्च महिन्यात फरारला 'जंगल फीवर' ने (मलेरियाने?) पछाडले. त्यातून तो वाचला परंतु त्याची प्रकृती इतकी ढासळली की, डॉक्टरांनी त्याला इंग्लंडात जाण्याचा सल्ला दिला. फरार आणि त्याची पत्नी मेमध्ये मुंबईहून इंग्लंडला रवाना झाली. ह्याप्रमाणे नाशिक मिशनला एकाच वर्षाच्या अवधीत तीन उत्तम मिशनऱ्यांना मुकावे लागले.

फरार आणि मिसेस फरार नाशकात फारच लोकप्रिय झाली होती. 'मिसेस फरार तर एक संतीणच होती. ती कधी रागावत नसे. तिच्या तोंडातून कधी वावगा किंवा रागाचा शब्द बाहेर पडला नाही. किंवा ती कधी वायफळ गप्पाही मारीत नसे,' असे तिचे वर्णन तिच्या मुलाने करून ठेवले आहे.

१८७५ त आप्पाजीने फरारच्या इंग्लंडमधील मुलाला पत्र लिहिले होते. त्यात तो फरार दांपत्याविषयी गौरवाने लिहितो, "माझ्या धर्मांतराचे श्रेय आपले माननीय वडील रेव्ह. फरार यांनाच आहे. रेव्ह. फरार आणि मिसेस फरार यांनी येथे जे कार्य केले त्याची आठवण नाशिकमधील हिन्दूदेखील काढतात. ते जर परत आले असते तर पुष्कळांना आनंद झाला असता."

१८३२ ते १८८२ ह्या पहिल्या पन्नास वर्षांत नाशकात वीस मिशनऱ्यांनी दीर्घकाळ वास्तव्य केले. त्यांतील पाच मरण पावले आणि सात जणांना प्रकृती ढासळल्यामुळे मायदेशी परत जावे लागले. म्हणजे विसापैकी बाराजणांचा येथील हवेने बळी घेतला.

धर्मांतरितांचे जीवन

नाशकात प्रथम ज्यांनी धर्मांतर करून ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली, त्यातील बहुतेक देशी धर्मप्रसारक झाले. दाजी पांडुरंगला रेव्हिन्यू खात्यात रु. ५० ची, त्या काळात चांगली समजली जाणारी नोकरी होती व त्याला बढतीही मिळाली असती. परंतु त्याने ही नोकरी सोडून दिली व तो धर्मप्रसारक बनला.

रामकृष्ण अंतांजी ख्रिस्ती झाल्यावर त्याच्यावर दुर्दैवाचे अनेक आघात झाले. त्याची बायको अतिशय आजारी पडली म्हणून तिला औषधोपचारासाठी मुंबईला घेऊन जाण्याचा त्याला सल्ला देण्यात आला. तिला घेऊन तो मुंबईला जात असता वाटेत त्याची छोटी मुलगी आजारी पडली आणि मरण पावली. त्याच्या बायकोला वेड लागले आणि वर्षभरात तीही मरण पावली. ह्या आपत्तीनंतर बिशपला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, "माझी प्रिय पत्नी आणि कन्या माझ्या आधी स्वर्गातल्या राज्यात गेल्या आहेत, ह्या विचाराने माझ्या मनाला समाधान वाटते. मरणापूर्वी माझ्या पत्नीची हीच इच्छा होती. मी जर माझ्या पूर्वजांच्याच धर्मात राहिलो असतो, तर

ह्या बहुमोल समाधानाच्या मोठ्या ठेव्याला मी मुकलो असतो. ते समाधान मला खिस्ती धर्मग्रंथांच्या वाचनामुळे आणि ईश्वराच्या मदतीमुळेच लाभले आहे. "

देशी धर्मप्रसारक

ह्या धर्मांतरितांना देशी धर्मप्रसारक बनविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यांना तसे शिक्षण सुरू करण्यात आले. धर्मप्रसाराचे शिक्षण घेण्याकरता प्रथम पाच विद्यार्थी होते. त्यांचा अभ्यासक्रम असा होता : सोमवारी संस्कृतचे पाठ, मंगळवारी ग्रीक भाषेचे पाठ, बुधवारी ॲड्रीजच्या 'एव्हिडन्सेस ऑफ खिश्चॅनिटी' ह्या पुस्तकाचा अभ्यास, गुरुवारी इंग्रजी व्याकरणाची उजळणी, आणि शुक्रवारी बार्टनच्या चर्चच्या इतिहासाचे वाचन. संध्याकाळी हे विद्यार्थी जोडीजोडीने गावाच्या निर-निराळ्या भागांत जात आणि धर्मप्रचार करीत. त्यांची सर्वांची लग्ने झालेली होती आणि ते जुन्या वाड्याच्या आसपासच राहात.

हे देशी धर्मप्रचारक गावात गेले की, पुष्कळदा त्यांची हुर्यो करण्यात येई. तरी त्यांनी कार्य चालूच ठेवले. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर निरनिराळ्या केंद्रांत सहायक धर्मप्रचारक म्हणून त्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. दाजीबा पांडुरंग नाशिक ते ते सिन्नर भाग, रामकृष्ण अंताजी नाशिक ते त्रिंबक भाग, जेम्स बंटर जुन्नर भाग, सोराबजी कर्सेटजी नाशिकचा परिसर, आणि अप्पाजी बापूजी मालेगाव भाग, असे विभाग त्यांना वाटून देण्यात आले होते.

ह्या धर्मांतरितांना सहाय्यक धर्मप्रसारक बनविण्यात आले. हा देशी धर्मप्रसार-केंद्राचा पायाच होय. ह्या देशी धर्मप्रसारकांचा खिस्ती धर्माचा प्रसार करण्यास बराच उपयोग झाला. नाशिक, मालेगाव, जुन्नर ह्या भागातील धर्मांतरितांची संख्या जोराने वाढू लागली, आणि अनेकांत खिस्ती धर्माविषयीचे कुतूहल निर्माण झाले. गोऱ्या मिशनऱ्यांपेक्षा लोकांचा विश्वास संपादन करण्यात हे काळे मिशनरीच अधिक उपयुक्त ठरले. ह्या काळ्या मिशनऱ्यांपैकी अनेकजण नंतर रेव्हरंडच्या हुद्दयापर्यंत चढले होते.

शरणपूरची स्थापना

जे लोक धर्मांतर करून खिस्ती झाले होते, त्यांना 'पाखंडी' मूर्तिपूजकांपासून दूर ठेवण्याकरता एका स्वतंत्र खेड्याची किंवा उपनगराची स्थापना करण्याची कल्पना मिशनऱ्यांना सुचणे साहजिकच होते. मुंबईचा बिशप १८६१ मध्ये केलेल्या एका भाष-णात म्हणतो, "प्राचीन काळच्या धर्मप्रचारकांच्या काळात जी परिस्थिती होती तीपेक्षा येथील परिस्थिती सर्वस्वी निराळी आहे. त्यामुळे त्यांनी ज्या मार्गांनी धर्मप्रसार केला त्यापेक्षा वेगळे मार्ग आम्ही येथील परिस्थितीत उपयोगात आणले तर ते योग्यच ठरेल. खिस्ती धर्माला येथे जेवढा प्रखर विरोध आहे तेवढा त्यांच्या काळात आणि देशात कोठे होता ? येथे लाखो लोकांना जखडून ठेवणारी जुलमी आणि समाजविघातक अशी

जातिव्यवस्थेची लोहशृंखला आहे. ख्रिस्ती धर्माचा संदेश ऐकणाऱ्याला यथे परकी मानण्यात येते. त्याला लोक महारोग्याप्रमाणे भितात आणि त्यास कोणीतरी भयंकर प्राणी समजतात. त्याला त्याच्या घरात, त्याच्या गावात, त्याच्या शहरात स्थान नसते. ह्यामुळेच, ज्या भागात कर्मठ धर्मनिष्ठपणा ठाण मांडून आहे, अशा भागात तरी नव्या धर्मांतरितांना संरक्षण देण्याची व्यवस्था करणे जरूर आहे, असे मला वाटते."

ह्या विचाराला अनुसरून नाशिकच्या पश्चिमेला दीड मैल अंतरावर दि. १३ ऑगस्ट १८५५ रोजी ख्रिस्ताला शरण गेलेल्यांचे आश्रयस्थान म्हणून शरणपूरची स्थापना करण्यात आली. ख्रिस्ती धर्मांतरित ह्या खेड्यात राहावयास गेले. तेव्हा तेथे शंभर लोक प्रार्थना करू शकतील, असे एक चर्च, वीस रहिवासी असलेले एक अनाथालय, काळ्या ख्रिस्त्यांकरता चार झोपड्या, एक औद्योगिक शाळा आणि दोन गुदामे एवढ्या वास्तू बांधून तयार होत्या. शरणपुरात राहण्याकरता एक नियम मात्र ठरविण्यात आला होता. जो काम करील त्यालाच खायला मिळेल, असा नियम केल्यामुळे ऐतखाऊ लोकांना शरणपुरात राहण्यास आपोआपच मज्जाव झाला.

ईश्वरी संकेत

शरणपूर मुख्यतः उच्चवर्णीय धर्मांतरितांकरता वसविण्यात आले. कारण ह्यांनाच आपल्या जातीकडून अधिक जाच होई. शरणपुरची जागा कशी निश्चित करण्यात आली, याविषयी एक गोष्ट सांगण्यात येते. ह्या ख्रिस्ती खेड्याची स्थापना कोठे करावी हे पाहण्याकरता रेव्ह. प्राईस घोड्यावरून चालला होता. जाता जाता त्याचा घोडा कशाला तरी अडखळून उभा राहिला. ह्याच जागेवर शरणपूर बांधावे असा ईश्वरी संकेत दिसतो असे प्राईसला वाटले, आणि त्याने तीच जागा मुक्रर केली. जेथे घोडा अडखळून उभा राहिला त्या जागेवर एक लाकडी तिपाई कित्येक वर्षे ठेवण्यात आली होती. त्या तिपाईला एक तास टांगला होता आणि त्यावर लोकांना कामावर जाण्यायेण्याकरता टोल वाजवण्यात येत.

१८७५ मध्ये शरणपुरातील ख्रिस्त्यांची वस्ती १२१ होती. शरणपुरची वस्ती हळूहळू वाढत होती. कारण ख्रिस्त्यांकरता आता आठ झोपड्या बांधण्यात आल्या होत्या, पण त्याही त्यांना पुरत नव्हत्या. शरणपुरात येणारे बहुतेक लोक औरंगाबाद भागातून आलेली गरीब माणसे होती. ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेण्याकरता हे भाबडे लोक येत होते. काही आधीच ख्रिस्ती झालेले, परंतु 'मेंढपाळ नसल्यामुळे विखुरलेल्या शेळ्यांप्रमाणे' इतस्ततः विखुरलेले लोकही आले होते. कित्येकांना हे खरोखरच 'शरणपूर' ठरले होते. धर्मांतरित ख्रिस्त्यांची मुले पाखंडी लोकांच्या मुलांत मिळत आणि साहजिकच त्यांच्यावर पाखंडी कल्पनांचा प्रभाव पडे. शरणपुरात वस्तीला आल्यामुळे ह्या मुलांनी लहानपणापासूनच ख्रिस्ती धर्माची आणि नीतीची तत्त्वे शिकवणे मिशनऱ्यांना सोपे झाले.

शरणपुरात एक अनाथालय होते. त्याला जोडून मुलामुलींची एक शाळा होती. ह्या शाळेतून पुढे धर्मप्रसारक, शाळामास्तर, आणि निरनिराळे व्यवसाय शिकलेले अनेक विद्यार्थी बाहेर पडले. एकदा भटक्या डोंबाऱ्यांनी पळवून आणलेल्या पाच मुलींना ह्या अनाथालयात आसरा देण्यात आला. त्यातील एक नंतर एका पाद्र्याची बायको झाली, आणि तिचा मुलगाही एक प्रसिद्ध पाद्री झाला.

औद्योगिक शाळा

शरणपुरात औद्योगिक शाळाही काढण्यात आली होती. तिच्यात सुतारकाम, लोहारकाम असे व्यवसाय शिकविण्यात येत. ह्या कारखान्यात छोट्या बैलगाड्या बनविण्यात येत. त्यांना बाजारात चांगली मागणी असे. नंतर पुस्तकबांधणी व विणकामही शिकविण्यात येऊ लागले. ह्या औद्योगिक शाळेतून इतके विद्यार्थी तयार झाले की एक मिशनरी लिहितो, "आता शरणपुरात एकही पाखंडी लोहार किंवा सुतार आणण्याची गरज पडत नाही. येथे तयार झालेल्या गाड्या, खुर्च्या, ह्यांना बाजारात चांगली मागणी आहे." महादू गोरे ह्या नावाचा माणूस लंडनला जाऊन बग्गी तयार करण्याचे शिक्षण घेऊन आला होता. त्याचप्रमाणे एक शिळा प्रेसही उघडण्यात आला होता व त्यास बरेच काम मिळत असे.

१८६० मध्ये शरणपुरातील झोपड्यांची संख्या तीसपर्यंत गेली होती. त्यात ४१ कुटुंबे राहात होती. अनाथालयातील मुलांची संख्या ५० पर्यंत गली होती. गावात एक पंचायत स्थापन करण्यात आली होती. तिचा अध्यक्ष अर्थातच एक मिशनरी होता. ही पंचायत गावातील कज्जे सोडवीत असे.

नाशिक शहरातील धर्मांतर

नाशकातील मिशनचे केंद्र शरणपुरात हलविण्यात आले, तेव्हा ह्या भागातील मिशनऱ्यांच्या कार्याला २४ वर्षे होऊन गेली होती. ह्या २४ वर्षांच्या काळात मिशनऱ्यांना आपल्या धर्मांतराच्या कार्यात किती यश आले ह्याचा आढावा रेव्ह. मेंजे ह्याने घेतला आहे. नाशिक किंवा काशीसारखी हिंदूंची जी धर्मक्षेत्रे आहेत, तेथे साहजिकच ख्रिस्ती धर्मप्रसारकांना ब्राह्मणांकडून विरोध होई. तेव्हा अशा क्षेत्रात धर्मप्रचाराची केंद्रे ठेवणे योग्य नाही असे तेव्हा पुष्कळ मिशनऱ्यांचे मत होते. रेव्ह मेंजे म्हणतो,

'नाशकात मिशन केंद्र २४ वर्षे आहे. एवढ्या प्रदीर्घ अवधीत नाशिकचे फक्त चार रहिवासी ख्रिस्ती झाले. ह्यांतील तिघे मिशनच्या इंग्रजी शाळेचे विद्यार्थी होते आणि चौथा मिशनच्या एका मराठी शाळेतील शिक्षक होता. दाजी पांडुरंग, अप्पाजी बापूजी, रामकृष्ण आणि शंकर नाना ही त्यांची नावे.' शंकर नानाला रामकृष्णानेच ख्रिस्ती बनविले होते.

नाशिक शहरात मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला इतका अल्प प्रतिसाद मिळत असला, तरी मुळीच नाउमेद न होता मिशनऱ्यांनी आपले कार्य चिकाटीने चालूच ठेवले.

खेड्यापाड्यांत प्रसार

नाशिक केंद्रातून मिशनरी जिल्ह्यातील साऱ्या खेड्यापाड्यांतून फिरत. त्या दृष्टीने रेव्ह. फ्रॉस्ट ह्याने फार मोठे कार्य केले. एखाद्या खेड्यात जाऊन आठदहा दिवस मुक्काम करावयाचा, आणि तेथून सकाळी एक व संध्याकाळी एक अशा जवळच्या दोन खेड्यांत जाऊन प्रचार करून घरी परत मुक्कामावर यावयाचे, असा त्याचा कार्यक्रम असे. खेड्यात तो तंबूत राही. तेथे त्याच्यावर अनेक संकटे येत. अनेक अडचणींना त्याला तोंड द्यावे लागे. परंतु त्यांना दाद न देता, नाशिक जिल्ह्यातील लहानात लहान आणि अगदी कोपऱ्यातल्या कोपऱ्यात असलेल्या खेड्याला एकदा तरी भेट द्यावयाचीच असा त्याचा निश्चय होता. दर पाच वर्षांनी त्या खेड्याला पुन्हा भेट द्यावयाची असा कार्यक्रम त्याने आखलेला होता.

एखाद्या खेड्यात मुक्काम ठोकला की तो पहाटे साडेचार वाजता उठे आणि जवळच्या एखाद्या खेड्यात सूर्योदयापूर्वी जाऊन पोहोचे. तेथे लोक गोळा करून तो त्यांच्यापुढे ख्रिस्ती धर्माच्या थोरवीवर प्रवचन करी. दुपारी प्रार्थना करी. नंतर साडेचार वाजता तो पुन्हा दुसऱ्या खेड्यावर जाई. तेथे धर्मप्रचार करून तो आपल्या तंबूवर रात्री साडेआठ वाजता परत येई. त्याने अशा रीतीने चार हजार चौरस मैलांच्या परिसरातील सर्व खेड्यांना भेट दिली.

चमत्कार !

एके दिवशी तो एका खेड्यात असाच बसून प्रवचन करीत होता. प्रवचन संपवून तो उठून उभा राहिला, तेव्हा लोक आश्चर्याने व भीतीने ओरडले, "विंचू ! विंचू !" त्याने वळून पाहिले तर तो बसला होता त्या जागेच्या अगदी जवळ दोन मोठे विंचू होते. ते त्याला चावले नव्हते ह्याचे लोकांना मोठे आश्चर्य वाटले. मग लोकच म्हणाले, "जो पवित्र ग्रंथ वाचतो त्याला विंचू चावतील कसे ?"

रेव्ह. फ्रॉस्टच्या ह्या प्रचारामुळे कोणी ख्रिस्ती झाले नाहीत. परंतु येशूचे नाव लोकांना परिचित व्हावे, त्यांच्यात ख्रिस्ती धर्माविषयी कुतूहल निर्माण व्हावे, ख्रिस्ती तत्त्वांवर त्यांनी विचार करावा एवढाच त्याचा ह्या प्रवासाचा मर्यादित हेतू होता. ख्रिस्ती धर्माची प्राथमिक ओळख खेड्यापाड्यांतून करून देण्यात तो यशस्वी झाला होता. खेड्यापाड्यांतून केव्हा केव्हा लोक त्याला भेटावयास येत आणि जे काही बोलत त्यावरून ह्याचे प्रत्यंतर येई.

म्हातारा खेडूत

एके दिवशी रेव्ह. फ्रॉस्टकडे एक म्हातारा खेडूत आला आणि म्हणाला, "तुम्ही सांगता ते खरं आहे, हे मला पटलं आहे. मी पुष्कळ पावसाळे पाहिले आहेत आणि खूप अनुभव घेतला आहे. आमचा धर्म खोटा, अंधाराचा आहे, आमच्या देवांच्या मूर्ती कुचकामाच्या आहेत; आणि आमचे शास्त्री पंडित आंधळे आहेत हे मला ठाऊक आहे. मी गरीब, अडाणी माणूस आहे, तेव्हा माझ्या ह्या मतांचा मी उघडपणे प्रचार केला तर त्याचा काही उपयोग होणार नाही. परंतु तुम्ही ह्या सत्य मतांचा प्रचार करीत राहा. लवकरच तुमच्या महान सत्यासमोर खोट्याचा पराभव होईल."

असे कोणी भेटले की रेव्ह. फ्रॉस्टला उत्साह येई. परंतु तो नाशिकला फार काळ राहू शकला नाही. त्याची प्रकृती बिघडली आणि त्याला इंग्लंडला परतावे लागले. रेव्ह. फ्रॉस्ट केंब्रिज विश्वविद्यालयाचा रँगलर होता. इंग्लंडात गेल्यावर तो एका कॉलेजचा प्राचार्य झाला.

ख्रिस्तीकरण

नाशकात जरी मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला विशेषसे यश आले नाही, तरी शरणपुरात मात्र त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. दरवर्षी तेथे निदान एका तरी मोठ्या माणसाला ख्रिस्ती बनविण्यात येई. ख्रिस्ती होण्याकरता शरणपुरात जे लोक येत त्यांपैकी बहुसंख्य अडाणी खेडूत असत. पण त्याचबरोबर शरणपुरात काही उच्चवर्णीय ब्राह्मणांनाही ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यात आली. मात्र हे ब्राह्मण नाशिकचे रहिवासी नव्हते. शरणपुरात एका पारश्यालाही ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यात आली. त्याचे नाव रतनजी नौरोजी. तो १८५५ त ख्रिस्ती झाला.

रतनजी ख्रिस्ती झाला तेव्हा अठरा वर्षांचा होता. तो अहमदनगरच्या एका प्रतिष्ठित पारशी कुटुंबातला होता. तेथील सरकारी इंग्रजी शाळेत त्याचे शिक्षण झाले होते. तो आणि त्याचे काही मित्र ह्यांना आपापल्या धर्मापासून समाधान लाभत नव्हते, म्हणून त्यांनी एक सभा स्थापन केली होती. ते मधून मधून एकत्र जमत आणि निराकार परमेश्वराची प्रार्थना करीत. त्यांनी बायबलचा अभ्यास केला, त्यात त्यांचा उद्देश ख्रिस्ती धर्मतत्त्वांचे खंडन करण्याचा होता. ह्याच वेळी अहमदनगरला इंग्लंडहून नेहेमिया पंडित आला होता. त्याने ह्या तरुणांच्या सभेपुढे प्रवचने केली. ती ऐकून ह्या तरुणांचे मतपरिवर्तन झाले आणि त्यांच्यापैकी पुष्कळांना अहमदनगरच्या ख्रिस्ती मिशनने ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. रतनजी नाशिकला राहावयास आला.

९

डेव्हिड लिव्हिंग्स्टन नाशिकमध्ये

रतनजीबरोबरच ल्युकस ह्याला ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यात आली होती. ल्युकस लहान असताना नाशिकच्या रस्त्यावर एका ब्राह्मण मुलाबरोबर भीक मागत फिरत असे. त्याला मिशनऱ्यांनी आणून शरणपुरातील अनाथालयात ठेवले. नंतर त्याने शिक्षक आणि धर्मप्रचारक म्हणून बरीच वर्षे काम केले. पुढे त्याची वुलढाण्याला रेव्हरंड म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याचे संपूर्ण नाव ल्यूकस मालोर्ता जोशी असे होते. त्यावरून तो एखाद्या गरीब ब्राह्मणाचा अनाथ मुलगा असावा असे वाटते. त्याचा मुलगा कॅनन जोशी हा रेव्हरंड झाला. त्याने बायबलचे मराठी भाषांतर केले. त्याबद्दल त्याला मरणोत्तर पारितोषिक देण्यात आले.

खेड्यांतील धर्मांतर

रेव्ह. प्राईसने खेड्यापाड्यांतून कायमचे काळे धर्मप्रसारक ठेवण्याची कल्पना काढली. रेव्ह. फ्रॉस्टने खेड्यांमधून फिरून ख्रिस्ती धर्माची तोंडओळख करून दिलेली होतीच. नाशकाजवळच असलेल्या वडाळा ह्या खेड्यात त्याने एक छोटे घर व शाळा बांधली व तेथे एका काळ्या धर्मप्रचारकाची नेमणूक केली. शाळेत मुलेमुली येऊ लागली. काही वर्षांत तेथील सातजण ख्रिस्ती झाले व इतर अनेकांनी ख्रिस्ती होण्याची तयारी दर्शविली.

मखमलाबाद येथे ल्युकस जोशीची नेमणूक करण्यात आली. हेच रेव्ह. नारायण वामन टिळकांचे गाव. तेथे ल्युकसने बावीस जणांचे धर्मांतर केले.

मखमलाबादेत एक मनोरंजक प्रकार घडला. तेथील एका मुलाला ख्रिस्ती व्हावयाचे होते. परंतु तो वयाने लहान असल्यामुळे व त्याच्या बापाचा विरोध असल्यामुळे पाद्रयाने त्याला ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली नाही. मुलाचा ख्रिस्ती होण्याचा हट्ट पाहून, मिशनऱ्यांपासून त्याला दूर न्यावे असे त्याच्या बापाने ठरविले. त्या मुलाला एका दूरच्या खेड्यात नेऊन ठेवण्यात आले. परंतु तेथून तो मुलगा

पळून मिशनऱ्यांकडे आला. त्याची ख्रिस्ती होण्याची ती दुर्दम्य इच्छा पाहून अर्थातच मिशनऱ्यांना त्याला नकार देता येईना. ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिल्यावर मिशनरी त्याला घेऊन त्याच्या बापाकडे मुलाचा इस्टेटीचा वाटा मागण्याकरता गेला. त्याबरोबर संतापलेले अनेक गावकरी तेथे गोळा झाले. जणू कोणी मेले आहे अशा रीतीने लोकांनी गळा काढून शोक करावयास सुरुवात केली. मुलाचा बाप तर मुलाला बडवायलाच लागला. तेव्हा मिशनऱ्याने गावच्या पाटलाकडे तक्रार केली. पाटलाने मध्यस्थी केल्यावर बाप मारावयाचा थांबला, परंतु आपल्या बाटलेल्या मुलाला आपण आता आपल्या घरात राहू देणार नाही असे त्याने सांगितले. त्याने मुलाला घरातून हाकून दिले आणि मिशनऱ्याने मोठा आनंदाने त्याला शरणपुरातल्या अनाथालयात आणले.

तो म्हातारा

त्यानंतर कित्येक वर्षांनी शरणपुरातल्या मिशनऱ्यांकडे एक म्हातारा माणूस ख्रिस्ती होण्याकरता आला. हा म्हातारा दुसरातिसरा कोणी नसून त्या ख्रिस्ती झालेल्या मुलाला मारणारा त्याचा बापच होता. हा म्हातारा ख्रिस्ती व्हावयास आलेला पाहून मिशनऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला असल्यास नवल नाही. ख्रिस्ती धर्माचा एक कडवा विरोधक ख्रिस्ती होण्याकरता आपण होऊन आला होता ना ! मिशनऱ्यांनी त्याला तत्परतेने ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली हे सांगणे नकोच.

मखमलाबादमध्ये एका थेडेफार शिकलेल्या आणि सुस्थितीतील महाराला ख्रिस्ती करण्यात आले. त्याचे नाव निंबाजी. तो महारांचा म्होरक्या होता. ख्रिस्ती झाल्यामुळे त्याला आपल्या घराला, शेतीवाडीला आणि बायकोला व एकुलत्या एक मुलालाही मुकावे लागले. परंतु अखेरीस त्याची बायको त्याच्याकडे आली. मग तिलाही ख्रिस्ती बनविण्यात आले. पातिव्रत्याचा हिंदू स्त्रियांचा सद्गुण मिशनऱ्यांच्या असा पथ्यावर पडे. मखमलाबादचे ना. वा. टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर कितीतरी वर्ष लक्ष्मीबाई टिळक हिंदू राहिल्या, परंतु अखेरीस धर्मप्रेमापेक्षा पातिव्रत्य आणि पतिप्रेम अधिक बलवान ठरले, हा इतिहासही सर्वश्रुतच आहे.

मखमलाबादमध्ये बरेच महार ख्रिस्ती झाले.

शरणपुरात आफ्रिकन शिद्दी

१८४७ मध्ये मुंबईत बावन्न आफ्रिकन माणसांना आणण्यात आले. त्या काळात अरबांचा गुलामांचा व्यापार चालत असे. आफ्रिकनांना गुलाम म्हणून विकावयास अरब लोक जहाजातून घेऊन येत होते. त्यांची एका इंग्रज युद्धनौकेने सुटका केली होती. युद्धनौकेने त्यांना मुंबईत आणून सोडले खरे, परंतु त्यांचे काय करावयाचे हा सरकारपुढे प्रश्न पडला. परंतु हे अनाथ आफ्रिकन गुलाम पाहून, एक चांगली संधी

चालून आली आहे, असे मिशनऱ्यांना वाटले. ह्या गुलामांना मिशनऱ्यांच्या ताब्यात सांभाळ करण्याकरिता द्यावे अशी विनंती मुंबईच्या बिशपने सरकारला केली.

मुंबईत असलेल्या मिशनऱ्यांत आयसेनबर्ग नावाचा एक मिशनरी होता. त्याने पूर्वी ॲबिसिनियात काम केलेले होते. आणि त्याला ॲबिसिनियन भाषा बोलताही येत होती. आणलेल्या गुलामातले निम्मे लोक हीच भाषा बोलत होते. ह्या गुलामांना राहण्याकरता आयसेनबर्गने लगेच एक घर भाडयाने घेतले आणि त्यांना लागणाऱ्या सर्व सामानाची तरतूद करून ठेवली. ते गुलाम अद्याप युद्धनौकेवरच होते. तेथे आयसेनबर्ग गेला, तेव्हा त्यांतले बरेच गुलाम ॲबिसिनियन ख्रिश्चन आहेत, असे त्याला त्यांच्या नावावरून कळून आले.

आयसेनबर्गने ह्या गुलामांचे स्वागत करण्याची सर्व तयारी करून ठेवली खरी, परंतु सरकारने त्यांना त्याच्या ताब्यात द्यावयास नकार दिला. हे गुलाम मिशनऱ्यांच्या ताब्यात दिले तर मुसलमान रागावतील अशी सरकारला भीती वाटत होती. आणि म्हणून ते गुलाम गावातील हिंदू आणि मुसलमान लोकांना सरकारने वाटून टाकले. तरीपण आयसेनबर्ग त्यांच्यावर नजर ठेवीत असे. पुढील दहा वर्षांत असे सोडवलेले अनेक गुलाम मुंबईत आणण्यात आले. त्यांतले पुष्कळ मिशनऱ्यांनी आपल्याकडे घेतले आणि कित्येकांना त्यांनी ख्रिस्ती बनवले.

आफ्रिकन अनाथालय

१८६० त आयसेनबर्ग शरणपुरला आला. सरकारच्या परवानगीने, मुंबईला त्याच्या ताब्यात असलेले आफ्रिकन गुलाम तो आपल्याबरोबर शरणपुरात घेऊन आला. ह्यात आफ्रिकन मुलांप्रमाणेच मुलीही होत्या. ही आफ्रिकन माणसे शरणपुरात आणल्यावर 'आफ्रिकन अनाथालय' ही नवी संस्था स्थापन करण्यात आली. ह्या संस्थेला सरकारचा पाठिंबा मिळाला.

पहिल्या वर्षी ह्या अनाथालयात २९ मुले होती. आफ्रिकेतील बारा देशांतील ही मुले होती. ह्यांपैकी बारा मुलांना सुतारकाम, लोहारकाम आणि विणकाम शिकविण्यात आले, बाकीच्यांना प्राथमिक मराठी शाळेत घालण्यात आले. सर्वांना रोज इंग्रजीचे धडे शिकविण्यात येत. आफ्रिकन मुलांची संख्या हळूहळू वाढत गेली. १८८५ मध्ये ह्या अनाथालयात ६८ मुले होती.

बारा वर्षांत एकूण २०० मुलांना अनाथालयात घेण्यात आले. अतिश्रमांनी, त्रासाने आणि त्यांच्यावर झालेल्या जुलमाने बहुतेकांची प्रकृती खराब झालेली होती. त्यातले पुष्कळ नंतर मुख्यतः क्षयरोगाने मरण पावले. बाकीचे निरनिराळे उद्योगधंदे शिकून पोट भरण्याकरता बाहेर पडले. ह्या मुलांतील काही उडाणटप्पू निघाली. त्यांना अनाथालयातून हाकून देण्यात आले.

दुर्दैवी गुलाम

मुंबईत असे सोडवलेले अनेक गुलाम आणण्यात येत, परंतु त्यांतील फारच थोडे मिशनऱ्यांच्या ताब्यात येत. ह्या बिचाऱ्या मुलांचा पिच्छा दुर्दैव सोडीत नसे. ही मुले मुंबईतील अरबांच्या हातात सापडत. ते प्रथम त्यांना मुसलमान बनवीत आणि मग त्यांना आपले गुलाम म्हणून वापरीत. काहींची परत गुलाम म्हणून विक्रीही करीत. कित्येक मुंबई-पुण्याच्या झोपडपट्ट्यांतून राहात. ह्या परक्या देशात त्यांना कोणाचाच आसरा नसल्यामुळे त्यांना अनन्वित हालअपेष्टांना तोंड द्यावे लागे.

१८५५ मध्ये सर बार्टल फ्रिअर हा मुंबईचा गव्हर्नर होता. त्याचा मिशनऱ्यांना सहानुभूती आणि पाठिंबा होता. त्याच्यामुळे अनेक आफ्रिकन गुलाम शरणपुरात पाठविण्यात आले. त्याने ह्या आफ्रिकन अनाथालयाला इतर प्रकारेही बरेच साहाय्य केले.

ह्या अनाथालयात आलेल्या मुलांना ख्रिस्ती बनवून त्यांना धर्मप्रचाराचे शिक्षण देण्यात येई. त्यांना परत आफ्रिकेत पाठवून तेथील मिशनमध्ये त्यांचा उपयोग करून घेण्याची मिशनऱ्यांची योजना होती. त्याप्रमाणे १८६४ मध्ये तिघा आफ्रिकनांना मोंबासाला पाठविण्यात आले. त्यांनी तेथे धर्मप्रचाराचे चांगले काम केले.

पुढल्या वर्षी पूर्व आफ्रिकेत दोघांना पाठविण्यात आले. त्यातील एक विल्यम जोन्स नावाचा होता. तो लोहारकाम शिकला होता. दुसरा इस्लाईल सेमलर हा सुतारकाम शिकला होता. दोघांचीही अनाथालयातील आफ्रिकन मुलींशी लग्ने झालेली होती. त्यांच्या बरोबर आणखी दोन मुलीही पाठविण्यात आल्या होत्या. मोंबासात ख्रिस्ती झालेल्या दोघा माणसांशी विवाह करण्याकरता त्यांना पाठविण्यात आले होते.

फ्रिअर टाऊन

सुटका केलेल्या आफ्रिकन गुलामांचे एक नगर पूर्व आफ्रिकेत वसविण्यात आले व त्याचे नाव फ्रिअर टाऊन असे ठेवण्यात आले. ह्यावरून सोडवलेल्या आफ्रिकन गुलामांची पुढची काळजी घेण्यात मुंबईचा गव्हर्नर फ्रिअर ह्याचा वाटा किती मोठा होता ह्याची कल्पना येते. १८७४ मध्ये रेव्ह. प्राईस शरणपुरहून फ्रिअर टाऊनला गेला, तेव्हा सुमारे शंभर ख्रिस्ती आफ्रिकनांनी त्याचे स्वागत केले. ह्यांतील बहुतेक सर्व शरणपुराहूनच तेथे गेलेले होते. त्यानंतर शरणपुरातून गेलेल्या ख्रिस्ती आफ्रिकनांच्या साहाय्याने आफ्रिकेतच मिशन्स उघडण्यात आली आणि मग शरणपुरातील आफ्रिकन अनाथालयाची गरज न उरल्यामुळे ते बंद करण्यात आले.

निग्रो तोंडवळा असलेले काही ख्रिस्ती आजही शरणपुरात दिसतात. ते ह्या आफ्रिकनांचेच वंशज होत.

नाशिक आणि लिव्हिंग्स्टन

प्रख्यात प्रवासी, संशोधक मिशनरी डॉ. डेव्हिड लिव्हिंग्स्टन ह्याचा काही काळ नाशिकशी संबंध आला होता व तो अप्रत्यक्ष रूपात आफ्रिकेत त्याला मृत्यू येईपर्यंत आणि लंडनच्या वेस्टमिन्स्टर ॲबेमध्ये त्याचे दफन करीपर्यंत टिकला होता, ही गोष्ट आपल्याकडे फारच थोड्यांना माहीत असेल. डॉ. डेव्हिड लिव्हिंग्स्टन हा एक स्कॉटिश मिशनरी होता. तो १८४० साली लंडन मिशनरी सोसायटीतर्फे दक्षिण आफ्रिकेत गेला. धर्मप्रचाराबरोबर आफ्रिकेतील अज्ञात भूप्रदेशांचे संशोधन करणे हा त्याचा आवडता उद्योग होता. १८५३ ते १८५६ या दरम्यान त्याने आफ्रिकेत अनेक प्रवास केले आणि तो पूर्व किनाऱ्यावरील क्विलीमेनपर्यंत गेला. याप्रमाणे त्याने सर्व आफ्रिका खंड ओलांडले. त्याच्या ह्या साहसी आणि रोमहर्षक प्रवासाची हकीगत त्याने 'मिशनरी ट्रॅव्हल्स अँड रीसर्चेस इन् साउथ आफ्रिका' या पुस्तकात दिली आहे. नंतर त्याने पुन्हा अनेक प्रवास करून न्यासा सरोवर आणि झँबेझी नदीकाठचा प्रदेश शोधून काढला व नंतर १८६५ साली तो नाइल नदीच्या उगमाचा शोध लावण्याकरता गेला. यानंतर मरेपर्यंत दक्षिण आफ्रिकेतील सरोवरमय प्रदेशांचा आणि विशेषतः न्यासा सरोवर व टँगानिका सरोवर यांच्या पश्चिमेकडील प्रदेशांचा शोध लावण्यात तो गुंतला होता. या वेळी त्याने बँग्वेलो व मोएरो ही सरोवरे आणि आरकाँगो इत्यादी प्रदेश शोधून काढले. या वेळी सुमारे तीन वर्षे तो कोठे आहे, जिवंत आहे की नाही, ह्याचा कोणालाच पत्ता नव्हता. म्हणून त्याचा शोध घेण्याकरता 'न्यूयॉर्क हेरल्ड' चा वार्ताहर एच. एम. स्टॅन्ले याने आफ्रिकेचा प्रवास सुरू केला. तेव्हा टँगानिका सरोवराबरील उजिजी येथे त्याची व लिव्हिंग्स्टनची १८७१ साली इतिहासप्रसिद्ध भेट झाली. स्टॅन्ले परतल्यानंतरही लिव्हिंग्स्टनने आपला प्रवास आणि भूप्रदेश संशोधन चालूच ठेवले. पण आता त्याची प्रकृती अतिशय ढासळली होती. तो अशक्त झालेला होता. लवकरच बँग्वेला सरोवराजवळील इलाला येथे तो मरण पावला. नंतर त्याचे शव इंग्लंडात आणण्यात आले आणि मोठ्या इतमामाने वेस्टमिन्स्टर ॲबे येथे पुरण्यात आले. त्याची बरीच स्मारके झाली आहेत.

शरणपुराहून प्रयाण

१८६५ च्या सप्टेंबर महिन्यात हा जगद्विख्यात प्रवासी शरणपुरला आला होता. येथे तो आफ्रिकन मुलांना पाहावयास आला होता. तो पुन्हा आफ्रिकेच्या प्रवासाला निघणार होता. प्रवासात सोबत म्हणून त्याला काही मुलांची निवड करावयाची होती. त्या वेळी आफ्रिकन अनाथालयात १०८ मुले होती. ती सर्व नसली तरी बहुसंख्य आफ्रिकन होती. ती शिक्षणात चांगली हुषार होती. विशेषतः संगीतात तर ती चांगलीच तरबेज होती. त्याचप्रमाणे त्यांनी निरनिराळ्या व्यवसायांचेही शिक्षण

घेतलेले होते. त्यांतील पुष्कळशी लिव्हिंग्स्टनने पूर्वी भेट दिलेल्या आफ्रिकेतील देशांतली होती.

आपणाबरोबर आफ्रिकेच्या प्रवासाकरता येण्यास कोण तयार आहे, असे लिव्हिंग्स्टनने विचारले, तेव्हा नऊ मुले त्याच्याबरोबर जाण्यास तयार झाली. लिव्हिंग्स्टन नाशकाहून पूर्व आफ्रिकेच्या प्रवासाला निघाला तेव्हा त्याच्याबरोबर १३ शिपाई, १२ इतर माणसे आणि ९ नाशकातील आफ्रिकन तरुण होते. त्याचप्रमाणे चुमा आणि वायकाट्ने ह्या नावाचे दोन आफ्रिकन नोकरही होते. ह्या दोघांची लिव्हिंग्स्टनने १८६१ साली गुलामगिरीतून मुक्तता केलेली होती. त्यानंतर लिव्हिंग्स्टन इंग्लंडला गेला असता, दीड वर्ष ते मुंबईला डॉ. विल्सन ह्यांच्या ताब्यात होते.

शिपायांचा त्रास

ही मंडळी लिव्हिंग्स्टनबरोबर आफ्रिकेच्या प्रवासाला निघाली खरी, परंतु त्याच्या शिपायांनी त्याला त्रास द्यावयास सुरुवात केली. त्यामुळे चारच महिन्यांत लिव्हिंग्स्टनने त्या सर्वांना कामावरून काढून टाकले. ह्या शिपायांनी नाशकाहून घेतलेल्या आफ्रिकन तरुणांनाही फितवण्याचा खूप प्रयत्न केला होता. ह्याच सुमारास नाशकाच्या आफ्रिकनांमधील रिचर्ड नावाचा तरुण मलेरियाने मरण पावला. त्याला तर शिपायांनी इतका त्रास दिला होता की, ह्यापेक्षा मरण आले तर बरे, असे तो मरणापूर्वी थोडेच दिवस त्याच्या एका मित्राकडे बोलला होता. नाशिकच्या आफ्रिकनांना, तुम्हास ठार मारू, असे सांगण्यापर्यंत ह्या शिपायांची मजल गेली होती. १८६६ साली लिव्हिंग्स्टनने सर्व शिपायांना परत पाठवले.

शिपायांनंतर इतर माणसेही हळूहळू गळाली. ही माणसे अट्टल चोरटी होती आणि ती निघून गेल्यावर सुंठीवाचून खोकला गेला असेच लिव्हिंग्स्टनला वाटले.

प्रवासात वायकाट्नेला त्याचा भाऊ भेटला, आणि लिव्हिंग्स्टनच्या परवानगीने तो आपल्या भावाकडे राहावयास गेला. अशी गळती लागता लागता अखेरीस लिव्हिंग्स्टनबरोबर छत्तीसपैकी सातच माणसे राहिली. त्यात सहा नाशिकचे आफ्रिकन होते, आणि सातवा चुमा होता. परंतु ह्यांनाही आजारीपणामुळे आणि रोगांमुळे गळती लागली. त्यातील एकएक जण आफ्रिकेच्या प्रवासात मरण पावला आणि अखेरीस लिव्हिंग्स्टनबरोबर अवघे दोन नाशिककर आफ्रिकन राहिले. दोघे शेवटपर्यंत लिव्हिंग्स्टनशी एकनिष्ठ राहिले.

एकनिष्ठ तरुण

त्यानंतर १८७२ मधे नाशिकमधील आफ्रिकन तरुणांमधून आफ्रिकेला जाण्याकरता आणखी सहा तरुणांची निवड करण्यात आली. इंग्लंडमधून लेफ्ट. डॉवसन ह्याच्या नेतृत्वाखाली लिव्हिंग्स्टनचा शोध करण्याकरता एक स्वारी निघणार होती. त्या स्वारीत ह्या तरुणांचा समावेश होणार होता. आफ्रिकेच्या घनदाट अरण्यातील

हा प्रवास किती धोक्याचा आणि संकटांचा आहे, ह्याची त्या तरुणांना कल्पना देण्यात आली. तेव्हा ते सर्व निश्चयाच्या स्वरात म्हणाले, "काही पर्वा नाही. आमचा स्वामी जेथे देह ठेवील तेथेच आम्हीही मरू." लिव्हिंग्स्टनवर आफ्रिकन तरुणांची एवढी भक्ती होती.

जेकब वेनराइट नावाचा तरुण ह्या सहा तरुणांतील नेता होता. ह्या सहा तरुणांना झांजीबारला पाठवून देण्यात आले. तेथे डॉवसन इंग्लंडहून आपली माणसे घेऊन आला. ह्या स्वारीत एकूण ५३ माणसे होती. १० ऑगस्ट १८७२ रोजी ही मंडळी लिव्हिंग्स्टनला जाऊन भेटली. त्यानंतर लिव्हिंग्स्टनच्या मृत्यूपर्यंत ते सर्व त्याच्याबरोबरच होते.

लिव्हिंग्स्टन १८७३ च्या मेमध्ये मरण पावला. मध्य आफ्रिकेच्या दाट अरण्यातून त्याचे शव इंग्लंडला कसे आणण्यात आले, ह्याचा इतिहास रोमहर्षक आहे.

लिव्हिंग्स्टनचा मृत्यू

तो मृत्यू पावला तेव्हा त्याच्याबरोबर गेलेल्या तरुणांपैकी फक्त पाचच जण राहिले होते. चुमा त्यांचा नेता होता. ह्याला मुंबईत डॉ. विल्सनने खिस्ती बनविले होते. शिवाय ह्या पाचांत दोघे नाशिककर आफ्रिकनही होते. नाशिकहून नंतर आलेल्या सहा तरुणांपैकी एकजण मरण पावला. बाकीचे पाच लिव्हिंग्स्टनच्या शवयात्रेत शेवटपर्यंत होते. ह्यांत जेकब वेनराईट होता. त्याने लिव्हिंग्स्टनच्या प्रवासाची दैनंदिनी ठेवली होती. लिव्हिंग्स्टनच्या मृत्यूची बातमी तारेने इंग्लंडला कळविण्यात आली, तेव्हा वेन्राइटने त्याच्या प्रेताबरोबर इंग्लंडला यावे, असे त्याला कळविण्यात आले.

इंग्लंडला आल्यावर जेकब वेन्राइटने डेव्हिड लिव्हिंग्स्टनच्या शेवटच्या दिवसांची हकिगत सांगितली. ती अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्याच्याबरोबरच्या काळ्या सेवकांनी त्याच्या प्रेताची किती काळजी घेतली आणि त्यांची त्याच्यावर कशी असीम श्रद्धा होती, हेही दिसून येते.

बॅग्वेलो सरोवरानजीक इलाला येथे त्या वेळी लिव्हिंग्स्टनचा मुक्काम होता. एके दिवशी सकाळी जेकबने त्याच्या झोपडीत जाऊन पाहिले तो लिव्हिंग्स्टन खाटेच्या आधाराने गुडघे टेकून बसलेला होता. जेकबने जवळ जाऊन पाहिले तो लिव्हिंग्स्टन मृतावस्थेत असलेला आढळला. जेकबने लगेच इतर सेवकांना बोलावले आणि आता पुढे काय करावयाचे ह्यावर त्यांनी खल केला. तेथेच लिव्हिंग्स्टनला पुरणे सोपे गेले असते. परंतु मग लिव्हिंग्स्टन मरण पावला ही बातमी ह्या काळ्या सेवकांनी दिल्यावर गोरे साहेब त्यावर विश्वास ठेवतीलच, अशी त्यांना खात्री वाटेना. ह्या काळ्यांनीच त्याचे काही बरेवाईट केले नाहीना, अशी गोऱ्यांना शंका आली असती.

आणि मग त्यांच्यावर मोठा कठीण प्रसंग गुदरला असता. गोऱ्या मिशनऱ्यांना बिचारे हे खिस्ती झालेले काळे लोक किती घाबरत, हे ह्यावरून दिसून येते. ह्या अडचणीमुळे अखेरीस लिव्हिंग्स्टनचे शव समुद्रकिनाऱ्यावरील एखाद्या बंदरावर घेऊन जावयाचे असे त्यांनी ठरविले. हा मार्ग फारच अडचणींचा होता. तेथून समुद्रकिनारा पंधराशे मैल अंतरावर होता. एवढे प्रदीर्घ अंतर त्यांना लिव्हिंग्स्टनचे प्रेत घेऊन जावे लागणार होते. त्यातून वाटेत रानटी टोळधा भेटणार होत्या. हे लोक आपल्या राज्यात एखादे प्रेत आणणे म्हणजे तो मोठाच अपशकून मानीत. अशा टोळधांना चुकवत आणि तोंड देत हा अवघड प्रवास करावयाचा होता. परंतु त्यांना दुसरे गत्यंतरच नव्हते, म्हणून लिव्हिंग्स्टनचे प्रेत घेऊन जावयाचे त्यांनी ठरविले.

विलक्षण शवयात्रा

त्यांच्यापैकी एकास प्रेताला मसाला लावण्याची विद्या ठाऊक होती. त्याने त्याप्रमाणे प्रेतात मसाला भरला. त्यांनी लिव्हिंग्स्टनचे हृदय काढून घेतले आणि एका खड्ड्यात ते पुरून त्यावर एक छोटेसे थडगे बांधले. जेकबला इंग्रजी वाचता येत होते. त्याने लिव्हिंग्स्टनचेच बायबल घेतले आणि त्यातून प्रेत पुरताना वाचावयाचा उतारा वाचला, हा विधी चालू असताना सर्वजण माना खाली घालून एक कडे करून उभे होते. विधी संपल्यावर सर्वजण खाली बसले आणि त्यांनी शोक केला. मग त्यांनी इतिहासातील ह्या एकमेव प्रदीर्घ प्रेतयात्रेला प्रारंभ केला.

ते सतत नऊ महिने प्रवास करीत राहिले. त्यांना अनेक अडचणी आल्या. त्यांच्यावर अनेक संकटे आली. परंतु त्या सर्वांना धैर्याने आणि युक्तीने तोंड देऊन त्यांनी हा पंधराशे मैलांचा प्रवास पूर्ण केला. बंदरावर येताच त्यांनी लिव्हिंग्स्टनचे प्रेत इंग्रजांच्या हवाली केले. तेथून ते जहाजातून इंग्लंडात नेण्यात आले, आणि लिव्हिंग्स्टनच्या मृत्यूनंतर जवळ जवळ दोन वर्षांनी, म्हणजे १८ एप्रिल १८७४ ह्या दिवशी, मोठ्या इतमामाने त्याच्या प्रेताचा वेस्टमिन्स्टर ॲबेत दफनविधी करण्यात आला.

दफनविधीच्या वेळी उपस्थित असलेल्या सर्व गोऱ्यांत, एकाच काळ्या आदमीला उपस्थित राहण्याचा मान देण्यात आला होता. तो काळा आदमी म्हणजे जेकब वेनराइट.

अशा रीतीने लिव्हिंग्स्टनच्या शेवटच्या प्रवासात सुरू झालेला नाशिकचा संबंध त्याच्या पार्थिव देहाची विल्हेवाट लागेपर्यंत कायम राहिला.


मराठी ग्रंथालय संघ


REFBK-0024581

श्रीविद्या प्रकाशन

साक्षी इतिहासाची